# मिरा भाईंदर महानगरपालिका

महापालिका सभागृह कार्यालय,
तिसरा मजला,
दि. १२/१०/२००६

आज दि. १२/१०/२००६ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. ०७ दि. ३०/०९/२००६ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

## उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीम. निर्मला बाबुराव सावळे | महापौर |
| २) | श्री. चंद्रकांत सिताराम वैती | उपमहापौर |
| ३) | श्री. मेन्डोसा स्टिवन जॉन | सभापती, स्थायी समिती |
| ४) | श्री. हॅरल जॉर्ज बोर्जीस | सभागृह नेता |
| ५) | श्री. पाटील परशुराम दामोदर | विरोधी पक्षनेता |
| ६) | श्रीम. गोविंद हेलन जॉर्जी | सभापती, पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण समिती |
| ७) | श्रीम. जयाबाई यशवंत भोईर | सभापती, महिला व बालकल्याण समिती |
| ८) | श्रीम. संगिता विजय म्हात्रे | उप-सभापती, महिला व बालकल्याण समिती |
| ९) | श्री. चिंतामण कमलाकर पाटील | सभापती, गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती |
| १०) | श्री. अशोक बळवंत पाटील | सदस्य |
| ११) | श्री. अनंत रामचंद्र पाटील | सदस्य |
| १२) | श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस | सदस्या |
| १३) | श्री. शेख आसिफ गुलाब | सदस्य |
| १४) | श्री. ठाकुर नितिन गोपीनाथ | सदस्य |
| १५) | श्री. म्हात्रे मिलन वसंत | गटनेता |
| १६) | श्री. तिवारी सुरेंद्रप्रसाद मुरलीधर | सदस्य |
| १७) | श्रीम. म्हात्रे नयना गजानन | सदस्या |
| १८) | श्री. अग्रवाल धनराज नंदलाल | सदस्य |
| १९) | श्री. अग्रवाल ओमप्रकाश गंगाधरजी | सदस्य |
| २०) | श्रीम. करंबेळे प्रियांका प्रकाश | सदस्या |
| २१) | श्रीम. गोहिल शानु | सदस्या |
| २२) | श्री. सिंग मदन उदितनारायण | सदस्य |
| २३) | श्री. रोहिदास शंकर पाटील | गटनेता |
| २४) | श्रीम. पाटील प्रभात प्रकाश | सदस्या |
| २५) | श्री. भुदेका शिवप्रकाश प्रल्हादराय | सदस्य |
| २६) | श्री. भोईर गजानन लक्ष्मण | सदस्य |
| २७) | श्री. नलावडे दिनेश दगडू | अध्यक्ष, प्रभाग समिती क्र. ०३ |
| २८) | श्रीम. पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| २९) | श्रीम. पाटील लिला गुरुनाथ | सदस्या |
| ३०) | श्री. पाटील प्रफुल्ल काशिनाथ | सदस्य |
| ३१) | श्री. पाटील जयंत महादेव | सदस्य |
| ३२) | श्री. रविंद्र भीमदेव माळी | गटनेता |
| ३३) | श्री. घरत केशव रामभाऊ | सदस्य |
| ३४) | श्रीम. हसनाळे ज्योत्स्ना जालिंदर ऊर्फ शिंदे पुजा प्रताप | सदस्या |
| ३५) | श्रीम. वाडे जिवी हिरा | सदस्या |
| ३६) | श्री. गावंड आत्माराम बाळाराम | सदस्य |
| ३७) | श्रीम. अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| ३८) | श्री. म्हात्रे परशुराम पद्माकर | सदस्य |
| ३९) | श्री. गावंड हरेश लक्ष्मण | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ४०) | श्री. भोईर सुर्यकांत अनंतराव | सदस्य |
| ४१) | श्रीम. सुरेखा यशवंत गायकवाड | सदस्या |
| ४२) | श्री. मोदी चंद्रकांत भिकालाल | सदस्य |
| ४३) | श्री. खान शफीक अहमद | सदस्य |
| ४४) | श्रीम. उमा विश्वनाथ सपार | सदस्या |
| ४५) | श्रीम. फॅरो ग्रिटा स्टीफन | सदस्या |
| ४६) | श्री. रोहिदास आत्माराम पाटील | सभापती, आरोग्य परिरक्षण समिती |
| ४७) | श्रीम. मेंडोंसा मायरा गिल्बर्ट | प्रथम महापौर |
| ४८) | श्री. पाटील अशोक पांडुरंग | सदस्य |
| ४९) | श्री. कोलासो लिओ इजिदोर | अध्यक्ष, प्रभाग समिती क्र. ०१ |
| ५०) | श्रीम. जेन्वी युस्टस आल्मेडा | सदस्या |
| ५१) | श्रीम. ऊर्मिला कोमल भामरे | सदस्या |
| ५२) | श्री. घोन्सालवीस जोजफ जॉन | सदस्य |
| ५३) | श्री. कोलासो जेम्स इजिदोर | सदस्य |
| ५४) | श्रीम. जैन गिता भरत | सदस्या |
| ५५) | श्री. रॉड्रिक्स मॉरस जोजफ | सदस्य |
| ५६) | श्री. शशिकांत रतिलाल शहा | सदस्य |
| ५७) | श्रीम. शाह रिटा सुभाष | सदस्या |
| ५८) | श्रीम. चौहाण महेंद्रसिंग | अध्यक्ष, प्रभाग समिती क्र. ०२ |
| ५९) | श्रीम. नरावत भवरीकुंवर चेनसिंह | सदस्या |
| ६०) | श्री. पाटील रतन कृष्णा | गटनेता |
| ६१) | श्री. पाटील शरद केशव | सदस्य |
| ६२) | श्रीम. गोयंका सुधा लक्ष्मीकांत | सदस्या |
| ६३) | श्री. मोहन मधुकर पाटील | सदस्य |
| ६४) | श्री. शशिकांत जगन्नाथ भोईर | गटनेता |
| ६५) | श्रीम. मुक्ता प्रविण रांजणकर | सदस्या |
| ६६) | श्री. प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| ६७) | श्रीम. नाईक शुभांगी सिताराम | सदस्या |
| ६८) | श्री. मेहता नरेंद्र | सदस्य |
| ६९) | श्री. तुळशिदास दत्तु म्हात्रे | सदस्य |
| ७०) | श्रीम. शाह रक्षा एस. | सदस्या |
| ७१) | श्री. पाटील मिलन गोविंदराव | सदस्य |
| ७२) | श्री. ठाकूर प्रकाश पांडुरंग | नामनिर्देशित सदस्य (सभापती, शिक्षण मंडळ) |
| ७३) | श्री. दुबोले प्रकाश शंकर | नामनिर्देशित सदस्य |
| ७४) | श्री. पांगे संजय नारायण | नामनिर्देशित सदस्य |
| ७५) | श्री. सुवर्णा रोहित मोहनचंद्र | नामनिर्देशित सदस्य |
| ७६) | श्री. टेरी पॉल परेरा | नामनिर्देशित सदस्य |

## गैरहजर सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. पांडे हंसु कमलकुमार | गटनेता |
| २) | श्री. कुरेशी याकुब इस्माईल | सदस्य |
| ३) | श्रीम. पाटील भानु भगवान | सदस्या |
| ४) | श्री. पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सदस्य |
| ५) | श्रीम. जानी कैलासबेन दिनेशचंद्र | सदस्या |
| ६) | श्री. जैन रमेश धरमचंद | सदस्य |

## रजेचा अर्ज दिलेले सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. आसिफ गुलाम पटेल | सदस्य |
| २) | श्रीम. सय्यद नुरजहाँ नझरहुसेन | अध्यक्षा, प्रभाग समिती क्र. ०४ |

**मा. महापौर :-**

सचिवजी सभेला सुरुवात करावी.

(''वंदे मातरम'' या राष्ट्रगीताने सभेला सुरुवात करण्यात आली.)

**मा. महापौर :-**

नमस्कार, १२ ऑक्टोंबर, २००६ रोजीची मा. महासभा महानगरपालिकेच्या सभागृहात उपस्थित असलेले या शहराचे मा. उपमहापौर श्री. चंद्रकांत वैतीजी, मा. आयुक्त सुदामराव गायकवाड साहेब, मा. सभागृह नेते हॅरल बोर्जीस, स्थायी समितीचे नवनिर्वाचित सभापती स्टीवन मेंन्डोसा साहेब, विरोधी पक्ष नेते, परशुराम पाटील, सर्व पक्षाचे गटनेते, माजी महापौर मायराजी मेन्डोसा मॅडम तसेच सर्व नगरसेवक नगरसेविका सर्व प्रभाग समितीचे अध्यक्ष, सर्व समित्यांचे महानगरपालिका सचिव हरेश पाटील, सर्व सन्मा. उपायुक्त आणि सर्व खात्यांचे अधिकारी सर्व वृत्तपत्राचे प्रतिनिधी व प्रेक्षक गॅलेरीत बसलेले नागरिक बंधु आणि भगिनींनो. बुधवार दि. २७/९/२००६ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या स्थायी समितीच्या सभापती पदाच्या निवडणूकीत श्री. स्टीवन मेन्डोसा यांची बिनविरोध निवड झाली. सभागृहाच्यावतीने त्यांचे हार्दिक अभिनंदन करते. मिरा भाईंदर शहरातील लोकसंख्येत मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. महानगरपालिका नव्याने अस्तित्वात आली असल्याकारणाने शहरातील नागरिकांना आवश्यक असलेली मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी मोठ्या प्रमाणात निधीची आवश्यकता आहे. या विषयाबाबत दि. १० ऑक्टोबर २००६ रोजी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा. श्री. आदरणीय विलासरावजी देशमुख, राज्याचे उपमुख्यमंत्री यांच्या दालनामध्ये मुंबई, मंत्रालय येथे केंद्र शासनाच्या जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुर्ननिर्माण अभियान तसेच, लहान व मध्यम शहराच्या पायाभुत सुविधांचा विकास कार्यक्रम या विषयाअंतर्गत बैठक आयोजित केली होती. या बैठकीमध्ये पुढील येणाऱ्या २५ वर्षाची आवश्यकता लक्षात घेता महानगरपालिकेचे खाली शहरविकास प्रकल्पाची सी.डी.पी. तयार करुन मुख्यमंत्री महोदयांच्या पुढे सादर करण्यात आली. रस्ते विकास प्रकल्प ३०९ कोटी, परिवहन प्रकल्प २५ कोटी, पाणीपुरवठा प्रकल्प ५८५ कोटी, मलनिःसारण प्रकल्प ३४३.७४ कोटी, भूमिगत गटारे प्रकल्प २२२.२६ कोटी, नियोजित झोपडपट्टी पुर्नःविकास प्रकल्प ११.१० कोटी, घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प ७४.७४ कोटी, नाट्यगृह, शाळा, कॉलेज, तंत्रशिक्षण, हॉस्पिटल, स्टेडीयम, उद्याने, वाचनालय व इतर प्रकल्पासाठी ३५३.८५ कोटी असे एकूण मिरा भाईंदर शहराच्या विकासासाठी १,९२५.१७ कोटीची ही सी.डी.पी. आम्ही मुख्यमंत्री साहेबांसमोर सादर केली. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या शहराचा खर्च १,९४५.१७ कोटीचा नियोजित प्रकल्प आदरणीय मुख्यमंत्री महोदय ह्यांच्यापुढे सादर केला. मुख्यमंत्री ह्यांनी सदर प्रकल्प राबविण्याबाबत, केंद्रशासन, राज्यशासन व स्थानिक स्वराज्य संस्था यांच्यातील त्रिपक्षीय करारपध्दतीने मंजुर करुन केंद्रशासनाकडे पुढील मंजुरीकरिता प्रस्ताव पाठविण्यात आला. मिरा भाईंदर शहराला जवाहरलाल नेहरु योजनेचा निधी लवकरात लवकर उपलब्ध करुन देण्याबाबत सदर बैठकीत आदरणीय मा. मुख्यमंत्री महोदय यांना मी निवेदन सादर केले असता, सदर निधी मिरा भाईंदर शहराला आम्ही लवकरच उपलब्ध करुन देऊ असे मा. मुख्यमंत्री साहेबांनी आम्हाला आश्वासन दिले. मिरा भाईंदर शहराची लोकसंख्या झपाट्याने वाढत असून मिरा भाईंदरमध्ये जनगणने प्रमाणे ५ लाख २० हजार लोकसंख्येचा पट जरी असला तरी वाढती मुळसंख्या ८ लाखापेक्षा अधिक आहे. त्यामुळे ८६ एम.एल.डी. पाणी हे मुबलक पाणी नाही. त्यामुळे सतत शहरामध्ये होणारी पाणी टंचाई, शहरामधील नागरिकांच्या पाण्यासंबंधित, शहरामध्ये सतत होणारी पाणी टंचाई यामुळे मिरा भाईंदर शहरातील नागरिकांनी आदरणीय गणेशजी नाईक साहेब यांच्याकडे सतत पत्रव्यवहार करुन पाण्याची सतत मागणी केली. तसेच या शहराचे प्रथम नेते नगराध्यक्ष गिल्बर्ट मेन्डोसा साहेब, यांच्याकडे ही सतत समस्या ठेवल्या. तसेच, आमचे कॉंग्रेसचे आमदार आदरणीय मुझफ्फर साहेब यांच्याकडे ही सर्व पक्षांनी मिळून मागणी केली. अशाप्रकारे शहरामध्ये पाण्याची वाढती टंचाई व महापौर म्हणून माझ्याकडे ही पाणी समस्या सोडविण्याची फार मोठी जबाबदारी माझ्यावर येऊन पडली म्हणून महापौर झाल्यापासूनच डिसेंबर महिन्यात १२ तारखेला २००५ या दिवशी आदरणीय पालकमंत्री गणेशजी नाईक साहेब तसेच, आदरणीय नामदार जलसंपदा मंत्री अजितदादा पवार साहेब यांच्याकडे वर्षातुन चारवेळा पत्रव्यवहार केल्यानंतर तसेच, प्रत्यक्ष ऑगस्ट महिन्यामध्ये जाऊन त्यांना प्रत्यक्ष पत्र देऊन भेटल्यानंतर त्यांनीही आपल्याला पाण्याची टंचाई कल्याण शहरानंतर मिरा भाईंदर शहराची पाण्याची टंचाई लवकरच दुर करु असे अश्वासन दिले आणि गेल्या तीन तारखेला ही सभा त्यांनी लावली आणि त्यांच्या दालनामध्ये आदरणीय आयुक्त महोदय उपस्थित होते. तसेच, सभागृह नेते श्री. हॅरल बोर्जीस, जिल्हाध्यक्ष श्री. मोहन पाटील तसेच स्थायी समितीचे सभापती श्री. स्टीवन मेन्डोसा व नगरसेवक आसिफ शेख यांच्या उपस्थितीमध्ये व तेथील विविध जलसंपदाच्या खात्याचे अधिकारी, इतर स्टेमचे अधिकारी यांच्या समवेत श्री. अजितदादा पवार यांच्या दालनामध्ये मिटींग झाली. राज्यमंत्री पाटबंधारे तसेच, पालकमंत्री गणेशजी नाईक राज्य उत्पादक शुल्क व पर्यावरण कामगार मंत्री यांच्याकडून ह्या सभेचे पुढे पाठपुरवठा केल्यानंतर ३५ एम.एल.डी. पाण्याची मागणी त्यांनी त्यांच्या दालनात उचलून धरली आणि कुठल्याही परिस्थितीत लवकरात लवकर दोन ते तीन महिन्यात मिरा भाईंदर शहराला ३५ एम.एल.डी. पाणी मंजुर करुन दिले आणि आजच्या दिवशी त्यांच्याकडील सभेचे इतिवृत्तांत आपल्याला प्राप्त झालेले आहे आणि ही मागणी त्यांनी मंजुर केलेली आहे. गेल्याच महिन्यात मिरा भाईंदर महानगरपालिकेची जी मा. महासभा झाली त्याच्यामध्ये आपण एक धोरणात्मक निर्णय घेतला.

सभागृहाचे सर्व अधिकारी, सर्व पदाधिकारी, सर्व सदस्य यांचे मी अभिनंदन करते की, आपल्या मिरा भाईंदर महानगरपालिकेची जी ५५ कोटीची मागणी होती. या मागणीसाठी शहरामध्ये जनतेने मिरा भाईंदर शहराची आर्थिक परिस्थिती सुधारावी म्हणून लवकरात लवकर घरपट्टी भरावी म्हणून आपण जी करामध्ये जी सुट दिलेली आहे की, १५ दिवसाच्या आत बिल मिळाल्यापासून पाच टक्के तर एका महिन्यात बिल भरणाऱ्याला तीन टक्के सुट आपण मंजुर केली होती. त्यानुसार आतापर्यंत या कर भरण्यामध्ये १५ दिवसाच्या आत आणि एक महिन्याच्या आत अशाप्रकारे आपण जी सवलत दिली. या योजनेचा नागरिकांनी चांगल्याप्रकारे फायदा घेतलेला आहे. जवळ जवळ ७ कोटी ९४ लाख ४८ हजार ५९२.३८ इतक्या प्रमाणात मिरा भाईंदरमध्ये कर वसुली झालेली आहे. जनतेने चांगल्याप्रकारे फायदा घेतलेला आहे. यावरुन आपल्याला असे चित्र दिसते की, मिरा भाईंदर शहरामध्ये यावर्षी चांगल्याप्रकारे लवकरात लवकर कर वसुली होईल. दिवाळी व ईद सण जवळ असून सणानिमित्त सर्वांना हार्दिक शुभेच्छा. महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांना दिवाळी सानुग्रह अनुदान देण्याबाबत बुधवारी दि. ११/१०/२००६ रोजी महापौर दालनामध्ये झालेल्या बैठकीत उपस्थित असलेले स्थायी समिती सभापती स्टीवन मेन्डोसा, प्रभाग समिती क्र.१ चे अध्यक्ष लिओ कोलासो साहेब, उपायुक्त श्री अजीज शेख साहेब, सहा. आयुक्त श्री. केसरीनाथ म्हात्रे, व संजय गोखले व इतर उपस्थित असलेले युनियन लेबरचे अध्यक्ष प्रभाकर आडेलकर व इतर कामगार युनियनचे अध्यक्ष यांच्या उपस्थितीत बैठक घेण्यात आली व गेल्यावर्षी ज्याप्रमाणे आपण त्यांना सानुग्रह अनुदान साडे चार हजार रुपये देण्यात आले होते. यावर्षी त्यांनी हे अनुदान वाढीव प्रमाणात द्यावे व आमची मागणी मान्य करावी असे आमच्या पुढे निवेदन सादर केले. आपल्या सभागृहापुढे त्यांचे निवेदन सादर करुन आपण सर्वांनी, सर्व सदस्यांनी या विषयावर चर्चा घडवून आणून योग्य तो निर्णय घ्यावा. यावर्षी दिवाळी सानुग्रह अनुदान कर्मचारी, अधिकारी यांना वेळेवर मिळणेकरिता आज आपण ही मा. महासभा लवकर आयोजित केलेली आहे. दिवाळी सानुग्रह अनुदान, रस्त्याचे नामकरण तसेच काजुपाडा-घोडबंदर येथील प्रकल्पग्रस्तांना महानगरपालिकेच्या आस्थापनेवर कायमस्वरुपी नेमणूक करणेबाबत. या विषयावर आपण सर्व एकत्रित निर्णय घेऊ व ही सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडावी आणि आपण मला पूर्णपणे सहकार्य कराल अशी मी अपेक्षा करते. धन्यवाद नमस्कार.

(नगरसचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले. त्याच्याबरोबर शुध्दीपत्रकाचेही वाचन केले.)

**नगरसचिव :-**

मा. महापौर मॅडम यांनी घोषित केल्याप्रमाणे नवनिर्वाचित सभापती मा. स्टीवन जॉन मेन्डोसा यांना मा. महापौर मॅडम पुष्पगुच्छ देऊन सत्कार करित आहे.

(मा. महापौरांनी सन्मा. श्री. स्टीवन मेन्डोसा यांना सभागृहासमोर पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.)

**नगरसचिव :-**

तसेच आजच्या मा. महासभेत नविन तीन अधिकारी आपल्याकडे हजर झालेले आहेत. त्यांनी प्रत्येकांनी स्वतः ओळख करुन द्यावी.

**महेंद्रसिंग चौहान :-**

सचिव महोदय, यह अधिकारी किसके जगह पर आए हुए है यह रितसर बताईए। पहिले आप बताईए, बादमे उनसे पुछीए। किनकी जगह पर रिप्लेसमेन्ट हुए है?

**नगरसचिव :-**

डॉ. रुंदन राठोड हे मुख्य आरोग्य अधिकारी म्हणून आपल्याकडे आलेले आहेत. ते आपली ओळख करुन देत आहेत.

**डॉ. रुंदन राठोड :-**

मी मेडिकल आणि हेल्थ ऑफिसर, वैद्यकिय आरोग्य अधिकारी म्हणून ४ तारखेला रुजु झालो आहे. इथली पोस्ट खाली होती आणि ठेक्यावर डॉ. पडवळ म्हणून होते. त्या रिक्त जागेवर मी रुजु झालेलो आहे. या आधी वर्धा येथे जिल्हा आरोग्य अधिकारी म्हणून कार्यरत होतो.

**मा. उपमहापौर :-**

मा. महापौर मॅडमची परवानगी घेऊन बोलत आहे की, आत्ताच मा. महापौरांचे जे अभिभाषण झाले. त्याच्यामध्ये वाचताना महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री म्हणून असा उल्लेख केला त्याजागी मुख्यमंत्री अशी सुधारणा करावी आणि मा. महापौरांनी सांगितले की, आपल्याला आपण १९३५ कोटी रुपयाची मंजुरी घेतली. परंतु, आपण तो प्रस्ताव सादर केला असे म्हणण्यापेक्षा या सभागृहाने केंद्र शासनाची जी योजना आहे, जवाहरलाल नेहरु नॅशनल अरबन रिन्युअल मिशन हा ठराव सहा महिन्यापूर्वी या सभागृहाने पारित केलेला आहे आणि त्यांची मागणी होती त्याला अनुसरुन टंडन समितीने या शहराचा जो टी.डी.पी. तयार केलेला आहे. डेव्हलपमेन्ट ज्या सांगितल्या आहेत त्याचा अहवाल आपण सादर केला असे आपण बोलला असता. या सभागृहाने सर्वानुमते पारित केलेला तो ठराव होता. त्याला अनुसरुन ही केंद्रशासनाची योजना आहे ही राज्यशासनाची योजना नव्हे आणि या योजनेसाठी केंद्रशासन ३५ टक्के आणि राज्यशासन १५ टक्के रक्कम देणार असून ५० टक्के रक्कम आपल्याला रोख्यातुन किंवा शेअरमधून किंवा कर्जरुपाने महापालिकेला, स्थानिक स्वराज्य संस्थेला उपलब्ध करायची आहेत. सदस्यांमध्ये हा गैरसमज होईल की, आपण १९३५ कोटी

रुपये मागितले तर ते पूर्ण मंजुर झाले आहेत काय? तर आपल्याला ती रक्कम पूर्ण मंजुर झालेली नाही. आपण त्या निवेदनामध्ये दुरूस्त्या करुन घ्याव्यात.

**रोहिदास पाटील :-**

नोव्हेंबर महिना असे वाचले तर ते ऑक्टोबर महिन्यातील आहे. पण मा. महापौर मॅडम, यांच्याकडून चुकीने नोव्हेंबर महिना असे वाचले गेले आहे. ती ही दुरूस्ती करावी.

**प्रकाश दुबोले :-**

मा. महापौर मॅडम, या ठिकाणी आपण आता जे निवेदन केले व मा. उपमहापौर यांना जे निवेदन केलेले आहे. या मिरा भाईंदर शहराच्या विकासासाठी सर्व सदस्यांचे यामध्ये योगदान आहे आणि आपल्या महानगरपालिकेच्यावतीने आपण प्रतिनिधी म्हणून त्या सभेसाठी मा. मुख्यमंत्री साहेब जे एम.एम.आर.डी.ए चे अध्यक्ष आहेत. त्यांच्याकडे ही सभा झाली. यासाठी एम.एम.आर.डी.ए चा जो फंड आहे. हा फंड फक्त मुंबईपुरता मर्यादित होता. परंतु, तो ठाणे जिल्ह्याच्या महानगरपालिकेलाही लागू व्हावा. कारण सर्व कामकाज आहे हे एम.एम.आर.डी.ए च्या अखत्यारित याठिकाणी चालते. म्हणून ठाणे जिल्ह्याला तो निधी मिळावा. या ठाणे जिल्ह्यातील महानगरपालिका त्यामध्ये वर्ग व्हाव्यात यासाठी सर्व प्रतिनिधी आणि ठाणे जिल्हा पालकमंत्री यांनी वेळोवेळी पाठपुरावा केल्यानंतर आपल्या महापालिकेला त्यात सामावून घेण्याचा विचार झाला आणि त्यादृष्टीने मा. मुख्यमंत्री साहेबांच्या समोर जी मिटींग झाली त्यामध्ये ठाणे जिल्हा पालकमंत्री, महापौर, उपमहापौर, महापालिकेचे आयुक्त साहेब हे हजर होते आणि १९३५ कोटीचे प्रस्ताव सादर झाले त्यामध्ये जवाहरलाल नेहरु योजनेत भुयारी गटार, डी.पी.चे रस्ते, पाणी पुरवठा योजना, नैसर्गिक नाले, परिवहन सेवा, घनकचरा व्यवस्थापन, गलिच्छ वस्ती सुधारणा यासाठी जो काही निधी होता. त्यासाठीचा प्रस्ताव आपण तयार केलेला आहे. तो जवळजवळ १९३५ कोटीचा प्रस्ताव आपण शासनाकडे सादर केलेला आहे आणि त्याला शासनाने मान्यता दिलेली आहे. हा प्रस्ताव सादर करताना मा. आयुक्त महोदयांनी चांगली कसरत केली आणि एक स्टेप पुढे जाऊन ती सी.डी. प्रत्यक्ष देऊन इतर महापालिकेच्या पुढे आपली महापालिका येईल आणि त्याठिकाणी आपण सर्व प्रतिनिधींनी आणि आयुक्त साहेबांनी दाखवून दिले. त्याबद्दल आम्ही आपले याठिकाणी आभार मानतो आणि त्याचप्रमाणे मिरा भाईंदर शहराची पाण्याची अडचण बघून महाराष्ट्र शासनाने मा. अजितराव पवार साहेबांच्या नेतृत्वाखाली जी सभा झाली त्यामध्ये ३५ दशलक्ष पाणी मंजुर झाले त्याबद्दल मी मा. मुख्यमंत्री साहेब, मा. उपमुख्यमंत्री साहेब, ठाणे जिल्हा पालकमंत्री, मा. महापौर साहेब, मा. उपमहापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, मा. मुझफ्फर हुसैन साहेब, मा. गिल्बर्ट शेठ यासर्वांचे मी याठिकाणी अभिनंदन करत आहे.

**नगरसचिव :-**

दुसरे अधिकारी मुख्य शहर अभियंता श्री वाणी साहेब ते आपली ओळख करुन देत आहेत.

**जोजफ घोन्सालवीस :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलत आहे की, मुख्य आरोग्य अधिकारी............

**रिटा शाह :-**

आमचेही आपण ऐकून घ्या ना.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपण असून घ्या. एकएकाला बोलण्याची संधी दिली जाईल. सचिवजी पुढील विषयाला सुरुवात करावी.

**नगरसचिव :-**

अधिकारी स्वतःची ओळख करुन देत आहेत.

**जोजफ घोन्सालवीस :-**

डॉ. राठोड ह्यांची मुख्य आरोग्य अधिकारी म्हणून ओळख करुन दिली तर त्यांच्याकडे ते डिपार्टमेन्ट सुपुर्द केली का? आतापर्यंत कमिशनर साहेब, उपकमिशनर श्री. अजीज शेख साहेब यांच्याकडे जी खाती होती ती त्यांच्याकडे सुपुर्द केली का?

**शुभांगी नाईक :-**

मा. महापौर मॅडम, आपण डॉ. राठोड साहेबांना आपण कोणकोणते अधिकार दिलेले आहेत? ते समजावून सांगा. त्यांना अधिकार दिले आहेत किंवा नाही किंवा कोणते अधिकार दिले आहेत?

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्यांनी जे प्रश्न सभागृहामध्ये उपस्थित केलेले आहेत त्या बाबतीमध्ये खुलासा करु इच्छितो की, डॉ. राठोड हे ४ तारखेला रुजु झालेले आहेत आणि ४ तारखेला आपण त्यांना हजर करुन घेतलेले आहे. आपल्या शहरामध्ये आणि संबंध देशामध्ये जे काही साथींच्या रोगाची लागण झालेली आहे. त्या साथीच्या रोगाची लागण ही मिरा भाईंदरमध्येसुध्दा आहे आणि त्यादृष्टीने ते आल्याबरोबर त्यांना प्रथम काम जबादारीने सांगितलेले असेल की, हे जे साथीचे रोग निर्माण झालेले आहेत किंवा पसरलेले आहेत. तर त्याबाबत आपण तातडीने पहिल्यांदा नियंत्रण करा आणि त्याच्यानंतर मग बाकीचा जो कार्यभार आहे तो कार्यभार त्यांच्याकडे सुपुर्द करण्यात येणार आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

साहेब, त्यांची अशी तक्रार आहे की, त्यांच्याकडे साफसफाई हा भाग येत नाही व त्यांचा कार्यभार त्यांच्याकडे सुपुर्द केले नसल्यामुळे त्यांची अडचण होते तर पहिल्यांदा त्यांच्याकडे खाती द्या व नंतर त्यांना सांगा की, हे काम करा.

**मा. आयुक्त :-**

अडचण काही नाही.

**शुभागी नाईक :-**

साहेब, अडचण काही नाही. हे आपण कसे बोलता.

**एस. ए. खान :-**

आपण त्यांना खुर्ची आणि केबिन दिली आहे का नाही?

**शुभागी नाईक :-**

त्यांनी म्हटले आहे की, आम्हाला काही अधिकार नाही.

**एस. ए. खान :-**

त्यांना केबिन दिल्यानंतरच त्यांना अधिकार मिळणार ना. डॉ. राठोड यांना खुर्ची व केबिन देण्यात आली आहे का? त्याचा खुलासा करावा. त्यांना बसायची जागाच दिली नाही तर ते आपल्या अधिकाराचा वापर कसा करणार?

**जोजफ घोन्सालवीस :-**

आपण त्यांना पहिल्यांदा ते सर्व अधिकार द्या.

**एस. ए. खान :-**

त्यांना बसायला पहिल्यांदा खुर्ची आणि केबिन द्या ना.

**जोजफ घोन्सालवीस :-**

साहेब, खुर्ची दिली, टेबल दिले म्हणून अधिकारी झाले असे नाही. त्यांना सगळं द्यायला पाहिजे.

**शुभागी नाईक :-**

त्यांना बसायला खुर्ची दिलेली नाही.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्यांनी खाली बसावे.

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, मा. महासभा दि. २०/९/२००६ रोजी मा. उपमहापौर चंद्रकांत वैती साहेब व काँग्रेस पक्षाच्या सर्व नगरसेवकांनी पाण्याबद्दल लक्षवेधी पारित केली होती आणि त्या लक्षवेधीमध्ये काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, बी.जे.पी. शिवसेना सर्व नगरसेवकांनी अपक्ष, जनता दल.............

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्या विषयाला सुरुवात होऊ द्या. मग मी आपल्याला बोलायची संधी देते.

**रिटा शाह :-**

मॅडम, सर्वांनी त्या विषयावर पोटतिडकीने निर्णय घेतलेला होता आणि आपणसुध्दा त्याच्यावर रुलिंग दिले होते. मॅडम, त्यामध्ये आपला अपमान झालेला आहे. आपण रुलिंग दिले होते की, पुढच्या मा. महासभेत आपण तो विषय घेऊ आणि आपण त्या विषयावर चर्चा करुन निर्णय घेऊ. परंतु, आपला अवमान करुन विषयपत्रिकेवर विषय घेतलेला नाही. त्याचा आम्ही प्रशासनावर निषेध व्यक्त करतो आणि पुढच्या मा. महासभेत आम्ही याविषयावर चर्चा करणार अशी मी सुचना करत आहे.

**एस. ए. खान :-**

मॅडम, मागच्या सभेमध्ये आपण सांगितलेले होते की, रितसर विषय घेण्यात येईल. पण तो विषय घेण्यात आलेला नाही.

**नगरसचिव :-**

शहर अभियंता श्री. वाणी साहेब हे ओळख करुन देत आहेत.

**मिलिंद वाणी :-**

नमस्कार. मी मिलिंद वाणी, शहर अभियंता या पदावर आलो आहे. श्री. वैरागडे साहेब, रिटायर्ड झाले आणि माझी शासनाने येथे नियुक्ती केलेली आहे. मी अगोदर धुळे महानगरपालिकेत शहर अभियंता म्हणून काम करत होतो. धन्यवाद.

**नगरसचिव :-**

मुख्य लेखापरिक्षक श्री. बनसोडे साहेब आपली ओळख करुन देत आहेत.

**महेंद्रसिंग चौहान :-**

शहर अभियंता की क्वॉलिफिकेशन क्या है यह बताइए।

**मिलिंद वाणी :-**

सर, मैने बी.ई. सिव्हिल किया है और उसके बाद एम.ए. सोशोलॉजी भी किया है।

**सुरेश बनसोडे :-**

सर्वप्रथम मी मा. महासभेस अभिवादन करतो. तसेच, मा. महापौर, मा. उपमहापौर, मा. आयुक्त साहेब यांनाही अभिवादन करतो. माझे नाव सुरेश क. बनसोडे माझे शिक्षण बी.ई. सिव्हिल झालेले आहे. मी महाराष्ट्र शासनाचा वित्त लेखासेवाचा वर्ग-१ चा अधिकारी आहे. याआधी मी मंत्रालयामध्ये अन्न नागरी पुरवठा विभाग येथे सहा. संचालक म्हणून काम करत होतो. ग्रामविकास व जलसंवर्धन विभाग येथे देखील सहा. संचालक म्हणून काम करत होतो. तसेच, याआधी मी उल्हासनगर महानगरपालिका येथे मुख्य लेखापरिक्षक या पदावर कार्यरत होतो. आता मी श्री. नाकाडी साहेब यांच्या जागेवर जी रिक्त जागा झाली. तिथे माझी मुख्य लेखापरिक्षक म्हणून नियुक्त करण्यात आलेली आहे आणि मी देखील मनापासून काम करेन अशी ग्वाही देतो. तसेच, या कामी मला आपलेही सहकार्य अपेक्षित आहे. धन्यवाद.

**मा. महापौर :-**

भाईंदर शहर जिल्हा काँग्रेस कमिटी - श्री. तुळशीदास म्हात्रे यांचे पत्र आलेले आहे. महासभेच्यावेळी राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या गोटात स्थान मिळविण्याबाबत.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आपण आपले धन्यवाद आपणच करुन घेतले. आम्हालाही धन्यवाद करायला मौका द्या ना. आपण असे का करता? आपण वाचन केले, आम्हाला बोलू द्या. मग कामकाज चालू करा. अधिकाऱ्यांची ओळख झाली.

**नगरसचिव :-**

हे पत्र आलेले आहे.

**रोहिदास पाटील :-**

मघाशी आपण जे वाचले त्याच्यावर बोलायचे. त्या उलट्या बोलल्या. तुमचा निषेध केला असे नाही. आम्हालाही बोलायचा मौका द्या ना. आता आपण काय चालू करता.

**मा. महापौर :-**

हा दुसरा विषय आहे.

**रोहिदास पाटील :-**

कोणता?

**मा. महापौर :-**

आपण बसून घ्या मी सांगते.

**रोहिदास पाटील :-**

पहिल्यांदा जे बोलले तो विषय पूर्ण करायचा नाही का?

**मा. महापौर :-**

आपल्याला बोलायची संधी देण्यात येईल. मी बोलल्यानंतर आपण बोला.

**रोहिदास पाटील :-**

आम्ही आपलेही अभिनंदन करतो, मा. आयुक्तांचेही अभिनंदन करतो. पण आम्हाला काय मागायचे असेल ते मागतो.

**मा. महापौर :-**

आपण आपले म्हणणे मांडा. आपल्याला वेळ दिली जाईल. मा. महासभेच्या वेळी राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या गोटात स्थान मिळणेबाबत. काँग्रेसमध्ये प्रवेश केलेले श्री. प्रफुल्ल पाटील, श्री. शशिकांत भोईर, श्रीम. लिलाताई पाटील, श्रीम. सुधा गोयंका यांनी रितसर काँग्रेस पक्षात प्रवेश केला असून या अनुषंगाने मा. महासभेच्यावेळी सभागृहाच्या कक्षात काँग्रेसच्या गोटात आमच्याबरोबर बसण्याची व स्थानापन्न करण्याची जागा व आसन व्यवस्था करुन देण्याची त्यांनी विनंती केलेली आहे. सचिवांना मी निर्देश देते की, पुढील मा. महासभेत त्यांनी तशी सर्वांना बसण्याची व्यवस्था करुन द्यावी.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलत आहे की, मघाशी मा. महापौरांनी जे निवेदन केले. ते मिरा भाईंदर शहराच्या दृष्टीने खरोखरच ही आनंदाची बातमी आहे. गेली साडेचार वर्षे आपण सभागृहात काम करित आहोत. सर्व पक्षीय नगरसेवक या सभागृहात काम करतात. आपआपल्या परिने ज्यांनी त्यांनी मागणी केली, प्रयत्न केला ज्यांचे खरोखर कर्तव्य होते त्यांनी कर्तव्य निभावण्याचा प्रयत्न केला आणि मघाशी जसे दोन गोष्टींचे निवेदन झालेले आहे. एकतर नेहरु रोजगार योजनेमध्ये आपल्या महापालिकेला स्थान मिळालेले आहे, निधी मिळालेला आहे. १९२५.१७ कोटीचा निधी आहे. मी आपल्यास विनंती करतो की, आपण जे वाचून दाखवले त्याचीच प्रत या सभागृहात सगळ्या सदस्यांना वाटावी जेणेकरुन आमच्याकडे त्याची नक्की खात्री राहील की, कोणत्या हेडखाली किती पैसे आपल्याला मिळालेले आहेत. हे करतेवेळी जसे सांगितले की, हा निधी शासनाने शिफारस केलेला आहे. आम्ही ह्याच्यावर टिका करण्याचा प्रश्न येत नाही. कोणी नकारात्मक बोलण्याचा ही प्रश्न येत नाही. कार्यकाळ किती राहील? किती वेळेत हे आपल्याला मिळेल? कोणत्या योजना किती पिरियडमध्ये होतील? हे निश्चित होण्याच्या दृष्टीने नाहीतर याच्याआधी आपल्याकडून अनेक सुचना

झालेल्या आहेत, अनेक घोषणा झालेल्या आहेत. पण त्या कार्यान्वीत झाल्या नाहीत. त्याच्यामुळे आम्ही आज टिका करणार नाही. पण आम्ही अपेक्षा करणार की, आदरणीय अजितदादा पवार यांच्या केबिनमध्ये झालेल्या मिनिट्स ही आलेल्या आहेत. त्याची आम्हाला प्रत मिळावी आणि या १९२५.१७ कोटीच्या येणाऱ्या निधीची ही आम्हाला प्रत मिळावी. तसेच, या शहरामध्ये पाणी आणले सांगितले तर त्याचे कोणीही स्वागत करेल. आम्ही स्वतः भारतीय जनता पार्टीचे सर्व नगरसेवक व्यक्तीशः मी या शहरातील नागरिक म्हणून जो नागरिक या शहरात राहत आहे तोही आणि शहरात येत आहे तोही. पण बाहेर जे चित्र दिसत आहे, ह्यांचे बोर्ड लागले आहे, त्यांचे बोर्ड लागलेले आहे. पाणी कोणी आणले तर ह्याचे आयुक्तांनी निवेदन केलेतर त्यांच्या नावाचा आम्ही अभिनंदनाचा ठराव देऊ. याच्यात आम्हाला काही अडचण वाटेल, लाज वाटेल, संकोच वाटेल असे काही कारण नाही. पण वस्तुस्थिती काय आहे? खरोखर ३५ एम.एल.डी. पाणी येईल व त्याची किती कोटीची योजना आहे? त्याला कुठे जोडणी होणार आहे? पाणी कसे येणार आहे? याच्यात खरोबर त्यांचा कोणाचा रोल आहे? कोणत्या मुख्यमंत्र्यांनी, कोणत्या उपमुख्यमंत्र्यांनी म्हणजे पाटबंधारे मंत्र्यांनी की जलनिःसारण मंत्र्यांनी कोणी ह्याच्यामध्ये सहकार्य केले आहे? हे सगळं त्या निवेदनात नीट आले तर त्याचा योग्य मॅसेज जाईल. अन्यथा स्पर्धेमध्ये आम्ही कुठेतरी रखडलो नाही पाहिजे. आज हे नक्की दिसत आहे की, पेपरवाले स्पष्ट छापत आहेत की, हे राष्ट्रवादीचे काम आहे. दुसऱ्या बाजुने छापले जात आहे की, हे कॉंग्रेसचे काम आहे. आम्ही असे म्हणतो की, हे सर्वांचे काम आहे. महापालिकेत होणाऱ्या कामकाजावर सर्वांचा अधिकार आहे आणि अभिनंदनास पात्र म्हणून मा. महापौर, मा. आयुक्त, मा. उपमहापौर आणि मा. आयुक्तांच्यामध्ये जर शंका राहिली तर त्याच्यात स्पर्धा होईल आणि स्पर्धेपाई ते रखडेल म्हणून ते न रखडता एकदम स्पष्ट पारदर्शक असे काम व्हावे जेणेकरुन पाणी, पाणी टंचाई आता चालू आहे. पाणी टंचाई होईल, नंतर पाणी मिळेल असे नाही. आता पाणी टचाई चालू आहे. त्यामुळे तातडीने जर त्याची तुम्हाला खात्री असेल तर मा. आयुक्तांनी त्याच्यावर निवेदन करावे की, हे काम इतक्या कोटी रुपयाचे आहे आणि हे काम तुम्ही जर कन्सलंट केले असेल तर आम्हीही कन्सलंट करत आहोत की इतक्या दिवसामध्ये ह्या-ह्या ठिकाणी जोडणी केल्यानंतर हे पाणी महिना, दोन महिन्यात येणार आहे. मे महिन्यामध्ये येणार आहे.  कारण त्यांचेही आता सुरु असताना, येते येते असे करताना, आम्हाला तसा विषयही मिळेल.  आज जसे मी अभिनंदन करतो. उद्या ते अभिनंदन आम्ही करणार नाही. कारण आपण आधीही सांगितले होते की, एकच लक्ष सब-वे. आता तो सब-वे कुठे आहे? हे कोणाला माहितच नाही. आता बंदरवाडीचे रेलिंग झाले. लोकांना कुठे जायला रस्ता नाही. लोकांचे हाल सुरु झाले. आपण चिमण्या बसवल्या सगळ्या जागोजागी मिरा भाईंदर महानगरपालिकेत चिमणी बसवली होती. त्या चिमण्याही कुठे गेल्या? कचराही कुठे गेला? आता कचरा उचलायलाही कोणी नाही. आजची स्थिती आहे. पुन्हा डम्पींगचे रॅशेस सुरु झाल्या. यात एक चित्र आहे. त्यामुळे आपण केलेल्या कामाचे आम्ही कौतुक करु पण न काम करता कौतुक होत असेल तर याचे आम्हाला वाईट वाटत नाही. आम्हालाही त्याची सवय पडेल. लोक त्याची चिंता व्यक्त करतील. आयुक्त साहेब, ३५ एम.एल.डी. बद्दल जर आपण निवेदन केले तर ते शास्त्रशुध्द  निवेदन करा व जी स्थिती असेल ती स्थिती सांगावी. उगाच ही बोर्डबाजी नको म्हणजे उद्या जर आपण हे बोर्ड काढले तरी लोकांना त्याचा आनंद वाटेल. कारण त्या बोर्डावर लोक विश्वास ठेवायला तयार नाही आणि आम्ही ही विश्वास ठेवू देणार नाही.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेबा, आपण सन्मा. सदस्य रोहिदास पाटील यांना या विषयावर बोलायची परवानगी दिली माझी पण तशीच अपेक्षा आहे की, या प्रश्नामध्ये मला दोन शब्द बोलण्याची परवानगी द्यावी. येथे आपल्या अधिकाऱ्यांचा परिचय होताना इंटरप्शन झाली. तीन नविन खात्याचे अधिकारी याठिकाणी आले. सिटी इंजिनियर, मुख्य वैद्यकिय अधिकारी आणि लेखा परिक्षक आले. मा. महापौर साहेबा, मी आपल्या माध्यमातुन मा. आयुक्त साहेबांना याठिकाणी एक जाणीव व्यक्त करुन देण्याची इच्छा व्यक्त करतो की, आपली ही महापालिका स्थापन झाल्यापासून चार वर्षे झाली व साडे चार वर्षे व्हायला आले. अगोदरचे अधिकारी ज्या पध्दतीने आले व ज्यापध्दतीने त्यांनी कामकाज केले. असे दिसले नाही की, फार मोठे एक जोशाचे, थोड्याशा शक्तीचे कॉम्पीटिटीव्ह काम त्या मंडळीने करण्याचा प्रयत्न केला. काम झाले. ॲथोराईज पध्दतीने पारंपारिक पध्दतीने काम झाले. हा जो आपण नविन प्रकल्प मा. मुख्यमंत्री साहेबांकडून मंजुर करुन घेतला. आता ह्या कामाचे २०३५ पर्यंतचे चित्र जर आपण डोळ्यासमोर पाहण्याचा प्रयत्न केला तर आलेल्या ह्या नविन अधिकाऱ्यांना अधिक, जोशाने, अधिक आत्मियतेने काम करायला पाहिजे अशी माझी इच्छा, तसेच सदनाची इच्छा असेल. सन्मा. सदस्य रोहिदास पाटील ह्यांनी पाणीपुरवठा बद्दल मा. महापौरांनी आणि मा. आयुक्तांनी निवेदन करावे असा आग्रह धरला. सन्मा. सदस्य रोहिदासजी पाटील, मला आनंद आहे. मी आपली वाक्य उद्धंकृत करत आहे. मागच्या सभेमध्ये आपण असे बोललात की, साडेचार वर्षे झाली आणि या शहरासाठी पाण्याचा एक लिटर ही वाढला नाही. तर वुई ॲग्रीड आणि आपण हे ही बोललात की, त्यासाठी पाणीदार माणसे लागतात. होय. मा. महापौर साहेबा या शहरामध्ये या सभागृहामध्ये बाणेदार माणसे आहेत आणि पाणीदार माणसांनी हे ३५ एम.एल.डी. पाणी मिळवण्याचा प्रयत्न केलेला आहे. म्हणून मी माझा आनंद व्यक्त करतो.

**नगरसचिव :-**

प्रश्नोत्तराचा तासाला सुरुवात होत आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सचिव साहेब, या विषयावर आयुक्त साहेबांचे निवेदन होऊ द्या. आम्ही देखील लोकप्रतिनिधी आहोत. शहरामध्ये चांगली चर्चा होत आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील ह्यांनी मंत्रालयातुन पाणीपुरवठा विभाग यांच्याकडे जो पत्रव्यवहार झालेला आहे त्याची मागणी केलेली आहे. तर संबंधित पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांनी त्याच्या प्रती नगरसेवकांना द्याव्यात व मा. आयुक्त महोदयांनी सदर विषयावर निवेदन करावे.

**रिटा शाह :-**

सचिव साहेब, मी जो हरकतीचा मुद्दा उचलला, तो हरकतीचा मुद्दा आपण घेतला नाही. कारण त्या विषयाबाबत मा. महापौर मॅडम यांनी रुलिंग दिले होते आणि तरीही आपण तो विषय मा. महासभेसमोर घेतला नाही.

**नगरसचिव :-**

विषय घेणे, सभा लावणे हे संपूर्णपणे मा. महापौर मॅडमचे अधिकार आहे.

**मा. महापौर :-**

अगोदर मा. आयुक्त साहेबांचे निवेदन होऊ द्या.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्य रोहिदासजी यांनी सभागृहामध्ये जे निवेदन केले आहे, त्या निवेदनाच्या संदर्भामध्ये आयुक्तांकडून पाणीपुरवठा संदर्भात जी माहितीची मागणी केली आहे. त्याबाबतीमध्ये मी सभागृहाला माहिती देतो की, महानगरपालिकेने पाटबंधारे विभागाला साधारण ७व्या महिन्यामध्ये पत्र पाठविलेले होते. जुलै महिन्यामध्ये पत्र पाठवून जवळ जवळ ८० एम.एल.डी. पाण्याची अतिरिक्त मागणी केली होती आणि त्याबाबत ठाणे जिल्ह्याचे जे पाटबंधारे विभागाचे जे अधिकारी आहेत. त्यांच्याकडे याबाबतीमध्ये पाठपुरावा करुन त्याचप्रमाणे मा. महापौर मॅडमनीसुध्दा त्यांच्यांशी पत्रव्यवहार करुन वेळावेळी त्यांच्याशी संपर्क साधून, त्याचप्रमाणे सन्मा. विधान परिषदेचे सदस्य मा. श्री. मुझफ्फर हुसेन साहेब यांनीसुध्दा याबाबतीमध्ये संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करुन वेळोवेळी फोनवर बोलून हा प्रस्ताव मार्गी लावण्याचा प्रयत्न केला आणि याबाबत जलसंपदा, कृष्णा खोरे, पाटबंधारे महामंडळ बघून लाभक्षेत्र विकास व पाणीपुरवठा स्वच्छता विकास यांचे कार्यालयाकडून आपल्याला दि. ३०/९/२००६ रोजी एक पत्र आले आणि त्यापत्रामध्ये त्यांनी असे नमुद केले होते की, मिरा भाईंदर शहराला बारवी धरणातून ४० ते ५० दशलक्ष लिटर वाढीव पाणीपुरवठा उपलब्ध करुन देण्यासंदर्भात चर्चा करण्यास्तव मा. मंत्री महोदयांनी मंगळवार दि. ०३/१०/२००६ रोजी सकाळी ११.०० वा. त्यांच्या मंत्रालयातील दालनात बैठक आयोजित केलेली आहे आणि त्या बैठकीला पदाधिकारी आणि अधिकारी यांना उपस्थित राहण्याबद्दल कळविलेले होते. त्याप्रमाणे दि. ०३/१०/२००६ च्या बैठकीला आपले पदाधिकारी आणि मी सुध्दा त्या बैठकीला हजर होतो आणि त्या बैठकीमध्ये एम.आय.डी.सी. कडून ३५ एम.एल.डी. पाणीपुरवठा तातडीने करावा अशाप्रकारचे आदेश त्या सभेमध्ये मा. मंत्री महोदयांनी दिलेले आहे आणि त्याप्रमाणे त्याठिकाणी एम.आय.डी.सी. चे मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे मुख्य अभियंता हे वरिष्ठ पातळीवरचे सर्व अधिकारी त्याठिकाणी हजर होते. एम.आय.डी.सी. ची फक्त एक विनंती होती की, जे अतिरिक्त पाणी मिरा भाईंदर शहरासाठी द्यायचे आहे तेवढे पाणी उचलण्यासाठी पाटबंधारे विभागाने परवानगी द्यावी आणि ती परवानगी तातडीने त्याच सभेमध्ये त्यांनी मान्य केली आणि त्याप्रमाणे मा. मंत्री महोदयांनी संबंधित अधिकाऱ्यांना तशाप्रकारचे निर्देश दिले आणि आजच आपल्याकडे त्याबाबत जी काही चर्चा झाली. मंत्रालयामध्ये जी बैठक झाली त्या बैठकीचे इतिवृत्तसुध्दा आजच आपल्याला ह्या क्षणी मिळालेले आहे आणि मा. महापौरांनी सांगितले त्याप्रमाणे ते सर्व सन्मा. सदस्यांना सरक्युलेट आता १० ते १५ मिनिटामध्ये होईल. तरी ह्या मिरा भाईंदर शहराला ३५ एम.एल.डी. अतिरिक्त पाणी पुरवठा मंजुर आहे. त्याबाबत मा. मंत्री महोदयांनी असे आदेश, निर्देश दिलेले आहेत की, सांकेत याठिकाणी स्टेमची लाईन आणि एम.आय.डी.सी. ची लाईन अशी दोन्ही लाईन जवळून जात आहेत तर त्याठिकाणी त्याचे हायड्रोलिक प्रेशर चेक करुन आपल्याला किती तातडीने काम करता येईल आणि त्याप्रकारचे निर्देश त्यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला दिलेले आहे. तर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने त्याठिकाणी असे सांगितले की, साधारण या संबंध कामासाठी अंदाजित दिड कोटी रुपयाचा खर्च अपेक्षित आहे आणि हे दिड कोटी रुपये ठेव म्हणून महापालिकेने त्यांच्याकडे जमा करायचे आणि त्याच्यातून त्यांनी हे काम पूर्ण करायचे आहे. या कामासाठी त्यांनी सांगितल्याप्रामणे दोन ते तीन महिन्याचा कालावधी उपेक्षित धरलेला आहे आणि याप्रमाणे आजच आपल्याकडे त्या बैठकीचे प्रोसेडिंग आलेले आहे. याबाबतीमध्ये आपल्या महानगरपालिकेचा ठराव परीत करुन त्यांच्याकडे पाठविणे गरजेचे आहे. मी आत्ताच मा. महापौरांना विनंती केली आहे की, हा जो विषय आलेला आहे किंवा हा अजेन्डा जो आपल्याकडे प्राप्त झालेला आहे. त्याविषयावर एक तातडीची बैठक लावावी आणि सभागृहाने त्याला मान्यता देऊन तो मान्यतेचा प्रस्ताव महाराष्ट्र जीवन प्राधिकरणला सादर करायचा आहे.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर मॅडम, याबाबतीमध्ये आम्हाला असा खुलासा हवा आहे की,...........

**रोहिदास पाटील :-**

ह्याच्यामध्ये कुठेही वेळ जाता कामा नये. अपेक्षित जो निधी आहे त्याचीही आपण तरतुद करुन ठेवा. मग आपण अंदाजपत्रकात तरतुद नाही किंवा अन्य नाही. तर ह्याविषयावर खास सभा घेऊन खास निधी जो दिड कोटी असेल तर तो चार कोटी गेला तरी हरकत नाही. चार कोटी रुपये जरी लागले व दोन महिन्यात जर आपल्याला पाणी मिळत असेल तर त्याचे आपण स्वागत केले पाहीजे. आपल्याकडून चुक होत आहे किंवा आपल्याकडून कोणाला तरी एक विषय मागे राहीला असे होऊ नये म्हणून आम्ही हा विषय आपल्यासमोर ठेवत आहोत.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेबांच्या परवानगीने, मा. आयुक्त साहेबांनी हे जे निवेदन केले ते स्वयं स्पष्ट आहे. परंतु, आपण असे जे म्हटले की, पदाधिकारी आणि अधिकारी यांना बोलावले होते तर एक्झॅक्टली कोणाला बोलावले होते? ह्याचाही खुलासा आपण जर आपल्या पत्रावरुन केला तर बरे होईल.

**शिवाजी बारकुंड :-**

सदर सभेचे पत्र हे मा. आयुक्त साहेब, मा. महापौर साहेबा व श्री. मोहन पाटील या तिघांच्या नावाची पत्र मंत्रालयातुन आपल्या कार्यालयाला प्राप्त झाली होती.

**शिवप्रकाश भुदेका :-**

मा. महापौर मॅडम, सभेला कोणकोण गेले होते ते ही सांगा. पत्र आले ते बरोबर आहे. पण त्या सभेमध्ये कोणकोण गेले होते ते ही सांगा.

**शशिकांत शाह :-**

मा. महापौर मॅडम, मै आपके माध्यम से यह जानना चाहता हू की, इस पत्र की द्वारा आपको बुलाया गया था यह इस सभागृह के लिए बहुत आनंद की बात है और हमारे पार्टी के मा. उपमहापौर श्री. चंद्रकांत वैती साहब को टाईम नही था की, उनको जानकारी नही दी गयी थी। इसकी जानकारी हमे मिलनी चाहिए और हम जरुर कहेंगे की, इस तरह का पत्र सचिवालय से आए तो सभी पदाधिकारी और विरोध पक्ष के पदाधिकारी को भी बुलाना चाहिए था। जिससे, इस पानी की महान समस्या के लिए इस सभागृह मे जो कोई गटनेता है उनको भी साथ मे बिठाकर यहॉपर सभा लेकर वहॉपर जाना चाहिए। जिससे, यह जो महान समस्या है उसका निराकरण व्यवस्थित रुपसे आए। इस तरहसे एक ही पार्टी के लोग जाकर वहॉपर कोई भी कार्यक्रम करके आते है और यहॉपर बोर्ड लगते है। यह इस सभागृह को शोभास्पद नही है। तो मेरी आपको और कमिशनर साहब को विनंती है की, इसके बाद जब भी इसतरह से काई भी सरक्युलर आए तो सभी को विधीत करते हूए, सभी को ध्यान मे लेते हूए इस कार्यक्रम को आगे बढाते जाईए।

**रिटा शाह :-**

सचिव साहेब, जे पत्र आलेले आहे, त्याबाबतीमध्ये नगरसेवकांनाही कळू द्या की, काय पत्र आले होते?

**एस. ए. खान :-**

सदर पत्राचे वाचन करावे.

**मा. महापौर :-**

नगरसेवकांनी मागणी केल्याप्रमाणे जलसंपदा मंत्री आदरणीय मा. नामदार अजितदादा पवार यांच्या दालनामध्ये पाणीपुरवठा संबंधित पाणी टंचाईच्या बाबतीत सतत आयुक्त, मी स्वतः महापौर यांनी पत्रव्यवहार करुन या सभेची मागणी केली होती. तसेच, ऑगस्ट महिन्यामध्ये त्यांना प्रत्यक्ष जाऊन भेटल्यानंतर त्यांनी ही सभा लवकरच लावू असे आश्वासन दिले व ह्या महिन्याच्या तीन तारखेला त्यांनी मिटींगही लावली. त्या सभेला मी स्वतः महापौर, मा. आयुक्त साहेब, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष श्री. मोहन पाटील, सभागृह नेता हॅरल बोर्जीस, स्थायी समितीचे सभापती स्टीवन मेन्डोसा आणि श्री. आसिफ शेख तसेच संबंधित खात्याचे अधिकारी त्याठिकाणी सभेला उपस्थित होते.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, प्रत्येक वेळेला आपण गटनेत्यांना बोलावता आणि या सभेमध्ये आपण आपल्या पक्षाच्या व्यतिरिक्त कोणालाही बोलावले नाही. शहरामध्ये जर काही प्रॉब्लेम आला तर आम्ही लोक आपल्याला हवे असतो. प्रत्येक प्रॉब्लेम आता कचऱ्याचा प्रॉब्लेमला सारखे सारखे बोलावता. काही त्रास असला की, आम्हाला बोलावता. पण हे आपण पक्के राजकारण खेळत आहात.

**मा. महापौर :-**

सन्मा. सभागृह सदर विषयाचा खुलासा करु इच्छिते की...........

**मिलन म्हात्रे :-**

मंजुरी घेताना आपण आम्हाला बोलावता.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपल्याला बोलायची परमिशन दिलेली नाही.

**मिलन म्हात्रे :-**

आपण जे चुकीचे केले आहे ते बोलत आहे. आपण आम्हाला बोलायची परमिशन देणारही नाही.

**मा. महापौर :-**

सचिवजी जे सदस्य परमिशिन न घेता बोलतील त्यांचे शब्द, वक्तव्य कामकाजातुन वगळून टाकण्यात यावे.

**मिलन म्हात्रे :-**

आमचे वक्तव्य वगळून टाका. त्याने काय फरक पडत नाही. पाण आम्ही ते बोलून दाखवले व सगळ्यांनी ते ऐकले.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपल्याला बोलण्याची संधी दिली जाईल.

**मिलन म्हात्रे :-**

आमचा हाच उद्देश होता.

**रोहित सुवर्णा :-**

डम्पींग ग्राऊंडच्या सभेला आम्हाला कशाला बोलावता?

**मिलन म्हात्रे :-**

आपण डम्पींग ग्राऊंडच्या सभेलाही आम्हाला बोलवायचे नाही. टेंडर सगळी तुमची आहेत. पैसे सगळे तुमच्याकडे जात आहेत. सौदे तुम्ही करत आहात आणि आम्ही कशाला? आम्हाला बोलवू नका. येथे भांडी घासायला आम्हाला बोलवू नका. या सर्व कामकाजामध्ये आपण आम्हालाही इनव्हॉल केले पाहिजे.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. महापौर मॅडम, मा. नामदार अजितदादा पवार यांच्या दालनात जी बैठक लावली ती बैठक सभागृहाच्यावतीने आयोजित केलेली नव्हती. ती बैठक मा. मंत्री महोदयांनी आयोजित केलेली होती. त्याचे सरक्युलर, त्याचे फॅक्स...........

**मिलन म्हात्रे :-**

सहन करण्याची क्षमता राहिलेली नाही. आपण अशी वागणूक देता.

**मा. महापौर :-**

आपल्या सभागृहामध्ये जर गोंधळ घालायचा असेल तर आपण हे सभागृह सोडून जाऊ शकता.

**मिलन म्हात्रे :-**

हे आपण आम्हाला सांगु शकत नाही.

**मा. महापौर :-**

आपल्याला बोलायला वेळ दिली जाईल.

(सभागृहात गोंधळ)

**रोहिदास पाटील :-**

आम्ही असेच सभागृह सोडणार नाही.

**रतन पाटील :-**

या कामाकरिता आपल्याच पक्षाचे सदस्य का गेले? मा. उपमहापौरांना का बोलावले गेले नाही?

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील हा प्रश्न सर्वांच्या जिव्हाळ्याचा आहे. हा विषय किती महत्वाचा आहे हे सर्वांना माहित आहे.

**रतन पाटील :-**

हो. आम्ही नव्हतो का? विरोधी पक्षनेते आहेत त्यांना का बोलावले गेले नाही? महत्वाचा प्रश्न, प्रत्येकवेळी आपण असेच वागता का?

**मोहन पाटील :-**

मा. महापौर महोदया, त्याठिकाणी पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी जेव्हा मा. श्री. अजितदादा पवार यांच्या दालनातून जेव्हा पत्र आले. आम्हाला ते यश संपादन झाले आहे. सत्ताधारी पक्षाचे हे यश आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे हे यश आहे. ते यश पचवता आले पाहिजे ना. आपण ते यश पचवा ना. या शहरामध्ये जर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीला पाण्याचा बाबतीमध्ये यश मिळाले तर विरोधी पक्ष म्हणून आपण हे यश पचवा ना.

**मिलन म्हात्रे :-**

आम्ही येथे अक्षता वाटायला बसलो नाहीत. खाली बसा. पहिले चोऱ्या माऱ्यांची पाण्याची कनेक्शन थांबवा. पाण्याचा जो सौदा चालू आहे तो पहिल्यांदा रोका नंतर एम.एल.डी. च्या गोष्ट्या करा.

**मोहन पाटील :-**

या गोष्टीचा प्रश्न येतच नाही.

**मा. उपमहापौर :-**

या विषयास आम्ही हरकतीचा मुद्दा घेतलेला आहे. सन्मा. मोहन पाटील साहेब आपण जे निवेदन करता की, यश सहन झाले नाही असे काय सांगु नका. आपण सहकार्याच्या भुमिकेतून या शहराच्या विकासामध्ये, जडणघडणीमध्ये सगळ्यांनी हिरीरीने भाग घेतलेला आहे. शहराला पाणी मिळाले तर कोणाला वाईट वाटण्याचे कारण नाही. ज्यावेळेला आमच्याकडे ही घोषणा आली. त्यावेळेला मा. आयुक्त साहेब, आपण स्वतः आणि मा. महापौरांना मी फोन करुन विचारले होते की, या विषयात आपण सभागृहातील इतर पदाधिकाऱ्यांना विश्वासात घेतले का? बोलावले का नाही? आणि या गोष्टीची शहानिशा करण्यासाठी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा. विलासरावजी देशमुख साहेब यांच्याकडे प्रत्यक्ष त्यांच्या निवासस्थानी मी, आमदार मुझफ्फर हुसैन साहेब, मा. तुळशीदास म्हात्रे साहेब, परिवहन समितीचे सभापती उस्मान नुरले साहेब आम्ही प्रत्यक्ष भेट घेतली. या विषयाबाबत आम्ही वारंवार निवेदन केली होती. सभागृहात सर्व सदस्य या शहराचा पाणी पुरवठा वाढावा, सुरळीत व्हावा, शहराचे हित राखले जावे ही भूमिका सगळ्यानींच घेतलेली आहे. आम्ही या विषयाचा पाठपुरावा करत होतो. मा. मुख्यमंत्र्यांनी आम्हाला सांगितले की, मा. श्री. अजितदादा पवार हे महाराष्ट्र राज्याचे जलसंपदा मंत्री आहेत. परंतु, एम.आय.डी.सी. हे क्षेत्र महाराष्ट्र राज्याचे पाणीपुरवठा मंत्री मा. अशोक चव्हाण साहेब यांच्या अखत्यारितले मंडळ आहे. शहराला पाणी पुरवठा पुरवण्याची आवश्यकता आहे आणि ते मिळाले ही चांगली गोष्ट आहे. त्यांनी घोषणा केली ही चांगली गोष्ट आहे. त्या विषयात मुख्यमंत्री या नात्याने मला मिरा भाईंदर शहरासाठी काय करता येईल तेही मी करायला तयार आहे. सदस्यांच्या भावना बरोबर आहेत. पदाधिकाऱ्यांना विश्वासात घ्यायला पाहीजे होते. आपला उत्साह जास्त होता. आपण उत्साहाच्या भरात जाऊन ताबडतोब ते पाणी मंजुर केले. पण एका बैठकीत असे पाणी मंजुर होते का? ठिक आहे. पाणी मंजुर झाले असेल तर स्वागतार्ह आहे. परंतु, उगीच आभास निर्माण केला असेल तर ते चुकीचे आहे, या विषयासाठीच या शहराला पाणी पुरवठा वाढावा म्हणून काही मुद्दे आम्ही लक्षवेधीच्या माध्यमातून सुचविले होते आणि त्यासाठी विशेष सभा लावण्याचे मा. महापौरांनी आश्वासित केले होते आणि विशेष मा. महासभा न लावता आणि आजच्या सभेत विषय कमी असताना, आजच्या या सभेत पाणीपुरवठा या विषयावर चर्चा झाली असती. परंतु, या सभेत आपण सहा कर्मचाऱ्यांना कायम स्वरुपी नोकरी द्यावी असा विषय आणू शकतो. पण पाणीपुरवठ्याचा विषय आणू शकत नाही. याच्यामुळे आपली उदासिनता स्पष्ट होते. आपण याबाबतीत स्पष्टपणे भूमिका घेतली पाहिजे. आमचा हरकतीचा मुद्दा आहे. सदस्यांना ही मी या विषयाच्या अनुषंगाने विनंती करतो की, सभेला रितसर सुरुवात होऊ द्या. विषयपत्रिकेचे वाचन झालेले आहे आणि इतिवृत्तांताची सुरुवात होईल प्रश्नोत्तराच्या तासानंतर हरकतीच्या मुद्यावर चर्चा करावी आणि आपण मुद्देसुदपणे सभेचे कामकाज करावे अशी मी विनंती करतो.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, यांना विनंती आहे की, या सगळ्या कामकाजामध्ये पत्रव्यवहार करतेवेळी मा. खासदारांना कुठेतरी कळवावे असे अभिप्रेत आहे की नाही? एवढे सांगा की, संपला विषय. कळवायचे नसेल तर तो तुमचा विषय आहे. एवढी मोठी योजना, एखादा मोठा ज्वलंत प्रश्न असताना खासदारांची आपल्याला आठवण होऊ नये. आपण कळवायला पाहिजे होते. ते येतील किंवा नाही तो विषय वेगळा. आपण इन्टीमेशन पत्र तरी द्यायला पाहिजे. मॅडम, ते लोकप्रतिनिधी आहेत. आपण कोणालाही कमी लेखायचे नाही. आपण त्यांना कळवायला पाहिजे असे आमचे मत आहे. आपल्याला काय अभिप्रेत आहे ते सांगा.

**शिवप्रकाश भुदेका :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. लिओ कोलासो सरजीने बोला के, पानी लाने के लिए पाणीदार चाहिए। तो हमने ५० एम.एल.डी. पानी लाकर दिया जब आप १०० एम.एल.डी. पानी लाए तभी हमारे सामने बोलनेकी हिम्मत रखे। हमन ५० एम.एल.डी. पानी ११० करोड युती शासनसे मिरा भाईंदर शहरके नागरिकोको ५० एम.एल.डी. पानी दिया है। इसलिए इन्हाने हमे पानी की भाषा सिखानेका नही।

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेबा, सभागृहामध्ये सरळ सरळ असे बोलले जाते. तर ह्यांचे ५० वर्षे झाली का? ५० एम.एल.डी. पाणी आपण आणले हे आपण कोणाला सांगत आहे.

**रोहिदास पाटील :-**

हे पाणी आम्ही आणले आहे. युती सरकारने आणले आहे.

**रतन पाटील :-**

सर, युती शासनाने ५० एम.एल.डी. पाणी मिरा भाईंदर शहरासाठी दिलेले आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्हाला युती बोलण्याचीही हिम्मत होत नाही. इथे सभागृहामध्ये युती आहे. किमान सभागृहाची तरी इज्जत ठेवा. महाराष्ट्र शासनाची ठेवू नका. पण या सभागृहाची इज्जत ठेवा.

**रतन पाटील :-**

आतापासूनच पाणी पाणी करायला लागले आहेत. पहिल्यांदा मिरा भाईंदरमध्ये पाणी तरी आणून दाखवा.

**परशुराम पाटील :-**

मा. महापौर साहेबांच्या परवानगीने बोलत आहे की, मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब चर्चा चांगली चालली आहे. पाणी मी आणले आहे. तो सांगतो पाणी मी आणले. अरे, मरताना माणूस पाणी पिऊन मरतो. पाणी पाणी करुन भरतो आणि जिवंत असताना ही पाणी पाणी मागून पितो पण ज्यावेळेला पाणी आले. लाठीमार झाला. जेलमध्ये गेलो. तीन दिवस तिथे खिचडी खाल्ली.

**रतन पाटील :-**

आम्ही लाठ्या खाल्ल्या.

**परशुराम पाटील :-**

ज्यादिवशी पाणी आले त्याची तारीख आपण आम्हाला सांगू शकाल का? कोणत्या तारखेला मोर्चा गेला? ४० वर्षाच्या काळामध्ये कलेक्टर ऑफिसमध्ये कोणी मोर्चा नेला नसेल. निवेदन देऊन जातात. त्याठिकाणी आम्ही काही मिठागर सैनिक मोरेश्वर पाटील अशापध्दतीने १९८२ साली पाण्याला चालना आली. तेव्हा महापौरसुध्दा नव्हते. ग्रामपंचायत होती.

**मिलन पाटील :-**

त्यावेळेला मी देखील होतो. माझे नाव विसरु नका. जसे तुम्ही दांडे खाल्ले ना, तसे पाठीवर मी पण खाल्ले आहे.

**मा. महापौर :-**

सचिवजी रितसर कामकाजाला सुरुवात करावी. सर्व सदस्यांनी शांतता पाळावी.

**परशुराम पाटील :-**

मा. महापौर साहेबा, ज्यापध्दतीने ४० वर्षाच्या काळामध्ये सन्मा. सदस्य मिलन पाटील, परशुराम पाटील यांनी पाण्याच्या दृष्टीने पाणी मागण्यासाठी त्यावेळेला डी.एस.पी.ने त्याच्या बत्तीच्या गाडीमध्ये मला ढकलून टाकले. बस इथे, बैठे इधर या पध्दतीने बसलो. दांडे खाल्ले आणि आज हे म्हणतात की, मी पाणी आणले आणि तो म्हणतो की, मी पाणी आणले. पण मा. महापौर साहेबा, आता ज्यापध्दतीने पाणी मागण्यासाठी जातो. पाणी हा आवश्यक ज्वलंत प्रश्न आहे आणि त्यापध्दतीने आता आपण मंत्र्यांना भेटण्यासाठी मंत्रालयात गेलात त्याचपध्दतीने मा. महापौर साहेबा, मा. आयुक्त साहेब, आम्ही विरोधी पक्षनेता आहोत. सभागृह नेता आहोत. ते जर गेले असतील पण जे काही लोक जे गटनेते आहेत त्यांना विश्वासात घेऊन आपण तिथे जायला हवे होते आणि आपण आपल्या पक्षाला विश्वासात न घेता जाणे हे योग्य नाही. बोर्ड लावला तर लावा. तुम्ही मोठेपणा घ्या. ज्या ज्या पक्षाचे लोक आहेत त्यांनाही आपण विश्वासात घ्या. पाणी हे एकच माणूस आणत नसतो. पाण्याचे बिल, पैसे भरण्याचा अधिकार महापालिकेला असतो. कोण फुकट पाणी देणार नसते. यापध्दतीने ही चर्चा चालू आहे. आता जी चर्चा झालेली आहे. ही चर्चा आपण संपवा आणि आपण रितसर या सभेच्या मार्गाला लागाल अशी आपल्याला विनंती करतो.

**एस. ए. खान :-**

मा. महापौर महोदया, एम.आय.डी.सी. चे जे खाते आहे, ते मा. मुख्यमंत्री श्री. विलासरावजी देशमुख ह्यांच्याकडे आहे आणि पाणी पुरवठा मंत्री श्री. अशोक चव्हाण साहेब आहेत. त्याची कृपया नोंद घेण्यात यावी.

**मा. महापौर :-**

सचिवांनी सभेला रितसर सुरुवात करावी.

**नगरसचिव :-**

प्रश्नोत्तराच्या तासाला सुरुवात होत आहे. दु. १२.४० मिनिट झाली आहेत. श्री ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल यांचा प्रश्न आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, मी जो प्रश्न विचारलेला आहे. त्यामध्ये माझे चार उपप्रश्न आहेत. प्रथम उपप्रश्न असा आहे की, अशी जी लेखांकित प्रत कोणत्या नियमाखाली सोडले पाहिजे. कुठल्या नियमात ती तरतुद आहे. दुसरा प्रश्न असे एकून किती राखीव भुखंड या शहरामध्ये आहे. तिसरा प्रश्न सदर आरक्षणाच्या ऐवजी जमिन मालकास किंवा विकासकर्त्यास महापालिका कोणती सवलत देते आणि चौथा प्रश्न सदर आरक्षणाच्या विकास करण्यामध्ये विकासकर्ता किंवा जमिन मालकाला कोणकोणत्या अटीशर्ती महापालिकेकडून लादल्या गेल्या .............

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल यांनी विचारलेल्या प्रश्नाचा खुलासा करण्यांत यावा.

**दिलीप घेवारे :-**

विकास नियंत्रण नियमावलीतील विनिमय क्र.२२ यामध्ये रिकेशनल ॲमिनिटी ओपन स्पेस त्याच्यामध्ये एक हजार ते अडीच हजार स्क्वेअर मिटरच्या प्लॉटसाठी किती आर-जी सोडायचा आहे? अडीच हजार ते

दहा हजारसाठी किती आर-जी सोडायचा आहे? त्यानुसार आपला जो प्रश्न आहे, श्री. शेख इस्माईल ह्यांची बालाजी वसाहत क्षेत्रातील, मौजे भाईंदर ..............

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तो प्रश्न आहे. आता मी जे उपप्रश्न विचारले आहे त्याचे उत्तर पाहिजे. आपण सांगितले की, विनिमय क्र. २२ अन्वये हजार ते दोन हजार, दहा हजार सोडणे. हे माझ्या पहिल्या प्रश्नाचे उत्तर झाले. माझा दुसरा प्रश्न असा आह की, भाईंदर परिसरामध्ये एकूण असे किती बांधकाम आहेत? आपण हजार ते दोन हजार, दहा ते वीस हजार आणि किती आर-जी प्लाट या शहरात आपण ठेवलेले आहे किंवा आहे?

**दिलीप घेवारे :-**

ह्याची यादी मी आपल्याला नंतर देऊ शकतो. आता आपण प्रश्न विचारलेला आहे. त्यामुळे ती यादी आता माझ्याकडे तयार नाही. मी ही यादी आपल्याला नंतर देऊ शकतो किंवा पुढच्या महासभेमध्ये देऊ शकतो. कारण हा प्रश्न आपण आता विचारला आहे. त्यामुळे मला सगळं बघावे लागेल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, आपण माझा हा प्रश्न पुढच्या सभेत घ्यावा.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल आपण जे तीन प्रश्न विचारले आहेत त्या तीन प्रश्नाच्या उतराने आपले समाधान झाले आहे का? आपण जो उपप्रश्न विचारला आहे तर पुढच्यावेळी आपण रितसर पत्र द्या. त्याचे उत्तर आपल्याला दिले जाईल. कारण इतर सदस्यांनी ही प्रश्न विचारलेला आहे त्याचे प्रश्न परत येणार नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, असे जर नियमामध्ये असेल की, उपप्रश्न विचारण्याचा अधिकार नाही. तर आपण तसा उल्लेख करा की, उपप्रश्न विचारण्याचा हक नाही.

**मा. महापौर :-**

मला वाटते, आपल्याला अधिकार देऊन ५-६ महिने झालेले आहेत आणि ५-६ महिन्यापासून आपला एकच प्रश्न चालू आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मॅडम, एकच प्रश्न चालू आहे तर शासन हे दखल घेत नाही. ही जर दखल घेतली असती तर

**मा. महापौर :-**

आपण आता हे जे सभागृहाला तीन प्रश्न विचारलेले आहेत. याच्यामध्ये आपले समाधान झालेले आहे की नाही?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

नाही. माझ्या ह्या प्रश्नाचे उत्तर मिळाल्यानंतर समाधान होणार आहे.

**मा. महापौर :-**

आपल्या उपप्रश्नाला उत्तर मिळेल. पण आपण रितसर पत्रव्यवहार करा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

बालाजी नगरचा जो प्लॉट आहे. त्या प्लॉटच्या संदर्भामध्ये माझ्या प्रभागातील, माझ्या वॉर्डातील प्रश्न आहे. माझ्या प्रभागाचे हे आरक्षण आहे. त्यामध्ये जी सवलत दिली पाहिजे, ती आतापर्यंत झालेली नाही. म्हणून हा प्रश्न विचारण्याची मला गरज आलेली आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य, आपण एक गोष्ट लक्षात घ्या की, सभागृहामध्ये इतरही सदस्य आहेत. त्यांचे प्रश्न ही जिव्हाळ्याचे आहेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मी कोणालाही अडवलेले नाही.

**मा. महापौर :-**

त्यांची ही अपेक्षा असते की, माझा प्रश्न येऊन मला उत्तर मिळाले पाहिजे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मी कोणालाही अडवलेले नाही. प्रश्न कोणीही विचारा. सर्वांना हक्क आहे.

**मा. महापौर :-**

आपल्या प्रश्नाला उत्तर मिळेल. आपण रितसर पत्र टाका. पण पुढच्या मा. महासभेत आपला प्रश्न घेता येणार नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

जर आपण अशापध्दतीने प्रश्न हाताळत असाल तर .......

**मा. महापौर :-**

आपल्याला अधिकार दिलेले आहेत.

**रोहिदास पाटील :-**

आपण एवढ्यात उत्तर दिले असते ना? कशाला उगाच वाढवता हे मला समजत नाही.

**मा. महापौर :-**

अधिकारी ह्यांना माहिती मागवायला वेळ लागेल.

**रोहिदास पाटील :-**

जेवढे त्यांना नॉलेज असेल तेवढे उत्तर द्यावे. एखाद्या पेपरची तर आम्ही मागणी करणार नाही. त्यांच्या माहितीने समाधान होत असेल तर ठिक आहे आणि नसेल तर आपण सांगा. पण ते विचारुच नये. आपण उपप्रश्नाचे राईट काढून घेता किंवा आपण जे रफटफ बोलण्याचा प्रयत्न करता ते करु नका ना. सभा चालू आहे.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्यांनी आता जो उपप्रश्न विचारलेला आहे त्या संदर्भामध्ये मी सन्मा. सदस्यांना विनंती करेन की, आपण जी माहिती मागितलेली आहे ती माहिती काढण्यासाठी थोडासा वेळ लागणार आहे. जर समजा, आपल्याला १५ दिवसामध्ये ही माहिती उपलब्ध झाली तर आम्ही समक्ष ती माहिती आपल्याला देऊ. डिपार्टमेन्टला मी तसे सुचना देतो की, अशाप्रकारे पंधरा दिवसामध्ये लेखी स्वरुपामध्ये त्यांनी कळवावे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

समजा, हे उत्तर दिल्यानंतर त्या विषयावर माझी काही अडचण असली तर पुढच्या मा. महासभेत आपण मला बोलायला देणार आहात का? हा प्रश्न झाला आहे असे माझे म्हणणे आहे. मी बोलत आहे कारण त्या प्लॉटवर अन्याय झालेला आहे. त्याठिकाणी शासनाची जागा नसताना आपण विकासासाठी पैसे खर्च करता आणि जे पब्लिक वापरासाठी आहे, लोकांसाठी आहे तिथे महापालिका खर्च करत नाही. नियम दाखवतात. आम्ही नगरसेवक निधी देतो तो निधी द्यायला ही आपण मागत नाही. म्हणून आम्ही हा प्रश्न विचारत आहोत.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्य आपल्याला जी माहिती पाहिजे. ती माहिती द्यायला आम्ही तयार आहोत. आम्ही असे म्हणत नाही की, आपल्याला माहिती देणार नाही आणि आपण जी माहिती उपस्थित करता किंवा जे उपप्रश्न आपण विचारलेले आहेत. त्याला वेळ लागणार आहेत. तर १५ दिवसामध्ये मी आपल्याला लेखी स्वरुपामध्ये द्यायला संबंधित डिपार्टमेन्टला आदेश देतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ठिक आहे. लेखी स्वरुपामध्ये उत्तर मिळाल्यानंतर पुढच्या मा. महासभेत त्या प्रश्नावर बोलायला मला वेळ द्यावी.

**मा. महापौर :-**

आपल्या उपप्रश्नाची उत्तरे आणि माहिती मा. आयुक्त महोदय त्यांच्या दालनामध्ये देतील. सचिवजी पुढील प्रश्न सुरु करावा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आणि पुढच्या मा. महासभेत तो प्रश्न पुन्हा घ्यायला पाहिजे.

**मा. महापौर :-**

पुढच्या मा. महासभेत तो प्रश्न घेणार नाही. पुढच्या वेळेस आपण प्रश्न विचारा. पण पुढच्या मा. महासभेत नाही जेव्हा आपला क्रमांक येईल. त्यावेळी आपल्याला वेळ मिळेल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

क्रमांक येईल म्हणजे?

**रोहिदास पाटील :-**

मॅडम, असे होत नाही. आम्हाला जेवढे अभिप्रत्यय आहे तेवढे आम्ही आपल्याला सांगतो. १५ दिवसात उत्तर देतील असे मान्य केले. पण त्यांना जर शंका असेल तर प्रश्नोत्तराच्या वेळामध्ये त्यांना बोलायची संधी द्या. आता हा जो प्रश्न आला असेल तो प्रश्न अडीच वर्षांनी आला असेल. आता नविन अर्ज केला की, पुढील अडीच वर्षामध्ये त्याचे उत्तर मिळेल का?

**मा. महापौर :-**

दुसऱ्या सदस्यांचे ही प्रश्न यायला पाहिजे ना.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आम्ही कुठे नाही बोललो. उत्तर दिली पाहिजेत.

**मा. महापौर :-**

पाच वर्षे पूर्ण होत आली आहेत पण प्रश्न आलेले नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आम्ही कोणालाही अडवलेले नाही.

**रोहिदास पाटील :-**

या सदनाचा जास्तीत जास्त वेळ आपणच घेत आहात. कारण नसताना. त्या मॅडम तसा वेळ घेत नव्हत्या.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य, आपल्या उपप्रश्नाचे उत्तर आयुक्त साहेब आपल्याला देतील. पण पुढच्या वेळेस हे प्रश्न परत घेतले जाणार नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, आपण नगरसेवकांचा जो हक्क आहे त्या हक्कावर गदा आणत आहात.

**मा. महापौर :-**

सभागृहात आपण एकच नगरसेवक आहात का? ८४ नगरसेवक आहेत. त्यांचे ही हक्क आहेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मी कुठे नाही बोलतो. प्रश्न विचारण्यासाठी कोणालाही अडवलेले नाही. प्रत्येकाने आपआपल्या बुध्दीमत्तेप्रमाणे प्रश्न द्यावेत. कोणाला प्रश्न न देण्यासाठी मी कोणाचाही हाथ पकडलेला नाही.

**मा. महापौर :-**

सचिवजी पुढील प्रश्न घेण्यात यावा. सन्मा. सदस्य आपण बसून घ्या.

**नगरसचिव :-**

प्रश्न क्र. ६१ श्रीम. कैलासबेन जानी दिनेशचंद्र जानी यांचा प्रश्न आहे. त्यांनी पत्र देऊन श्री. ओमप्रकाश अग्रवाल यांना प्रश्न विचारण्याची परवानगी दिलेली आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, या मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या नगरभवनमध्ये जे वाचनालय आहे. त्यामध्ये आपण आमच्या सन्मा. नगरसेविकांना उत्तर दिलेले आहे की, ९०० विद्यार्थ्यांचे रजिस्ट्रेशन केलेले आहे आणि ४० विद्यर्थ्यांना बसण्याची व्यवस्था आहे. आपण विचार करा. आपण एकाबाजुला साक्षरता अभियान किंवा या शहरातील लोक शिकले पाहिजे. येथील डिग्रीहोल्डर झाले पाहिजे, मोठे तज्ञ झाले पाहिजे आणि महानगरपालिकेचा एवढा मोठा बजेट असताना आणि वाचनालय असताना आपण ९०० रजिस्ट्रेशन करता आणि बसण्याची व्यवस्था ४० आहे असे का? ह्याचे मला उत्तर द्यावे. मग आपण रजिस्ट्रेशनच कशाला करता? आणि जर ९०० रजिस्ट्रेशन केली आहेत तर तुम्ही त्यांना कशापध्दतीने बसण्याची व्यवस्था केली आहे. ह्याचा खुलासा करावा.

**मा. महापौर :-**

संबंधित खात्याच्या अधिकाऱ्यांनी या प्रश्नाचा खुलासा करावा.

**अजिज शेख (मा. उपायुक्त) :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो की, आपल्या वाचनालयाची १३ फेब्रुवारी १९९३ ला सुरुवात झालेली आहे आणि तेव्हापासून आजपर्यंत आपल्या आभ्यासिंकेमध्ये ४,२८४ विद्यार्थ्यांना रजिस्ट्रेशन केलेले आहे आणि त्याठिकाणी ४० विद्यार्थी बसू शकतील इतकीच उपलब्ध जागा आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, माझा प्रश्न असा आहे की हा प्रश्न २००४ साली केलेला आहे. म्हणजे सन २००४-५-६ अशी दोन वर्षे झाली. शेवटी आपण काय दिलेले आहे? नविन आभ्यासिकेबाबत धोरणात्मक निर्णय घेतले जाईल. म्हणजे या दोन वर्षामध्ये आपल्याला या विषयाची काही पडलेले नव्हते.

**अजिज शेख (मा. उपायुक्त) :-**

त्याठिकाणी जितकी जागा आहे ......

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

नगरभवन रिकामी झाला होता. आपला सभागृह रिकामी झाला होता. साहेब, आपण असे उत्तर देऊ नका. दोन वर्षामध्ये आपल्या डिपार्टमेन्टने शिक्षण मंडळ किंवा शिक्षेण अधिकाऱ्याला किंवा महापौरांना कोणालाही आपण जाणीव करुन दिली नाही. या शहरातील विद्यार्थ्यांवर अन्याय करत आहोत. लोक आपल्या येथे येऊन रजिस्ट्रेशन करतात. फी भरतात.

**अजिज शेख (मा. उपायुक्त) :-**

सध्या जी जागा आहे त्याठिकाणी ४० विद्यार्थी बसू शकतात. परंतु, मध्यंतरी आम्ही आपले जे परिवहनचे जे कार्यालय आहे त्याचे काम चालू आहे. त्यावर तो एक मजला येणार आहे. त्यावरची जागा आम्हाला मिळावी अशा पध्दतीचे आम्ही बांधकाम विभागाला विनंती पत्र दिलेले आहे. जागा मिळाल्यानंतर आम्हाला ...........

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आपण पत्र दिलेले नाही आणि पत्र दिले असेल तर त्याची तारीख सांगा. आपण याबाबतीमध्ये काही केलेले नाही. आपण जे सांगता ना त्यावर मी ठामपणे सांगतो की, आपण यावर कुठलीही ॲक्शन घेतलेली नाही. आपण सभागृहाला खोटी माहिती देऊ नका.

**अजिज शेख (मा. उपायुक्त) :-**

खोटी माहिती देत नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आपण शिक्षण मंडळ उघडले. आपण तिथे परिवहनचे कार्यालय उघडले. पण तुम्हाला तिथल्या शाळेच्या मुलांना शिकावे हे आपल्या कोणाच्या लक्षात आले नाही. महापालिका अन्य ठिकाणी कोट्यावधी रुपये खर्च करते. पण या शहराचा विद्यार्थी शिकावा. गरजू विद्यार्थी, जे वन रुम किचनच्या फ्लॅटमध्ये राहत आहेत आणि या शहराच्या शैक्षणिक दर्जा उंचावला पाहिजे असे आपल्याला वाटत नाही का? आपण सांगता की, बांणकाम विभागाला पत्र दिलेले आहे. हे पत्र दिलेले आहे. सभागृहाला ही खोटी बातमी देऊ नका. आपले दुर्देव असे आहे की, ज्या कार्यालयामध्ये शाळा चालते तिथे आपण कार्यालय उघडतो. म्हणजे इथला प्रश्न आपल्या लक्षातच आला नाही. या शहराच्या विद्यार्थ्यांचे भले करावे हे महानगरपालिकेचे काम नाही का?

**अजिज शेख (मा. उपायुक्त) :-**

त्या ठिकाणी आपल्याला जागा अव्हेलेबल होण्याची शक्यता आहे. कारण आपल्या परिवहनचे काम तिथे चालू आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, आपण हे कबुल करा की, आम्ही बांधकामाला कळविलेले नाही.

**अजिज शेख (मा. उपायुक्त) :-**

आम्ही कळविलेले आहे त्यांच्या डिपार्टमेन्टच्या इंजिनियर बरोबर आपण बोला.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आपण अजूनही खोटे सांगत आहात.

**दिपक खांबित :-**

आम्हाला कळविलेले आहे आणि त्याप्रमाणे काम करणार आहोत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आपणाला कधी कळविलेले आहे?

**दिपक खांबित :-**

या महिन्यामध्ये पत्र आलेले आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

हा सन २००४ चा विषय आहे. या प्रश्नाला दोन वर्षे झालेली आहे. बांधकाम विभागाकडे फंड नाही का?

**दिपक खांबित :-**

आम्हाला आता या महिन्यामध्ये कळविलेले आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आपण असे सांगा ना. या महिन्यामध्ये कळविलेले आहे. आम्ही हेच सांगत आहेत. आम्ही खोटं सांगत नाही. साहेब, या महिन्यामध्ये कळविलेले आहे. आपण याची नोंद घ्या. म्हणजे सभागृहाला दिशाभूल करण्याचे हे अधिकारी प्रयत्न करत आहेत. हे प्रयत्न करु नका.

**अजिज शेख (मा. उपायुक्त) :-**

दिशाभूल कुठे केली? आपल्याला फॅक्ट सांगत आहे. त्याठिकाणी जागा नव्हती. त्या ठिकाणी हॉल होता. पूर्वीचा जो हॉल होता तो अभ्यासिकेसाठी नव्हता.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

अजूनही सांगत आहे, अजूनही खोटं बोलत आहेत. हे मी आपल्याला खात्रीने सांगतो.

**अजिज शेख (मा. उपायुक्त) :-**

मग ह्याच्यात काय करु? ते आपण बोला.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आपण कुठलाही पत्रव्यवहार केलेला नाही. आपल्याला या विद्यार्थ्यांच्या अभ्यासिकेसाठी वर्ग उघडावे, या शाळेतील विद्यार्थी या वाचनालयामध्ये येऊन शिक्षण घ्यावे असे कोणालाही वाटत नाही.

**अजिज शेख (मा. उपायुक्त) :-**

एक्झीक्युटीव्ह इजिनियर बोलत आहे ना की, पत्र दिलेले आहे. तर ते बोलणे खोटे झाले का?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

पत्र कधी दिले आहे? सन २००४ चा विषय आहे आणि मागच्या महिन्यामध्ये पत्र दिले. म्हणजे कशावर आपण आम्हाला आश्वासित करता? या शहराचे कोणी कल्याण करणार का नाही? आपण कचऱ्यावर लक्ष ठेवू नका. आता मुले शिकायला येतात. त्या शहरामध्ये सर्व मध्यमवर्गीय लोक येतात. त्यांचा वन रुम किचनचा फ्लॅट आहे. त्यांना कुठेतरी शिक्षण मिळावे ही महापालिकेची गरजेची बाब आहे आणि आपण सांगता की, एक महिन्याआधी मी बांधकाम विभागाला पत्र दिलेले आहे आणि हे ही खोटं बोलत आहेत.

**मा. आयुक्त :-**

पत्र दिले म्हणून सभागृहासमोर सांगत आहेत ना.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, शिक्षणाच्या बाबतीमध्ये सर्व सभागृह चिंतीत आहे. आपण लक्ष देत नाही. हा शिक्षणाचा विषय आजचा नाही.

**अजिज शेख (मा. उपायुक्त) :-**

त्याठिकाणी जागेची अव्हलेबिलिटी झाल्यानंतर आपल्याला तिथे आभ्यासिकेचे एक्स्टेंन्शन करता येईल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आपण काय प्रपोझल पाठविले ते सांगा?

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्य, वाचनालयामध्ये जी तुटपुंजी व्यवस्था आहे किंवा विद्यार्थ्यांची गैरसोय होत आहे. हे जे आपण प्रभावीपणे सभागृहामध्ये मांडत आहात. त्याबाबतीमध्ये मी आपल्याला असे आश्वासन देतो की, आपण जे काही वक्तव्य करत आहात आणि आपल्या ज्या भावना आहेत त्या भावनांचा आदर करुन ४० विद्यार्थ्यांची आज महानगरपालिकेने त्याठिकाणी बसण्याची व्यवस्था केलेली असेल आणि ती जागा जर खरोखर अपुरी पडत असेल, अपुरी पडतच असेल. तर त्याची समक्ष मी पाहणी करेन आणि पुढच्या वर्षाच्या बजेटमध्ये तशी तरतुद करुन आपण जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना त्या तिथे बसण्याची व्यवस्था करु.

**रोहिदास पाटील :-**

साहेब, याचा पर्याय आहे. आपण तो पर्याय शोधत नाही. आपण पश्चिमेची संख्या बघून, पूर्वेकडची जनसंख्या बघून, पूर्वेकडे होणारा प्रभाग ऑफिस आता आपण गोड उत्तर देऊ शकले असते की पूर्वेच्या प्रभाग ऑफिसमध्ये आपण नविन अद्यावत वाचनालय सुरु करुन तिथले रजिस्ट्रेशन येथे ट्रान्सफर करु. जसे गॅसवाले करतात तसे. असे आपण उत्तर दिले नाही. तसे जर उत्तर दिले असते तर त्यांचे समाधान झाले असते.

**मा. महापौर :-**

सचिवजी पुढचा प्रश्न घेण्यात यावा.

**नगरसचिव :-**

प्रश्न क्र. ६२ श्री ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल यांचा प्रश्न आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, हा जो प्रश्न आहे .............

**चंद्रकांत मोदी :-**

मॅडम, प्रश्नोत्तर का आधा घंटा पुरा हो गया है।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ठिक है। सन्मा. सदस्य चंद्रकांत मोदी साहब यह प्रश्न अगले टाईम ले लेंगे। मेरी कोई हरकत नही है। मा. महापौर मॅडम, आपण मला नेहमी प्रेमाने फटकारे मारतात. त्याची हरकत नाही. पण हा जो विषय आहे. या विषयाच्या गांभीर्याने दोन वर्षापूर्वी उल्लेख केलेला आहे. प्रश्न क्र. ३ (क) मध्ये महापालिकेमध्ये सुट देण्याची तरतुद आहे का? म्हणजे लोकांनी वेळेवर १५ दिवसात टॅक्स भरले तर सुट देण्याची तशी तरतुद आहे का? आपल्याकडून त्याचे उत्तर मिळाले नाही. मा. महापौर साहेबा, आत्ताचे जे अधिकारी श्री. अजित पाटील व आयुक्त साहेब यांनी निर्णय घेतला. सभागृहामध्ये तो निर्णय आला आणि आपण सत्कारामध्ये उल्लेख केला की, ७ कोटीची वसुली झाली. हा निर्णय दोन वर्षापूर्वी झाला असता तर आज या महापालिकेतील लोकांची थकबाकी भरपूर वसुल झाली असती. आपण मला दोष देता की, तुम्हीच प्रश्न विचारता, तुम्हीच बोलता. आम्ही जे बोललो ते दोन वर्षापूर्वी बोललो होतो. जर या दोन वर्षापूर्वी निर्णय घेतला असता तर आज महानगरपालिकेत ही रांग लागली नसती. लोकांना माहित झाले असते. म्हणून सर्वप्रथम हा निर्णय आयुक्त साहेबांनी घेतला. अजित पाटील यांनी हा निर्णय घेतला. नविन आयुक्त झाले त्यांनी ताबडतोब ही प्रोसिडिंग आणून निर्णय घेतला. म्हणूल मी सांगतो की, असे निर्णय घेण्याची क्षमता अधिकाऱ्यांमध्ये निर्माण करा. काही ठिकाणी कायद्याची तरतुद मा. महासभेलाही दिलेली आहे. आपल्यालाही दिलेली आहे. पण त्याचा उपयोग कोणी करत नाही. म्हणून कायद्याची बाजु वाचून अशापध्दतीने जर शहराचा विकास केला तर फार उत्तम होईल. ह्याच्यामध्ये माझा एक असा प्रश्न आहे आणि तो सर्वांना आवडेल. महापालिकेने सप्टेंबर महिन्यामध्ये बिल पाठवले. म्हणजे सहा महिन्यानंतर. मार्च महिन्यापर्यंत कोणी बिल भरले नाही. तर एप्रिल महिन्यामध्ये पुन्हा बिल येणार. त्यावेळी व्याजाची रक्कम ही कोणत्या महिन्यापासून कोणत्या महिन्यापर्यंतची लावणार?

**अजित पाटील :-**

सन्मा. सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे तर नियमात तरतुद अशी आहे की, बिल दिल्यापासून १५ दिवसाच्या आत त्यांनी पैसे भरायचे आहेत. पैसे न भरल्यास त्यांना मागणी नोटीस जाते. मागणीची नोटीस दिल्यापासून १५ दिवसात बिलाची रक्कम भरली नाही तर त्या दिनांकापासून त्यांना व्याजाची आकरणी करण्यात येत असते.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

म्हणजे त्या दिवसापासून. जर आपण सप्टेंबर महिन्यामध्ये बिल दिले म्हणजे सप्टेंबर महिन्यानंतर आपण व्याजाची रक्कम घेणार ना.

**अजित पाटील :-**

नोटीस दिल्यापासून १५ दिवसाच्या आत रक्कम न भरल्यास अशी तरतुद आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आयुक्त साहेब, आत्ताच्या व्याजाची रक्कम बिलामध्ये लावली जाते. त्यात संपूर्ण वर्षाचे व्याज लावता. जेव्हा आपण बँकेत डिपॉझिट केली नाही तर बँक व्याज कसे देणार? आपण बिलच पाठवले नाही आणि आपण व्याजेची मागणी करता. हे कसे योग्य आहे? ज्यांनी सप्टेंबर ते मार्च या सहा महिन्याच्या कालावधीमध्ये नोटीस दिलेली आहे. या सहा महिन्यामध्ये ज्याने बिल भरली नाहीत. त्यांना तुम्ही सहा महिन्याचे व्याज लावायला पाहिजे आणि पुढच्या वर्षामध्ये सहा महिन्याचे राहील. पण आतापर्यंत महापालिकेने लोकांकडून संपूर्ण वर्षाचा व्याज घेतलेला आहे. आपण नागरिकांचे अशाप्रकारे छळ करु नका असे आमचे म्हणणे आहे. मागणी करा. तुम्हाला मागणी करण्याचा हक्क आहे. दुसरा मुद्दा असा आहे की, आपण जी व्याजाची रक्कम लावतो. पहिल्या वर्षी त्या माणसांनी ते ही भरले नाही. म्हणजे सन २००३-०४ ते २००४-०५ या दोन वर्षाची थकबाकी त्या माणसाने भरली नाही आणि व्याजाची रक्कम पाचशे रुपये आहे. त्या व्याजावर व्याज महापालिका लावू शकते का?

**अजित पाटील :-**

कायद्यामध्ये तरतुद आहे. बिलाची मागणी नोटीस दिल्यानंतर त्यामध्ये देय असणाऱ्या रक्कमेवर व्याज लागण्याची तरतुद आहे. त्याप्रमाणे व्याज लावले जाते. मागणी नोटीसमध्ये व्याजाची डिमांड असते. त्यामुळे मागणी नोटीस दिल्यानंतर जी रक्कम देय होईल त्याच्यावर व्याज लावण्याची व्याज लावण्याची तरतुद आहे. त्या नियमानुसार व्याज लावले जाते.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

व्याजावर व्याज?

**अजित पाटील :-**

असते. मागणी नोटीसमध्ये जी मागणी केलेली आहे. त्या मागणी नोटीसमध्ये व्याज इन्क्लूड झालेले असते. त्या देयक मागणी नोटीसवर व्याज लागते. म्हणजे व्याजावर व्याज हे नियमाच्या तरतुदीनुसार लागते.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ठिक आहे. आता जे लोकांकडून चुकीने व्याज घेतलेले आहे. ती रक्कम महापालिका परत करणार का?

**अजित पाटील :-**

असे देता येणार नाही. पण पुढील वर्षी या सुचनेनसार विचार करुन व्याज लावण्याची कार्यवाही करु.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

म्हणजे आपल्याला घेता येते. लोकांचे पैसे आपण कसे खा.

**रोहिदास पाटील :-**

अजित पाटील साहेब, आपण आम्हाला पत्र दिले आहे की, त्याला आम्ही स्टॅम्पींग करुन देणार. आज ही जी घरपट्टीची पावती मिळाली आहे त्याच्यावर तारीख नाही. ती एप्रिल महिन्यापासूनच पकडली जाईल.

**अजित पाटील :-**

काय?

**रोहिदास पाटील :-**

आपण मला पत्र दिले की, बिल वाटते वेळी ज्यादिवशी बिल देतो त्याची तारीख लिहली जाईल. पण त्याच्यावर स्टॅम्प नाही.

**अजित पाटील :-**

आपला मुद्दा कसा होता. बिल कधी दिले जाते? आम्ही म्हटले आहे की, बिल मिळाल्यापासून १५ दिवस मोजले जातील.

**रोहिदास पाटील :-**

स्टॅम्प तर मारला पाहिजे ना. ज्या दिवशी बिल दिले जाईल.

**अजित पाटील :-**

आमच्याकडे त्याची पोच पावती आहे.

**रोहिदास पाटील :-**

आम्हालाही त्याची माहिती पाहिजे ना. आमची आपल्याला विनंती होती की, सकाळी निघते वेळी माणूस स्टॅम्पींग करुन निघाला पाहिजे.

**अजित पाटील :-**

तो कर्मचारी स्टॅम्पींग करुनच निघतो ना.

**रोहिदास पाटील :-**

तसे होत नाही.

**अजित पाटील :-**

सगळ्यांना इस्ट्रक्शन दिलेले आहेत. त्याप्रमाणे शिक्के मारलेले आहेत.

**रोहिदास पाटील :-**

आज जी पावती दिली आहे ती पावती आपल्याला उद्या आणून देतो.

**अजित पाटील :-**

प्रत्येकाला बिलावर स्टॅम्प मारण्याची सुचना दिलेली आहे. त्याप्रमाणे कार्यवाही केली जाते. त्यात एखादं दुसरे राहिले असेल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, व्याजाची रक्कम ज्याने ................

**अजित पाटील :-**

या व्याजाच्या संदर्भात नागरिकांकडून मागण्या आल्यानंतर त्याच्यावर आम्ही कायदेशीर तरतुदीनुसार विचार करुन कार्यवाही करु.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

कायद्याची तरतुद आहे का? आपण चुकीने घेतलेली रक्कम परत का देणार नाही? कुठल्या कायदा बोलतो?

**अजित पाटील :-**

थकबाकीदारांची मागणी आली ...........

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आपण चुकीने घ्यायची आणि नंतर कायदा बघायचा.

**अजित पाटील :-**

या संदर्भात थकबाकीदारांची तक्रार आल्यानंतर त्याची छानणी केली जाईल व कार्यवाही केली जाईल.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्य आपण हा जो प्रश्न उपस्थित केलेला आहे. तर आपले म्हणणे बरोबर आहे. कायद्याच्या तरतुदीप्रमाणे कर आकारणी करायला पाहिजे व त्याच्यावरचे व्याजदर निश्चित केले पाहिजे. जर समजा, कायद्याच्या तरतुदीप्रमाणे विसंगत व्याज आकारणी केलेली असेल आणि संबंधित नागरिकांनी महपालिकेकडे जर तशाप्रकारे लेखी तक्रार केली तर त्याच्यावर विचार करुन निर्णय घेण्यात येईल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, अजूनही आपण दिशाभूल करत आहात. मला सांगा, ज्या व्याजाची तरतुद नव्हती. ते व्याज आपण घेतले. लोकांना माहिती नाही म्हणून लोकांनीही दिली. आज आम्हाला माहित झाले. आपण जे व्याज चुकीने घेतलेले आहे. महापालिकेच्या इलेक्शनमध्ये माझ्यावर ७ रुपयाची नोटीस फी लावली होती. मी वेळेवर फी भरले. त्याचा मी रिबेक घेतलेला आहे. मला सांगितले की, ७ रुपयाची नोटीस तुझी कॅम्प्युटरमधून वजा करुन ती रक्कम वजा केली नाही आणि ज्यावेळी इलेक्शनचा फॉर्म भरायला गेलो तेव्हा माझ्यावर ७ रुपयाची थकबाकी दाखविली.

**मा. आयुक्त :-**

आमच्याकडे अशा प्रकारची तक्रार आलेली नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आपल्याकडे मी तक्रार करतो. असे सर्वांवर अन्याय झालेला आहे. त्या सगळ्यांना व्याजाची रक्कम मिळाली पाहिजे.

**अजित पाटील :-**

व्याज अनियमितरित्या घेतला असेल तर यासंदर्भात कोणीही खातेदारांनी तक्रार केली तर त्याची छानणी करुन त्याच्या व्याजाची रक्कम परत केली जाईल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ठिक आहे.

**रोहिदास पाटील :-**

आपल्या ऑडीटमध्ये असे येत नाही का? ऑडीट डिपार्टमेंट जे काम करते, आपल्यावर किती शेरे लागले गेले?

**अजित पाटील :-**

इंडीव्ह्युजव्हल जर कोणी थकबाकीदाराने मागणी केला............

**रोहिदास पाटील :-**

अजित पाटील साहेब, या कामकाजाच्या पध्दतीवर नगरपरिषदेमध्ये बेकायदेशीर वसुल केल्याचे किती रिमार्क मारले गेले? ते रिमार्क मारुन सुध्दा आपण सुधारत नाही. पुन्हा पुन्हा चुका करता. कर वसुलीचे रिमार्क आहेत की नाही.

**अजित पाटील :-**

रिमार्क आहेत.

**रोहिदास पाटील :-**

नगरपालिकेच्या ऑडीटमध्ये रिमार्क मारले आहेत की नाही?

**अजित पाटील :-**

होय.

**रोहिदास पाटील :-**

मग त्याची अंमलबजावणी आपण का करत नाही? आम्ही चुक दाखवूनसुध्दा आपण एकतच नाही आणि ऑडीटरनेही रिमार्क मारल्यानंतर आपण सुधारत नाही. त्याची दखल तरी घ्यायला पाहिजे की नाही.

**अजित पाटील :-**

ठिक आहे. पुढील वर्षी याची दखल घेऊ.

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, आपण जी टॅक्सची ५ टक्के सूट दिलेली आहे. त्याबद्दल आपल्याला धन्यवाद देते. परंतु, ह्याच्यामध्ये काही असे केसेस आहेत की, ज्यांचे बिले चुकीचे आलेले आहेत आणि जेव्हा ते बिल भरायला गेले तेव्हा त्यांनी दाखवले की, हे चुकीचे आहे. आम्ही बिल भरले आहे आणि ते बिल ॲड होऊन आलेले आहे. आपण जी सूट दिलेली आहे ती सूट आली नाही. आपण परत तीच चूक केलेली आहे. असे पेन्डींग बिल आहे. असे बिल भरणा करायला येणार. ते सुधारित करुन देणार तेव्हा ते भरणा करायला येणार. मग त्यांना आपण ५ टक्के सूट देणार की नाही.

**अजित पाटील :-**

जर बिलाची मिस्टेक झाली. पावती बिलावर थकवली नसेल आणि जर बिल दाखवून दिले तर ज्या दिवशी त्याला बिल दुरूस्त करुन मिळेल. तेव्हापासून त्याचे १५ दिवस पकडले जातील.

**रिटा शाह :-**

मी असे विचारत नाही. जसे माझ्या शाळेचा मुद्दा आहे त्याला ५० टक्के सुट मिळाली आहे. परंतु, दरवर्षी मला ओरिजनल बिल मागितले जाते.

**अजित पाटील :-**

दुरुस्त करून ज्यावेळी आपल्याला बिल सबमिट होईल.

**रिटा शाह :-**

दरवर्षी मी दुरूस्त करून देते परत तेच.

**अजित पाटील :-**

या संदर्भात सन्मा. नगरसेवक शशिकांत शाह ह्यांनी तक्रार केली होती व दुरूस्तीची जी कामे आहेत ती दोन दिवसात होतील.

**रिटा शाह :-**

साहेब, मला बिल मिळाले त्याचदिवशी मी बिल भरायला आली. मला बिलात दुरूस्ती करून द्या. पण त्यांनी सांगितले की, आता लोकांची फार गर्दी आहे. त्यामुळे आपण नंतर या. आम्ही आपल्याला नंतर दुरूस्ती करून देऊ. त्यामुळे आपण आम्हाला नंतर ५ टक्के सूट देणार आहात का?

**अजित पाटील :-**

पहिले प्रथमतः सर्व बिल काढण्याचे काम चालू आहे. बिल काढण्याचे काम पूर्ण झालेले आहे. दुरूस्तीचे काम चालू आहे. दोन दिवसाच्या आत दुरूस्ती बिल सादर केली जातील आणि तेव्हापासून त्याची मुदत पकडली जाईल.

**रिटा शाह :-**

मग त्यांना सूट देणार ना?

**अजित पाटील :-**

होय. सूट देण्यात येईल.

**गजानन भोईर :-**

मा. महापौर मॅडम, हा नागरिकांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. आपण १ लाख ८५ हजार रूपये कल्याण डोंबिवली महानगरपालिकेला देत आहोत. सव्वा ते दिड कोटी रुपये आपण सी.एफ.सी. करिता खर्च केला. आता, मी प्रत्येक वर्षी हाऊस टॅक्स भरतो. यावेळेस मला २२०० रूपये टॅक्स दंडासहीत आला. भरायला गेलो तर मागच्या वर्षाचा टॅक्स भरलेला होता. आपण सांगू शकाल का, आपले डिमान्ड किती आहे? संपूर्ण मिरा भाईंदर मागणी किती आहे? माझ्या एका बिलामध्ये सोळाशे रुपये कमी झाले. तर असे हजारो बिल

आहेत. म्हणजे आपण कमी करून देता. तर सी.एफ.सी. मध्ये नक्की कामकाज काय होत आहे? जर मी प्रत्येकवर्षी `बिल भरतो तरी माझी दोन वर्षाची थकबाकी दाखविलेली आहे. मग नक्की चुकी कुठे होते? अधिकाऱ्यांची चुकी आहे की, संगणकाची चुकी आहे.

**अजित पाटील :-**

संगणकाच्या काही तांत्रिक चुका राहतात तर आम्ही ताबडतोब रेकटीफाय करुन देत असतो.

**गजानन भोईर :-**

संगणकाची मिस्टेक आहे की, कोणाची मिस्टेक आहे? आपल्या रजिस्टरमध्ये नोंदी होतात का?

**अजित पाटील :-**

काही काही वेळेला संगणकाची सुद्धा मिस्टेक होऊ शकते. पावतीची पोस्टींग राहते.

**शिवप्रकाश भुदेका :-**

१ लाख ४६ हजार रुपया हर महिना क्यो देते है?

**गजानन भोईर :-**

याच्यामध्ये महानगरपालिकेचे नुकसान होते ना. आपण बजेटमध्ये ह्याचे कसे करणार? एखाद्या व्यक्ती आपले टॅक्स दुसऱ्याच्या नावाने ट्रान्सफर करतो. तीन वर्षानी परत यावर्षी सर्वांना जुन्या नावाने आले.

**अजित पाटील :-**

बिल येते असेल. पण अमाऊन्टला तेवढा फरक पडत नाही. ट्रान्सफर झाले ट्रान्सफर नाव चेंज होत नाही. पण अमाऊन्ट तीच राहते ना.

**गजानन भोईर :-**

असे प्रत्येक वर्षी का हाते?

**अजित पाटील :-**

या संदर्भामध्ये काही केसेस माझ्याकडे आल्या तर त्याचे ताबडतोब निराकरण करण्यात येईल.

**गजानन भोईर :-**

१ लाख ८५ हजार रुपये द्यायचे बंद करा व १५ माणसे बसवा. म्हणजे लवकर काम होईल.

**रतन पाटील :-**

अजित पाटील साहेब, हे आपल्या अधिकाऱ्यांकडून खतवल्या गेल्या नाहीत. म्हणून आपले अधिकारी जसे देतील तसेच कॉम्प्युटरमध्ये येणार आहे.

**शिवप्रकाश भुदेका :-**

मा. महापौर मॅडम, आयुक्त साहबने बोला की, आपके ट्रस्ट मे विचार दिया तो वह एकदम सही रहता है। भारतीय जनता पार्टी कभी ट्रस्ट मे है तो महानगरपालिका और शहरके हित मे सवाल पुछती है। हम कभी सन्मा. नगरसेवक महेंद्रसिंग चौहाण जैसे पुछते नही है। शहर अभियंता उनका एज्युकेशन कितना है?

**महेंद्रसिंग चौहान :-**

दस सब पर ध्यान देने की आपको जरुरत भी नही है। हम हमेशा जनहित के बारे मे ही प्रश्न करते है।

**शिवप्रकाश भुदेका :-**

शहर अभियंता को हम कभी पुछते नही है की, आपका एज्युकेशन कितना है? यह महाराष्ट्र शासन का काम हे।

**महेंद्रसिंग चौहान :-**

भारतीय जनता पार्टी का नाम जैसे आप लेते हो, वैसे हमने पार्टी का नाम कभी भी नही लिया है। यह सब तुम्हारे जैसे तुच्छ आदमी, जो भारतीय जनता पार्टी का नाम लेते है। हमने कभी पार्टी का नाम नही लिया है। तुम्हारी औकात क्या है? तुम पार्टी का नाम लेकर बात करो हमने कभी पार्टी का नाम लेकर बात नही की है।

**नगरसचिव :-**

प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

**मा. महापौर :-**

सचिवजी, पुढील विषयाला सुरुवात करावी.

**नगरसचिव :-**

आजच्या सभेकरिता दोन लक्षवेधी आलेली आहे. पहिली लक्षवेधी श्रीम. रिटा शाह ह्यांची आहे आणि दुसरी लक्षवेधी श्री. रतन कृष्णा पाटील ह्यांची आहे. या दोन्ही लक्षवेधी मी मा. महापौरांकडे सादर करत आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

पहिली लक्षवेधी माझी आहे. माझ्याकडे तारखेसकट सही आहे.

**महेंद्रसिंग चौहान :-**

आपको उसी पार्टी मे जाना चाहिए।

**शिवप्रकाश भुदेका :-**

हमको हमारे पार्टी पर गर्व है। आप आपके पार्टी का नाम नही ले सकते हो।

**महेंद्रसिंग चौहान :-**

आप कोई भी पार्टी मे जा सकते हो।

**शिवप्रकाश भुदेका :-**

आपको हमारे पार्टी का नाम लेने के लिए शर्म आती होगी। हमको हमारे पार्टी पर गर्व है।

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्यांनी खाली बसावे.

**नगरसचिव :-**

एकून तीन लक्षवेधी आहे. पहिली लक्षवेधी श्री. ओमप्रकाश अग्रवाल. दुसरी लक्षवेधी श्रीम. रिटा सुभाष शाह आणि तिसरी लक्षवेधी श्री. रतन पाटील यांची आहे. तिन्ही लक्षवेधी मी मा. महापौरांकडे सुपुर्द करत आहोत.

**मा. महापौर :-**

पहिली आलेली लक्षवेधी श्री. ओमप्रकाश अग्रवाल यांची आहे. त्यांनी लक्षवेधी मांडलेली आहे.

**रिटा शाह :-**

सचिव साहेब, मी आपल्याकडे चार दिवस अगोदर लक्षवेधी दिली होती.

**नगरसचिव :-**

नाही.

**रिटा शाह :-**

आणि आपण मला सांगितले की, दोन तास अगोदर लक्षवेधी दयायची आहे. मी म्हटले ठिक आहे. मग आता चार दिवस अगोदर दिलेली लक्षवेधी पहिली की, आपल्याकडे ९.०० ला ५ मिनिटे कमी असताना येऊन गेली. आपण हजर नव्हता. मग आपण कोणती लक्षवेधी पहिली घेणार? ते मला सांगा.

**नगरसचिव :-**

अनुक्रमे तीन लक्षवेधी आली होती. ती पहिली लागेल.

**रिटा शाह :-**

मी आपल्याला चार दिवसापूर्वी आणि आजही मी सकाळी ९.०० ला ५ मिनिटे कमी असताना नियमानुसार आपल्या कार्यालयात पोच घ्यायला हजर झाले होते. मग कोणाची लक्षवेधी पहिली? आपण कुठल्या बेसने त्यांची लक्षवेधी पहिली सांगता. मी आपल्याला चार दिवसांअगोदर लक्षेवधी दिली होती.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

पहिली लक्षवेधी माझी आहे.

**रिटा शाह :-**

९.०० वाजायला ५ मिनिटे कमी असतांना मी या कार्यालयात हजर झाली आहे. कायद्याच्या हिशोबाने मी वेळेत हजर झाली होती पण सचिव साहेब जागेवर नव्हते.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. नगरसेवक श्री. ओमप्रकाश अग्रवाल ह्यांची जी सुचना आहे, ती लक्षवेधी लोकांच्या हिताची आहे. ती लक्षवेधी आपण सभागृहात चर्चेला घ्यावी.

**रिटा शाह :-**

आम्ही जी लक्षवेधी दिली आहे ती ही लोकांच्या हिताची आहे.

**नगरसचिव :-**

पहिली लक्षवेधी श्री. ओमप्रकाश अग्रवाल ह्यांची आलेली आहे.

**रिटा शाह :-**

कोणत्या बेसवर ती लक्षवेधी पहिली आहे हे आपण सांगा. त्याचे उत्तर द्या. कायद्यानुसार दोन तास अगोदर लक्षवेधी द्यायला पाहिजे हे बरोबर आहे. तर ९.०० ला ५ मिनिटे कमी असतांना मी कार्यालयात हजर झाले. पण साहेब, आपण जागेवर नव्हता.

**नगरसचिव :-**

मी महापौर दालनात होतो.

**रिटा शाह :-**

आपण कुठेही असू द्या. आपण दोन तास अगोदर तिथे थांबायला पाहिजे. तुम्हांला ४ दिवस अगोदर मी ती लक्षवेधी दिलेली आहे.

**मा. महापौर :-**

तीन लक्षवेधीपैकी सचिवांनी सांगितल्याप्रमाणे सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश अग्रवाल यांची लक्षवेधी स्विकारण्यांत येत आहे व त्यांना लक्षवेधीवर चर्चा करण्याकरिता दहा मिनिटांचा अवधी देण्यांत येत आहे.

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, माझी लक्षवेधी का फेटाळली?

**रतन पाटील :-**

तिन्ही लक्षवेधी वाचा.

**मा. महापौर :-**

सचिव तिन्ही लक्षवेधी वाचून दाखवतील.

**रिटा शाह :-**

सचिव, आपण मा. महापौरांची आणि सभागृहाची दिशाभूल करत आहात.

**नगरसचिव :-**

दिशाभूल करत नाही.

**रिटा शाह :-**

आपण सन्मा. नगरसेवक श्री. ओमप्रकाश अग्रवाल यांची लक्षवेधी कोणत्या बेसवर पहिली सांगता त्यांचे उत्तर द्या.

**नगरसचिव :-**

माझ्या अगोदर ती लक्षवेधी कार्यालयात जमा होती.

**रिटा शाह :-**

मी तुम्हाला चार दिवस अगोदर लक्षवेधी देऊन गेलेली आहे आणि आज ९.०० ला ५ मिनिटे कमी असताना मी तुमच्या कार्यालयात उपस्थित झाली होती. तुम्ही तिथे जागेवर नव्हता.

**मा. उपमहापौर :-**

पोच दिली असेल ना.

**रिटा शाह :-**

पोच दयायला ते जागेवर नव्हते.

**नगरसचिव :-**

तिन्ही लक्षवेधीचे वाचन करतो.

**रिटा शाह :-**

मी सचिवाचा निषेध करते. श्री. हरेश पाटील यांच्यावर कार्यवाही करा. कारण ते जागेवर उपस्थित नव्हते. त्यांच्या कार्यालयामध्ये मी चार दिवस अगोदर ही गेले होते आणि आजही गेले व आता ते चुकीचे बोलत आहे की, सन्मा. नगरसेवक ओमप्रकाश अग्रवाल यांची लक्षवेधी पहिली आली आहे. ठिक आहे, त्यांची लक्षवेधी कशी पहिली आली आहे हे आपण मला दाखवा ना. मला असे त्यांची काही नाही. त्यांचा ही विषय खूप चांगला आहे. मी एकटी आली होती आणि तिथे कमीत कमी साडे नऊ वाजेपर्यंत बसली होती. मॅडम, तिथे कोणीही आले नाही. मी तुमच्या ऑफिसमध्ये साडेनऊ पर्यंत बसून होती.

**जयंत पाटील :-**

असा जर नियम आहे की, दोन तास अगोदर लक्षवेधी दया. तर दोन तास अगोदर आपण तिथे जागेवर हजर पाहिजे.

**नगरसचिव :-**

लक्षवेधी दोन तास अगोदर घ्यायचा नियम आहे.

**जयंत पाटील :-**

आपण कार्यालयात हजर नाही. हा नगरसेवकांचा दोष नाही हा आपला दोष आहे. आपण तिथे हजर असायला पाहिजे. कोणाची लक्षवेधी पहिली आली हे ठरविण्याकरिता आपण तिथे हजर पाहिजे ना. आपण जर तिथे हजर नाही तर तो आपला दोष आहे.

**रोहिदास पाटील :-**

जी दुरूस्ती करत आहे ती दुरुस्ती समजून घेण्याचा प्रयत्न करा. ते खरं किंवा खोटं हे आयुक्त साहेब सांगतील. ही जी लक्षवेधी ती दोन तास अगोदर तर किमान दोन तास अगोदर म्हणजे त्याचा आदला दिवस आहे की, दोन दिवस आधी आहे असे ही ते मोजले जात नाही. कारण आपण रुलिंग देतेवेळी दोन तासापूर्वी दिले पाहिजे असे नाही. किमान दोन तास आधी सभा चालू व्हायच्या किमान दोन तास आधी.

**रिटा शाह :-**

म्हणजे सचिव साहेब आम्हाला चुकिची माहिती देतात. मी त्यांच्याकडे पोच घ्यायला पोच घ्यायला चार दिवस अगोदर गेले होते. मला बोलले की, तुम्हाला दोन तास अगोदर पोच मिळणार मग मी ९.०० ला ५ मिनिटे कमी असताना गेली.

**रोहिदास पाटील :-**

आपली लक्षवेधी चार दिवस अगोदरची आहे आणि सन्मा. ओमप्रकाश अग्रवाल यांची लक्षवेधी पाच दिवस अगोदरची आहे.

**रिटा शाह :-**

आम्हाला पोच दाखवा ना. जर पाच दिवस अगोदरची लक्षवेधी आहे.

**रोहिदास पाटील :-**

या पोचवर तारीख आहे दि. ५/१०/०६, वेळ १२.४५.

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. रोहिदास पाटील या संदर्भात आपल्या उपविधीमध्ये काय नोंद आहे त्याचे वाचन करुन ठरवू.

**रोहिदास पाटील :-**

म्हणजे खरी माहिती मिळेल.

**मा. उपमहापौर :-**

जी खरी माहिती आहे त्याप्रमाणे करु.

**रिटा शाह :-**

मा. महापौर साहेबा, मा. उपमहापौर साहेब, महत्त्वाचा मुद्दा असा आहे की, मी हरेश पाटील यांच्याकडे गेले व मी म्हणाले की, मला याची पोच दया. त्यावर ते बोलले की, दोन तास अगोदरच लक्षवेधी घेऊ शकतो आणि त्यांनी सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल यांना पाच दिवस अगोदर पोच दिलेली आहे. हे असे नगरसेवकांमध्ये भेदभाव का करता?

**नगरसचिव :-**

भेदभाव करत नाही.

**रिटा शाह :-**

मी त्यांचा निषेध जाहिर करते. ते त्या पदावर बसण्याच्या लायकीचे नाही. हे सर्व नगरसेवकांबरोबर भिन्न व्यवहार का करता?

**प्रभात पाटील :-**

असेच झाले ना. आपण ह्यांना सांगता की, दोन तास अगोदर पोच देतो आणि एकाला पाच दिवस अगोदर पोच देता. हा अन्यायच आहे ना. आपण एखादयावर असा अन्याय करु शकत नाही. दोन्ही नगरसेवक सारखे आहेत. आपण एकाला एक उत्तर देता आणि दुसऱ्याला पोच देता हे बरोबर नाही.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्या रिटा शाह आपण मांडलेली सुचना महत्त्वाची आहे. सभाशास्त्रानुसार मा. महासभेचा दिवशी दोन तास आधी लक्षवेधी आल्यानंतर ती लक्षवेधी स्विकारली जाईल आणि आपला असा नियम आहे की, जी लक्षवेधी अगोदर येईल ती पहिली लक्षवेधी म्हणून घेतली जाईल.

**रिटा शहा :-**

मॅडम, महत्त्वाचा मुद्दा असा आहे कि, मी त्यांच्याकडे गेली असतांना त्यांनी मला पोच दिली नाही. विचारा त्यांना, मी समोर आहे आणि त्यांना पोच दिली. मला पोच दिली असती तर त्यांच्या अगोदर माझा प्रश्न आला असता. मॅडम, हे चुकीचे आहे. आपण लक्षवेधी तिघांची फेटाळा.

**प्रभात पाटील :-**

एकाला पोच देतात आणि एकाला पोच देत नाही हे चुकीचे आहे ना. हे पुर्णपणे चुकीचे आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

पिठासीन अधिकारी, सभा शास्त्र नियम असे सांगतो की, दोन तास अगोदर. मग दोन तास अगोदर हे कधीही होउ शकतो. असे नाही की, सभेचा दिवस उगवल्या नंतर सभेच्या दिवशी असे होउ शकत नाही. अशा पद्धतीने २ तास अगोदर जेंव्हा एक लक्षवेधी येते मग ती कधीही येउ द्या त्यानंतर स्विकारलीच नाही पाहिजे. कारण एकच लक्षवेधी वर चर्चा होते. मग दोन तास अगोदर कधीही लक्षवेधी आली तरी ती तुंम्हाला घ्यावी लागते.

**रिटा शहा :-**

आंम्हाला चुकीची माहिती का देतात? मग आपण ५ दिवस अगोदर एक लक्षवेधी स्विकारली आणि आंम्हाला मग चुकीची उत्तरे का देता?

**प्रफुल्ल पाटील :-**

किमान दोन तास अगोदर ह्याचा अर्थ कधीही आली तरी ती तुंम्हाला घ्यायला लागते. सभा शास्त्र नियम काय सांगतो मा. महासभेच्या दिवशी २ तास अगोदर याचा अर्थ कधीही होतो.

**रिटा शहा :-**

सन्मा. प्रफुल्ल पाटील साहेब, आता तो मुद्दा राहीला नाही मुद्दा आता राहीला आहे की, मी त्यांच्याकडे पोच घ्यायला गेली. मी ४ दिवस बोलते, पण ५ ते ६ दिवस झाले. कारण सभा संपल्यानंतर ४ ते ५ दिवसानंतर मी लगेच त्यांच्याकडे गेले होते. मला ते बोलले की सभेच्या दिवशी २ तास अगोदर द्या. तरी पण मी ती लक्षवेधी त्यांच्योडे सुपुर्द करुन आली आणि आज सकाळी ९.०० ला पाच मिनिट कमी होती तेंव्हा मी त्यांच्या कायार्लयात बसुन होती सकाळी ९.३० वाजेपर्यंत मी बसली होती. त्यांची उपस्थिती नव्हती. त्यानंतर

मी खाली गेले होते. मग, हा सर्व कारभार चुकीचा चालला आहे. हे सर्व चुकीचे झालेले आहे. तर आपण सर्वांचीच लक्षवेधी फेटाळा.

**प्रभात पाटील :-**

आजच्या दिवसात एकही लक्षवेधी स्विकारण्यात येउ नये. कोणतीच लक्षवेधी आज घेण्यात येउ नये. पढच्या वेळेस स्विकारावी.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, पुढे दखल घ्या. आपण कधी कधी दखल घेतो आणि.....

**रोहीदास पाटील :-**

मॅडम, आपण यावर रुलिंग द्या आणि ती लक्षवेधी पुढच्या वेळी पहिली घ्या.

**रिटा शहा :-**

असे करायचे असेल तर चालणार नाही. त्यांच्याकडे मी पहिली गेली आहे. आपण त्यांना विचारा. त्यांनी मला पोच दिली नाही यात माझी चुक नाही. ते समोर बसले आहेत. आपण त्यांना विचारा. मी त्यांच्याकडे केंव्हा गेले होते?

**मा. उपमहापौर :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सभागृह, आपल्याकडे सभाशास्त्राप्रमाणे आपल्या उपविधीमध्ये जी नोंद आहे त्याच्यामध्ये जी गोष्ट दिलेली आहे ती मी प्रत्यक्ष वाचून दाखवतो. महानगरपालिका सदस्यास सभेच्या प्रारंभ होण्याच्या निदान २ तास अगोदर, मा. महापौर, मा. आयुक्त व महानगरपालिका सचिव यांस लेखी नोटीस देउन आणि पिठासीन अधिकाऱ्यांच्या पुर्व परवानगीने निकडीच्या सार्वजनिक महत्त्वाच्या कोणत्याही बाबींकडे मा. आयुक्तांचे लक्ष वेधता येईल आणि मा. आयुक्तांस संक्षिप्त निवेदन करता येईल किंवा नंतरच्या तारखेस निवेदन करण्याची वेळ मागता येईल. अशा निवेदनावर कोणतीही चर्चा होणार नाही. त्यास बैठकीस एकापेक्षा अधिक कोणतीही बाब उपस्थित करण्यात येणार नाही. ह्याच्यामध्ये स्पष्ट लिहिलेले आहे की, सभेच्या २ तास आधी आता सन्मा. सचिव साहेब आपण ह्याचे वाचन प्रत्यक्ष करुन दाखवले असते तर प्रश्न ताबडतोब सुटला असता सन्मा. ओमप्रकाश अग्रवाल यांची जी लक्षवेधी आलेली आहे. मी पाहिली नाही. परंतू, आपण सन्मा. सदस्य रिटा शाहजी यांचा आरोप आहे की, त्यांच्या आधी घेतली आणि मला तसे करण्यासाठी मज्जाव करण्यात आला होता. परंतू, प्रत्यक्षात याच्यात २ तास आधी लिहिलेले आहे. या नियमामध्ये ......

**रोहीदास पाटील :-**

साहेब, आपण आता गफलत करु नका. आम्हाला जे समजते ते सांगतो.

**मा. उपमहापौर :-**

कृपया, मला काय सांगायचे आहे ते आता ऐका की ह्या नियमाची उकल नीट होत नाही. या संदर्भात सन्मा. सचिवांनी पुनःश्च एकदा या नियमाची नीट उकल करावी किंवा असे नियम आहेत ज्याच्यामध्ये काही गोंधळ होउ शकतो तर अशा उपविधी आहेत त्यामध्ये आपले पुन्हा त्याच्यामध्ये नविन अमेंडमेंट घडवून आणण्यात या संदर्भातला निर्णय आपण सभागृहाने सन्मा. सचिवांनी मा. आयुक्तांनी, मा. महापौरांनी घ्यावा कारण दोन्ही लक्षवेधी ह्या अतिशय महत्त्वाच्या बाबींना निर्देशित करणाऱ्या आहेत. तर आपण दोन्ही सन्मा. सदस्यांनी देखील ह्याच्यामध्ये जर एक मत केल की, कोणाच्या लक्षवेधीला प्राधान्य द्यावे. आणि नियमांच पुनःश्च एकदा सचिवांनी व्यवस्थित अवलोकन करुन सदस्यांना नियम सांगावा.

**रिटा शहा :-**

मा. उपमहापौर साहेब, महत्त्वाचा मुद्दा असा आहे की, त्यांच्याकडे पोच आहे आणि मी ह्याच्याकडे आपली मा. महासभा संपल्यानंतर माझी लक्षवेधी मागच्या मा. महासभेत होती. आपली लक्षवेधी होती म्हणून मी माझी लक्षवेधी मागे घेतली आणि नंतर लगेचच मी दुसऱ्या दिवशी जाउन त्यांना सांगितले की, पुढच्या मा. महासभेत माझी लक्षवेधी घ्यायची आहे. ह्यांनी मला असे उत्तर दिले कि, मॅडम कायद्यात अशी तरतूद आहे की, पुढच्या मा. महासभेच्या २ तास अगोदर तरी पण मी त्यांच्या जवळ माझे पत्र सोडून आली आणि त्यांच्या बोलण्याच्या हिशोबाने आज सकाळी ९ वाजायला ५ मिनिट कमी होती तेंव्हा त्यांच्या कार्यालयात ९.३० पर्यंत मी तेथे बसून होते तर यांनी मला चुकीची माहिती दिली. दुसऱ्यांना ते बरोबर पोच देतात आणि त्यांनी मला पोच दिली नाही तर त्यांच्यावर आपण काय कार्यवाही करणार ते मला सांगा.

**शशिकांत शाह :-**

सचिवजी, पोच कोणी दिलेली आहे. क्लार्कने दिली की आपण दिली आहे.. क्लार्कने दिली असेल तर त्या कागदाची झेरॉक्स मारुन दिली असेल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, सचिव कार्यालयात कोण आहे? क्लार्क आहे तर क्लार्कला कशाला बसवता? त्यांचे पी. ए. आहेत असे आपल्याला जे बोलायचे आहे ते ठाम बोला. म्हणजे मा. आयुक्तसाहेब नसतील तर आयुक्त साहेबांच्या पी. ए.ला किंवा त्यांच्या शिपाईला पत्र देत नाही का? आणि आपण त्यांच्या कार्यालयातून सही घेतो ना. हे तुम्ही उलट-सुलट सचिवांना दाबण्याचा प्रयत्न करु नका. त्यांनी न्याय केलेला आहे. माझी लक्षवेधी ह्या शहराच्या दृष्टीने, शैक्षणिक दर्जाच्या दृष्टीने हिताची आहे आणि आमचे सन्मा. नगरसेवक,

शिक्षणचे सदानंद शिर्के यांनी या विषयावर वाचा फोडण्यासाठी शिक्षण मंडळात आवाज उठवला. तिथे दाद मिळाली नाही आणि वर्तमान पत्रामध्ये .....

**रिटा शहा :-**

मा. महापौर मॅडम, त्यांच्या लक्षवेधी प्रमाणे माझी ही लक्षवेधी शहराच्या भल्यासाठी आहे. मी माझ्या घरातील विषय आणलेला नाही. पण महत्त्वाची गोष्ट अशी आहे की, सचिव पदावर बसणाऱ्या व्यक्तिनी माझ्यावर अन्याय केलेला आहे आणि तुम्ही आता त्यांच्यावर काय कार्यवाही करणार ते महत्त्वाचे आहे.

**प्रभात पाटील :-**

कोणाची लक्षवेधी स्विकारायची हे सिद्ध झालेले नाही. अगोदरच त्या विषयाची चर्चा कशाला?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, या शहराचे आणि या सभागृहाचे दुर्दैव असे आहे की, तोंडावर बोललो तर राग येईल जे विषय ''ज'' प्रस्तावा खाली विरोधी पक्षाने आणायला पाहिजे ते विषय सत्ताधारी आणतात. नियम काय आहे. आपली सत्ता आहे.

**रिटा शहा :-**

नियम काय आहे ते मला सांगू नका. तुम्ही नियमाचे बाहेर जाउन बोला

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आपले महापौर आहेत पण आपण विषय आणताना आपल्याला हक्क आहे. तुमची या शहरांमध्ये सत्ता आहे आणि तुंम्हाला ''ज'' चे प्रस्ताव आणायला लागतात तेही लोकांच्या हितासाठी ही शरमेची बाब आहे. तुमची ही सत्ता आहे. हे सर्व ''ज'' चे प्रस्ताव विरोधी पक्ष आणतात. विरोधी पक्षास जेंव्हा बोलायला मिळत नाही तेंव्हा ते या अधिकाराचा वापर करतात आणि तुंम्हाला ''ज'' खाली प्रस्ताव आणावा लागतो असे नाही. मॅडम, ही तुमची व्यथा आहे.

**रिटा शहा :-**

लक्षवेधीत असे कुठे लिहीले आहे की, सत्ताधारी पक्षाने मांडायची नाही आणि विरोधानी मांडायची.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्स ओमप्रकाश अग्रवालजी आपण बसुन घ्यावे.

**अनंत पाटील :-**

मा. महापौर महोदय, या संदर्भात आपल्या महानगरपालिकेने विधी सल्लागार नेमलेले आहेत त्याचे मत घ्या.

**रिटा शहा :-**

ते काय मत देणार? सचिव हरेश पाटील यांनी स्वतः चुकी केली आहे. मी त्यांच्याकडे १५ दिवस अगोदर गेली होती. त्यांनी मला चुकीची समज घातली आहे.

**अनंत पाटील :-**

विधी सल्लागारांचे मत घ्यायला हरकत नाही.

**संगिता म्हात्रे :-**

मा. महापौरसाहेबांच्या परवानगीने बोलते आहे की, सन्मा. सदस्य रिटा शाह मॅडम ९ वाजायला ५ मिनीटं बाकी असतांना गेल्या होत्या त्यांची लक्षवेधी घेण्यात यावी.

**रिटा शहा :-**

सचिव हरेश पाटील यांनी सांगावे की, मी त्यांच्याकडे १५ दिवस अगोदर आले नव्हते का? तुम्ही मला काय उत्तर दिले की, दोन तास अगोदर लक्षवेधी द्या. तुम्ही मला हेच उत्तर दिल की नाही? विचारा साहेब ते हो सांगत आहे. यात माझी काय चुकी आहे सांगा.

**अनंत पाटील :-**

मा. महापौर महोदया, विधी सल्लागार यांचा सल्ला घ्या ना. आपण त्यांना एवढं पेमेंट करतो त्यांच ह्याच्यामध्ये स्टेटमेंट मिळेल.

**रिटा शहा :-**

एका नगरसेवकास पोच देतात आणि आम्हाला पोच देत नाहीत.

**मा. महापौर :-**

विधी सल्लागारांनी या विषयावर खुलासा करावा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ही कोर्टाची बाब नाही. येथे कोर्ट कुठे आले? विधी सल्लागार हे कोर्टासाठी आहेत. हे सभागृहच कामकाज आहे.

**रोहिदास पाटील :-**

विधी सल्लागार हे कोर्टाच्या कामासाठी आहेत. हे कोर्ट नाही. हे सभागृहाचे कामकाज आहे. कोर्टाच्या अधिकाराच्या कक्षेच्या बाहेर आहे. हे सभागृह आहे. या सभागृहाचे जे नियम असतील ते वाचा, समजुतीने सांगा, कोर्टाचा विषयच नाही.

**रिटा शहा :-**

मॅडम, हा न्यायाचा की कोर्टाचा प्रश्न आहे. ते समोरा समोर चूक कबूल करतात. मॅडम, आता तुंम्हालाच हा निर्णय घ्यायचा आहे की माझ्यावर ह्यांनी अन्याय केलेला आहे आणि त्यांना त्याती पोच दिलेली आहे. मी १५ दिवस अगोदर त्यांच्याकडे गेलेली आहे. माझी, लक्षवेधी मागच्या सभेमध्ये फेटाळली. मा. महासभेच्या दुसऱ्या दिवशी मी त्यांच्याकडे गेले होते. त्यांनी मला सांगितले की, २ तास अगोदर लक्षवेधी द्या.

**रोहिदास पाटील :-**

सन्मा. रिटा शाह आपला काय चांगला विषय आहे ते आपण मला सांगा. शहराच्या भल्याचा असेल तर मी सन्मा. ओमप्रकाशजी अग्रवाल यांना त्यांची लक्षवेधी मागे घ्यायला सांगतो.

**रिटा शहा :-**

साहेब, शहराच्या भलाईचाच विषय मी दिलेला आहे.

**रोहिदास पाटील :-**

काय विषय आहे ते सांगा?

**रिटा शहा :-**

जकात संदर्भाचा विषय आहे.

**रोहिदास पाटील :-**

ठिक आहे सन्मा. सदस्या रिटा शाह यांची लक्षवेधी घेण्यात यावी. हा संपुर्ण शहराचा विषय आहे.

**रिटा शहा :-**

भारतीय जनता पार्टीचे गट नेता मा. रोहिदास पाटील यांचे मी अभिनंदन करते आणि त्यांना थँक्स बोलते की, त्यांनी पोटतिडकीने माझ्यावर झालेला अन्याय समजून घेतला. त्याबद्दल त्यांचे मी अभिनंदन करते आणि.....

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आतापर्यंत सचिवांना इथे जे बोललेले आहे त्याचेही त्यांनी दिलगीरी व्यक्त करावी. सन्मा. नगरसेवक आम्ही मोठेपणा दाखविला आहे तर आपणही सचिवांबाबत मोठेपणा दाखवावा. जेंव्हा तुमच काम करतो तेंव्हा ते सचिव आणि जेंव्हा तुमच काम करत नाही तेंव्हा सचिव नालायक.

**मा. महापौर :-**

आजच्या सभेसाठी तीन लक्षवेधी आलेल्या आहेत व सन्मा. सदस्या रिटा शाह यांनी मांडलेली जी लक्षवेधी आहे.....

**प्रभात पाटील :-**

असे कोणीही बोलले नाही की, सचिव नालायक आहेत. असे कोणी बोलत नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

बोलले. निषेध व्यक्त करता, या व्यतिरिक्त तुम्ही काय शब्द वापरणार आहात. नालायक म्हणजे निषेध म्हणजे काय आहे.

**प्रभात पाटील :-**

निषेध आणि नालायक या शब्दामध्ये फरक आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

जेंव्हा सचिव काम करतात आणि सर्व अधिकारी काम करतात तेंव्हा सर्व अधिकारी चांगले आणि अधिकाऱ्यांनी एक वाईट गोष्ट केली तर ते चोर आहेत. आम्ही सत्ताधारी पक्षाच्या विरोधात आहोत. आंम्हाला बोलण्याचा हक्क आहे.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर मॅडम, हे पहा या.....

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

जेंव्हा अधिकारी चांगले करतात तेंव्हा अधिकारी चांगले आणि आमच्या विरोधात प्रस्तावात आणतात.

**रतन पाटील :-**

सचिवांचा आपण निषेध करता.

**रोहिदास पाटील :-**

आता शेवट गोड करा.

**प्रभात पाटील :-**

मॅडम, मला बोलायला दिलेले आहे.

**रोहिदास पाटील :-**

सभेच्या किती तास, किती दिवस आधी लक्षवेधी दिली पाहिजे. आंम्हाला एवढे माहिती आहे की, किमान दोन तास आधी. एकतर त्या दिवशी.....

**प्रभात पाटील :-**

मॅडम, मला असे वाटते की मला बोलायला परवानगी दिलेली आहे.

**रोहिदास पाटील :-**

लक्षवेधी आल्यानंतर ते नंबर टाकतील आणि आपल्याला ते सोपे होईल. आपण याचा खुलासा करा ना.

**प्रभात पाटील :-**

मला बोलण्याची परवानगी मिळालेली आहे. शब्द वापरला गेला काहीतरी नालायक शब्द बोलले गेले असा येथे उल्लेख झाला. तर मला वाटले की, सन्मा. सदस्यांनी निषेध शब्द वापरला.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

निषेध आणि नालायक शब्दामध्ये काय फरक आहे? निषेध म्हणजे काय धिक्कार. हिंदीमध्ये धिक्कार. आम्हीपण शिक्षण घेतलेले आहे. बी. कॉम. केलेले आहे. आम्ही शिक्षिका नाही पण आम्हीही पुस्तकाचे शिक्षण घेतलेले आहे.

**प्रभात पाटील :-**

मला परवानगी दिलेली आहे. मला बोलता आले पाहिजे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल व इतर सदस्यांनी शांत बसून घ्या. दुसरे सदस्य बोलत असतांना शांत बसावे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आम्ही पण शिक्षण केले आहे. बी. कॉम. केले आहे. आपण शिक्षिका असाल. तुंम्हाला व्याकरणाची माहिती जास्त असेल.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपण खाली बसावे. सन्मा. सदस्या प्रभात पाटील यांना बोलण्याची संधी दिलेली आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

पण आमचे म्हणणे आहे की, अधिकारी जो अधिकारी चांगल करतात.....

**प्रभात पाटील :-**

म्हणजे यांना प्रशासकिय अधिकाऱ्यांच्या विषयी खुप प्रेम आहे का? असे ते दाखवतात का? आणि आंम्हाला काही नाही का? येथे आम्ही फक्त चुकांवर बोट ठेवले आहे. आम्ही फक्त त्यांच्या चुकांवर बोट ठेवले आहे. त्यांनी असे बोलता कामा नये.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

असे असेल तर माझी लक्षवेधी पहिली राहू द्या.

(सभागृहात गोंधळ)

**प्रभात पाटील :-**

न्याय मागणे किंवा त्यांच्या चूका दाखवणे ही चूक असेल, हा नालायकपणा असेल लर सभागृहाने ते दाखवून द्यावे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आमच्या गटनेत्याने मोठेपणा केला. तसाच मोठेपणा आपल्या गट नेत्याने करावा.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवालजी आपण बसून घ्यावे.

**शुभांगी नाईक :-**

सन्मा. सदस्या रिटा शाह मॅडम, आपण आपले शब्द मागे घ्या. सचिवांसाठी आपण जो उल्लेख केला तो शब्द मागे घ्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आपण आपले शब्द मागे घ्या. आमच्या गटनेत्याने जसा मोठेपणा दाखवला तसा मोठेपणा आपणही दाखवा.

**शुभांगी नाईक :-**

ते नगरसेवकांचे सचिव आहेत.

**सुरेखा गायकवाड :-**

मा. महापौरसाहेबांच्या परवानगीने बोलते आहे की, सन्मा. सदस्य रिटा मॅडम यांनी निषेध केलेला आहे. त्यांनी कोणासाठी ही गैरशब्द वापरलेला नाही.

**शुभांगी नाईक :-**

त्यांनी निषेध केलेला आहे. तो शब्द त्यांनी मागे घ्यावा. सचिवाचा निषेध केलेला आहे. त्यांनी तो शब्द मागे घ्यावा.

**प्रभात पाटील :-**

आज आपल्याला सचिवांविषयी फारच प्रेम आले असेल त्याला हरकत नाही. आमची एवढीच इच्छा आहे की, सचिवांनी सर्व नगरसेवकांना एकसारखी वागणूक द्यावी.

(सभागृहात गोंधळ)

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आम्ही प्रत्येक अधिकाऱ्यांवर प्रेम करतो. आम्ही कधी निषेध व्यक्त करत नाही.

**शुभांगी नाईक :-**

सचिवांची लायकी नाही हा शब्द वापरला गेलेला आहे.

**शिवप्रकाश भुदेका :-**

मा. महापौर मॅडम, हमे सचिवसे भी प्रेम है और सन्मा. सदस्य प्रभात पाटील से भी प्रेम है. हमारी किसीसे नाराजगी नही है। वा उन्होंने बोला के सचिव के कुर्सी पर बैठने के लायकता नही है। वो अच्छा नही है। मतलब, सचिव को ऐसा शब्द बोलना यह अच्छा नही है।

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य रिटा शाह यांनी सचिवांबद्दल जे अपशब्द वापरले आहेत ते शब्द कामकाजातून वगळण्यात येतील.

**प्रभात पाटील :-**

त्याच्यापलिकडे जाउन आम्ही पार्टीच्या वतीने सांगतो की, सन्मा. सदस्या रिटा शाह यांनी जो निषेध व्यक्त केला आणि खुर्चीच्या लायक म्हटले नाही तर आम्ही स्वतः सांगतो त्यांची मिस्टेक असेल त्या काही बाय मिस्टेक बोलल्या असतील. भावनेच्या भरात बोलल्या असतील तर कृपया त्यांनी ते शब्द मागे घ्यावेत. आम्ही स्वतः सांगतो. आंम्हाला सन्मा. सचिवांना अपमानीत करण्याचा त्याचा उद्देश असेल असे आमचे म्हणणे नाही.

**शिवप्रकाश भुदेका :-**

एकदा नाही चारदा बोलले आहेत.

**प्रभात पाटील :-**

मी स्वतः त्यांना बोलेन की, त्यांनी ते शब्द स्वतःहून मागे घ्यावे.

**शुभांगी नाईक :-**

त्यांना मघाशी बोलले असते तर झाले असते. मग प्रकरण एवढ वाढलं नसतं.

**मा. महापौर :-**

सभागृहात शांतता पाळा. सभागृहापुढे तीन लक्षवेधी आलेल्या आहेत. या लक्षवेधीपैकी सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल यांनी आपली लक्षवेधी मागे घेतलेली आहे आणि तो चान्स त्यानी सन्मा सदस्य रिटा शाह यांना दिलेला आहे. सन्मा सदस्य रिटा शाह यांना लक्षवेधी चर्चा करण्यासाठी १० मिनिट देण्यात येत आहे.

**शरद पाटील :-**

सन्मा. महापौर मॅडम, लक्षवेधी वाचून दाखवावी.

**मा. महापौर :-**

लक्षवेधी वाचून दाखवण्यात येईल.

**रतन पाटील :-**

सन्मा. महापौर मॅडम, लक्षवेधी वाचून दाखवावी. महत्वाची लक्षवेधी कोणती आहे हे सन्मा नगरसेवकांना समजेल.

**शशिकांत शाह :-**

ज्या तीन लक्षवेधी आलेल्या आहेत. त्या तिन्ही लक्षवेधी पहिल्यादा वाचून दाखवा

**रिटा शहा :-**

मा. महापौर मॅडम, माझ्यावर जे एलिगेशन केलेले आहे त्याबद्दल मला बोलायचे आहे. मागून जे बोलले त्या अगोदर मला बोलायला पाहिजे होते. पण मला बालायलाच दिले नाही तर मी काय बोलणार? मी भावनेमध्ये बोलले कारण नगरसेवकांवर जेव्हा अन्याय होतो तेंव्हा नगरसेवकांची काय परिस्थिती होते हे मला लक्षात घेउन बघा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आमची परिस्थिती काय होते? मा. महापौर आंम्हाला उत्तर देत नाहीत. आम्हालं सभागृहाच्या बाहेर जावे लागते. तेंव्हा आमची भावना तुंम्हाला समजत नाही का?

**रतन पाटील :-**

आमची परिस्थिती काय होते? आमच्यावर नेहमीच अन्याय होत असतो.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील आणि सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवालजी .....

**रिटा शहा :-**

मा. महापौर मॅडम, सभा त्याग करतात ती गोष्ट वेगळी आहे.

**रतन पाटील :-**

गोष्ट वेगळी कशी काय? आंम्हाला बोलायला दिले जात नाही ही आमची गोष्ट आहे.

**रिटा शहा :-**

मा. महापौर मॅडम, इथे सर्व मधे बोलतात आम्ही ते बोलत असतांना गप्प बसतो. सन्मा. सचिवांसाठी मी असे का बोलले तर सचिवांनी स्वतः सांगितले आहे की, स्वतः एक्सेप्ट केले आहे की, ह्या माझ्याकडे आल्या होत्या. मी पहिला त्यांचा निषेध व्यक्त केला कारण त्यांनी त्यांची लक्षवेधी घेउन त्यांना पोच दिली, पण मला पोच दिली नाही. म्हणून निषेध व्यक्त केला. परंतू, सन्मा. सचिवांचे आज मी अभिनंदन व्यक्त करते कारण अधिकारी चुकतो पण चुकल्यानंतर मान्य करतो. तोही मोठेपणा असायला पाहीजे तो मोठेपणा हरेश पाटील यांच्यामध्ये आहे म्हणून मी बोललेले सर्व शब्द मागे घेत आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

अभी यह छोड दो। यह जमाना चला गया। पहिले मारके लेनेका फिर माफी माँगनेका। यह छोड दो।

**मा. महापौर :-**

आजच्या लक्षवेधीच्या संदर्भात सभागृहामध्ये जे सन्मा. सदस्यांच्या भावना लक्षात घेता सचिवांनी पुढील कामकाज करत असताना आपले नियम सभाशास्त्रानुसार काम झाले पाहिजे याची खबरदारी घ्यावी.

**नगरसचिव :-**

मा. महापौरसाहेबांच्या परवानगीने बोलतो.

**रोहीदास पाटील :-**

मॅडम, आपण विषय वाचा. पण त्या अगोदर निवेदन करा की अशा पद्धतीने दिलेली लक्षवेधी स्विकारत नाही.

**शुभांगी नाईक :-**

मॅडम, आपण तिन्ही लक्षवेधी वाचून घ्या ना.

**अनंत पाटील :-**

तिन्ही लक्षवेधी वाचून घ्या.

**रोहीदास पाटील :-**

आपल्याला नियम माहित नाही ना तर आपण मा. आयुक्त साहेबांना विचारा १ सेकंदामध्ये सांगा. एक दिवस आधी, दोन दिवस आधी आणि २ तास पुर्वी याचे रुलिंग द्या. याच्यात वेळ का घालवता? तुंम्हाला व्याप नको आणि आंम्हालाही व्याप नको. सांगा ना. म्हणजे त्याच्याशिवाय कोणताही नगरसेवक आग्रह धरणार नाही आणि आजची जी लक्षवेधी आहे ती लक्षवेधी सन्मा. सदस्य ओमप्रकाशजी अग्रवालजींनी मागे घेतली. पुढच्यावेळी त्यांची लक्षवेधी पहिली असेल. असे सांगा. याने घोळ होतो ना. मा. महापौर मॅडम, जशी आज त्यांनी लक्षवेधी मागे घेतली तर पुढच्यावेळी त्यांची लक्षवेधी पहिली असेल असे सांगा ना. मग चर्चा होणार नाही. वाद वाढणार नाही. तुम्ही वाईन्डअप करत नाही

**नगर सचिव :-**

सभेची सुचना निघाल्यापासून किमान २ तास अगोदर जी लक्षवेधी पहिला येईल ती लक्षवेधी स्विकारायची आहे.

**रोहीदास पाटील :-**

सुचना निघाल्यापासून ना?

**नगर सचिव :-**

होय.

**रोहीदास पाटील :-**

मग ठिक आहे.

**शुभांगी नाईक :-**

मा. महापौर मॅडम, तिन्ही लक्षवेधी वाचायला घ्या.

**शशिकांत शाह :-**

तिन्ही लक्षवेधी वाचून घ्या.

**नगर सचिव :-**

मी सन्मा. सदस्य रिटा शाह यांची लक्षवेधी वाचून दाखवत आहे.

**रोहीदास पाटील :-**

तिन्ही लक्षवेधी वाचून घ्या. आणि सन्मा. सदस्य रिटा शाह यांची लक्षवेधी पहिली घ्या व त्यांना बोलायला द्या.

**शिवप्रकाश भुदेका :-**

मा. महापौर मॅडम, देढ साल के बाद आपका स्वभाव आज अच्छा लग रहा है। इसे परमनंट ऐसेही रहने दिजिए।

(नगरसचिवांनी सभागृहासमोर एक-एक करुन तिन्ही लक्षवेधीचे वाचन केले.)

**रतन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, या तिन्ही लक्षवेधीपैकी महत्त्वाची लक्षवेधी कुठली आहे. लोक अपघात होउन मरतात. तर महत्त्वाची लक्षवेधी कोणती आहे. लोक मेली पाहिजेत का? त्या रोडवर ते टेंम्पो वाहन तळ बनविले आहे. तिथे लोक मेली पाहिजेत का? त्या रोडवर किती ॲक्सिडंट झाले महत्त्वाची कोणती लक्षवेधी आहे? हे सभागृहास समजत नाही का? महत्त्वाची कुठली आहे? त्यांना परवानगी दिली आहे त्याबाबत मी बोलत नाही. पण महत्त्वाची कुठली आहे? टेम्पो वाहन तळावर किती ॲक्सिडंट होत आहेत. लोक मरत आहे याचे गांभिर्य आहे की नाही?

**रिटा शहा :-**

मा. महापौर मॅडम, मला वाटते तिथे टेंम्पो स्टॅंड ५ वर्षापासून आहे. लक्षवेधी ५ वर्षानंतर आलेली आहे.

**रतन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आम्ही तुंम्हाला बोलत नाही. आम्ही तिथे बोलतो आहोत. आपण मध्ये बोलू नका. तुंम्हाला बोलायला दिल्यावर तुम्ही बोलायचे. महत्त्वाची कुठली आहे. याच गांभीर्य घ्या ना.

**रिटा शहा :-**

मला मा. महापौरांनी परवानगी दिलेली आहे. जकात बद्दलची लक्षवेधी मी ठेवलेली आहे.

**रतन पाटील :-**

सत्ताधाऱ्यांनी जकात द्यायचे आणि लक्षवेधी आणायची

**रिटा शहा :-**

दि.१३/९/०६ रोजी जे काही वातावरण शांतीनगर, मिरा रोड येथे निर्माण झाले असे वातावरण जकात ठेकेदार आपल्याकडे नेहमीच निर्माण होते. मिरा रोडला असे वातावरण एकदा नाहीतर दोनदा, तिनदा झाले. तेंव्हा हेमंत पाटीलसाहेब तिथे होते आणि ते जकात ठेकेदारही होते. मा. चंद्रकांत मोदी साहेब होते. आमचे प्रभाग समिती अध्यक्ष मा. नुरजहाँ बेगम (मम्मीजी) पण तिथे होत्या. परंतू, नगरसेवक आणि पोलिस दलानी जर हस्तक्षेप केला नसता तर तिथे मारामारी आणि खून खराब्याच वातावरण निर्माण झाले असते. तर ते का? तर फक्त कोणार्क यांनी असे आपल्याकडे एक लेखी तक्रार केली आणि त्या लेखी तक्रारीवर फक्त रिमार्क्स आहेत. कुठला आदेश नाही. फक्त रिमार्क्स आहे. आपण जाउन प्रत्यक्ष पाहणी करा. पाहणी करा. त्याच्यामध्ये काहीही करा, कसे करा त्याला काही लिगल वे आहेत का? हेमंत पाटील हे रिस्पॉन्सिबल जबाबदार जकात मधील अधिकारी आहेत. पहिली गोष्ट, आपण जकात जेथे वसूल करतो तिथे आपल्या एकाही अधिकाऱ्याला कुठलाही अधिकार भेटलेला नाही. आपले अधिकारी पलिकडे बाहेर जसे आपण जकातवाले या शहराचे मालिक आहेत आणि मिरा भाईंदर महानगरपालिकाचे अधिकारी जसे त्यांचे नोकर आहेत. अशी आपण त्यांना साईडला केबिन दिलेली आहे. तर पहिली माझी अशी मागणी आहे की, हेमंत पाटील आणि जे आपले अधिकारी आहेत त्यांना ते कोणार्क वाल्याच जिथे ते वसुली करतात त्याच्या बाजूला केबिन द्यावी आणि दुसरी गोष्ट अशी की, जकात वाल्याची दादागिरी खरोखर इथे एकही सन्मा. नगरसेवक बोलणार नाही की, त्यांची दादागिरी नाही. कुठलाही व्यापारी आपल्या परिसरात माल घेउन येतो. तो त्याच्या बिलामध्ये हरकत घेतो. तुमचा माल, तुमच्या बिलाची रक्कम ही नाही आहे. मग हे ठरवण्याचे अधिकार कोणाचा आहे? ठेकेदारांचा आहे का? ठेकेदार नक्की करतो की, तुमच्या बिलाची रक्कम किती असायला पाहिजे? तुमच्या मालाची रक्कम किती असायला पाहिजे? त्याच्याही पलिकडे जाउन सांगते की, कस्टम मधून येथे माल पास होउन येतो. कस्टमचा रिमार्क असतो. कस्टमच्या मालाचा बिलभरणा ठरलेला असतो. त्याची ड्युटी भरल्याची पावती असते. तरी पण ते हरकत घेतात आणि सांगतात हे माल एवढ्याचा नाही एवढ्याचा असायला पाहिजे आणि बिल एवढे एवढे म्हणून तुम्ही एवढी जकात भरा. अशी नेहमी त्यांची दादागिरी असते आणि अशी कुठलीही गोष्ट सोडवण्याचा अधिकार त्याला नाही असे मला वाटते. ते अधिकार आपले अधिकारी मा. खतगांवकर साहेब म्हणजे मा. महानगरपालिका, मा. उपायुक्त आणि हेमंत पाटील यांचे अधिकार आहेत. परंतू, त्यांच्याकडे कुठलीही गोष्ट न जाता ते परस्पर व्यापारी यांना त्रास देत असतात. दुसरा एक मुद्दा, मी तिथे दोन तास जाउन बसली होती. कुठलाही माल लॉरी भरुन येत असतो त्याच्यामध्ये स्टॅंडर्ड कंपनीचा माल भरलेला येतो त्याच्यामध्ये किलोचा वेट लिहिलेला असतो. तरीपण ते लॉरीचा संपूर्ण माल बाहेर काढायला लावतात. आणि वजन करायला लावतात. आणि त्या वजनाचे चाळीस रुपये घेतात. व्यापाऱ्यांची ते एवढी हालत करतात लॉरी भरलेला माल परत बाहेर काढायचा. अशा प्रकारची ते दादागिरी करतात आणि व्यापाऱ्याचा माल लॉरीमधून खाली करायला लावतात. आणि बिलाची रक्कम किती असायला पाहिजे. स्टॅंडर्ड कंपनीचे बिल असते. स्टॅंडर्ड रेट असतात तरीपण ते दादागिरी करतात रेट असे नाही असे व्हायला पाहिजेत. कस्टम ड्युटी भरलेला माल येतो. त्याची ड्युटी भरलेली असते. रिसिटही त्याच्याकडे असते. तरीपण ते त्याच्यावर हरकत घेतात आणि त्यांना हैराण करतात. त्यांच्या ट्रकचा लाखोरुपयाचा माल दोन-दोन, चार-चार दिवस तिथे ठेवतात आणि त्याच्यामध्ये चोऱ्याही होतात. मग ह्याची जबाबदारी कोणाची आणि त्यादिवशी मला बोलायला नको हेमंत पाटील तिथे उभे होते. त्यांना मी सांगितले आपण हे जे काही करतात ते पुर्णपणे चुकीचे करतात. आपल्याकडे मा. खतगावकर साहेबांचे किंवा मा. आयुक्त साहेबांचे लेखी आदेश आहेत का? की सदर दुकानामध्ये जाउन तपास करायचा. तर त्यांच्याकडे कुठलेही लेखी आदेश नव्हता. फक्त रिमार्क होते आणि तेही कोणार्क

वाल्याचा. लेटरपॅडवर रिमार्क होते. त्याच्यांकडे मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या लेटर पॅडवर कुठलाही आदेश नव्हता. तरी पण ते तिथे गेले. आणि त्याच्याकडे तिथे पुस्तक वैगरे संपुर्ण शांती नगरला सर्व व्यापारी वर्ग एकत्रित आले आणि बाचाबाची झाली. जागेवर पोलिस आले. तेथे स्थानिक नगरसेवक होते म्हणून ती गोष्ट पार पडली नाहीतर त्यादिवशी दंगल होणार होती. ह्याच्यावर आपण धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे. आणि आपण त्या ठेकेदाराशी केलेले ॲग्रीमेंट त्या ॲग्रीमेंटच्या हिशोबाने तो कोणतेही कार्य करित नाही. मग, आपण त्याच्यावर काय कार्यवाही करणार आहे. तोही चर्चेचा एक भाग आहे. मॅडम, ह्याच्यावर आपण डिसिजन देणार आणि ह्याच्यावर पुढे कोणत्याही व्यापाऱ्यावर अन्याय होणार नाही याची दखल घेणार असे आपण रुलिंग देणार, अशी मी इच्छा व्यक्त करते.

**परशुराम पाटील :-**

मा. महापौरसाहेबांच्या परवानगीने बोलतो, आता सन्मा. सदस्या रिटा शाह यांनी जी लक्षवेधी दिली आहे त्याबद्दल आपले मत बोलून दाखविले आहे. मा. आयुक्त साहेब आपण हे जे ऑक्ट्राय ठेकापद्धतीने दिलेले आहे त्या माणसाची मनमानी इतकी चाललेली आहे की, ५ पाउले पुढे गेले नाही की त्याला सांगतात की, गाडी घेउन आपण पुढे गेलात म्हणून आपल्याला आता नाही तेवढ्या मालाचे दंड आकारणार आणि त्याच पद्धतीने जकात नाकाच्या लोकांना ज्या ज्या फॅक्ट्रीमध्ये, ज्वेलर्सच्या दुकानामध्ये, किराणा मालाच्या दुकानामध्ये प्रत्यक्षात ते ठेका पद्धतीने दिलेले आहेत. कॉन्ट्रक्टर ते त्याचे लोक जातात. म्हणजे दंड आकारण्याचा त्यांना गाडी पकडण्याचा त्यांना अधिकार दिला असेल किंवा नसेल किंवा त्यांना कोणत्याही पद्धतीने त्यांना दंड आकारता येतो की, महानगरपालिकेला दंड आकारता येतो आणि त्याच पद्धतीने ते जर त्यांना प्रत्येक दुकानाला, प्रत्येक फॅक्टरीमध्ये फिरण्याचा अधिकार आपण यांना कोणत्या नियमामध्ये दिलेला आहे असे आपण सांगू शकाल का? तर त्याच पद्धतीने त्यांना तुम्ही वॉर्निंग देण्यात यावी की, ह्या पद्धतीने तुंम्हाला कोणत्याही दुकानात, कोणत्यांही फॅक्टरीमध्ये जाता कामा नये. त्याच्यापासून व्यापारी वंचीत झालेले आहेत. त्या ठेकेदारामुळे वंचित झालेले आहेत की, असे झालेले आहे की, येथून जशा अगोदर फॅक्टरी गेलेल्या आहेत. ते पण आता बाहेर जाण्याच्या मार्गावर आहे म्हणजे या ठेका पद्धतीने जे दिलेले आहे. जो ऑक्ट्रायवाला जी वसुली करतो त्या लोकांना आता फॅक्टरीच्या लोकांना आता महागात पडलेले आहे. म्हणून त्या लोकांनी आता एक निश्चय केला आहे की, आता आम्ही कोणत्या पद्धतीने या भाईंदर शहरामध्ये जगावे. त्याच्यावरसुद्धा विचार करण्यात यावा आणि महानगरपालिकेतून जर असे व्यापारी लोक जायला लागले तर भाईंदर महानगरपालिकेचे इनकमच्या दृष्टीने अत्यंत नुकसान होणार आहे. याचा मा. आयुक्त साहेब विचार करण्यात यावा आणि त्यांना सक्त वॉर्निंग देण्यात यावी ही आपणास नम्र विनंती आहे.

**रिटा शहा :-**

मा. महापौर मॅडम, सदर लक्षवेधी बाबत मी ठराव मांडत आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम, जकातवाल्याचे असे आहे की, त्याच्या शेटच्या हिशोबाने चालायला लागते एखादा माणूस ७.०० वाजता गाडी घेउन गेला आणि त्यावर त्याला दंडाची रक्कम आकारायची असते त्यावेळी व्यापारी नाकारतो. त्याला सांगतो आपण उद्या सकाळी या. आमचे शेट येतील त्यावेळी या. म्हणजे २४-२४ तास ते टेंम्पो थांबवायला लागतात. हे एक महत्त्वाच आहे. आणि दुसरे आपल्या अधिकाऱ्यांना फोन केले की, त्यांची एकच भाषा असते की, तुम्ही चोरी केली तर १०रुपये वस्तू, त्याने कबुल केली आणि त्यांनी सांगितले की ती १२रुपयाची वस्तू आहे. नंतर माणूस कंटाळून सांगतो की, ठिक आहे. आता १२ रुपया तो १२ रुपया ले लो. नंतर तो सांगतो १० पट भरा. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे समजा एक वस्तू मी आणली. मी सांगितले की, १० रुपयांची ती वस्तू आहे. आपल्याकडे आपण त्याचे रेट ठरवलेले आहेत. तुंम्हाला वाटते १२ रुपये तर १२ रुपयावर जकात आकारा. त्या व्यापाऱ्याला वाटते आपल्यावर अन्याय झालेला आहे तर तो आपल्या महानगरपालिकेकडे लेखी तक्रार घेउन येईल. पण त्या व्यापाऱ्याने १० रुपये सांगितले तरी त्यांनी १२ रुपये कबुल केले तर त्याला १० पट रक्कम आकारायची आणि ज्यावेळी आपण १० पट रक्कम आकारायचे सांगतो व ते एवढं भरणार नाही आणि आम्ही जेंव्हा एका अधिकाऱ्याला फोन करतो की, साहेब असे झाले, जरा बघा. आंम्हाला काही मदत करा. तर तो सांगता आता मी केस बनवतो आणि तुम्हाला तिथे पाठविन. त्याला आपण जर १० पट पैसे दिले तर ते तिजोरीत. दिले नाही तर त्या माणसाला कामावर लावायचे. आणि २४-२४ तास तो टेंम्पो उभा करतो. तर त्या माणसाचे किती नुकसान होत असेल. दुसरी गोष्ट, आपले जे अधिकारी आहेत ते तिथे फक्त नावासाठी आहे. ते काही करु शकत नाही. समजा, आम्ही पण एकदा फोन केला की, साहेब तुम्ही साहेबांशी बोला. म्हणजे नोबडी इज देअर टू टेक डिसिजन. मग त्या जागेवरच डिसिजन घ्यायला कोणीच नाही. इव्हन मी माझे स्वतःचे नरेंद्र मेहता नगरसेवक ब्रॅकेटमध्ये लिहिलेले आहे. ४० हजाराचा माल होता. मला माहित नव्हते ऑक्ट्रायवाला हैराण करणार. त्याच्यावर पण त्यांनी ४० हजार नाही ५० हजार आहे असे सांगून ऑक्ट्राय आकारला. तर ३०० रुपयाच्या मागे काय लागायचे मी ते भरुन टाकले. आजपण जे बिल ओरिजिनल बिल आणि ऑक्ट्रायची पावती माझ्याकडे आहे. पण ३०० रुपयासाठी त्याच्याकडे काय जायचे म्हणून मी त्याच्याकडे गेलो नाही. पण अशी बरीचशी लोक आहेत व हे नेहमी आणि वारंवार तक्रारी होत असतात. आणि ज्या दिवशी २४ तास टेंम्पो उभा केला जातो त्याचा आपण विचार करा. तो टेंम्पो वाला भाडे

घेतो प्लस त्याला किती लेट होतो हे ही आपण लक्षात घेतले पाहिजे. आणि महानगरपालिकेतर्फे एक सक्षम अधिकारी आपण तिथे उभा करा. काही तरी त्याला निर्णय घेता येईल. माणसाने तक्रार कुठे करायची? प्रत्येक माणूस महानगरपालिकेत येउ शकत नाही आणि संध्याकाळी ७.०० नंतर आला तरी २४ तास म्हणजे दुसऱ्या दिवशी महानगरपालिकेत येउन तक्रार करायची तर हे जरा लक्षात घ्यावे.

**परशुराम पाटील :-**

मा. महापौरसाहेबांच्या परवानगीने बोलतो, परवाच्या दिवशी फटाके वाड्यावरुन आणले त्याचे ३५ हजाराचे बिल आहे आणि कॉन्ट्रॅक्टर सांगतो की १ लाखाचा माल आहे. म्हणजे ३५ हजाराच बिल तिथे दाखवत असताना त्यांना साडेतीन हजार रुपये भरायला लागले असे सांगितले. तरच तुमचा माल पास होईल. नाहीतर तुमचा माल पास होणार नाही रात्री मला १.०० वाजता घरी फोन आला. मी झोपलो असतांना. रिंग चार वेळा वाजली. राहू द्या म्हणून मी फोन उचलला नाही. नंतर मला फोन उचलावा लागला. उचलल्या नंतर मला सांगितले की अशा अशा पद्धतीने असे असे फटाके आणलेले आहेत आणि एवढं बिल आहे आणि ही माणसे माझ्याकडून साडे तीन हजार रुपये बिल मागतात. म्हणजे हा कोणता निर्णय आहे? किती झाले? ६२-६३ करोड रुपयास ऑक्ट्राय घेतले म्हणून आपण लोकांवर अन्याय कराल हे ह्या लोकांनी काय लावलं आहे?

**शुभांगी नाईक :-**

मा. महापौर मॅडम, गेल्याच आठवड्यामध्ये म्हणजे १५ दिवसापुर्वी मा. उपमहापौरांनी मा. आयुक्तांच्या दालनामध्ये मिटिंग घेतली होती. त्याठिकाणी व्यापारी, उद्योजक सगळे आलेले होते आणि त्यावेळी प्रत्येक पक्षाचे गट नेते होते. आणि त्याठिकाणी मी पण उपस्थित होती. पण मी त्यावेळी त्यांना सांगितले होते की, महिलांवरतीसुद्धा अत्याचार होतो. महिला बसमधून उतरल्यानंतर बॅगा तपासल्या जातात किंवा आणि मग व्हॅन येते आणि महिलांना घेउन ७ नंबर खिडकीकडे नेले जाते. त्यानंतर एका बाजूला आपली सत्ता असून सुद्धा एका बाजूला सन्मा. सदस्य रिटा शाह म्हणतात की हा आपल्या नागरिकांवर अन्याय होत आहे. हे कितपत योग्य आहे?

**रिटा शहा :-**

मॅडम, नागरिकांवर नाही तर व्यापारी वगार्वर, सर्व नागरिक व्यापारी असतात असे नसते आणि आपल्याला असे वाटत असेल तर......

**शुभांगी नाईक :-**

नागरिकांवर अन्याय होत आहे आणि महिलासुद्धा नागरिकच आहेत. त्यांनी महिलांचा अशाप्रकारे तपास केलेला आहे आणि तेंव्हा मा. आयुक्त साहेबांनी सांगितले होते की, मी निवेदन देतो. पण अजूनपर्यंत साहेबांनी त्याच्यावर काहीही निवेदन केलेले नव्हते. आम्ही संध्याकाळपर्यंत थांबलो होतो. आपण ठेकेदाराला बोलवा आणि यासंदर्भात विचारणा करा.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य शुभांगी नाईक आपण बसून घ्यावे.

**रिटा शहा :-**

मा. महापौर मॅडम, ठेकेदारांच्या बाजूने मी पहिल्यांदाही नव्हते कारण जेंव्हा जकातचा विषय आला होता. जकात किंवा उपकर.

**शुभांगी नाईक :-**

मॅडम, ठेकेदारांनाच विरोध करा म्हणजे विषय संपला.

**रिटा शहा :-**

जकात किंवा उपकर असा विषय आला होता तेंव्हा ही मी उपकराच्या बाजूने ठराव मांडला होता. माझा स्वतःचा ठराव होता. सन्मा. सदस्या गीता जैनने त्यात अनुमोदन दिले होते आणि आजही मी जकात ठेकेदार आणि जकातीच्या बाजूने नाही. आज आपल्या क्षेत्रात जकात विषयी जे काही चालले आहे आणि जेंव्हा जेंव्हा हा जकातीचा विषय मा. महासभेमध्ये ह्या सभागृहात उचलला आहे. तेंव्हा तेंव्हा मी जकातीच्या विरोधात बोलली आहे आणि मागच्या १३ तारखेला मिरा रोड येथे जकात ठेकेदारांनी केले ते अतिशय गंभीर स्वरुपाचे होते म्हणून ते लक्षवेधी म्हणून आणले आहे. नाहीतर आपण लेखी तक्रार करतो. आमचे मा. उपमहापौर चंद्रकांत वैती साहेबांच्या दालनामध्ये मिटींग घेतली. सर्व व्यापारी आले होते. तेंव्हा तेही माझ्याशी बोलले की, असे सर्व ठरले आहे. त्यांच्याही अगोदर मी सांगते, माझ्याकडे मिरा-भाईंदर महानगरपालिकेचे पत्र आहे ते सन्मा. सदस्य रोहीदास पाटील यांना दि. ११/९/२००६ ला दिलेले आहे. त्यांना आपल्या प्रशासनाने दिलासा दिलेला आहे की, जकात ठेकेदाराबद्दल त्यांची हरकत होती आणि त्यांनी ही जकात ठेकेदाराविरुद्ध पत्र लिहून चर्चा केली आणि तुम्ही आश्वासन दिले होते की, आता पुढे सर्व सुरळीत चालणार. परंतू, तसे काही घडले नाही. आपण ५ वर्षापासून जकात ठेकेदाराचा विरोध करत होते अग्रवाल होते तेंव्हाही बोललो आणि आता कोणार्कवाला आहे आणि कोणार्कवाल्याने पुन्हा अग्रवालशी पार्टनरशिप केली आहे. आपण बोंबलत राहतो. आपल्या अधिकाऱ्याची तिथे काहीच व्हॅल्यू नाही. कोणार्कवाल्याने ठेका घेतला म्हणजे मिरा-भाईंदर महानगरपालिका आपण त्याच्याकडे गहाण ठेवली. असे चित्र तिथे निर्माण झाले आहे. आणि अधिकाऱ्यांची तिकडे काहीच व्हॅल्यू राहीलेली नाही. १० पट उतरावयाचे आहे तरी पण ठेकेदार उतरवतो. काही कुणाची

हरकत आहे, कुणाचे काय चुकीचे आहे की नाही हे पण ते ठेकेदार ठरवतो. म्हणून मी त्या अनुषंगाने ठराव मांडत आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य रिटा शाह लक्षवेधीवर ठराव मांडता येत नाही. आपल्या सुचना नोंदवून घेतल्या जातील.

**रिटा शहा :-**

ठिक आहे. मी माझ्या हरकती आणि सुचना मी आपल्यापुढे मांडल्या आहेत. त्याच्यावर रुलिंग द्यावे.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आपल्या परवानगीने बोलतो, आपण ठेकेदाराला काही अटीशर्ती दिलेल्या आहेत. त्यांच्यामध्ये ते लोक कंपनीमध्ये किंवा सोन्याच्या दुकानामध्ये डायरेक्ट जाउ शकतात का?

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सभागृह, ही जो उपविधी आहे. तर आता सभागृहासमोर फार मोठा गोंधळ होता की, लक्षवेधी कोणती घ्यावी? याविषयी आपण सचिव दालनाकडून आपल्या सभाशास्त्राची जी प्रत आहे ती पाहून घ्यावी म्हणजे पुढच्या वेळेला हा गोंधळ उडणार नाही. याविषयी जरा पुरक माहिती देतो. कारण हा गोंधळ होतो ह्याच्यामध्ये आता जो निर्णय सचिवांकडून आला. सचिवांवर आक्षेपही झाले. परंतू सभासुचना ज्यादिवशी निघेल त्या दिवसापासून सभेच्या किमान २ तास आधी पोहचेल अशा सुचनेला लक्षवेधी म्हणून स्विकारता येईल आणि त्याच्यामध्ये भविष्यात कोणाची सुचना किती महत्त्वाची आहे ते सांगता येणार नाही. म्हणून निवेदन करु इच्छितो की, पिठासीन अधिकारी म्हणून मा. महापौर ह्या बाबतीत निर्णय घेतील की, किती महत्त्वाची लक्षवेधी आहे. आणि कोणती लक्षवेधी आपल्या या सभागृहासमोर घ्यावी. त्या नंबरने ती लक्षवेधी घेता येणार नाही. म्हणून सर्व सदस्यांना अशी सुचना आहे की, स्पेसिफिकली असे म्हटलेले आहे की, महानगरपालिका सदस्यास सभेचा प्रारंभ होण्यापुर्वी निदान दोन तास आधी मा. महापौर, मा. आयुक्त, सन्मा. महानगरपालिका सचिव यांना लेखी नोटीस देउन आणि पिठासिन अधिकाऱ्याच्या पुर्व परवानगीने निकडीच्या सार्वजनिक महत्त्वाच्या कोणत्याही बाबींकडे मा. आयुक्तांचे लक्ष वेधता येईल. आणि मा. आयुक्तांस संक्षिप्त निवेदन करता येईल. किंवा तदनंतरच्या तारखेस निवेदन करण्याची वेळ मागता येईल आणि त्याच नियमात असे स्पष्ट म्हटले आहे की, लक्षवेधीवर कुठल्याही प्रकारची चर्चा होणार नाही. लक्षवेधी ज्या सन्मा. सदस्याने मांडलेली आहे त्या सन्मा. सदस्याने त्याच्यावरती निवेदन दिल्यानंतर त्या निवेदनावर ठराव घेता येत नाही. तर मा. आयुक्तांना त्याच्यावर संक्षिप्त निवेदन करता येते. किंवा मा. आयुक्त वेळ मागून आपल्याला पुढच्या सभेत त्या विषयी निवेदन करु शकतो, असे स्पष्ट लिहिलेले आहे. पुढील सभेत यापुढे कधीही सभागृहासमोर लक्षवेधी आणतांना ही बाब लक्षात ठेवावी आणि आपल्याला वाटत असेल की माझी लक्षवेधी अतिशय महत्त्वाची आहे तरीपण त्यावेळेला मा. महापौर जी लक्षवेधी महत्त्वाची सार्वजनिक हिताची समजतील त्या लक्षवेधीस प्राधान्य देण्यात येईल. अपेक्षा करतो की त्याच्यामध्ये कुठल्याही प्रकारच्या राजकीय पक्षाची लक्षवेधी लक्षात घेणार नाही. आता ज्या जकात ठेकेदाराबाबत चर्चा झाली त्या चर्चेला अनुसरुन सांगतो की, त्याच्यावरदेखील एका सन्मा. सदस्यांनी करायला पाहिजे होते. आता आपल्यासमोर स्पष्ट निवेदन केलेले आहे. आपण याबाबतीत सचिवांकडून अतिरिक्त माहीती घेउ शकता. या विषयावर मा. महापौरांना, मा. आयुक्तांना विनंती करतो की आपण जकात ठेकेदाराविषयी काय काय कार्यवाही केली त्याचे निवेदन करा.

**प्रभात पाटील :-**

मॅडम, मी एका मिनीटात बोलते की, मध्यंतरी आपल्या लक्षवेधीच्या चर्चेच्या अगोदर आपली लक्षवेधी स्विकारण्याच्या अगोदर ह्या लक्षवेधीच्या नियमावरुन ह्या सभागृहात प्रचंड गोंधळ झाला. सन्मा. हरेश पाटील यांनी मोठ्या मनाने माझी चुक आहे, स्वतःची चुक मान्य केली. त्याच्यानंतर मॅडमने पण त्यांना बरेचसे बोलून घेतले. काही लोकांनी त्यांच्या समर्थनार्थ बोलले मी त्यांच्या चुकीकडे निर्देश केले की, एका नगरसेवकाला आपण न्याय देता व एका नगरसेवकावर अन्याय करता ही बाजू घेउन मी एवढेच बोलले असे मला वाटते. त्याच्यापलिकडे जाउन मी सांगते की, ही सुचना आता जे तुम्ही म्हटले की, त्या उपविधीमध्ये असलेल्या सुचनेचा खुलासा केला. हे ह्याच्याअगोदरच तुमच्या लक्षात आले नव्हते का? त्याचा खुलासा जर तुम्ही आधी केला असता तर मी फक्त एवढच म्हटले की, दोन तास अगोदर ती स्विकारली की त्या म्हणाल्या मी तुमच्याकडे आले तेंव्हा तुम्ही नव्हता आणि मी बाहेर गेले होते वैगरे. हे जर अगोदरच तुमच्या निदर्शनास आले असते तर इतके आरोप, प्रत्यारोप तुमच्यावर आमचे आणि आमच्यावर त्यांचे हे सगळे होण्याचे कारणच नव्हते ना. हे फक्त तुम्ही ५ मिनिट अगोदर बोलला असता किंवा याचा खुलासा झाला असता. तर या भानगडीत किती किल्मिश त्याच्यामुळे एकेकाच्या मनात तयार झाले. सचिव साहेब याच्यपुढे तुंम्हाला म्हणायचे आहे ते तुम्ही स्पष्टपणे बोलत चला. तुमच्या कडे काय सुचना आहेत तुमच्याकडे उपविधीची काय प्रायोरिटी आहे. हे तुम्ही बोलला असता तर हे मध्ये एवढा जो सगळा उहापोह झाला किंवा भानगडी पर्यंत प्रश्न आले ते झाले नसते ना. तुमच्यावरही आरोप झाले नसते त्यांनी तुम्हाला अपशब्द वापरले नसते. कृपया, याच्यापुढे आपण ही दक्षता घ्यावी.

**रिटा शाह :-**

मॅडम, त्याच्यामध्ये मी अजून एक सुचना करते की, ठेकेदारांनी आपल्या मिरा-भाईंदर महानगरपालिकेचे ठेकेदार बरोबर ॲग्रीमेंट झाले असेल. त्या ॲग्रीमेंटच्या हिशोबाने १० पट पैसे वसूल कोणी करायचे तेही लिहिलेले असेल. कारण मी ॲग्रीमेंटची एक प्रत मा. खतगांवकर साहेबांकडे मागितली होती. पण त्यांनी मला सांगितले की, आता माझ्याकडे नाही. मी उद्या-परवा तुमच्याकडे पोहचवतो. पण आजपर्यंत ती प्रत मला मिळालेली नाही. म्हणून त्याच्यावर मला माहित नाही की, नक्की त्या ॲग्रीमेंट मध्ये आपण काय लिहले आहे आणि आपण काय बांधिलकी केली आहे. परंतु, मला जेवढें माहित आहे त्या हिशोबाने १० पट पॅनेल्टी आपण जी वसुल करतो ते मिरा-भाईंदर महानगरपालिकाचा आपला स्वतःचा हक्क आहे. कुठल्याही वादावर डिसिजन द्यायचा आपला हक्क आहे. फक्त तो ठेकेदार म्हणून आपला नोकर आहे. त्याने आपल्याकडून काहीना काही काम घेतलेलं आहे आणि तो आपल्याकडे काम करतो. असे त्याचा मतलब होतो. परंतु, ठेकेदार मिरा भाईंदर महानगरपालिकाचा मालक आहे असे शहरात वातावरण निर्माण झालेले आहे. म्हणून माझी पहिली सुचना अशी आहे की, ताबडतोब आपल्या अधिकाऱ्यांला सांग की, जिथे ठेकेदार बसून वसुली करतात तिथे एक केबिन लावा. दुसरी माझी सुचना आहे की, जे व्यापारी लॉरीमध्ये माल आणतात. ते स्टॅण्डर्ड कंपनीचे माल असतात. त्याच्यावर त्याचा वेट लिहलेले असतात तरी पण सर्व लॉरी खाली करायला लावतात व वजन करायला लावतात. ते सर्व त्यांना बंद करायला लावा. कस्टम मधून जो माल पास होऊन येतो. कस्टम डयुटी भरलेली असते. कस्टमची पासिंग असते. त्यांनी सर्व व्यवहार केलेला असते तरी पण ते तिथे हरकत घेतात की, आपण कस्टममधून आणले आहे. तेथे डयुटी कमी भरुन आणले आहे असे आहे तसे आहे. असे ते आरोप करतात तसे आरोप करण्याचा त्यांना अधिकार आहे का? जर त्यांना असा कोणताही संशय निर्माण झाला असेल तर तसे प्रकरण त्यांनी आपल्या मा. उपायुक्तांकडे आणि आपल्या मुख्यालयाकडे पाठवायला पाहिजेत त्यांनी स्वतः डिसिजन घ्यायचं की, स्वतः ट्रक ताब्यात घ्यायचा त्यांना अधिकार नाही. पण असे ट्रक ताब्यात घेऊन आणि दिवसेंदिवस तिथे ते ट्रक उभे करून ठेवतात आणि व्यापारी कंटाळून ते जेवढे पैसे मागतात. तेवढे पैसे भरून जातात. कारण मी मागे गेले होते. दहा पट पॅनेल्टीचे फक्त सहा महिन्यामध्ये एकच पावती फाडलेली होती आणि ते असे बोलतात की, त्या ठेकेदाराच्या पत्रावरुन असे समजून येते की, किती व्यापारी जकात चोरी करून पळतात. मग पळतात त्यांना पकडतात व दहा पट आपण जर पॅनेल्टी वसुल केली तर ती जाते कुठे? हा पण प्रश्न निर्माण होतो. म्हणून मॅडम, माझ्या चार सुचना आहेत आणि ॲग्रीमेंटच्या हिशोबाने जे काही बॉयलॉझ क्लॉज आपण त्याच्याशी केलेले आहे त्याच्यामध्ये मी सांगितलेली सुचना आपण कायदेशीर ॲड करु शकतो का? तो पण एक माझा महत्वाचा प्रश्न आहे की, आपण आज नविन कायदा त्याच्यात ॲड करू शकतो का?

**धनराज अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, पंधरा दिवसांपूर्वी मा. आयुक्तांच्या दालनामध्ये सर्व प्रकारची चर्चा झालेली होती आणि ४० असोसिएशनचे प्रतिनिधी त्यावेळी तेथे उपस्थित होते, ही जेवढी आता चर्चा झाली. त्याच्यापेक्षाही जास्त काय तो आपल्याला त्रास देतो, काय तो कॉन्ट्रक्टर त्रास देतोय आणि गुंडगिरीने तिथे वागतोय. ही सर्व चर्चा झाली होती. मा. आयुक्तांनी आम्हांला त्यावेळी सांगितले की, मी एक ते दोन दिवसांत यांचा सर्वांचा खुलासा करतो आणि आपल्याला कळवतो. पण आजपर्यंत त्या संदर्भात खुलासा झाला आहे का? आम्हाला अजूनही लेखी काही कळविलेले नाही.

**रिटा शाह :-**

साहेब, त्याच्याही पलिकडे जाऊन सांगते की, माझी ही लक्षवेधी .....

**धनराज अग्रवाल :-**

सन्मा. सदस्या रिटा शाह जरा थांबा. मा. आयुक्त साहेब, उसके बाद मे आपने क्या किया आपने यहाँ तक बोला था की, अगर ऐसा कुछ ज्यादा चलेगा तो उसको हम टर्मिनेट करेंगे और हमारे सामने उसे आपने काफी कुछ कहा था। ऑक्ट्राय ठेकेदार को, उसका ॲक्शन क्या हुआ। अभी भी ऐसी घटनाये हररोज हो रही है। वो नही होनी चाहिए। आपका उस पर क्या ॲक्शन हुआ वह आप सभागृह को बताईए।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सभागृहाची मागणी आहे की, त्यांना टर्मिनेटच करा. ठराव मांडा ना. नविन ठराव आणा आणि मा. उपमहापौरांनी खंत व्यक्त केलेली आहे. आम्ही नाही, सत्ताधारी जेवढे व्यापारांचे हिताचे बोलतात ते त्यांनी प्रत्यक्षात करुन दाखवावे आणि या ठेकेदारास टर्मिनेट करुन टाका तेव्हा आम्ही समजू की खरोखर या शहराचा हितासाठी हा प्रश्न आणला आहे.

**रिटा शाह :-**

मॅडम, पहिले तर हा सभागृह आहे आणि येथे कोणाला चॅलेन्ज करण्यासाठी आखाडा नाही आणि कोणत्याही नगरसेवकाने दुसऱ्या नगरसेवकाबद्दल कारण मी एवढे बोलते पण कोणत्याही नगरसेवकाच्या विरोधात किंवा त्यांच्याबद्दल काहीच बोलत नाही. माझ्या मागून कित्येक जण बोलले आहेत. सत्ताधारी पक्षाची मी नगरसेविका आहे तरी पण मी नेहमी जेव्हा जेव्हा वेळ पडली आहे तेव्हा तेव्हा सत्याग्रह पण केलेला आहे आणि घनकचरा प्रकल्पासाठी उद्याला मी जे उपोषण करणार आहे त्याचे पत्र दिलेले आहे. म्हणजे आम्ही

सत्तेमध्ये आहोत म्हणून काय आवाज उठवायचा नाही का? तर असे कोणत्याही कायदयामध्ये लिहीलेले नाही. ही पहीली गोष्ट आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आपण निर्णय घेउ शकतात ना.

**रिटा शाह :-**

आम्ही निर्णय घेतोय ना. निर्णय आम्हीच घेतोय.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवालजी आपण बसून घ्यावे.

**रिटा शाह :-**

असे बघायला गेले तर विरोधी पक्षाने निर्णय घ्यायला पाहिजे पण तुम्ही निर्णय घेत नाही. आम्हीच पाहिजे. नेहमी निर्णय घेतो आणि आम्हीच नेहमी विरोध करतो.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य रिटा शाह यांनी मांडलेली लक्षवेधी आणि सभागृहातील सर्व सन्मा. सदस्यांनी मांडलेल्या आपल्या सुचना, जकाती विषयी निर्माण होणारा त्रास प्रत्यक्ष जकातचे नेमलेले कर्मचारी अधिकारी आहेत ते प्रत्यक्षात दुकानात जाउन तपासणी करुन, पाहणी करतात तो अधिकार त्यांना दिलेला आहे का? आपण जो जकात करारनामा केलेला आहे. त्या करारनाम्यामध्ये त्यांना काय नियम नेमून दिलेले आहेत महिलांची पर्स उघडून त्या पर्सची पाहणी करणे किंवा महिलांना वेगवेगळ्या प्रकारे त्रास देणे. एखादी महिला ती बसमधून उतरल्यानंतर तिला जीप मध्ये बसवून तिला विशिष्ट नाक्यावर घेउन जाणे. हे फार चुकीच्या पद्धतीचे धोरण आहे. त्या महिलांना कुठल्याही प्रकारचा त्रास होउ नये अशी त्या जकातचे कर्मचारी जे ठेकेदार आहेत त्यांना कडक कार्यवाही करुन किंवा त्यांना कडक प्रमाणे आश्वासन एक त्यांच्यावर कुठलाही विलंब न लावता त्यांना तशी सुचना देण्यात यावी. ठिकठिकाणी शहरामध्ये जकात नाके आहेत. त्याच्यावर येणारा व्यापारी वर्ग, वाहनातून येणारा माल तिथे २४ तास रखडून ठेवणे हे सुद्धा चुकीचे आहे. कारण यामुळे पुर्ण शहरातील व्यापाऱ्यांच्या व्यापारावर परिणाम होतो. अशा कुठल्याही चुकीची गोष्ट निर्देशनास आली आणि शहरामधील सन्मा. सदस्यांनी उपस्थित केलेल्या सुचना या सर्व सुचना त्यांनी स्वतः एक जबाबदार नागरिक म्हणून जनतेच्या वतीने या सभागृहात मांडलेले आहे. या सर्व सुचनेवर फार काळजीपूर्वक, बारकाईने लक्ष देवून आपण सर्वांनी हा निर्णय घेतला पाहिजे आणि संबंधित जकात अधिकारी व ठेकेदार आणि त्याखालचा तृतीय, चतूर्थ श्रेणीत काम करणारा जो वर्ग आहे त्याला शिस्त लावणे गरजेचे आहे. सन्मा. सदस्यांनी केलेल्या सुचनांवर व विचारलेल्या प्रश्नांवर मा. आयुक्त साहेबांनी खुलासा करावा.

**रोहीदास पाटील :-**

मा. उपमहापौर साहेब, यांचे याबाबत १६ प्रश्न होते. ते नागरिकांच्या व व्यापाऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने मी अपेक्षा करतो की, हे मा. आयुक्तांनी हे प्रेमपत्र दिले. मा. उपमहापौर श्री. चंद्रकात वैती यांनी दिले. त्यात १६ मुद्दे ते १६ मुद्दे हे नागरिकांच्या व्यापाऱ्यांच्या हिताचे म्हणून स्पष्ट लिहून दिले आहेत. ती क्रिमीनल लोक राहणार नाहीत अशा पद्धतीने हे पत्र आहे. सन्मा. सदस्य रिटा बोलल्या की त्यांचे पत्र आहे. आता ते माझ्या हातात नाही ह्याची अंमलबजावणी होत नाही. ह्या सभागृहात मी अशी अपेक्षा करता की, हे जे ठेकेदार तिकडे वेटींग करत ठेवतोय तर कोणतेही डिस्प्युटेड केस असेल तर या सभागृहाची मागणी म्हणून आता मा. महापौर मॅडम व मा. आयुक्तांच्या सहीच पत्र जावे की, ती डिस्प्यूटेड केस त्यांच्याकडे पेंडीग न राहता जे पुर्णपणे मा. आयुक्तांच्या राईटमध्ये करण्यात यावे ह्याचा निकाल मा. आयुक्तांनी लावावा. म्हणजे आम्ही आणलेला माल जेंव्हा १०० रु. जेव्हा १ लाखाचा माल आणला ते म्हणतात तो १ लाखाचा माल नाही ३ लाखाचा आहे. त्याची रक्कम ठरवायची. ते समझोत्याने होत नाही. त्यांनी त्यांना २ तासापेक्षा जास्त थांबवू नये, वाहन तर मुळीच थांबवू नये. जे सदर प्रथमदर्शनी असेल ते वसुल करावे आणि मा. आयुक्त जेंव्हा निकाल देतील ते आपले कोर्ट चालवावे. मा. आयुक्त साहेब, मी या शहराच्या नागरिकांच्या दृष्टीने, व्यापाऱ्यांच्या दृष्टीने, सभागृहाच्या अधिकाऱ्यांच्या दृष्टीने ह्या मा. महासभेचा जो मान सन्मान आहे त्या दृष्टीने एक अधिकार तुंम्हाला द्यायचा आम्ही सर्व विनंतीपुर्वक अर्ज करतो. विनंती पुर्वक आहे. याला दुसरा पर्याय नाही. त्या माणसाशी आपण चांगले प्रेमाने बोललो त्या दिवशी व्यापारी रफ-टफ बोलले तुम्ही पण रागाने आमच्या समोर म्हणजे जे बोलायचे आहे त्याचा पलिकडे जाउन बोलले. आमची बाहेर जाउन चर्चा झाली. आज मा. आयुक्तसाहेब त्याच्यावर तुमचे असे सभागृहाच्या भावनेमुळे पत्र जावे की जे डिस्प्युटेड मॅटर आहे ते त्याने क्लिअर करायचे नाही. आपण मा. महापौर आणि मा आयूक्त म्हणून तुम्ही राईट घेतेले आहे. सभागृहाने ते तुंम्हाला दिलेले आहे. तो जो रक्कम वाढवील त्या रक्कमेचा पैसा तुंम्हाला मान्य असेल तर तो व्यापारी भरेल. पण त्याने २ तासापेक्षा कोणतेही वाहन थांबवू नये. तरी सुद्धा व्यापाऱ्यांना राहत मिळेल आणि या सभागृहाने किंवा मा. आयुक्ताने एक चांगले काम केले असा एक मेसेज जाईल

**जयंत पाटील :-**

एका अतिशय चांगल्या विषयाला सन्मा. सदस्य रिटा शाह यांनी हात घातलेला आहे. परंतु, एक गोष्ट माझ्या दृष्टीकोनात येते, की आमचे प्रशासन या बाबतीत खुप हतबल आहे. म्हणजे एक ठेकेदार या शहरातील

सर्व नागरिकांना सर्व व्यापाऱ्यांना राबवतो आहे. परंतु, आम्ही काही करु शकत नाही. मध्ये एका वर्तमान पत्रात एक बातमी होती. आणि जागतिक रिपोर्ट आहे की, जगामध्ये भ्रष्टाचारा मध्ये भारताचा पहिला नंबर आहे. आता आपल्या महानगरपालिकेचा कितवा नंबर आहे हे शोधायची वेळ आली आहे. आणि म्हणून हे एकमेव कारण आहे की, त्या निर्ढावलेल्या ठेकेदाराला काहीच करु शकत नाही. आता मा. महापौरांनी काही नियम सांगितले की असे जर आपण केले तर हे करायला पाहीजे होत. तर मा. महापौर मॅडम, अशी आमची खात्री आहे. आम्ही प्रामाणिक पणे आपले मत सांगितले आहे की, महिलांना त्रास देउ नये. महिलांना हे करु नये पण, प्रशासन त्याबाबतीत काही करु शकणार नाही. १ करोड ६२ लाखाची मागणी तो ठेकेदार आपल्याकडे करतो आहे. काही कारण नसताता. मा. आयुक्त साहेब, याविषयावर आपण आंम्हाला माहिती द्या. १ करोड ६२ लाखाची मागणी त्यांने आपल्याजवळ केलेली आहे. स्थायी समितीची सभा आम्ही थांबविली आणि मी संध्याकाळी येतो. आता येतो, उद्या येतो. नंतर येतो करुन संध्याकाळी ६.०० वाजता तो माणूस आला. तोपर्यंत आम्ही सभा थांबवली होती, आणि आपण तिथे आलात आम्ही चर्चा केली त्याबाबतीत पुढे काय झाल? कुठल्या कोर्टात ती केस आहे? आणि ती कुठल्या स्टेजला आहे आंम्हाला मा. विधी अधिकाऱ्यांनी सांगावे. त्यांची माहिती द्यावी कारण आजपर्यंत महानगरपालिकेच्या वकिलाने एकही केस जिंकून दाखविलेली नाही. हा केस तरी जिंकेल काय? याची खात्री त्यांनी आंम्हाला द्यावी. पावसामुळे या शहराचे नुकसान झाले असताना माझे ६५ लाखाचे नुकसान झाले आहे असे तो माणूस म्हणतो आणि आम्ही त्याला काहीच करु शकत नाही. आता सन्मा. सदस्या रिटा शाहा यांनी पोटतिडकीने विषय मांडलेला आहे. त्याच्या बद्दल काहीतरी इम्प्लिमेंटेशन होईल का? कारण हा निर्ढावलेला माणूस आहे.

**मा. आयूक्त :-**

सन्मा. सदस्यांनी जी लक्षवेधी......

**रिटा शाह :-**

साहेब, माझा त्या संदर्भात एक प्रश्न आहे. कारण जकातच चालले आहे ते कशावरुन तर तो ठेकेदार म्हणतो आणि आपल्याकडे लेखी पत्र ही देतो की, काही व्यापारी जकात चोरी करुन तो गाडीत माल आणतात, बसमध्ये आणतात असे करतात. माझा एक प्रश्न त्यावर आहे की, आपल्याकडे कायदेशीर असे किती आकडे आहेत की जकातीची चोरी झालेली आहे आणि आपण त्याच्यावर किती पैसे वसुल केलेले आहे.

**मा. आयूक्त :-**

सन्मा. सभागृहामध्ये जकात वसुलीच्या बाबतीमध्ये जी खाजगी ठेकेदाराची नेमणूक केलेली आहे. त्या संदर्भात ज्याकाही वारंवार तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत त्या तक्रारीवरुन माझ्या माहितीप्रमाणे माझ्या दालनामध्ये याप्रकारच्या दोन ते तीन बैठका झाल्या आहेत आणि जर शेवटची बैठक झाली आहे. ती बैठक २७ तारखेला झाली त्या बैठकीमध्ये सर्व सन्मा. गटनेत्यांना निमंत्रित केलेले होते. त्याचप्रमाणे मा. उपमहापौरही त्यावेळी तेथे उपस्थित होते आणि तेव्हा शहरातील जी काही व्यापारी मंडळ आहेत. आणि त्यांचे पदाधिकारी जे आहेत असोसिएशन जे आहेत त्यांनाही त्याठिकाणी निमंत्रित करण्यात आले होते. आणि जो काही निर्णय प्रशासनाने त्याबाबतीत घेतलेला आहे. त्याबाबतीमध्ये संबंधित ठेकेदारांना लेखी सुचना दिलेल्या आहेत त्या मी थोडक्यात सभागृहास वाचून दाखवतो. जकात देय करण्या करता जकात नाक्यावर येणारे व्यापारी व त्यांच्या प्रतिनिधींना सौजन्याची आणि सलोख्याची वागणूक देण्यात यावी. जर आपल्या अधिपत्याखाली कार्यरत कर्मचाऱ्याचा क्रिमिनल रेकॉर्ड असेल आणि सदर कर्मचाऱ्यांवर फौजदारी स्वरुपाचे गुन्हे किंवा दंड झालेले असतील अशा वाईट प्रवृत्तीच्या कर्मचाऱ्यांना जकात अभिकर्ता सेवेतून कमी करण्यात यावे. व्यापाऱ्यांच्या मागणीनुसार मध्यवर्ती जकात नाक्यावर व्यापारी मार्गदर्शन केंद्र सुरू करण्यास परवानगी देण्यात येत आहे. सदर केंद्रास आवश्यक ते सहकार्य करावे. जकात केंद्रावर प्राप्त झालेल्या मालाची नियमानुसार आवश्यक ती शहानिशा करुन जकात वसुली करण्यात यावी. जेणे करुन एखाद्या संबधीत व्यापारी व त्याच्या प्रतिनिधींना सदरचा माल रितसर त्याच्या गोदामात किंवा दुकानात घेउन जाण्यास कोणतीच अडचण असू नये. सदर मालाची पुन्हा तपासणी करण्याची आवश्यकता येउ नये. जकात वसुलीच्या अनुषंगाने कोणत्याही व्यापाऱ्याकडून जकात चुकवेगिरी होणार नाही याकरिता कार्यरत व्हिजलन्स स्कॉड मध्ये महानगरपालिकेचे कर्मचारी नेमण्यात यावे. त्या अनुरूप मागणी केल्याप्रमाणे महानगरपालिकेचे कर्मचारी आपणास कायमस्वरुपी प्रतिनियुक्तिवर उपलब्ध करुन देण्यात येतील. एखादा व्यापारी किंवा संस्था याबाबत त्यांच्याकडून जकात वसुली बाबत त्याच्या अभिलेखी तपासून त्यांच्या मालाची शहानिशा करणे याबाबत कार्यवाही करणे अपेक्षित असल्यास त्या अनुषंगाने आवश्यक तो प्रस्ताव मा. आयुक्तांकडे सादर करुन यांच्याकडे देउन मा. आयुक्तांच्या परवानगीने पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी. जकात अभिकर्ता अनुषंगाने अधिनियमातील आणि जकात वसुली नियमातील सर्वबाबींचे अंमल करण्याचे अधिकार महानगरपालिकेच्यावतीने अभिकर्ता म्हणून आपणांस असल्यामुळे जकात वसुलीमध्ये कोणताही वाद निर्माण झाल्यास सदर वाद अंतिम करण्याचा अधिकार मा. आयुक्तांकडे व त्यांच्या वतीने प्राधिकृत अधिकारी यांच्याकडे करारनाम्यानुसार राखीव ठेवण्यात आलेला आहे. या अन्वये दैनंदिन जकात वसुली मधून निर्माण होणारे वाद जागेवर निपटारा होण्याच्या दृष्टीने अनुषंगाने जकात अधिक्षक व त्यांचे सहाय्यक कर्मचारी यांचे कार्यालय मुख्य जकात नाका येथे ठेवण्यात येत आहेत. जकात वसुली मध्ये चुकवेगिरी, चोरी, लबाडी या अनुषंगाने वसुल होणारी दंडाची रक्कम महानगरपालिका

खात्यामध्ये जमा होणे करारनाम्यानुसार आसश्यक आहे. त्या अनुषंगाने जकात चुकवेगिरीतुन प्राप्त होणारे प्रकरण वेळोवेळी निर्णयास्तव महानगरपालिकेकडे सादर करण्यात यावे अशाप्रकारच्या सुचना संबंधित जकात ठेकेदाराला देण्यात आलेल्या आहेत आणि हे जे आदेश जकात ठेकेदाराला दिलेले आहेत त्याच्या प्रति मात्र संपुर्ण जेवढ्या - जेवढ्या संघटना आहेत त्याच्या संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना पाठवल्या आहेत. सन्मा. गटनेत्याना ही त्याच्या एक - एक कॉपी दिलेल्या आहेत. मा. महापौर व मा. उपमहापौर यांनाही या बाबतीमध्ये प्रती देण्यात आलेल्या आहेत. सर्व सन्मा. सदस्यांनाही या बाबतीत प्रती देण्यात आल्या आहेत.

**रिटा शाह :-**

साहेब, ते सर्व झाले आपण सर्व बायलॉज बनवले आहेत, की आपण ॲग्रीमेंट केले आहे आणि पहिला तर मी तुंम्हाला एक नियम विचारला आपण ॲग्रीमेंट केले तेंव्हा आपण नियम केले होते आणि त्याच्यावर आपली आणि त्यांची सही झाली म्हणजे ते दोघांनाही ॲक्सेप्ट होत. आता हे आपण नविन नियम तयार केलेला आहे. त्याच्यामध्ये आपण हे कायदेशीर ॲड करु शकतो काय? दुसरा मुद्दा मी विचारलाय की, जकात चोरी होते असा जकात ठेकेदाराचा दावा आहे. मग आतापर्यंत आपल्याकडे किती जकंत चोरीची प्रकरणे पकडली आहेत आणि आपल्या खात्यात किती पैसे जमा झाले आहेत?

**हेमंत पाटील :-**

मा. महापौर मॅडम, त्यांच्या परवानगीने बोलतो आहे. सन्मा. सदस्य रिटा शाहा कॉर्पोरेटर यांनी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे की, आतापर्यंत जकातीच्या दंडाची प्रकरणे किती झाली आहेत आणि किती पैसे वसुल केलेले आहेत त्या अनुषंगाने मी सांगु इच्छितो आतापर्यंत जकात दंडाची २६ प्रकरणे झाली आहेत. आणि त्या अनुषंगाने ८९ हजार ७९१रुपये वसुल करण्यात आलेले आहेत.

**रिटा शाहा :-**

साहेब, महत्वाची गोष्ट म्हणजे आकडे बघा. म्हणजे खुप कमी प्रमाणात आपल्याकडे चोरी होत आहे. आपल्याकडे एवढे व्यापारी वर्ग आहेत. एवढे लघुउद्योजक आहेत आणि फक्त ७९ हजार रुपये आपण चोरी प्रकरणाची वसुल केलेले आहे. म्हणजे त्याचा अर्थ आपल्याकडे चोरी होतच नाही. तरी पण कोणार्कवाला असे पत्र पाठवतो की, व्यापारी वर्ग चोरी करतात आणि आपले श्री. हेमंत पाटील त्यांना सहकार्य करुन.....

**नरेंद्र मेहता :-**

सहा महिने अगोदर आम्ही आपल्याला पत्र दिले होते. तेंव्हाही आपण हिच रक्कम सांगितली होती. सेम फिगर होते. आता ही तिच फिगर.

**हेमंत पाटील :-**

ह्याच्या अगोदर आम्ही ३४ हजार रुपये सांगितलेले होत. पण आज ८९ हजार रुपये झालेली आहे. मी जी रक्कम सांगितलेली ती ३४ हजार आणि आता ८९ हजार रुपये आहे.

**शिवप्रकाश भुदेका :-**

आप हाथी को तो रहने दिजिए मगर आपले पुँछ का बाल भी नही पकडा।

**रिटा शाहा :-**

श्री. हेमंत पाटील साहेब, ही किती महिन्याची वसुली आहे?

**गजानन भोईर :-**

एका प्रकरणामध्ये हे १०-१० हजार रुपये वसुल करतात.

**रिटा शाहा :-**

हि किती महिन्याची वसुली आहे? श्री. हेमंत पाटील साहेब चोरी प्रकरणी किती महीन्याची वसुली आहे?

**हेमंत पाटील :-**

२३ जुन पासुन आजपर्यंत.

**रिटा शाहा :-**

२३ जुन म्हणजे वर्ष व्हायला आले.

**हेमंत पाटील :-**

२३ जुन २००६.

**रिटा शाहा :-**

म्हणजे आता किती महिने झाले?

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौरसाहेबांच्या परवानगीने बोलतो आहे, श्री. हेमंत पाटील साहेब......

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, एका व्यक्तीकडून दिड लाख रुपये घेतलेले आहे याबाबत मी हेमंत पाटील व त्यांचे कर्मचारी या दोघांनाही माहिती दिलेली आहे. त्या व्यापाऱ्याकडून दिड लाख रुपये घेतलेले आहे. पन्नास हजार रुपये बाकी आहे. तो माणूस त्यादिवशी माझ्याकडे आला आणि सांगितले की ही लोक दोन लाख रुपये मागतात. तर असे एकाच व्यक्तीने दिड लाख रुपये भरलेले आहेत आणि तरी ते म्हणतात की ८९ हजार रुपये.

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, माझी सुचना आहे की, सदर ठेकेदारांबद्दल……

**नरेंद्र मेहता :-**

त्याच्या गाळ्यावर जाउन जबरदस्तीने दिड लाख रुपये घेतले त्याच्याकडून २ लाखाची मागणी केली आणि शेवटी तो माणूस माझ्याकडे आला.

**रिटा शाह :-**

जे आकडे चोरीचे आपल्याकडे स्पष्ट झालेले आहे. त्यावरुन समजून येते की, व्यापारी वर्ग कुठल्याही प्रकारची चोरी वैगरे करत नाही आणि तरी पण तो ठेकेदार संपुर्ण व्यापारी वर्गाला हैराण करतो.

**नरेंद्र मेहता :-**

ऑक्ट्राय बद्दल जेवढे पुरावे पाहिजेत तेवढे मी द्यायला तयार आहे. पण आपली तयारी आहे का त्याला निलंबीत करायची. तसे मला सांगावे. तुंम्हाला जेवढे पुरावे पाहिजे तेवढे मी द्यायला तयार आहे. आपली त्याला निलंबीत करायची तयारी आहे काय?

**रिटा शाह :-**

जकात ठेकेदाराला निलंबीत करा.

**प्रेमनाथ पाटील :-**

ठेकेदार नाही अधिकाऱ्यांना निलंबित करा.

**रिटा शाह :-**

टर्मिनेट करा.

**नरेंद्र मेहता :-**

त्याचे टेंडर कॅन्सल करावे.

**रिटा शाह :-**

टर्मिनेट करावे.

**नरेंद्र मेहता :-**

ठेकेदाराचा ठेका रद्द करण्याची आपली तयारी आहे का? तर मी आपल्याला पुरावे देतो.

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, ठेकेदाराचा ठेका रद्द करावा.

**मिलन पाटील :-**

सन्मा. सदस्य नरेंद्र मेहता तो सरकारी नोकर आहे का? त्याला निलंबित करायला?

**शुभांगी नाईक :-**

सन्मा. सदस्य रिटा शाह आपण जे बोललात ते योग्य बोललात.

**मिलन पाटील :-**

तो सरकारी नोकर आहे का? त्याला निलंबित करायला?

**शुभांगी नाईक :-**

ठेका रद्द करा.

**प्रेमनाथ पाटील :-**

ठेका रद्द करायचा.

**नरेंद्र मेहता :-**

त्याबद्दल मी सॉरी बोलतो. ठेका रद्द करायची तयारी आहे का? आणि श्री. हेमंत पाटील साहेबांनी दंडाच्या बिलाची सप्टेंबर महिन्याची रक्कम सांगावी. सप्टेंबर महिन्याची बिल आहेत का?

**मा. आयुक्त :-**

आपण सभागृहामध्ये सांगत आहात की संबंधित ठेकेदाराने दिड लाख रुपये वसुली केलेली आहे. ती वसुली जकातीची केलेली आहे की दंडाची रक्कम वसुल केली आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

दंडाची रक्कम वसुल केली आहे.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, दंडाची रक्कम आहे. गाळ्यावर जाउन जकातीची वसुली कशी करणार?

**मा. आयुक्त :-**

ही दंडाची रक्कम तुम्ही म्हणता त्याप्रमाणे वसुल केली तेव्हा ही गोष्ट महानगरपालिकेच्या निदर्शनास आणून दिली का?

**नरेंद्र मेहता :-**

म्हणून मी त्यांना थोडक्यात का विचारले? त्यांनी मला सप्टेंबर महिन्याची दंडाच्या बिलाची रक्कम सांगावी. साहेब आता,५ दिवसापुर्वीचीच गोष्ट आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, मी २५ तारखेचेच सांगतो ना, माझ्या मित्राकडून २५ हजार रुपये घेतले आणि त्यांनी पावती दिलीच नाही.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, मला दोन तास वेळ द्या मी आता ऑक्ट्राय नाक्यावर जाउन मी तुंम्हाला फाईन भरतो आणि दाखवतो. माझ्यासोबत एक अधिकारी बरोबर द्या.

**मा. आयुक्त :-**

नियमाप्रमाणे महानगरपालिकेने जो काही ठेकेदाराशी करारनामा केलेला आहे. आणि महानगरपालिकेचे जे काही जकात नियम आहेत. त्या जकात नियमाप्रमाणे जकात वसुली करणे ठेकेदारास बंधनकारक आहे. जर समजा एखाद्या व्यापाऱ्याने आपण म्हणतात त्याप्रमाणे समजा जर एखाद्या व्यापाऱ्याने चोरी करुन जर माल आयात केला असेल आणि चोरी करुन माल आयात केल्यानंतर जर महानगरपालिका पर्यंत जर अशा तक्रारी आल्यातर महानगरपालिकेला त्याच्यावर १० पटीने दंड आकारेल आणि ते पैसे महानगरपालिकेमध्ये जमा होतील.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, हे तर आपल्या नियमामध्ये आहे.

**मा. आयुक्त :-**

मला खुलासा तर करु द्या. आणि जर समजा १० पटी पेक्षा जर आतमध्ये त्याचे सेटलमेंट होत असेल तर जकात ठेकेदार आणि संबंधित जकात चोरी करणारा जो कोणी असेल तो तर ते आपल्या पर्यंत तर येतच नाही ना आणि असे जे येत नसेल तर पहिली गोष्ट म्हणजे ते १० पटीने जकात त्याच्या वर जकातीची आकारणी करणे गरजेचे आहे. परंतु, जर १० पटीच्या आतमध्ये जर त्याचे सेटलमेंट होत असेल तर ते आपल्यापर्यंत येतच नाहीत. तो विषय कोणीच आपल्याकडे आणत नाही.

**नरेंद्र मेहता :-**

ठिक आहे ना. एखादा व्यापारी तो आतमध्ये सेटलमेंट करतो तो त्याचा फायदा मागतो. पण त्या ठेकेदाराचे ही कर्तव्य आहे की, त्यांनी असे स्विकारायचे नाही आणि आपल्याकडे त्या केसेस आणायच्या.

**मा. आयुक्त :-**

अशा प्रकारच्या सुचना संबंधीत ठेकेदारांना दिलेल्या आहेत आणि त्याच्यासाठी आपला अधिकारी त्याठिकाणी बसविला आहे.

**नरेंद्र मेहता :-**

सर, मी असे बोलतो की, मला माहित आहे तसे होणार नाही. मला आपण एक आश्वासन द्या की एखाद्या कडून जर असे वस्तू घडली.

**मा. आयुक्त :-**

अशाप्रकारे जर संबंधित जकात ठेकेदार आणि जो कोणी व्यापारी आहे त्या व्यापाऱ्यांशी जर अशाप्रकारे संगनमत जर होत असेल तर पहिली अशी गोष्ट की, अशाप्रकारे संगनमत व्हायला नाही पाहिजे. जकात चोरी करुन व्यापाऱ्यांचा आणलेला जो माल असेल तो महानगरपालिकेपर्यंत यायला पाहिजे. महानगरपालिकेपर्यंत त्याच्या तक्रारी आल्या पाहिजेत. परस्पर त्यांच्याशी संगनमत करुच नका ना आणि अशा प्रकारे तक्रारी महानगरपालिके कडे जर प्राप्त झाली आणि त्यांची जर दखल घेतली नाही तर प्रशासन काय करणार?

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, किती लोकांना महिती आहे की महानगरपालिकेत किती दंड आकारायचा. त्या ठेकेदारांना दंड आकारायचा कि नाही? हे किती व्यापाऱ्यांना माहित आहे.

**मा. आयुक्त :-**

या संदर्भामध्ये जर खरोखरच जकात भरणारे जे काही नागरिक आहेत त्यांना जर अशा प्रकारची जाणीव नसेल तर अशा प्रकारचा बोर्ड आपण जकात नाक्यावर लावण्याची व्यवस्था करु.

**नरेंद्र मेहता :-**

आता जे झाले ते आपण विसरुन जाउ. पण साहेब, यापुढे ठेकेदारांनी एखादा दंडाची रक्कम आकारली तर त्याच्यावर आपण काय कार्यवाही करणार याची मला खात्री द्यावी.

**मा. आयुक्त :-**

या संदर्भामध्ये जर समजा संबंधीत कोणीही ज्याने जकात भरलेली आहे त्याने आपल्याकडे तक्रार करावी किंवा आपल्याला जर कळले तर आपणसुद्धा अशी एखादी तक्रार आमच्याकडे करावी. आम्ही समक्ष लोकांना बोलावून घेउ आणि जी काही समजा दंडाची रक्कम घेतली असेल ती दंडाची रक्कम महानगरपालिकेमध्ये जमा करुन घेउ.

**नरेंद्र मेहता :-**

बस तेवढच.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्यांनी खाली बसुन घ्यावे. सर्वांच्या सुचना समजलेल्या आहेत.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम, लक्षवेधी माझी आहे. मला एकच वाक्य बोलायच आहे की हे सर्व आपल्या समोर चर्चेमध्ये आलेले आहे.

**गजानन भोईर :-**

जेव्हा त्यांनी आमच्याकडे पैसे मागितले होते......

**नरेंद्र मेहता :-**

जर व्यापाऱ्याने चोरी केली तर त्यांना १० पट फाईन करायचे आणि त्यांनी कितीही पैसे आकारले तर त्यावर काही कार्यवाही नाही.

**मा. आयुक्त :-**

खर म्हणजे ठेकेदाराने हे दंड आकारायला नको.

**नरेंद्र मेहता :-**

आपण सांगा ना की आकारणी केल्यावर आपण ही कार्यवाही करणार. काय कार्यवाही करणार ते सांगा ना.

**परशुराम पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, जकातीच्या बाबतीमध्ये आपण जे सांगत आहात त्याच्याशी आम्ही सहमत आहोत. असे समजायचे. पण ही जी दंडाची रक्कम येते ती छोटी आहे. मोठी आली तर त्यांना काय परवडणार नाही. मोठी अमाउंट जर इथे महानगरपालिकेत आली तर त्यांना परवडणार नाही. म्हणून ते इथे छोटी रक्कम देतात आणि मोठी रक्कम तिथे ठेवतात.

**मा. आयुक्त :-**

म्हणून सांगतो की, आपल्याकडे जर अशाप्रकारची तक्रार आली तर ती तक्रार ताबडतोब आमच्या पर्यंत पोहचवा.

**परशुराम पाटील :-**

साहेब, पण अशी मोठी तक्रार इथे येउुच शकत नाही. तिकडेच ते निभाउन घेतात की, इसका इतना दे दो और चले जाओ। अशी पद्धत आहे. आता सन्मा. सदस्य नरेंद्र मेहता साहेबांनी सांगितले आहे. त्या पद्धतीने जर सांगितले की पुरावे आणले तर साहेब, आपण त्या ठेकेदारावर काय कार्यवाही करणार? ,

**मा. आयुक्त :-**

अशी जर एखादी तक्रार आली की, आपण ती तक्रार लगेच आमच्याकडे पाठवा.

**परशुराम पाटील :-**

साहेब, हे वर्षानुवर्ष चालले आहे. आता १ करोड ६५ लाख रुपयाची आपल्यावर त्याने केस केली आहे. त्याच्यामध्ये मी इकडे अनुमोदन दिलेले आहे. मा. महापौर साहेबा, तुम्हीच सांगा उद्याला ती केस आपण मागे घ्यायला पाहिजे की नाही.

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, आपण इथे....

**परशुराम पाटील :-**

उद्या, जर त्या ठेकेदाराने पैसे त्या तिथुन ठेकेदारांनी वसुल केले तर ही आर्थिक नुकसानी कोणाची आहे? महानगरपालिकेची ही आर्थिक नुकसानी आहे की, नाही? ते मला सांगा? मग ती केस मागे घ्यायला पाहिजे. ती केस मागे घेतल्यानंतरच आपण त्यांना ठेका द्यायला पाहिजे होता. ती केस त्याने मागे घेतली नाही आणि त्याला आपण ठेका दिला. ती केस चालू आहे की, नाही? त्याचा आपण आंम्हाला खुलासा द्या.

**मा. आयुक्त :-**

त्या ठेकेदारांनी ही मागच्या वर्षाची जी मागणी केली होती. त्या मागच्या मागणीला आपण प्रखर विरोध केलेला आहे. दि. २६ आणि २७ जुलैला.......

**गजानन भोईर :-**

मा. आयुक्त साहेब, सर्व सन्मा. स्थायी समितीच्या समोर त्याने सांगितले होते की, ९९ टक्के मी ही केस मागे घेतो आणि मी पैसे मागणार नाही. हे सर्व सन्मा. सदस्यांसमोर त्यांने सांगितले होते. त्या टाईमाला.....

**परशुराम पाटील :-**

१०० टक्के सांगितले होते. १०० ते ९९ टक्के सांगितले होत की मी ही केस मागे घेईन. तर वास्तविक ती केस मागे घ्यायलाच पाहिजे होती. कारण आता महानगरपालिकेचे नुकसान आहे. कधीतरी तो ते पैसे वसुल करणारच.

**मा. आयुक्त :-**

याबाबतीमध्ये मी सभागृहाला सांगू इच्छितो की, जकातीच्या ठेक्या बद्दलचा विषय मागच्या सन्मा. स्थायी समितीच्या समोर जेंव्हा आला तेंव्हा त्याला तिथे पाचारण केले होते. तेंव्हा त्याने त्याठिकाणी कुठच्या प्रकारचे आश्वासन दिले आहे किंवा आपल्याला कुठल्या प्रकारचे निवेदन दिलेले आहे. याबाबतीमध्ये मी माहिती घेतो आणि त्यांनी जर अशाप्रकारचे मा. स्थायी समितीला आश्वासन दिलेले असेल तर त्याला मी विचारणा करतो.

**परशुराम पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, हे सभेमध्ये झालेले आहे. आम सभेमध्ये झालेले आहे. त्याला आम्ही अनुमोदन दिलेले आहे.

**शिवप्रकाश भुदेका :-**

स्थायी समितीचे सभापती साहेब आपण बोलाना.

**जयंत पाटील :-**

साहेब, माहिती आपण कशाला देता? हे सर्व आमसभेतच होतं.

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौर मॅडम, सभागृहामध्ये जकातीचा विषय आला त्यावेळेला......

**गजानन भोईर :-**

सन्मा. सभापतींच्या दालनामध्ये सन्मा. सभापतीसमोर त्यांनी आश्वासन दिलेले आहे. ते सन्मा. सभापतींसमोर बोललेले आहे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

मा. आयुक्त साहेब, त्यासाठी आम्ही सभा २ तास थांबवली होती.

**गजानन भोईर :-**

संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत सभा थांबवली होती.

**तुळशीदास म्हात्रे :-**

या शहराच्या दृष्टीकोनातून हा निर्णय महत्त्वचा आहे. तर ह्या ठिकाणी १ करोड ६५ लाख रुपये जेंव्हा महानगरपालिकेचे नुकसान होणार आहे. ह्यासाठी आम्ही दोन तास थांबून राहिलो पण त्याच्यानंतर तुम्ही त्यावर दुर्लक्ष केले की काय केले त्याबाबतीत अजुनही आपण त्याचा खुलासा केलेला नाही. खरं म्हणजे ते माफ करायला पाहिजे होते. अन्यथा त्यांनी आंम्हाला माफ करणार असे सांगितल्यानंतर केस करणार नाही सांगितले व केस मागे घेतो असे सांगितल्यानंतर आम्ही तो ठराव केल्यानंतर त्याला ठेका देण्याच कॅन्सल केले असते. त्याला ठेका द्यायचा ठराव केलाच नसता.

**मा. महापौर :-**

सर्व सन्मा. सदस्यांच्या भावना लक्षात घेता याविषयावर आयुक्त साहेबांनी खुलासा केलेला आहे. सचिवांनी पुढील विषयाला सुरुवात करावी.

**शिवप्रकाश भुदेका :-**

मा. महापौर मॅडम, व्यापारी लोगोंकी इतनी बडी समस्या है फिर भी सन्मा. चौहान साहाब मौन है।

**तुळशीदास म्हात्रे :-**

आपले १ लाख ६५ लाख रुपयाचे नुकसान होत आहे. ही कमालीची गोष्ट आहे.

**रिटा शाह :-**

माझ्या एका सवालाचा आपण अजून खुलासा केलेला नाही.

**शिवप्रकाश भुदेका :-**

मा. महापौर मॅडम, व्यापारीयों की इतनी बडी समस्या है फिर भी सन्मा. सदस्य चौहान साहब मौन है। कुछ बोल नही रहे है। इनके वॉर्ड में बहुत सारे व्यापारी है। अभी इनको व्यापारी कैसे मतदान करेंगे यह समझमे में नही आता है।

**तुळशीदास म्हात्रे :-**

मा. आयुक्त महोदय, त्यांना पुन्हा बोलवून घ्या आणि त्यांचा खरोखरच ठेका कॅन्सल करा ते १ करोड ६५ लाख रुपये ची जी केस त्यांनी लावलेली आहे ती केस त्यांना मागे घ्यायला लावा आणि त्यांचा ठेका खरोखरच कॅन्सल करा जेणे करुन याठिकाणी मिरा - भाईंदर शहरामध्ये असलेल्या फॅक्टऱ्या बंद झाल्यामुळे मा. आयुक्त साहेब.....

**मा. महापौर :-**

सचिवजी पुढील विषयास सुरुवात करा.

**रोहिदास पाटील :-**

एकही सन्मा. सदस्य जेवणाची पर्वा करत नाही. कोणी पाणी मागत नाही. आपण विषय समजून घ्या.

**सुधा गोयंका :-**

मा. महापौर मॅडम, मुझे इस विषयपर बोलनेकी इजाजत दिजिए। अभी जिस तरह से शक उठाया की, उसका नुकसान हुआ और वह हमसे १ करोड ६५ लाख रुपया माँग रहा है। तो यह वह मिरा - भाईंदर के काफी नागरीकों का नुकसान हुआ है।

**मिलन पाटील :-**

मॅडम, आपण जेवणाची सुट्टी कधी करता?

**तुळशीदास म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, आपण जेवायची सुट्टी देता ती गोष्ट खरी आहे. पण, हा विषय फार गंभीर आहे. यांच्यावर लक्ष केंद्रीत करायला नको का? या शहरातील फॅक्टऱ्या बाहेच्या ठिकाणी पळून गेल्या आहेत. म्हणजे उद्या किती नुकसान होणार आहे. मा. आयुक्त साहेब दोन-चार वर्ष जास्त लागतील आणि बदली होउन जातील पण नुकसान कोणाचे होईल?

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, माझी फक्त एक सुचना होती की, ज्या जकात ठेकेदारानी आपल्या मिरा - भाईंदर महानगरपालिकेचे प्रशासन आणि ७९ सन्मा. नगरसेवक आज ज्या जकात ठेकेदाराबद्दल चर्चा करतो आणि आपण कितीही नियम लावले तरी पण तो आपल्या शहराचा राजा आहे असे मी सांगते. कारण त्याच्यापुढे आपले काहीच चालणार नाही ते ही मी बोलते.

**शिवप्रकाश भुदेका :-**

मॅडम, ७९ नगरसेवक नाही ८४ नगरसेवक आहेत.

**रिटा शाह :-**

म्हणून अशा ठेकेदारांना टर्मिनेट करा. अशी मी सुचना देत आहे. ह्या लक्षवेधीच्या अंतर्गत त्याला टर्मिनेट करा. अशी मी सुचना मांडत आहे.

**(लंच टाईम दुपारी २.३० वाजता)**

**मा. महापौर :-**

सचिवांनी सभेला सुरुवात करावी.

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ७५चे वाचन केले.)

**रोहित सुवर्णा :-**

सचिवजी दि २०/६/२००६ रोजीच्या इतिवृत्तांतामध्ये पान नं. २६ वर ज्याठिकाणी सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे बोलतात की आंम्हाला या कॉन्ट्राव्हर्सी पाहिजे.

**शशिकांत भोईर :-**

पान नं. ३६ वर ठराव केलेला आहे. त्यात दुरूस्ती आहे. एक सफाई पाहिजे तिथे सुफाई लिहीले आहे आणि कॉम्प्युटर ऑपरेटर संगणक चालक शैक्षणिक पात्रता कोणत्याही शाखेतली पदवी परिक्षा 'अ' आणि पुढचे अक्षर समजत नाही आहे. ते उत्तीर्ण काय आहे? त्यांची श्रेणी काय आहे? ते बघा 'अ' श्रेणी आहे का? बघा. कॉम्प्युटर ऑपरेटर संगणक चालक शैक्षणिक जी पात्रता दिली आहे. कोणत्याही शखेतील पदवी परीक्षा 'अ' नंतर काही अक्षर दिले आहे ते समजत नाही ते बघा.

**नगरसचिव :-**

चेक करुन दुरुस्ती करण्यात येईल.

**रतन पाटील :-**

सन्मा. सचिव साहेब क्षमा मागतो. पान नं. १२.

**नगरसचिव :-**

काही दुरुस्ती आहे का?

**रतन पाटील :-**

दुरुस्ती नाही मा. आयुक्तांना विचारायचे आहे की, मा. आयुक्त साहेब, पान नंबर १२ मध्ये टॉवर संदर्भात मी विचारलेला प्रश्न होता. आपण त्याला उत्तर दिले होते. याबाबी संबंधीताना आदेश दिले आहेत आणि त्याची १५ दिवसात पुर्तता केली जाईल. १५ दिवसा मध्ये जे कागद पत्राची पुर्तता करणार नाही. त्यांचे टॉवर काढून घेण्यात येतील. असे आपण या सभागृहात सांगितले आहे. तर १५ दिवस झाले नाहीत का? ही प्रोसिडींग दि. २०/६/२००६ ची आहे. ह्याची पुर्तता झाली नाही का? ह्याची पुर्तता झाली आहे, होणार आहे, काय आहे? ह्याबद्दल मला सांगा. पुर्तता झाली नसेल तर कशाला मंजुर करायचे?

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील इतिवृत्तांताचा विषय चालू आहे.

**रतन पाटील :-**

मॅडम, मला माहित आहे. इतिवृत्तांताचा विषय आहे. आम्ही त्याला मान्यता कशा मधून द्यायची? ह्याची पुर्तता झालीच नाही. १५ दिवसामध्ये सर्व मोबाईल टॉवर सर्व अनधिकृत आहेत ते टॉवर काढणार आहेत ह्याच्यात लिहिलेले आहे. जर ते काढणार नाही तर हे का दिले? याची १५ दिवसामध्ये पुर्तता का नाही झाली? प्रत्येक वेळी आम्ही असेच ऐकायचे का? मा. आयुक्त साहेबच याचे उत्तर देतील.

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील साहेब आपल्याला आता याच्यामध्ये ज्या काही चुका असतील तेच सांगा. कम्प्लेंटस रिपोर्ट आहे. त्याच्यावरील कार्यवाहीचे नंतर मा. आयुक्त खुलासा करतील.

**रतन पाटील :-**

मला मान्य आहे. बरोबर आहे. पण आता इलिवृत्तांताला आपण मान्यता देणार आहोत .

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील साहेब पहिले हे इतिवृत्तांत पुर्ण होउ द्या. नंतर आपल्याला कमिशनर रीपोर्ट सांगतील.

**रतन पाटील :-**

मला या विषयावर चर्चा करायला आपण वेळ देणार का?

**मा. उपमहापौर :-**

होय, आपल्याला चर्चा करायला वेळ देणार.

**शशिकांत भोईर :-**

सचिवजी, पान क्र. ४७ माझे संभाषण आहे. वरुन तिसरी लाईन आपली पैशाची बचत होईल. आपली बचत होईल. असे लिहिले आहे. तर आपल्या पैशाची बचत होईल असे पाहिजे. अशा पद्धतीने जेवढ्या आपल्या इमारती आहेत तर तिथे इमारत्या लिहिले आहे. त्याला ही सौर उर्जेची निर्मिती करुन महानगरपालिकेची जेवढी बचत होईल असा एक नविन उपक्रम आपल्या उपक्रम आहे. तिकडे प्रयोग लिहिले आहे. आणि परत भाईंदरहून आहे तिथे भाईंदरचा त्यानंतर खालची लाईन आहे हा न्यू ॲपेन्डीसमध्ये टाकावे ही सुचना न्यू ॲपेन्डीसमध्ये टाकावी असे पाहिजे.

**रोहित सुवर्णा :-**

पान क्र. ६९ वर जो ठराव क्र. ३३ आहे. लाईन नं. ५ त्याच्यामध्ये दि. २६/१२/२००२ आहे की, दि. २६/१२/२००३ आहे हे आपण कन्फर्म करुन घ्या.

**नगरसचिव :-**

ठिक आहे, कन्फर्म करुन घेतो.

**रोहित सुवर्णा :-**

पान क्र. ७० मध्ये बी ओ टी नसुन बी. ओ. ओ. टी. पाहिजे.

**शशिकांत भोईर :-**

पान क्र.७५ पहिली ओळ आहे. तुम्ही हेडक्लार्क भरला नाही आणि हेडमास्तर कसला मागत आहे. आहात तर तिथे कशाला पाहिजे.

**रोहित सुवर्णा :-**

पान क्र.८१ मध्ये सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे यांचे संभाषण आहे. त्यातील शेवटची लाईन शासनाने नसून प्रशासनाने पाहिजे.

**हॅरल बोर्जीस :-**

प्रकरण क्र. ७५ दि. २०/६/२००६ व २०/७/२००६ रोजीचे मा. महासभेचे इतिवृत्तांत कायम करणेबाबत ठराव......

**मा. महापौर :-**

पान क्र. ७८ मध्ये दुरूस्ती करायची आहे. ते आपण बोललात का? नाही. तसेच दिलेलं आहे. पान क्र. ७८ बघा. ७८ आणि ७९...

**परशुराम पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

इतिवृत्तांत मध्ये पान नं ७८ आणि ७९ जी पदे आपण दिलेली आहेत. तसे इथे इतिवृत्तांत आलेले नाही. फक्त १२ पदे आपण सांगितलेली आहेत मान्य केली आहेत आणि इथे पद जास्त आहे. गेल्या महासभेमध्ये हा जून मधील इतिवृत्तांत आहे. आपण ठराव केलेला वेगळा आहे. इथे इतिवृत्तांतामध्ये पेज जोडून जास्त पदांची संख्या दिलेली आहे. असा ठराव झालेला नाही.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेबा, हा आक्षेपाचा मुद्दा आहे. प्रोसिडींग दुरूस्तीचा हे बरोबर आहे. पण, आपण जे व्यक्त करत आहात, त्यावर काय दिसत की, कोणीतरी या प्रोसिडींग मध्ये घूसवले आहे का? ॲडिशनल ॲडिशन केलेले आहे का? असे कसे काय होउ शकते. ही गोष्ट फार गंभीर आहे.

**मा. महापौर :-**

रेकॉर्डिंगला ही त्याच्यामध्ये आलेले असेल, सुचक आणि अनुमोदक ज्यांनी दिलेले आहे. त्यांनी वाचून दाखवल त्याच्यामध्ये हे रेकॉर्डिंगमध्ये नाही.

**लिओ कोलासो :-**

ही गंभीर गोष्ट आहे. याच्यावर पण आपण निर्णय दिला पाहिजे.

**रोहित सुवर्णा :-**

मॅडम, ही चुकी सिरियस आहे. तर हे कोणी केलेले आहे त्याच्यावर कडक कार्यवाही करावी. म्हणजे आपण ठराव मांडतो एक आणि आपण घरी गेल्यानंतर परत ३० दिवसानंतर जेव्हा इतिवृत्तांत येते तेव्हा त्याच्यामध्ये असे कसे काय येते?

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्य रोहित सुवर्णा साहेब, या विषयावर गोंधळ करण्यापेक्षा आपण त्या ठरावाची प्रत मागू या.

**रोहित सुवर्णा :-**

बरोबर.

**मा. उपमहापौर :-**

म्हणजे त्या विषयाला उगीच वेगळी चर्चा होईल.

**लिओ कोलासो :-**

सर, आम्ही गोंधळ केलेला नाही. धिस इज नॉट गोंधळ आपण आम्हाला सांगा. आम्ही गोंधळ केलेला नाही.

**मा. उपमहापौर :-**

लगेच प्रत मागवून घेउ.

**रतन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, माझा विषय आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य हॅरल बोर्जीस यांनी ठराव मांडताना बराच वेळा या विषयावर बरीच चर्चा झाल्यानंतर मा. उपमहापौर, मा. महापौर, मा. आयुक्त यांच्या सहमतीने ती पद खरचं ती पद गरजेची आहेत का? त्याच पदांचा उल्लेख केला गेला. ह्या गोषवाऱ्यामध्ये पुर्णपणे असाच गोषवारा दिला गेला नव्हता. गोषवारा फक्त दिला होता तो ७ पदांचा दिला होता. नंतर ची ही ११ पदे आलेली आहेत आणि नंतर ठराव माझ्याकडे आल्यानंतर मी त्या ठरावावर सही सुद्धा केली नाही. कारण मला हा ठराव चुकीचा वाटलेला आहे. माझी सही झालेली नाही. इतिवृत्तांत आल्यानंतर मला सन्मा. सदस्यांकडून अपेक्षा होती जे अभ्यासूक सदस्य होते ते ह्या विषयावर चर्चा करतील. परंतु, कोणत्याही सन्मा. सदस्याने ह्याच्यावर बोलले नाही आणि त्या दिवशी सगळ्या सन्मा. सदस्यांनी या चर्चेत भाग घेतला होता. मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर एवढी पदे भरल्यानंतर अतिरिक्त बोजा बजेटवर पडणार आहे. असा विषय जेव्हा सगळ्यांनी उचलून धरला होता. स्वतः मा. उपमहापौर व मा. सभागृह नेत्यांची माझ्या बरोबर चर्चा झाल्या नंतर फक्त १२ पदच आपण मंजूर केली. आणि ती पद वर लिहिली आहेत बघा. सन्मा. महापौर मॅडम, प्रकरण ४१ पदनिर्मिती प्रस्तावाबाबत सभागृहामध्ये सर्व सन्मा. सदस्यांनी आपआपल्या भावना प्रकट केल्या आहेत. सन्मा. उपमहापौरांनी ह्या विषयावर चर्चा घडवून खालील पद निर्मिती प्रस्तावासाठी मी नावे जाहिर करीत आहे. त्याच्यामध्ये मुख्य अग्निशमन अधिकारी मुख्य स्वच्छता अधिकारी, सहाय्यक आरोग्य अधिकारी, वरिष्ठ स्वच्छता निरीक्षक, स्वच्छता निरिक्षक, सहाय्यक नगररचनाकार, शाखा अभियंता, सार्वजनिक आरोग्य अधिकारी, स्वच्छता सहाय्यक आरोग्य अधिकारी. वॉलमॅन-एक, प्लंबर-एक तिथे ५० ही किंवा ५ असा आकडा नाही. सन्मा. सदस्यांना ही बाब मी निर्देशनास आणून देते. नंतर सन्मा. सदस्या हेलन गोविंद यांनी शिक्षण अधिकारी हे पद मांडल्यानंतर असे १२ वे पद आपण त्यांना दिलेले आहे. त्यांनी ती मागणी केल्यानंतर अशी एकूण फक्त १२ पद जर मान्य असतील तरच तो इतिवृत्तांत पुढे घेण्यात यावा.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, आपण हा सभागृहापुढे विषय आणलात त्याबद्दल आम्ही अभिनंदन करतो. परंतु, आपण जे आता बोललात त्याच्यामध्ये बघा ह्याच पानामध्ये ७८ वर माझे एक स्टेटमेंट आहे. महानगरपालिका धर्मशाळा बनवू नका. हे मी आपल्याला अगोदरच बोललो होतो. आहेत ती पद, अधिकारी बाहेर पडत नाही. आपल्या केबीनच्या बाहेर पडत नाही त्यांना गाडया दिल्यात मॅटीनं दिल्यात. खुर्च्या दिल्यात आपण आता राजकोटला गेलो एकदम सिंम्पल साधा आय.एस. डायरेक्टर ऑफिसर बसतो त्याला साधा एक टेबल आणि

खुर्ची आहे. आज आपण म्हणलात आज जर हाच मुद्दा आम्ही जर काढला असता तर तुमच्यातील इकडची माणसं बोलली असती की पहिले इतिवृत्तांत मंजूर होउ द्या. हे सन्मा. सदस्य मिलन पाटील पासून सर्व बोलले असते. आपण बोललात ते फार चांगले केले. कुठे तरी बोललात मागच्या वेळीला मी तुम्हाला बोलणार होतो. मी एक तुम्हाला सांगितलं तो जो प्रतिनियुक्तीचा होता त्याच्यामध्ये आम्ही सांगितले होते की, ज्या अधिकाऱ्यांची जे काही रेकॉर्ड आहेत ते तपासून घ्या. आणि ज्याचे सी.आर. क्लिअर आहेत. त्यांनाच पदोन्नती द्या. पण माझी ती लाईन त्या ठरावातून वगळण्यात आली. सभागृहापुढे ह्याची मी नोंद केली आहे. पण ते कोणी ऐकलच नाही. कारण आम्ही विरोधी पक्षातले आहोत आणि आता आपण स्वतः आणलात म्हणून त्याला जरा गांभीर्य आहे आणि आम्ही गप्प बसले आहोत. पण त्यावेळेला या अगोदर जे मी मांडले त्याचे कुठे उत्तरही नाही. तुमचे तीन महिन्या अगोदरच रुलिंग आहे की, याचे सर्व गोपनिय अहवाल व्यवस्थित बनले जातील आणि ते आम्हाला सादर करा. असे आपले रुलिंग आहे. त्याच्यावर काय झाले? आपण रुलिंग देता त्याचे पुढे काही पालन होत नाही. आम्हालाही काही पत्र देत नाही किंवा आपण हा प्रश्न उपस्थित केला होता आपण धडाधड, धडाधड मिनिटस पास झाले की, संपलं. पुढे काहीच नाही. आता जे आपण म्हणालात हे कोणी केल त्याच्यावर कार्यवाही करावी. कारण हे एकदा झालेले नाही. कमीत कमी १० ते १२ वेळेला असे झालेले आहे. आतापर्यंत आमच्यामध्ये होत होते. आता सन्मा. हॅरल बोर्जीस सुचक आणि अनुमोदक त्याच्यामध्ये आहेत होणार आहे. आपण सभागृहात निकाल घ्या. तुम्ही घ्याल किंवा नाही. आता जे आपण वक्तव्य केले वरचे सर्व मार्ग आम्हाला मोकळे आहेत. आम्ही आपल्याकडून काही जास्त अपेक्षा करत नाही. जे आपण बोलतात. आपल्या स्वतःच्या निर्णयावर आणि आपल्या या रुलिंगवर आपण ठाम राहत अशी आमची आपल्याला विनंती आहे. आणि आम्हाला त्याच्यावर रुलिंग पाहिजे की हे का झाले? कारण हया प्रोसिंडींग मध्ये जी मिस्टेक होते क्रिमिनल प्रोसिजर कोण लिहते तो गुन्हा आहे. तो आपण भरणार आहात का बोला. त्याबाबत रुलिंग पाहिजे

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो आहे. सभागृह स्तब्ध ठेवायचे काही कारण नाही. एवढं गांभीर्य याच्यामध्ये काहीच नाही. हा तुमचा नेहमीचाच खेळ तुम्हीच काढलाय. म्हणून उत्तर पण येथे तुम्हीच द्यायचे. ह्यावेळच्या पिठासिन अधिकारी तुम्हीच होत्या.

**लिओ कोलासो :-**

हा नेहमीचाच खेळ आहे असे कसे बोलता.

**रोहिदास पाटील :-**

आपले सकाळपासून मौन का होते ते आता उघड झाले आहे. नाहीतर, ते कुठेतरी आम्हाला प्रश्न पडला होता की, सर्व लोक गंभीर का आहेत. एकपण बाईला फोन करत नाहीत काही मार्गदर्शन करीत नाही. मा. महापौर एकट्या पडतात त्या एकट्या बिचाऱ्या लढाई करून किल्ला लढवत होत्या.

**मा. महापौर :-**

सन्मा सदस्य रोहीदास पाटील साहेब, तसे काही नाही.

**रोहिदास पाटील :-**

असु द्या.

**शिवप्रकाश भुदेका :-**

मा. महापौर मॅडम, आज नही है।

**महेंद्रसिंग चौहाण :-**

हम लोग बोलते है तो आप हाउस छोडकर चले जाते है इसलिए शांत बैठे है की, कम से कम आप भी हमारे साथ बैठे। हमारा साथ तो दे। इसलिए हम चूप बैठे है।

**रोहिदास पाटील :-**

अब आपकाही कहना मानूगा।

**शिवप्रकाश भुदेका :-**

मा. महापौर मॅडम, आज ऐसा नही है। नही तो सन्मा. सदस्य मोहन पाटील जी बैठकर चलाते और है और ऑक्ट्राय का विषय था तब कुछ भी नही बोले।

**महेंद्रसिंग चौहाण :-**

हमारे साथ बैठे है। अच्छा तो लग रहा है।

**शिवप्रकाश भुदेका :-**

ऑक्ट्राय के विषय पर कुछ नही बोलिए। अभी उसके आगे कुछ बोलने का नही है। अभी वो कॅसेट पोपट के जैसा बोलने को आ रहे है।

**महेंद्रसिंग चौहाण :-**

ऑक्ट्राय मे तो सबसे ज्यादा सन्मा. सदस्य शिवप्रकाश भुदेका को ही ज्यादा दिलचस्पी है। ऑक्ट्राय मे है चेक नाका मे है और यहा भी दिलचस्पी है। हम लोग तो चूप चाप ही बैठे रहते है। यह सारे मॅटर पर आपने इतनी चर्चा क्यों करवाई? आपको इस विषय मे चर्चा करनेका मतलब ही यही है।

**रोहिदास पाटील :-**

मॅडम, आमचे आपल्याला या बाबतीमध्ये पूर्ण समर्थन आहे ही या सभागृहाच्या एक मताची एक चूकून मिस्टेक झाली असे नाही. सभागृहाच्या कामकाजाच्या इतिवृत्तांताचा हा भाग आहे. म्हणजे ज्या गोष्टीला सभागृहाने मंजूरीच दिली नाही. ज्या गोष्टी सभागृहाच्या समोर चर्चेलाच आल्या नाहीत. त्या सभागृहाच्या पटलावर आणून त्या इतिवृत्तांतामध्ये घुसवण्याची जी हिंमत केलेली आहे. खरोखरच ती हिंम्मत अत्यंत निंदाजनक आहे. गांभीर्याचे असे की असे किती पध्दतीने काम झाले असेल? आज साडे चार वर्षाचा कालावधी गेला लोकसभा, या सभागृहाचे सदस्य कुणावर विश्वास ठेवून काम करतात म्हणा किंवा ते खरोखरच फार डोकावून बघत नाही म्हणा. असे कोणतेही योग्य वाक्य जरी लावले तरी ते वाक्य योग्यच ठरेल. पण ही अत्यंत गांभीर्याची गोष्ट आहे. हा विषय तसाच सोडून चालणार नाही. आपण हया सभेमध्ये रुलिंग द्या. ही सभा तहकूब झाली तरी चालेल. ही सभा आपण तहकूब करा. हया गोष्टीचा निर्णय लावा आणि दोन दिवसांनी पुन्हा सभा बोलवा. हा तेवढा सोपा विषय नाही आणि त्याला आम्ही तसे समर्थन देणार नाही. गोंधळ घालतात म्हणजे येथे आम्ही लोक गोंधळी नाही. ज्या मुददयावर जायायचे आहे. तो मुददा पक्का आहे की इतिवृत्तांत पुर्ण खोडण्याची हिंम्मत केली आहे. मॅडम, तुम्ही मघाशी निवेदन केले आता आमच्या हातात कॉपी आहे. कदाचित आमची समजूत होउ शकते की, तुम्ही ओरिजनल कॉपीवर सही केलेली आहे. मगाशी तुम्ही केलं तिथे सन्मा. नगरसचिवांची सही आहे. पण सही मा. महापौर मिरा भाईंदर महानगरपालिका आपण बोलतात की, मी सही केलेली नाही बरोबर आहे ना. म्हणजे आमचा समज चुकीचा नाही. मग, आपली सही झालेली नाही हया सभागृहात इतिवृत्तांत मंजूरी आलेले आहे स्वाभाविकच आहे, ते तुमचे कर्तव्य आहे. तुम्ही ते सगळयांच्या समोर आणले त्याबददल आम्ही आपल्याला धन्यवाद देउ. पण आता जो निर्णय घ्यायचा आहे. तो ठोस निर्णय घेणं गरजेचे आहे. हया सभेत जर निर्णय होत नसेल व तुम्ही निर्णय घेण्यासाठी जर अवधी मागत असाल तरी पिठासिन अधिकारी आपणच आहात आपण ते पॉईंट आउट केलेले आहे त्यामुळे ही सभा इथे तहकूब केली तरी चालेल. मी तहकूबेची सुचना मांडेल. पण, याचा निर्णय लागला पाहिजे. सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे बोलले की धर्मशाळा बनवू नका तर हा धर्मशाळा बनविण्याचाच प्रयत्न आहे. हा साधा विषय नाही.

**परशुराम पाटील :-**

मा. महापौर साहेबांच्या परवानगीने बोलत आहे की, दि. २०/६/०६ ला जेव्हा सभेमध्ये ठराव झाला त्यावेळी सन्मा. सभागृह नेते हॅरल बोर्जीस यांनी ठराव मांडला व त्याला मी अनुमोदन दिले. साहेब, आमच्या त्याच्यावर सह्या झालेल्या आहेत तर आपली पिठासीन अधिकारी म्हणून त्याच्यावर का सही झाली नाही? कशासाठी? काय अडचण आली होती?

**मा. महापौर :-**

जो ठराव आपण मा. महासभेत मांडला होता तो तसा ओरिजनल ठराव माझ्यापुढे आला नाही. याची शहानिशा केली व तो ठराव मला योग्य वाटला नाही. म्हणून मी सही केली नाही. आपण जी पदे मंजूर केली होती तिचं पदे ठरावात पाहिजे ना.

**परशुराम पाटील :-**

मा. महापौर साहेब, सर्वानुमते तो ठराव मंजूर झाला होता. त्याच्यामध्ये कोणाचे ऑब्जेक्शन नव्हते. फक्त आपलेच ऑब्जेक्शन आहे. ते का?

**मा. महापौर :-**

ऑब्जेक्शन आहे किंवा नाही, जेव्हा ठराव सर्वांच्या चर्चेतून मांडला गेला. तेव्हा कुठली पदे आहेत हे आपण रेकॉर्डींगमधून सगळ्यांनी ऐकून घ्यावे. रेकॉर्डींगमध्ये आपल्याला क्लिअर ऐकायला मिळेल. माझे ऑब्जेक्शन नाही. आपण सगळ्या सदस्यांनी एक जागरुक नागरिक म्हणून आपण जो ठराव केला जो सत्य केला तोच ठराव पुढे यायला पाहिजे.

**रोहिदास पाटील :-**

सभागृहातले जे कामकाज आहे तेच यायला पाहिजे. मॅडम, मी आपल्याला पुन्हा विनंती करतो की, या शहरात सुज्ञ नागरिक आहेत. यांच्या सारखे नाही.

**मा. महापौर :-**

मी कुठल्याही प्रकारचा, कोणावर आरोप करत नाही.

**रोहिदास पाटील :-**

हे आपण लाईव्ह दाखवा. आपण आज असे रुलिंग द्या. हे थप्पे मारण्याचे काम नाही.

**मा. महापौर :-**

सभागृह नेता असो किंवा विरोधी पक्षनेता असेल. येथे तांत्रिक शब्दांची चुकी झाली असेल असे मला वाटते.

**संजय पांगे :-**

जे सत्य आहे तेच सभागृहासमोर आले पाहिजे.

**रोहिदास पाटील :-**

जे सत्य आहे तेच समोर आले पाहिजे आणि ते सत्य गावाच्यासमोर गेले पाहिजे. आपल्याला अंदाज येईल की, या सभागृहाचे कामकाज लाईव्ह दाखवा.

**शिवप्रकाश भुदेका :-**

सभागृहामध्ये नेते हॅरल बोर्जीसजी ठराव पढते है और इनका अनुमोदन पहिले ही तयार रहता है। इनको ठराव क्या होता है वह मालूम नही होता है।

**परशुराम पाटील :-**

मा. महापौर साहेब, ज्यावेळेला सभागृहामध्ये आपण ठराव मांडत असतो त्यावेळी आपण ठराव वाचूनच ठराव मांडतो व ठराव वाचल्यानंतरच ठराव मजूर केला जातो. तेव्हा आपले लक्ष होते की, नाही याची मला कल्पना नाही.

**मा. महापौर :-**

जो ठराव वाचलेला आहे तो हा ठराव नाही. म्हणून माझी सही नाही आणि याची शहानिशा करण्यासाठी परवाच्या दिवशी मी सचिवांना केबिनमध्ये बोलावून कॅसेट ऐकलेली आहे. कॅसेटमध्ये १२ पद आहेत. ती मंजूर असतील तर पुढे इतिवृत्तांत चालू करावे.

**नितीन ठाकूर :-**

मा. महापौर मॅडम, आपण महापौर आहात. प्रथम नागरिक आहात. आपल्या सारख्या व्यक्तीची या शासकिय अधिकाऱ्यांनी दिशाभूल केलेली आहे. आपली व आमची या संपूर्ण सभागृहाची दिशाभूल केलेली आहे आणि या अधिकाऱ्यावर आपण कार्यवाही करायला पाहिजे आणि या संपूर्ण प्रकरणाची चौकशी नेमा आणि हा विषय तहकूब ठेवा आणि चौकशीने जे निर्णय येतील त्याच्याने त्या व्यक्तीवर जी कोण व्यक्ती असेल तिच्यावर कठोर कार्यवाही करावी. अशी माझी मागणी आहे.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्य नितीन ठाकूर यांनी जी सुचना मांडली आहे ती बरोबर आहे. आम्ही त्याचे समर्थन करत आहोत.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आपण महिला महापौर कोणत्याही दबावाला बळी न पडता. कोणत्याही आड पर्दा न ठेवता आपला पारदर्शक कारभार येथे सिद्ध केलेला आहे. कॉग्रेस आणि राष्ट्रवादी कॉग्रेसचे सरकार किती पारदर्शक आहे हे येथे दाखवून दिलेले आहे. मी आपले त्रिवार अभिनंदन करते. त्रिवार आभार मानते की, ह्याच प्रकारचा पारदर्शीकपणा आपल्या कारभारमध्ये कायम राहावा आणि येत राहिल. आपल्या धाडसाचे आम्ही निश्चितपणे कौतुक करतो.

**रोहिदास पाटील :-**

साडे चार वर्षे चाललेल्या अनागोंदी कारभारचा आज कळस झालेला आहे आणि आता मुर्दा पडला आहे असे दिसते.

**प्रभात पाटील :-**

पारदर्शक कारभारचा आज कळस झाला आहे.

**रोहिदास पाटील :-**

या शहराच्या महापौर आहेत आणि त्यांच्याबद्दल या गावाला अभिमान आहे. त्यांनी हा विषय आणलेला आहे. तुमची सगळी भांडी आता बाहेर निघणार आहे, थांबा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, सर्वात दुदैवी गोष्ट ही आहे की सभागृहाचे विरोधी पक्षनेते आज महापौरांना खोटे ठरविण्याचा प्रयत्न करत आहेत. म्हणजे सभागृहाच्या विरोधी पक्षनेत्यानी कोणती बाजू घेतली हे त्यांना कळत नाही आणि ते महापौरांना खोटं ठरवित आहे ही पण निर्देशनास आणण्याची बाब आहे.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, कॅसेट वाजवून दाखवा.

**गजानन भोईर :-**

विरोधी पक्षनेते जर इच्छा असेल तर कॅसेट वाजवायला सांगा.

**रोहिदास पाटील :-**

कॅसेट वाजवा. ऐकू द्या.

**परशुराम पाटील :-**

सन्मा. सदस्य गजानन भोईर आपण बोललात की, मी मॅडम, मा. महापौरांना विचारले की, आम्ही त्याच्यावर ठराव मांडला व त्याला अनुमोदन दिले तर त्याच्यावर आपण सही का केली नाही? हा प्रश्न मी विचारलेला आहे. शंका विचारली?

**रतन पाटील :-**

साहेब, ठरल्याप्रमाणे केले नाही म्हणून त्यांनी शंका विचारली.

**परशुराम पाटील :-**

हे आपण लक्षात घ्यायला पाहिजे.

**गजानन भोईर :-**

आपण मा. महापौरांना हा प्रश्न विचारण्याच्या अगोदर मा. महापौरांनी आपल्या उत्तर दिले आहे. पद वाढविली आहेत म्हणून त्यांनी सिग्नेचर केली नाही.

**परशुराम पाटील :-**

उत्तर दिले म्हणून आमचे आम्ही समाधान करुन घेतले ना.

**रतन पाटील :-**

विरोधी पक्षनेते त्या उत्तरामुळे तर ही चर्चा चालू आहे.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलत आहे की, आता जी आपण सुचना केली याच्यावर चौकशी समिती नेमायची तर मी सांगतो की, चौकशी समितीमध्ये आपण स्वतः राहायचे. आपण स्वतः त्याचे अधिकारी असाल आणि दुसरे सन्मा. लिओ कोलासो यांचे नाव घ्या. कॉग्रेंसचे पक्षाचे सन्मा. जयंत पाटील यांचे नाव घ्या. याबाबत त्या नगरसेवकांची सुद्धा संमती घ्या. ह्यांचे चौकशी समितीमध्ये नाव घ्या असे सांगत आहोत व त्यांना आपण समाविष्ट करुन घ्या.

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, सदर विषयावरचा आपण पर्दाफाश केलेला आहे आणि जो आमच्याकडे झाला नव्हता. त्याच्यामध्ये ॲड करुन तो ठराव आपल्याकडे पोहचला आहे आणि ते आपल्या लक्षात आले म्हणून आपण सही केली नाही हे उत्तम केले आणि आपण आपल्या कर्तव्याचे पालनही केले आहे. परंतु, आता प्रोसिडींग मंजूरीचा विषय चालला आहे आणि सदर ठरावामध्ये फेरबदल करणारा व्यक्ती कोण? त्याच्यासाठी कमिटी नेमायची अशी तेथून सुचना आलेली आहे. आपल्या देशामध्ये असे खूप कमिट्या नेमल्या आणि आजपर्यंत कोणालाही शिक्षा झालेली नाही. आता आपण हे विचारा की, ह्या प्रोसिडींगच्या कॉप्या तयार कोण करतो आणि त्याला निर्देश कोण देतो? ती कॅसेट कोणाच्या ताब्यात असेल आणि ती कॅसेट ऐकून हे प्रोसिंडींग कोण बनवतो त्याला शिक्षा करा आणि आपण ते डिक्लेर करा.

**मा. उपमहापौर :-**

हा जो ठराव आहे तो आपल्याकडे प्रथेप्रमाणे सभागृह नेते ठराव मांडत असतात आणि विरोधी पक्षनेते हे त्यांना अनुमोदन देत असतात आणि पिठासिन अधिकारी म्हणून मा. महापौर त्या ठरावावर सही करत असतात. हा ठराव घुसविण्यात आला असे म्हणण्यापेक्षा त्याच्यावर सभागृह नेते यांची सही आहे. विरोधी पक्षनेत्यांची सही आहे. पिठासिन अधिकारी म्हणून मा. महापौरांनी या ठरावावर सही केलेली नाही. सदस्यांमध्ये हा गैरसमज नको की, नंतर ठराव घातलेला आहे आणि या ठरावाला या सभागृहात उपस्थित असलेल्या कोणत्याही सदस्याने विरोध केल्याची नोंद नाही. त्या अनुषंगाने चर्चा व्हावी.

**मिलन म्हात्रे :-**

पहिली गोष्ट टेक्निकल बाब आहे जर मा. महापौरांची सही झाली नसेल तर हा ठराव प्रोसिडींगमध्ये कसा आला?

**रोहिदास पाटील :-**

सभागृह नेते यांच्यावर गुन्हा दाखल करा.

**मिलन म्हात्रे :-**

एक गोष्ट लक्षात घ्या की, तो ठराव फायनल म्हणून मा. महापौरांनी सही केलेली नाही. मग हे प्रोसिडींगमध्ये कसे काय आले?

**रोहिदास पाटील :-**

या महापालिकेचे येथे होणारे प्रत्येक कामकाज शासन दरबारी जाते ना.

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौर मॅडम, दि. २० जून,२००६ च्या मा. महासभेमध्ये आकृतीबंध पदनिर्मितीचा प्रस्ताव आला असताना सभागृहामध्ये चर्चा होत असताना सन्मा.....

**रोहिदास पाटील :-**

मॅडम, हे कामकाज शासन दरबारी जाते की, नाही?

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौरांची सही नसताना तो ठराव प्रोसिडींगमध्ये कसा काय आला?

**रोहिदास पाटील :-**

आपण सही केली नाही तरी कसे पाठवले? की, असेच पाठवले?

**मिलन म्हात्रे :-**

हे शासनाकडे सुद्धा गेले असेल.

**रोहिदास पाटील :-**

आपण हे शासनाकडे पाठवले?

**आसिफ शेख :-**

सन्मा. महापौर साहेबा, सन्मा. ज्येष्ठ सदस्य रोहिदासजी पाटील.....

**रोहिदास पाटील :-**

जरा थांबा.

**मिलन म्हात्रे :-**

सगळे लफडे तुम्ही करता. ही सगळी तुमच्या लोकांची लफडी आहेत.

**आसिफ शेख :-**

कोणाची लफडी आहेत हे आपण बघू या.

**मिलन म्हात्रे :-**

ते बघायची वेळ आलेली आहे म्हणून सांगतो ना. आपण ते सगळे बाहेर आणा. कॅसेट वाजवा. हे सगळं काय चालले आहे? आमच्या लोकांची आपण स्टेंटमेंट बदलता.

**रोहिदास पाटील :-**

हा प्रस्ताव शासनाकडे पाठविला किंवा नाही?

**रोहीत सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, यांनी स्वतः कॅसेट ऐकलेली आहे. याच्यापेक्षा जास्त पाहिजे? मा. महापौर मॅडम यांनी स्वतः कॅसेट मागवून ऐकून घेतले आहे असे ते स्पष्ट रेकॉर्डीगमध्ये बोलत आहेत आणि आमचा तुमच्यावर विश्वास आहे.

**मिलन म्हात्रे :-**

हा विषय पेन्डींग ठेवून पुढचे प्रोसिडींग पुढे करा. आमची या विषयाला मंजुरी नाही. हा विषय येथेच संपला.

**आसिफ शेख :-**

सन्मा. महापौर साहेबा, सन्मा. ज्येष्ठ सदस्य रोहिदासजी पाटील साहेब यांनी या ठिकाणी सांगितलेले आहे की, सभागृह नेते आणि विरोधी पक्षनेते यांच्यावर गुन्हा दाखल करा. चोर सोडून संन्यासाला फाशी कशाला देत आहात?

**रोहिदास पाटील :-**

त्यांनी सह्या केल्या आहेत ना.

**मिलन म्हात्रे :-**

संन्याशी बदमाश आहेत. चोर बदमाश नाही. प्रत्येक बदमाशीत एक संन्याशी पळाला आहे. हे लफडं करणारा एक संन्याशी मोहन पाटील पळाला आहे.

**लिओ कोलासो :-**

सन्मा. सदस्य मोहन पाटील हे सभागृहात नाही. त्यामुळे त्यांच्या विरोधामध्ये असे बोलले जाऊ नये.

**आसिफ शेख :-**

त्यांच्या समोरासमोर बोला ना.

**मिलन म्हात्रे :-**

ते सगळं करून गेले.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्यांनी संबंधित विषयाला धरुन बोला.

**आसिफ शेख :-**

सन्मा. सदस्य मिलनजी म्हात्रे साहेब, आपण सन्मा. सदस्य मोहन पाटील सभागृहात उपस्थित असतील तेव्हा बोला. तर आम्ही म्हणू की, आपण बोलत आहात. उपस्थित नसताना बोलू नका.

**मिलन म्हात्रे :-**

आम्ही तेव्हाही बोलू. सभागृहामध्ये कोणी संन्याशी उपस्थित नाही. संन्यासवर बोलायचे नाही. एकही संन्याशी उपस्थित नाही. संन्याशी पळून गेला आहे.

**आसिफ शेख :-**

मा. महापौर साहेबांचे मन मोठे आहे. त्यांनी हे संपूर्ण प्रकरण आपल्या सभागृहासमोर आणलेले आहे. खरं म्हणजे मा. महापौर साहेबांना धन्यवाद दिले पाहिजे.

**रोहित सुवर्णा :-**

रमजानच्या महिन्यामध्ये तरी खरं बोला.

**मा. उपमहापौर :-**

सकाळपासून सभेला सुरूवात झाली असताना. आता सव्वाचार वाजलेले आहेत आणि अजूनपर्यंत आपण पहिल्या विषयाला सुरूवात केलेली नाही. सन्मा. सदस्य नितीन ठाकूर साहेब यांनी सुचना केली की,

याबाबत एक समिती नेमून त्याची शहनिशा करावी. त्याचे स्पिकर वाजवायचे आणि कॅसेट ऐकायची. जो काही प्रकार शहानिशा करता येण्यासारखा असेल.

**मिलन म्हात्रे :-**

पण त्या समितीमध्ये कोण कोण असणार? चुका करणारे असतील तर ते सॅक्शन देणार नाही.

**मा. महापौर :-**

सगळ्या पक्षाचे गटनेते असू दे. ते करतील काय करायचे आहे ते. हा विषय बाजूला ठेवून इतर इतिवृत्तांताला मान्यता द्यावी आणि सभागृहाचे पुढील कामकाज सुरू करावे.

**मिलन म्हात्रे :-**

झालेल्या ठरावाबद्दल काय?

**धनराज अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, समितीमध्ये सर्व पक्षीय गटनेते आले पाहिजे.

**मा. उपमहापौर :-**

सर्व पक्षाचे गटनेते येतील.

**आसिफ शेख :-**

सर्व पक्षाचे गटनेते समिती घ्या.

**रोहिदास पाटील :-**

साहेब, एक मुद्दा क्लिअर झाला नाही. मॅडम, आपण हा प्रस्ताव शासनाकडे पाठवला किंवा नाही? इतिवृत्तांताला मंजूरी नाही. त्यात खरं-खोटं झालेले आहे? खोटं केले आहे हे खरं आहे. त्याबाबत पिठासिन अधिकारी बोलत आहेत. नुसते मा. महापौर बोलत नाही. आधी पण त्याच होत्या आणि आता ही त्याच आहेत. तरी शासनाकडे प्रस्ताव गेला?

**शिवप्रकाश भुदेका :-**

मा. महापौर मॅडम यांना त्या ठरावावर सही केली नाही तरी तो प्रस्ताव पाठवला?

**शशिकांत शाह :-**

मा. महापौर मॅडम, अगर हम साधा एक कागज लेने के लिए जाते है, तो आपको साईन नही हो तो कागज नही मिलता है और ठराव भेज दिया गया।

**मा. महापौर :-**

सचिवांनी सभागृहाला सरळ रेकॉर्डिंग वाजवून दाखववावी. कारण रेकॉर्डिंगमध्ये जर बदल झाला तर हे सर्व महापौरांवर येईल. त्यामुळे रेकॉर्डिंग वाजून दाखववावी.

**रोहिदास पाटील :-**

बरोबर आहे. आम्ही आपल्याबरोबर आहोत.

**जयंत पाटील :-**

प्रोसिडींगला मंजूरी मिळण्याअगोदर शासनाकडे ठराव कसा काय पाठवला? प्रोसिडींगला तर मंजूरी नाही.

**लिओ कोलासो :-**

तसा ठराव पाठवावा लागतो.

**जयंत पाटील :-**

मग तो ठराव कसा काय मंजूर होणार?

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर मॅडम, एक साधा ठराव रहता है और हम कभी मांगते है तो बोलते है की, साईन नही हुई है। आपको ठराव नही मिलेगा।

**मिलन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, हा ठराव शासनाकडे पाठविण्याची एवढी घाई कशाला केली? आपली ठरावावर सही नसताना तो ठराव शासनाकडे जातो कसा?

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही सक्षम आहात म्हणून घाई झाली.

**मिलन पाटील :-**

मॅडम, या गोष्टीची ही चौकशी झाली पाहिजे. शासनाकडे एवढ्या लवकर हा प्रस्ताव कसा गेला? आपली सही झाली नाही. हा ठराव पास झाला नाही. त्याचे अजून इतिवृत्तांत मंजूर झाले नाही आणि शासनाकडे प्रस्ताव गेला. मॅडम, हा प्रस्ताव शासनाकडून पास होउन ही आला असेल याची सुद्धा आपल्याला कल्पना नसेल. ही गंभीर बाब आहे.

**जयंत पाटील :-**

आयुक्त साहेब, आम्हाला माहिती द्या. सचिव साहेब, इतिवृत्तांला मंजूरी मिळणे अगोदर शासनाकडे ठराव पाठवू शकतो का? याबाबत आपण आम्हाला माहिती द्यावी.

**मा. महापौर :-**

नियमामध्ये काय आहे हे आपण सभागृहाला सांगा.

**नगरसचिव :-**

इतिवृत्तांत मंजूर झाल्यावर किंवा त्याच्यातल्या ठरावाचे वाचन करुन दाखविल्यानंतर शासनाकडे पाठवता येतो.

**जयंत पाटील :-**

इतिवृत्तांताला मंजूरी मिळेल तेव्हा तो ठराव पास होईल ना. मग त्याच्या अगोदर शासनाकडे ठराव कसा काय पाठवला गेला?

**शरद पाटील :-**

सचिव साहेब, ठरावाचे वाचन झाले पण ज्या ठरावाचे वाचन झाले तो ठरावच नाही ना.

**जयंत पाटील :-**

आज मा. महापौरांचे मी अभिनंदन करत आहे की, आज त्या खुर्चीला खरा न्याय मिळालेला आहे. मी अतिशयोक्ती बोलत नाही. मघाशी, एवढा गंभीर विषय होता आणि हा ही विषय गंभीर आहे. खरतर हसण्यावरी नेउ नका. मघाशी सुद्धा जकातीचा जो विषय होता. तो विषय आपण असा गौतमवारी फेकून दिलेला आहे. अतिशय गंभीर विषय होता. या शहराच्या आर्थिक बाबी संबंधित विषय होता आणि हा विषय ही तसाच आहे. मा. महापौरांच्या चाणाक्ष्य नजरेमध्ये हा विषय सापडलेला आहे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

आणि आता नवीन विषय असा की, समिती नेमा. कशाला समिती ही सगळी ढोंगबाजी. ही ढोंगबाजी करु नका.

**मिलन म्हात्रे :-**

जर विषयाची वाट लावायची असेल तर समिती नेमायची. कुठला विषय सडवायचा असेल तर समिती नेमायची.

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, आता आपण जे रूलिंग दिले की, टेप वाजवून सर्वांना कॅसेट ऐकवण्यात यावी. नाहीतर, त्याच्यामध्ये परत फेरबदल केला जाईल. आपण टेप आणि ती कॅसेट मागवा.

**शिवप्रकाश भुदेका :-**

मा. महापौर मॅडम, आप कोई भी अच्छा काम करो हमारा समर्थन रहेगा। लेकीन ठराव सन्मा. सदस्य हॅरल बोर्जीस जी को और अनुमोदन सन्मा. सदस्य परशुराम पाटील जी को देने को मत दिजीए। यह इनका बदमाशी है।

**रिटा शाह :-**

एक महिला महापौर यांनी स्वतःची शक्ती दाखविली आहे. त्याच्याही पुढे जाउन मी सांगते की, महिला नेहमी पुरूषाच्या आदेशामध्ये अधिन असते. पण असे नसते की नेहमी अधिन असते. पार्टी असू दे, घर असू दे, संसार असू दे की समाज असू दे. महिला नेहमी पुरूषाचा साथ देते. परंतु, जेव्हा असा निर्णय घ्यायची वेळ येते तेव्हा ती बाई रणचंडी होउन दाखविते आणि सच्चाईच्या बाजूला स्वतःचे मत देते. हे आपण आज शाबित करून दिले आहे. त्याबद्दल आपले अभिनंदन.

**शरद पाटील :-**

मा. महापौर मॅडम, जोपर्यंत कॅसेट येत नाही तोपर्यंत मला सुद्धा बोलायचे आहे. हा इतका गंभीर विषय आहे. ह्या इतिवृत्तांताला मंजूरी झाली नाही आणि तो ठराव शासनाकडे पाठविण्यात आला आणि जेव्हा आम्ही सांगतो, एखादे जनहिताचे काम आहे. त्याचा ठराव झालेला असतो त्याबद्दल आम्ही अधिकाऱ्यांना विचारतो तेव्हा सांगितले जाते की, अजून त्याचे इतिवृत्तांत झाले नाही. वाचन झाले नाही. हा आपला ठराव मंजूर करता येणार नाही. आपले काम होणार नाही आणि जी गंभीर बाब आहे तो ठराव महाराष्ट्र शासनाकडे पाठविण्यात आला आहे. हे कसे काय व्हायचे?

**गजानन भोईर :-**

सन्मा. सदस्य मिलन पाटील बोलत आहेत की, हा ठराव पास होउनही आला असेल. याचा अर्थ सभागृहाला कळू दे.

**मिलन म्हात्रे :-**

ही सेटींग लागलेली आहे.

**शरद पाटील :-**

ही चुकीची गोष्ट आहे. मा. महापौर मॅडम, आम्ही खरच आपले अभिनंदन करतो. आपण ही गोष्ट आमच्या सगळ्या सदस्यांसमोर आणली आणि असे होत असेल तर प्रत्येक गोष्टीला आणि प्रत्येक ठरावाला, ठराव झाल्यानंतर लगेच त्याचे काम चालू झाले पाहिजे. एक-एक कॉपी सर्व सदस्यांना द्यावी अशी विनंती आहे. मॅडम, आपण आता जो निर्णय घेतला आहे. कॅसेट ऐकवून दाखवायचा तो बरोबर आहे. नाहीतर, ही

कॅसेट खरचं बदली झाली असती. कारण आम्हाला अनुभव आहे. सन्मा. सदस्य गजानन भोईर यांनी जे वक्तव्य केले होते, 'दिल्ली जा' तर तेवढचं ऐकवून दाखवत होते. पुढचे ऐकू येतच नव्हते.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, आपण ठराव केलेला आहे, समान कर प्रॉपर्टी. प्रत्येक बिल्डिंगला समान कर असला पाहिजे. समान कराचा प्रस्ताव आपणच पास केला आणि अजूनही त्याचे इम्प्लीमेंट होत नाही. लोकांना अजूनही बिल नविन कराची जातात.

(सन्मा. सभागृहासमोर दि. २०/६/०६ रोजी झालेल्या सभेची कॅसेट वाजवून दाखविण्यात आली.)

**संगिता म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडमच्या खुर्चीवर कोणीही बसलेले नाही?

**रोहिदास पाटील :-**

सभाशास्त्राप्रमाणे पिठासिन अधिकारी कोण आहे?

**सुरेखा गायकवाड :-**

डायसवर मा. महापौर, मा. उपमहापौर दोघेही नाहीत. सभा संपली की, काय? डायसवर एकही अधिकारी व पिठासिन अधिकारी नाही. ही काय भानगड आहे?

**रतन पाटील :-**

खुर्च्या रिकाम्या ठेवायच्या नसतात. सगळ्या खुर्च्या खाली आहेत. आम्ही येउ का पिठासिन अधिकारी म्हणून बसायला.

(पिठासिन अधिकारी हे आपल्या जागेवर येउन बसले त्यानंतर चर्चेला सुरूवात झाली.)

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आपण या ठरावामध्ये किती असावीत याची पदसंख्या दिलेली नाही. एकूण १२ पदे. पण पदसंख्या किती आहेत हे आपण या ठरावामध्ये दिलेले नाही.

**मा. महापौर :-**

एक-एक सिंगल पदाचे.

**प्रेमनाथ पाटील :-**

ह्याच्यात ५० आहे, ६४ आहे.....

**मा. महापौर :-**

संख्यांचा उल्लेख केलेला नाही.

**रतन पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलत आहे. येथे वॉलमन ५० दिलेले आहे.

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, जेव्हा अनु. क्र. ५ वा आला त्यानंतर एकही पदाचे बोललेले नाही. डायरेक्ट वॉलमन झाले आहे. मधले समजते की, ते गहाळ झालेले आहे.

**रतन पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलत आहे. येथे फक्त वॉलमन म्हणून बोलले आहेत. पण वॉलमनची पदसंख्या दिलेली नाही आणि येथे वॉलमनची पदसंख्या ५० दिलेली आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सदस्य रतनजी पाटील आपण वॉलमन एकतर भरु शकत नाही ना.

**रतन पाटील :-**

बोलताना एक काय, आपण एक भरताना एक लिहीतो ना. आपण एक पद भरता एक लिहिता. पन्नास पद तुम्ही भरत नाही. हे द्यायला पाहिजे.

**रोहिदास पाटील :-**

५५ ची बोलणी चालू असताना ५५ बोलायला पाहिजे ना आणि ह्याच्यामध्ये सन्मा. सदस्य धनराज अग्रवालजी ह्यांचे भाषण आहे की, याला आमचा विरोध आहे. तो विरोध झाला ना. आम्ही....

**रतन पाटील :-**

ह्या इतिवृत्तांताच्या सुरूवातीला वाचा, आमचा विरोध असताना सर्वानुमते असे का दिले आहे.

**रोहिदास पाटील :-**

आमची विनंती आहे की, आपण ही कॅसेट पूर्ण वाजवा. हा फक्त पदनिर्मितीचा विषय नाही. आम्ही नीट वाचून आपल्याशी कधीपासून बोलत आहे की, जिथे सन्मा. सदस्य धनराजजी अग्रवाल ह्यांचे स्पष्ट म्हणणे आहे, याला आमचा विरोध आहे. तरी आपण एकमताने ठराव मंजूर असा लिहिता यामुळे या विषयाची शहानिशा व्हावी. त्यांनी हे इतिवृत्तांत नीट वाचावे आणि हवे असल्यास आजची ही सभा तहकूब करा व उद्या चालू करा. त्याची शहानिशा करा व पुन्हा चर्चेला हा विषय नाही आला पाहिजे. आम्ही विरोधी बोलतो आणि आपण लिहून ही घेत नाही. या तुमच्या टिपणीमध्ये आहे. सन्मा. सदस्य धनराजजी अग्रवाल ह्यांचा विरोध

आहे. विरोध नोंदविलेला आहे आणि तो विरोध असताना ही आपण एकमताने ठराव असे कसे दिले? संख्या बदलली, विरोध बदलला हे सगळं सभागृह ईजी घ्यायचं का? येउ दे ना, एकदा आरपार होउ दे.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील, सभागृहामध्ये ज्यावेळेला मी ठराव वाचला व ठराव वाचल्यानंतर प्रोसिंडिंगमध्ये ज्या पेजमध्ये जो उल्लेख आहे. त्याचप्रकारचा उल्लेख ठरावामध्ये होता. म्हणजे आमच्या दोघांचाही, सन्मा. विरोधी पक्षनेता आणि आजी सभागृह नेता म्हणून मी ज्या ठरावावर सही केली त्या ठरावामध्ये आणि प्रोसिडींगमध्ये असलेल्या ठरावामध्ये कुठेही बदल नाही. आम्हाला जो ठराव सह्या करण्यासाठी दिला तो ॲज इट इज ठराव प्रोसिडींगमध्ये आलेला आहे. आमची सही घेताना आमचे दिशाभूल करण्याचा प्रयत्न नाही. फक्त प्रोसिडींगमध्ये आपण कॅसेट ऐकताना, त्या सगळ्याच पदांचा त्याच्यामध्ये उल्लेख असलेला कुठे दिसत नाही.

**परशुराम पाटील :-**

फक्त आकडेवारी दिलेली नाही.

**रोहिदास पाटील :-**

सन्मा. हॅरल बोर्जीसजी आपण सभागृह नेते आहात. आपण कशाची किंमत वाढवता आणि कशाची किंमत कमी करता? आम्ही का आग्रह धरतो. ठराव सर्वानुमते मंजूर. त्याच्यावर सन्मा. सदस्य धनराजजी अग्रवाल ह्यांचे वक्तव्य आहे की, त्याला आमचा विरोध आहे. तर आपण असे कसे म्हणता? आणि ही सभा आपण पुढे कसे चालवणार? मॅडम, आमचा पुन्हा आग्रह आहे की, ही कॅसेट जशीच्या तशी परत वाजवा.

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, याच्यामध्ये नगर रचनाकार आणि सहा. नगररचनाकार असे दोन पदे होते तेही त्याच्यामध्ये आलेले नाही.

**परशुराम पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलत आहे की, आपली सभा दि. २०/६/०६ मध्ये झाली. प्रकरण क्र.४१, ठराव क्र.३४ शासन निर्णयानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेचे 'ड' वर्गामध्ये वर्गीकरण करण्यात आलेले असून 'ड' वर्ग महापालिकेकरिता निश्चित केलेल्या आकृतीबंधानुसार महानगरपालिकेच्या आस्थापनेवर खालील पदे सध्या मंजूर नाहीत. महिला व बालकल्याण विकास अधिकारी-१, अधिक्षक-१, सहा. सार्व. आरोग्य अधिकारी-१, पशूशुल्क चिकित्सक संबंधित अधिकारी-१...

**मा. महापौर :-**

विरोधी पक्षनेता आपण काय वाचून दाखवत आहात.

**परशुराम पाटील :-**

मांडलेला ठराव वाचून दाखवत आहे.

**मा. महापौर :-**

ठराव प्रोसिडींगमध्ये वेगळा आहे. आपण सगळ्यांच्या चर्चेमधून ही फक्त १२ पदे भरलेली आहेत. आपण ठरावामध्ये लिहीलेली वेगळी पदे होती.

**परशुराम पाटील :-**

ठरावाला अनुमोदन आहे. मी हा ठराव पुर्ण वाचून दाखवतो.

**मा. महापौर :-**

आणि नंतर आपण ठराव परत बदलला. चर्चा झाल्यानंतर सभागृहात ठराव बदललेला आहे.

**परशुराम पाटील :-**

मॅडम, आपण थोडक्यात ऐकून तरी घ्या. शिक्षण अधिकारी-१, उप परिवहन व्यवस्थापक-१, मुख्य अग्निशमन अधिकारी-१ तरी वरीलप्रमाणे शासन निर्णय क्र. संकिर्ण-२००५/ वर्गीकरण/प्र.क्र.३७९/०५/नवि.२४, दि. ४/५/०६ नुसार पदे महानगरपालिकेस अनुज्ञेय असून सदर पदाची महानगरपालिकेस आवश्यकता आहे. तसेच, दैनंदिन कामकाजाचा व्याप लक्षात घेता वरील पदाव्यतिरिक्त खालील पदनामाची पदे मंजूर होणे आवश्यक आहे. पदाचे नाव...

**शिवप्रकाश भुदेका :-**

हमारे पास है वह सुनाने का क्या जरूरत है?

**परशुराम पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो की, आयुक्त साहेब मागचा जो दि. २०/६/०६ रोजी ठराव झाला त्याच्यावर सन्मा. सदस्य हॅरल बोर्जीस साहेबांनी नेत्यांनी ठराव मांडलेला आहे. त्याला मी अनुमोदन दिलेले आहे आणि तेच अनुमोदन पद्धतीने आमचा जेव्हा ठराव झाला त्यानंतर ठरावाच्या प्रती माझ्या मी मागवून घेतो आणि त्या प्रती मी विरोधी पक्षनेता म्हणून माझ्याकडे पाठविल्या जातात. पण मॅडम, आपली या ठरावावर सही आहे याचा माझ्याकडे पुरावा आहे. हे आपण बघा.

**मा. महापौर :-**

ठरावावर मी सही दिलेली नाही. कॅसेट ऐकल्यानंतर ही सही....

**परशुराम पाटील :-**

ह्याची ओरिजनल कॉपी या संबंधित अधिकाऱ्याकडे असेल तर प्रत आपण मागवून घ्या.

**मा. महापौर :-**

आणि इतर सह्या देखील आहेत. त्याही आपण बघून घ्या. मी सगळ्या ठरावावर हिरव्या पेनाने सह्या केलेल्या आहेत.

**नितीन ठाकूर :-**

विरोधी पक्षनेता साहेब, आपण मा. महापौरांवर आरोप करत आहात. सही चेक करायला पुणे येथे पाठवा.

**रोहिदास पाटील :-**

ते या सभागृहात बोलत आहेत. ते कोणावर आरोप करत नाही. हे सभागृह आहे. सभागृहात जेव्हा पिठासिन अधिकारी यांनी सही केली नाही....

**मा. महापौर :-**

सभागृहात, ठरावावर जी सही आहे ती माझी सही नाही. मी हिरव्या पेनाने सर्व ठरावावर सही करते. आपण सगळ्या कॉप्या बघून घ्या.

**परशुराम पाटील :-**

मॅडम, माझ्याकडे आपल्या सहीच्या ठरावाची प्रत आहे.

**रोहिदास पाटील :-**

हा भयंकर आरोप आहे.

**परशुराम पाटील :-**

माझ्याकडे जी प्रत आहे ती आपल्याला देत आहे.

(सभागृहात गोंधळ)

**रतन पाटील :-**

सही पडताळणीसाठी पाठविण्यात यावी.

**नितीन ठाकूर :-**

मा. महापौर मॅडम, तो पेपर सिल करावा.

**शिवप्रकाश भुदेका :-**

परशुरामजी पाटील यह दुसरा गुनाह है। मा. महापौर मॅडम की सही नही है यह दुसरा गुनाह है।

**मा. महापौर :-**

एक-एक सन्मा. सदस्यांनी बोलावे म्हणजेच सभागृहात गोंधळ होणार नाही.

**रोहिदास पाटील :-**

पिठासिन अधिकाऱ्यावर आपण आरोप करता. ते स्वतः सांगतात ना, त्यांची सही नाही.

**शिवप्रकाश भुदेका :-**

मा. महापौर मॅडम, आप इनका पत्र कस्टडी मे रखो।

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौर मॅडम, माझी व विरोधी पक्षनेत्याची त्या ठरावावर सही झाल्यानंतर सदर ठरावाची एक प्रत आपल्याकडे पोहचलेली आहे. जर आपली त्या ठरावावर स्वाक्षरी असेल तर तशी सभागृहाला माहिती द्यावी. अन्यथा जर ती सही आपल्या पश्चात केली असेल तर त्याची चौकशी करण्याकरिता आपण डायसवरुन आदेश द्यावे.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौरांनी सांगितले ना की, मी सही केलीच नाही.

**मा. महापौर :-**

मी खुलासा करते. सर्व सदस्यांनी शांतपणे ऐकून घ्या.

**शिवप्रकाश भुदेका :-**

अभी परशुरामजी पाटील इन्होंने जो प्रत दिया है ना.....

**परशुराम पाटील :-**

मा. महापौर साहेबा, आपण याचा खुलासा करावा. ही सही आपणच केली आहे असे मी म्हणत नाही. कारण मी विरोधी पक्षनेता आहे आणि माझ्याकडे एक कॉपी येते.

**मा. महापौर :-**

मी आपल्याला जे घडलेले आहे ते सविस्तर सांगते.

**तुळशीदास म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, मी एकच शब्द सांगतो. जर ती तुमची सही नसेल व एखाद्या अधिकाऱ्याने ती सही केली असेल तर त्या सस्पेन्ड करावे. हा एकच पर्याय आहे. मग तो कोणीही असू दे. ज्या अधिकाऱ्याने सही केली असेल त्याला ताबडतोब सस्पेन्ड करा.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, जर आपण मला परवानगी दिली तर मी या विषयावर बोलू इच्छितो.

**मा. महापौर :-**

मी दोन मिनिटांत माहिती देते. नंतर आपल्याला बोलण्याची परवानगी देते. सगळ्यांनी शांत बसावे.

**जयंत पाटील :-**

मा. महापौर मॅडम, सभागृहात आजचा दिवस काय वेगळाच दिसत आहे.

**मा. महापौर :-**

मला दोन मिनिटे बोलू द्या.

**जयंत पाटील :-**

मा. महापौरांची सही प्रोसिडींगवर जर दुसऱ्याने कोणी केली असेल. आपले म्हणणे आहे की, ही आपली सही नाही.

**मा. महापौर :-**

त्या ठरावावर, प्रोसिडींगवर नाही.

**जयंत पाटील :-**

त्या ठरावावरच. त्या ठरावावर जर तुमची सही नसेल तर ती सही कोणी केली? सन्मा. तुळशीदास म्हात्रे साहेबांनी बोलल्याप्रमाणे ते शोधणे हे तुमचे काम आहे व आमचेही काम आहे आणि सहीचे व्हेरीफिकेशन पुण्याला होते. तिथे आपण ठरावावरची सही पाठवा आणि आपले सिग्नेचर व्हेरीफिकेशन करून घ्या. कारण ही अतिशय गंभीर बाब आहे. उद्या, चेकवर सुद्धा आपल्या सह्या होतील.

**मा. महापौर :-**

पहिला विषय सांगते, माझी सही इतकी सोपी आहे की, सहज कोणीही करु शकतो. एवढी साधी आणि सोपी सही आहे. दुसरा विषय, हा ठराव जसा रेकॉर्डीगला, आपण सर्वांनी ऐकलेला आहे. सभागृहातील प्रत्येकाची ही जबाबदारी आहे. ही माहिती सदस्यांकडून यायला पाहिजे होती, जेव्हा माझ्याकडे सचिवजी सहीसाठी आले तेव्हा त्यांनी रितसर दाखवल्यानंतर मी स्वतः मा. महासभा चालू असताना पदनिर्मितीचा एखादा प्रस्ताव आला की, मी ते स्वतः पद लिहून घेते आणि त्या दिवशी मी सभागृह नेते यांच्याकडून ठराव मागितला तेव्हा गोषवाऱ्यामध्ये एकूण ७ पदे होती पण त्याच्या व्यतिरिक्त ११ म्हणजे ४३ पदे अधिक होती. याची संख्या केल्यानंतर ही पदे जास्त होत होती आणि जेव्हा सभागृहनेत्यांनी हा ठराव वाचून दाखविला तेव्हा सभागृहामध्ये सगळ्या सदस्यांकडून विरोध आला की, आस्थापनेवर याचा जास्त बोजा पडेल. आस्थापनेवर या एवढया अधिकाऱ्यांची गरज नाही आणि ही जी पदे लागणार आहेत त्याची सध्यातरी गरज नाही आणि जी आवश्यक पदे आहेत तिच पदे भरण्यात यावी. गरज आहेत तिचं पदे भरावीत. यानंतर बराच वेळ म्हणजे जवळ जवळ दोन तास या सभागृहात चर्चा चालू होती. त्याच्यानंतर मा. उपमहापौर साहेब काही सदस्यांकडे गेले व त्यांनी सदस्यांना सांगितले की, गरज असेल तरच ते पदे भरावे. सभागृह नेता, विरोधी पक्षनेता यांच्याशी त्यांची चर्चा झाली. नंतर, आपल्याला माहित असेल. आज ही ते चित्र डोळ्यासमोर उभे राहते. सभागृह नेते स्टेजवर आले व उपमहापौर व माझ्याशी बोलले. उपमहापौरांनी टिकमार्क करुन ९ पदे मोजून त्यांना दिली. फक्त ९ पदे या पदांची गरज असेल तरच हे पदे भरा. त्यांचेही त्यावेळेस हे वक्तव्य होते. आपण हे रेकॉडिंगला ऐकले असेल व इतिवृत्तांतामध्ये वाचले असेल. पान क्र. ७४, ७१ वर रेकॉर्डिंगला त्यांचा ही या सगळ्या पदाला विरोध होता. त्यांच्यानंतर राष्ट्रवादी आणि कॉग्रेंस याच्यामधून ९ पदे आपण फायनल केली. पण पाणी पुरवठा विभागामध्ये प्लंबर आणि वॉलमनची पदे आवश्यक आहे परंतु ती संख्या त्यांनी तिथे जाहिर केली नाही. फक्त प्लंबर आणि वॉलमन म्हणून वाचन केले आणि नंतर सन्मा. हॅलन गोविंद मॅडम यांनी एक शिक्षण अधिकारी शिक्षण समितीला हवा म्हणून मागणी केली. असे एकूण १२ पदांची मागणी झालेली आहे आणि हे जे इतिवृत्तांत आहे या इतिवृत्तांतामध्ये शब्दरचना आणि मांडणी करताना जे ठरावामुळे अगोदर यायला पाहिजे होते ते आधी आलेले आहे. पान क्र. ७८ वर सभागृह नेते यांनी जो ठराव मांडला. त्याची फक्त वाक्यरचना करुन दिलेली आहे. चार वाक्यरचना केलेली आहे आणि जो ठराव सगळ्यांनी मिळून ज्यांनी कोणी तयार केला असेल त्यांचे मी नाव घेत नाही आणि माझ्यासमोर तो ठराव तयार झालेला नव्हता आणि ती कॉपी माझ्यापर्यंत डायसवर आलेली ही नव्हती. सभागृहात माझा विरोध कुठल्याही व्यक्तीला किंवा सभागृहातील कुठल्याही सदस्यावर आरोप किंवा विरोध नाही. फक्त माझे सभागृहाला एवढेच म्हणणे आहे की, सभागृहात जे सत्य मांडलेले आहे ते सभागृहात आले पाहिजे आणि मंजूर केलेली जी १२ पदे आहेत त्याच्यावर माझे असे ठाममत आहे की, आपण ज्या १२ पदांना मान्यता दिलेली आहे ती १२ पदेच घेण्यात यावी. त्याच्या व्यतिरिक्त कुठलीही पदे घेण्यात येउ नये. याच्यानंतर या ठरावावर माझी सही घेण्यासाठी सचिव आले, सभागृह नेते आले. परंतु, मी त्यांना सही दिली नाही आणि आयुक्तांना मी केबिनमध्ये बोलावून सांगितले की, साहेब या ठरावावर माझी सही झालेली नाही. मला हा ठराव योग्य वाटत नाही. तेव्हा सभागृहात जे वाचलेले आहे ते मी माझ्या स्वतःच्या वहीमध्ये नोंद केलेली आहे. तर ही पदे आणि दिलेली पदे जुळत नाही. त्यामुळे मी सही करणार नाही. त्यावर साहेब म्हणाले की, हा प्रस्ताव मी शासनाकडे कधीच पाठवून दिलेला आहे आणि काही दिवसात मंजूरीसुद्धा मिळेल तेव्हा मी म्हणाले महापौरांची ठरावावर सही नसताना आपण हा प्रस्ताव

शासनाकडे कसा पाठविला? याच्यानंतर तिसरा माणूस. जेव्हा मी दवाखान्यात ॲडमिट होते तेव्हा सही घेण्यासाठी तिथे माणूस आला होता.

**रतन पाटील :-**

तो तिसरा माणूस कोण?

**मा. महापौर :-**

आपल्या महापालिकेचा अधिकारी आला होता. त्याचे मी येथे नाव घेउ शकत नाही. त्यांनी सहीसाठी मागणी केली तेव्हा मी त्यांना सांगितले की, मी आजारी आहे. बरी झाल्यानंतर घरी आल्यावर मी आपल्याला सही देते. कारण या ठरावामध्ये बऱ्याचशा मला मनाला न पटणारे विषय आहेत. त्यामुळे मी सगळयांच्या समोर सांगितले आणि जेव्हा इतिवृत्तांत सभागृहापुढे सभेत सादर व्हायचा होता. त्यादिवशी सुद्धा मी सांगितले की, इतिवृत्तांतामध्ये असे येता कामा नये. जे ठरावात झालेले आहे तेच द्या. पण याच्यामध्ये काही न करता त्यांनी जसेच्या तसे होते तसेच दिले. त्यामुळे मला आज सभागृहात बोलावे लागले. जर सचिवांनी किंवा जे इतिवृत्तांत तयार करतात त्या अधिकाऱ्यांनी जर हे त्यावेळेस त्यांच्या निर्देशनात आणून दिले असते आणि ऐकले असते तर आज एवढा गोंधळ सभागृहात झाला नसता आणि आपण या सहीच्या बाबतीत बोलता तर ही सही माझी नाही. आतासुद्धा सचिवांकडे प्रोसिडींग, ठरावाच्या प्रती आहेत त्या ठरावाच्या प्रती आपण मागवाव्यात. काही ठिकाणी निळ्या पेनाने तरी काही ठिकाणी जुन्या ज्या प्रती आहे म्हणजे अगोदर सहा महिन्याच्या पुर्वीच्या, एक वर्षाच्या पुर्वीच्या त्या सह्या निळ्या पेनाने केलेल्या आहेत आणि आता ७ महिन्यापासून मी हिरव्या पेनाने सही करते. कारण तिथे गोंधळ होउ नये आणि सहीमध्ये एक पॉइंट असा आहे की, माझी सही मला ओळखता येते. त्यामुळे ही सही माझी नाही. सही तज्ञाकडे पाठवून याची चौकशी करावी.

**तुळशीदास म्हात्रे :-**

चौकशी झाल्यानंतर त्या अधिकाऱ्याला माफ करु नका. कारण आतापर्यंत आपण सन १९९१ पासून जेवढे अधिकारी निलंबित झाले होते. त्यांना आपण परत घेतो. त्याच्यामुळे अधिकारी शेफारले गेले आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

आपल्या आर्शिवादाने त्यांना बढत्या दिल्या.

**तुळशीदास म्हात्रे :-**

म्हणून आता जी घटना घडलेली आहे. ह्याच्यामध्ये जो अधिकारी सामील असेल त्याला आपण कायम स्वरुपी सस्पेन्ड करावे.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, मी आपल्याकडे त्यावेळी परमिशन मागितली होती आणि आपण बोलला होता की, मी बोलल्यानंतर आपल्याला संधी देईल. मी या सभागृहाच्या पुढे आपल्या परवानगीने, मला असे वाटते की, महत्त्वाच्या काही सुचना मांडाव्यात आणि आपण निश्चित त्याचे पालन कराल अशी माझी खात्री आहे. या विषयामध्ये आपण स्वतःच तक्रारदार आहात. त्यामुळे मी आपल्याला सांगू इच्छितो की, भारतीय पुरावा अधिनियम हा इंडियन एव्हीडन्स ॲक्ट १८८२ साली निर्माण झालेला आहे. त्याप्रमाणे मा. महासभेमधला इतिवृत्तांत, हा जो इतिवृत्तांत मिनिट्स आहे. हा एका प्रकारे कलम ७६ प्रमाणे हे पब्लिक डॉक्युमेंट आहे आणि पब्लिक डॉक्युमेंटमध्ये इंडियन एव्हिडन्स ॲक्ट १८८२ त्याच्यामध्ये कलम ७६ प्रमाणे हे पब्लिक डॉक्यूमेंट आहे आणि पब्लिक डॉक्युमेंटमध्ये कुठल्याही प्रकारची खाडाखोड, व्हाईटनर किंवा खोटी सिग्नेचर करणे किंवा खोटी माहिती देणे याच्यात देखिल आय.टी.सी.चा १९३ चा सबसेक्शन (२) आणि सेक्शन १९९ आणि २०० देखिल लागू होतो. तेवढेच नव्हेतर, तर महापालिकेचे, महासभेचा, जनतेचा जवळ जवळ आठ ते नउ लाख जनतेचा आणि आपण प्रथम नागरिक असून आपल्या सिग्नेचरची कोणी तरी या ठिकाणी फसवणूक केलेली आहे. म्हणजे फसवणूक केलेली आहे तर आपण भाईंदर पोलिस स्टेशनमध्ये जाउन गुन्हा दाखल करावा. हा गुन्हा ४२० खाली करावे तसे परज्युरी देखिल आहे. एका प्रकारे पब्लिक डॉक्युमेंटमध्ये खोटी माहिती देणे. फौर्जरी प्लस परज्युरी असे असताना देखिल आपण स्वतः करु शकता. तसेच, आयुक्त साहेबांनी या ठरावाला या इतिवृत्तांला मंजूरी नसताना मंत्रालयामध्ये हा ठराव मंजूरीसाठी स्वतः सही करुन हा ठराव जर ते मंत्रालयामध्ये पाठवितात तर आयुक्त साहेब देखिल दोषी आहेत. आयुक्त साहेबांवर देखिल कार्यवाही करावी अशी मागणी आपण प्रधान सचिवांकडे करावी. अशी माझी नम्र विनंती आहे. जयहिंद.

**मा. महापौर :-**

ठराव क्र. ३४ नुसार प्रोसिडींगमध्ये जी पदे आलेली आहेत त्याच्या व्यतिरिक्त जी पदे आहेत ती पदे भरु नयेत आणि प्रोसिडींगमध्ये रेकॉडिंगमध्ये जी पदे आलेली आहेत तीच पदे घेण्यात यावी.

**शिवप्रकाश भुदेका :-**

आपली त्या ठरावावर सही नाही तर तो ठराव कसा पास होईल?

**मा. महापौर :-**

माझ्याकडे जेव्हा योग्य ठराव येणार तेव्हाच मी सही करणार. ठरावात जास्त पदे होती म्हणून सही केली नव्हती.

**शिवप्रकाश भुदेका :-**

आपण सांगता की, सही ड्युप्लिकेट आहे. आम्हाला तो ठराव कुठे बघायला मिळाला.

**हॅरल बोर्जीस :-**

कॅसेटमध्ये रेकॉर्डिंगप्रमाणे ठराव होईल. प्रोसिडींग मंजूरीला जोपर्यंत आपली त्यावर स्वाक्षरी होत नाही तोपर्यंत मूळ ठराव कायम होणार नाही.

**हॅरल बोर्जीस :-**

प्रोसिडींग मंजूर होईल. आपण जे बोलता त्याप्रमाणे....

**मा. महापौर :-**

मूळ ठराव जो आपण प्रोसिडींगमध्ये आणि रेकॉडिंगमध्ये पद मंजूर केली होती त्याच्यावर मी सही करायला तयार आहे.

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलत आहे. मा. महापौरांनी आत्ता वक्तव्य केले की, त्यांना जसा ठराव पाहिजे त्याप्रमाणे केले तर ते सिग्नेचर करणार आहेत. परंतु, आत्ता जो ठराव...

**मा. महापौर :-**

तसा पाहिजे नाही. सभागृहाने मंजूर केलेला ठराव त्याच्यावर मी सही करणार आहे.

**शशिकांत भोईर :-**

बरोबर आहे. त्याचप्रमाणे आत्ता जो ठराव आलेला आहे त्यावर आपण काय कार्यवाही करणार आहात किंवा आपल्या आयुक्तांनी जो ठराव पदनिर्मितीसाठी पदासाठी शासनाकडे दिले, सुर्पुद केले सहिनिशी. त्याच्यावर आपण काय कार्यवाही करणार आहात? तसे आपण रुलिंग द्यावे नाहीतर, सर्व पदांना स्थगिती द्यावी.

**नितीन ठाकूर :-**

मा. महापौर मॅडम, आता जो आपल्याला विरोधी पक्षनेता परशुराम पाटील यांनी जो पेपर दिलेला आहे. त्याच्यावर आपली सही आहे असे सांगितले आणि आपण सांगितले की, ती सही तुमची नाही. तर ती कोणी केली? त्यांना तो पेपर कुठून मिळाला? कुठल्या अधिकाऱ्यांनी त्यांना तो पेपर दिला त्याची चौकशी करावी.

**शशिकांत भोईर :-**

मॅडम, चौकशी न करता आपण पहिल्यांदा तो पेपर सील करावा. पोलिसांना कम्प्लेंट करून तदनंतर आपल्या आयुक्तांनी तशाचा तसा ठराव आपली सही नसताना त्यांनी मंत्रालयामध्ये पदनिर्मितीसाठी पाठविला आहे. त्यांच्यावर काय कार्यवाही करणार ह्याचे आम्हाला रुलिंग द्या.

**नितीन ठाकूर :-**

मॅडम, त्यानंतर तो ठराव पास करावा. कृपया, तोपर्यंत हे प्रकरण पेन्डींग राहू दे.

**हॅरल बोर्जीस :-**

आपल्याकडे जी कॉपी दिलेली आहे ती झेरॉक्स प्रत आहे असे मला वाटते. तर त्याची ओरिजनल प्रत कुठे आहे याची कृपया सभागृहाला माहिती द्यावी.

**नितीन ठाकूर :-**

त्यांच्याकडूनच मिळेल ना. विरोधी पक्षनेत्यांकडूनच मिळेल ना.

**मिलन म्हात्रे :-**

चार फटके पडले की, सगळं बाहेर येईल.

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर मॅडम, आपण प्रथम नागरिक आहात. आपल्या सहीचा गैरवापर झालेला आहे. जो ठराव आपण केला होता त्याच धर्तीवर त्यांनी तो तसाचा तसा ठराव आयुक्तांनी त्यांच्या सहीनिशी मंत्रालयात पाठविला. तर आपण आयुक्तांवर काय कार्यवाही करणार आहात ह्याचे मला रुलिंग आम्हाला द्या.

**नितीन ठाकूर :-**

मा. महापौर मॅडम, आपण प्रथम नागरिक आहात. आपल्या राष्ट्रवादी कॉग्रेंसचे पदाधिकारी सुद्धा आहात. तर पार्टीची प्रतिमा कुठे मलिन होउ नये हे आपण बघावे आणि त्याप्रमाणे कार्यवाही करावी. तोपर्यंत हा ठराव नामंजूर करावा, पेन्डींग ठेवावा. ही माझी विनंती आहे.

**रोहिदास पाटील :-**

राष्ट्रवादी पार्टीचा हा भाग नाही. हा सभागृहाचा भाग आहे. राष्ट्रवादी पार्टीच्या प्रतिमेचा प्रश्न येत नाही. राष्ट्रवादी सहभागी असेल तर प्रतिमा मलिन होईल.

**मिलन म्हात्रे :-**

पक्षाचा काही सहभाग नाही.

**रोहिदास पाटील :-**

आता आमचा आग्रह आहे की, जो पेपर आपल्याला दिलेला आहे, या पिठासिन अधिकाऱ्याला प्रश्न विचारतो की, सही खोटी आहे की खरी आहे आणि पिठासिन अधिकारी स्पष्ट सांगतात की, सही खोटी आहे. तर हा गुन्हा दाखल झालाच पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

आजच्या आज आपण गुन्हा दाखल करा. अन्यथा या सभागृहाचा मी देखील एक सभासद आहे. आम्ही गुन्हा दाखल करू. आम्ही गुन्हा दाखल करु शकतो. आम्ही या महापालिकेचे विश्वस्त आहोत आणि कुठल्यापक्षाचे वगैरे आपण असे राजकारण आणू नका. इथे कुठल्याही पक्षावर कोणी टिका केलेली नाही.

**रोहिदास पाटील :-**

येथे राष्ट्रवादी पक्षाच्या अब्रुचा, सत्ताधारी पक्षाच्या अब्रुचा...

**मिलन म्हात्रे :-**

येथे सभागृहाचीच अब्रु गेलेली आहे.

**रोहिदास पाटील :-**

येथे कामकाजाची या डायसची किंमत आहे. त्याची शान आहे. तिथे कोण बसला आहे हा प्रश्न नाही. आमजनता ज्यांना सलाम ठोकते त्यांच्यावर आपण आरोप केला की, सही खोटी आहे. त्या म्हणतात ना की, मी सही केली नाही तरी आपण पुन्हा वधून घेतले. ह्याच्यापेक्षा काय? हा गुन्हा रजिस्टर झाला पाहिजे. ह्याची रितसर चौकशी झाली पाहिजे. ठराव पेन्डींग राहू दे. तो शासनाकडे गेला असेल तर आमचे उद्या, १६ आमदार सचिवालयामध्ये जातील. आपण त्याची चिंता करु नका. तुम्ही आता पुढचे काहीच काम करु नका. हा गुन्हा दाखल करा, बस.

**शशिकांत भोईर :-**

मॅडम, मी आताच आपल्याला प्रश्न केलेला आहे की, आपण रुलिंग द्यावे. जर आपल्या बिना सहीचा ठराव आयुक्तांनी मंत्रालयात मंजूरीसाठी पाठविलेला आहे त्याच्यावर आपण काय रुलिंग देणार?

**मिलन म्हात्रे :-**

आयुक्तांनी बेशिस्त वर्तन केल्याच्या प्रकरणी त्यांच्यावर कार्यवाही करुन त्यांना त्वरीत येथून घालविण्याचा मी ठराव ठेवीत आहे.

**नयना म्हात्रे :-**

माझे अनुमोदन आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आमचा ठराव मंजूर झाला आहे. आपण कुठल्याही लॉ पॉइंट वर आम्हाला सांगा की, आमचा ठराव कुठल्या आधारावर बेकायदेशीर आहे आणि आपण तो ठराव विखंडीत करा.

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर मॅडम, माझ्या प्रश्नाला रुलिंग द्या. मी ठराव मांडलेला आहे. मी रुलिंग मागतो.

**मिलन म्हात्रे :-**

मुद्द्याचे आले आहे तर मुद्दयाचे बोला ना. तुम्ही कसले धुमून धुमून बोलता. त्या मेयर मॅडमचा त्यांनी विश्वासघात केला आहे. मा. महापौरांनी त्यांना सांगितले की, माझी सही नाही तुम्ही हा ठराव पाठवू नका. तरी कमिशनरने तो ठराव शासनाकडे पाठविण्याची हिंमत केली आहे. दरवेळी तुम्हाला महिला-महिला आठवते आणि आता एका महिलेचा अपमान आयुक्तांनी केला तरी आपण गप्प कशाला? आता तुमची महिला कुठे गेली?

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्य, मी आपला त्याबाबतीमध्ये खुलासा करतो की, आपण जे सदनामध्ये....

**मिलन म्हात्रे :-**

आपण खुलासा उठून उभे राहून करा. आपण उभे राहून बोलायचे. बसून बोलू नये. हा डेकोरम तुम्ही पाडू नका. उभे राहा आणि बोला.

**मा. आयुक्त :-**

उभे राहून बोलतो ना.

**मिलन म्हात्रे :-**

आपण सभेचा डेकोरम पाळा. मा. महासभेत रुलिंग देताना उभे राहून बोलतात.

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौर मॅडम, विषयाचे परत एकदा विषयांतर होत आहे.

**मिलन म्हात्रे :-**

काही विषयांतर होत नाही. विषयावरचा विषय चालू आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

आपल्याकडे जी झेरॉक्स प्रत आहे. त्याची कृपया मुळ नस्ती, त्याची प्रत कुठे आहे हे शोधून काढावे. कारण आपल्याला जी प्रत दिलेली आहे ती त्याची झेरॉक्स आहे.

**मिलन म्हात्रे :-**

शोधून काढा ना.

**हॅरल बोर्जीस :-**

त्याची ओरिजनल प्रत कृपया सभागृहासमोर आणावी.

**मिलन म्हात्रे :-**

डायसवरचा अधिकारी बोलतो की, माझी सही नाही. तरी आपण घुमून फिरुन बोलता.

**रिटा शाह :-**

हॅरल बोर्जीस सभागृह नेते आहेत. सभागृहामध्ये जेव्हा एखादी कॉम्पीकेटेड विषय येतो त्याच्यावर सभागृह नेत्याचे आपण पहिले वक्तव्य ऐकायचे असते.

**मिलन म्हात्रे :-**

ह्याच्यामध्ये सभागृह नेत्यानींच सगळी मस्ती केलेली आहे. त्यांचे अनुमोदन आहे. ते काय ह्याच्यात क्लेरिफिकेशन देणार? स्वतः महापौर बोलतात की, माझी सही नाही. तरी आपण बायका गप्प राहता.

**रिटा शाह :-**

सभागृह नेत्यांनी सांगावे की, त्या ठरावावर आपण सही केली. विरोधी पक्षनेत्याने सही केली. मग मा. महापौरांनी तुमच्यासमोर सही केली का नाही ते आपण आम्हाला सांगावे?

**नितीन ठाकूर :-**

सन्मा. सदस्या रिटा शाह मॅडम, मा. महापौरांनी स्वतः सांगितलेले आहे.

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

सभागृहात एक-एक सदस्यांनी बोलावे.

**शुभांगी नाईक :-**

ह्याचाच अर्थ, आपला मा. महापौरांवर विश्वास नाही का?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

एका बाजुला मा. महापौरांचे अभिनंदन करता आणि एका बाजूला आपण महापौरांना खोटं ठरवता.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्या रिटा शाह यांचे असे म्हणणे आहे की, आपण सभागृहाला फसवता, आपण खोटं बोलता.

**रिटा शाह :-**

सन्मा. सदस्या रिटा शाहने काय बोलले ना ते पहिल्यांदा आपण समजून घ्या. समजल काय? हे सभागृह नेता आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

आज ती महिला एकटी ...............

**रोहित सुवर्णा :-**

आपण नेहमी महिला महिला म्हणून अभिनंदानाचे ठराव ठेवता.

**मिलन म्हात्रे :-**

हिम्मत असेल ठेवून द्या.

**शुभांगी नाईक :-**

आता महिलांच्या पाठिशी उभे राहा ना.

**रोहित सुवर्णा :-**

आपण प्रत्येकवेळी महिला महिला करता ना. अहो, आम्हाला बोलता ना. महिलांबद्दल अभिमान आहे का? आणि कॅसेट वाजविण्याची पध्दत हायकोर्टामध्ये झालेली होती. ठाणे कोर्टामध्ये झालेली होती. तिथे ही कॅसेट वाजवली गेली. म्हणून सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे ह्यांना जामीन मिळाली. त्यावेळी तुम्ही लोक काय बोललात? कोणीही बोलते नाही की, कॅसेट वाजवून दाखवा.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्यांनी शांतपणे बोलावे आणि एकेकाने बोलावे.

**रोहित सुवर्णा :-**

पण हायकोर्टामध्ये कॅसेट वाजवून दाखवली.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आमचे तेच म्हणणे आहे की, सन्मा. नगरसेवकांनी ठाम रहावे. एका गोष्टीवर ठाम रहावे. एका बाजुला अभिनंदन करता आणि एकाबाजुला मा. महापौरांना खोटं ठरवता. हे बरोबर नाही.

**रिटा शाह :-**

मी अभिनंदन केले किंवा विरोध केले त्याच्याशी त्यांना काय करायचे आहे?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

म्हणजे प्रत्येकवेळी अभिनंदन करायचे आणि मा. महापौरांवर आरोप ही ठेवायचा. ही कुठली बाब आहे. आपण एका विषयावर ठाम राहा ना.

**रिटा शाह :-**

सन्मा. सदस्य, मी माझ्या मताशी ठाम आहे. मी काय विचारले याचा अर्थ हे तुम्हाला समजले नाही. कारण सभागृह नेते बोलतात. विरोधी पक्षनेते बोलतात की, आम्ही सही केली. मग महापौर बोलतात ते काय?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, स्वतः बोलतात की, ही माझी सही नाही. तर तुम्ही त्यांना खोट ठरविण्याचा प्रयत्न करता.

**रिटा शाह :-**

त्याचा अर्थ तेच ना जे आपण बोलता तेच. पण आपण त्याला वेगळा अर्थ लावत आहात. मी परत सांगते की, आम्ही मा. महापौरांचे अभिनंदन केले, हा असा चुकीचा विषय आपण आमच्यासमोर आणला आणि असा विषय आणण्याचे धाडस केले. पण आता आपल्या सभागृहाची गंमत अशी आहे की, मा. महापौर मॅडम बोलतात की, मी सही केली नाही. सभागृह नेता बोलतात की, मी सही केली. विरोधी पक्षनेता बोलतात की, मी सही केली आणि असा ठराव झाला. मग ह्याच्यामध्ये सत्य काय? कुठला अधिकारी ह्याच्यामध्ये गुंतलेला आहे. ज्याने हे सर्व निर्माण केलेले आहे आणि वाढीव पदे केली आहेत की सभागृह नेता खोटे आहेत की विरोधी पक्षनेता खोटे आहेत हे आपण बाजूला ठेवा आणि खरोखर काय निर्देश झाला होता आणि खरोखर काय ठराव झालेला होता हे आपण कॅसेटमध्ये ऐकले आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, बोलतात की, माझी सही नाही. आपण त्यांचे आता अभिनंदन केले.

**रिटा शाह :-**

आपण त्या ठरावाची ओरिजनल प्रत मागवा ना.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

प्रत्येक वेळी आपण कशाला अभिनंदन करता?

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्यांनी बसून घ्यावे.

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर मॅडम, मी आपल्याकडे रुलिंग मागितले होते की, आपण मला अजूनपर्यंत रुलिंग दिलेले नाही. आपली सही नसताना आयुक्तांनी त्यांच्या सहिनिशी मंत्रालयात पदनिर्मितीसाठी प्रस्ताव पाठविला तो गैर आहे तर त्याच्यावर काय कार्यवाही करणार? याबाबत आपल्याकडून रुलिंग मागितली होती आणि आपण रुलिंग दिलेली नाही. मी त्याच्यावर भांडत आहे. आपण त्याच्यावर रुलिंग द्यावे.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. शशिकांत भोईर साहेब....

**मिलन म्हात्रे :-**

हॅरल बोर्जीस तुम्हाला बोलण्याचा अधिकार नाही. खाली बसा. रुलिंग होउ द्या.

**लिओ कोलासो :-**

असे कसे रुलिंग मागता. एकाने बोलायचे आणि रुलिंग मागायचे का? तर आम्हालाही या विषयावर बोलायचे आहे.

**मिलन म्हात्रे :-**

खाली बसा.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सदस्य शशिकांत भोईर साहेब जो मुद्दा उपस्थित करत आहेत त्यांचे म्हणणे असे आहे की, आपण डीनॉय करता की, ती स्वाक्षरी आपण केलेली नाही. आजच्या तारखेमध्ये सभागृह सक्षम नाही की, ती स्वाक्षरी आपली आहे की आपल्या अनुपस्थितीमध्ये ती स्वाक्षरी दुसऱ्या कोणी केलेली आहे. जो पर्यंत त्या स्वाक्षरीचे इनव्हेस्टीगेशन होत नाही. तोपर्यंत आपण त्यांना डायसवरुन, त्यांना अपेक्षित असलेले जे रुलिंग आहे तर मला वाटते ते आपण देवू शकत नाही. कारण आजच्या तारखेमध्ये आपण जरी डीनॉय करत असलात तरीसुद्धा जोपर्यंत त्या स्वाक्षरीचे इनव्हेस्टीगेशन होत नाही. तोपर्यंत ती स्वाक्षरी आपली आहे की, दुसऱ्या कोणी मारली आहे ह्याची खात्री होत नाही.

**रोहिदास पाटील :-**

ही त्यांची सही नाही असे ते स्वतः सांगतात ना. स्वतःची सही स्वतः ओळखू शकतात.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

स्वतःची सही ते ओळखू शकतात आणि आपण त्यांच्यावर आरोप करता.

**शशिकांत भोईर :-**

मॅडम, आपले इतिवृत्तांत मंजूर न होता आपला तसाचा तसा ठराव पदनिर्मितीसाठी जातो.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य एकेकाने बोलावे.

**शशिकांत भोईर :-**

मॅडम, आपला इतिवृत्तांत किंवा कोणताही ठराव....

**शिवप्रकाश भुदेका :-**

मा. महापौर मॅडम, आप पर यह सरासर आरोप है की, आप झुठ बोल रहे हो।

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर मॅडम, माझी आपणांस विनंती आहे की, आपण ज्यावेळेस इतिवृत्तांत मंजूर केल्यानंतर सर्व ठरावांवर कार्यवाही करतो. इतिवृत्तांत मंजूर झाल्यानंतरच. पण आपला इतिवृत्तांत आज मंजूर होत आहे आणि त्याचा ठराव पूर्वीच मंजूरीसाठी महाराष्ट्र शासनाच्या मंत्रालयामध्ये गेला आहे. हे योग्य आहे का? आपण याच्यावर काय कार्यवाही करणार? ह्याचे मला आपणाकडून रुलिंग पाहिजे.

**शिवप्रकाश भुदेका :-**

मा. महापौर मॅडम, यह आप पर सरासर आरोप है की, आप झूठ बोल रहे हो। सन्मा. हॅरलजी बोर्जीस की तरफ से आपपर आरोप पे आरोप लगाते जा रहे है। जब आदमी एक चोरी करता है तो उसको अपने आप को बचानेके लिए दस झूठ बोलना पडता है।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

स्वतः पिठासिन अधिकारी आपण पाच वर्षापासून त्यांचे निर्णय मान्य केले आणि आज आपण त्यांची सही खोटी ठरविता आणि आपण व्हेरीफिकेशनसाठी पुणे येथे ठराव पाठविण्याचे सांगता हे आपल्याला योग्य वाटते का? सभागृह नेत्यांनी आजच्या या प्रकरणासाठी राजीनामा दयावा.

**नितीन ठाकूर :-**

मा. महापौर मॅडम, जिथपर्यंत आपल्या सहीचे व्हेरीफिकेशन होत नाही. तोपर्यंत हा विषय पेन्डींग ठेवावा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आपण त्यांचे आजपर्यंत निर्णय मानले. ते पिठासिन अध्यक्ष म्हणून काम करत आहेत. त्यांना आपण कसे काय खोटं ठरविता?

**नितीन ठाकूर :-**

खोटं कुठे ठरवितो?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ते बोलतात ना, माझी सही नाही. म्हणजे आपण जाणूनबूजून त्यांना सांगता का, येथे जा. पुण्याला जा. ते स्वतः पिठासिन अधिकारी म्हणून बसले आहेत. पाच वर्षे आपण त्यांचे निर्णय मान्य केले आणि आता ते जे बोलतात त्याला तुम्ही खोटं ठरविता.

**शिवप्रकाश भुदेका :-**

सन्मा. सदस्य नितीन ठाकूरजी मा. महापौर मॅडमने पाच बोला की यह मेरी साईन नही है। फिर भी आप उनपर झूठा आरोप लगा रहे हो।

**मा. महापौर :-**

सर्व सन्मा. सदस्यांनी बसून घ्यावे.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर मॅडम, सकाळ पासून काही लोक कॉग्रेंस आणि राष्ट्रवादी कॉग्रेंस व आता महापौर आणि नगरसेवक यांच्यात लावून देण्याचा प्रकार चालला आहे.

**नितीन ठाकूर :-**

मॅडम, हे चुकीचे आहे.

(सभागृहात गोंधळ )

**शशिकांत भोईर :-**

मॅडम, जनसंदेशाने ही जबाबदारी तेवढी आपली ही आहे. असा जर गैरव्यवहार होत असेल तर ती जबाबदारी आपल्यावर येईल.

**प्रभात पाटील :-**

लावालावी करु नका ना. प्रश्न उचलून धरा ना.

**शशिकांत भोईर :-**

लावालावी करत नाही.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्यांनी खाली बसून घ्यावे.

**शशिकांत भोईर :-**

सभागृहाचा अपमान होईल अशी गैरप्रकरणे जर आपल्या मंजूरीवाचून जात असतील. तर त्यांच्यावर काय कार्यवाही करणार याबाबत मी विचारले आहे.

**प्रभात पाटील :-**

आपण एकंदर कार्यवाही विषयी बोलत नाही. सभागृहामध्ये या विषयाला मी देखिल त्यांना समर्थन दिले आहे व पहिल्यांदा त्यांचे कौतुक मी केले आहे. परंतु, हा जो प्रकार आहे की, एकदा आपण मा. महापौरांना खोटं ठरविता. हे असे कोण बोलले आहे? सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल हे वाक्य सारखे सारखे बोलत आहेत की, महापौरांना तुम्ही खोटं ठरवित आहात.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मॅडम, बोलत आहेत की, ही माझी सही नाही, सही नाही.

**प्रभात पाटील :-**

आपण सभागृहाला विशद करु नका.

(सभागृहात गोंधळ)

**शिवप्रकाश भुदेका :-**

सन्मा. सदस्या प्रभात पाटीलजी, आपने सुना नही होगा परंतु, सन्मा. हॅरल बोर्जीसजी ने बोला है।

**नितीन ठाकुर :-**

मा. महापौर मॅडम, सक्षम आहेत त्यांना माहित आहे की काय खरं आहे आणि खोटं आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, याचा अर्थ सभागृहाला आपल्यावर विश्वास नाही.

**रतन पाटील :-**

सन्मा. हॅरल बोर्जीस सांगतात की, माझी त्यांची सही आहे. म्हणजे खोटं कोण? महापौर की हॅरल बोर्जीस?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ते बोलतात की माझी सही आहे.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

सही है। लेकीन नही है तो इनव्हेस्टीगेशन का मॅटर है। आप ऐसा बोलिए ना। आपका सिग्नेचर है लेकिन नही है तो आप इसको जाच कराईए। यह अपने हाउस का समय क्यों बरबाद कर रहे है। अगर इसपर आपका सिग्नेचर है और नही है झुठा है तो आप जाच कराईए।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, याचा अर्थ असा की, हे आपल्यावर आरोप करता आणि जर तुमची हिम्मत असेल व मा. महापौर मॅडम, जर खोटं बोलत असतील तर आपण मा. महापौरांचा राजीनामा घ्या.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवालजी आपण बसून घ्या.

**महेद्रसिंग चौहाण :-**

आप इसे जाच कराईए। इसपर आपका सिग्नेचर है।

**मा. महापौर :-**

वह बोला है। आप बैठीए।

**महेंद्रसिंग चौहाण :-**

तो अननेसेसरी समय क्यों खराब कर रहे हो।

**मा. महापौर :-**

सर्व सदस्यांनी खाली बसावे.

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर मॅडम, मला जर रुलिंग दिले नाही तर मी तिथे खाली बसेन. मला जर रुलिंग दिली नाही तर मी खाली बसणार. आपण रुलिंग द्यावे. मी जो आपल्याला प्रश्न केला आहे त्याचे रुलिंग द्यावे. जोपर्यंत रुलिंग देणार नाही तोपर्यंत मी बसणार नाही.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपण विचारलेला जो प्रश्न आहे तर मी सचिवांना नियम विचारते की, असे कुठल्या नियमामध्ये आहे की, महापौरांची सही झाल्याशिवाय किंवा इतिवृत्तांत मंजूर झाल्याशिवाय हा प्रस्ताव शासनाकडे पाठवायचा की नाही याचा ते खुलासा करतील.

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर मॅडम, ज्यावेळी समान कर आकारणीचा विषय होता तेव्हा प्रशासकीय अधिकारी आम्हाला बोलायचे की, ठराव पारित झाला नाही. इतिवृत्तांत मंजूर झाल्यानंतर कार्यवाही होणार.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

यह आप आयुक्त को बोलिये ना। मॅडम, यह हम लोगो का सब्जेक्ट नही है, यह आप साहब को बोलिए। उन्होंने ऐसा क्यो दिया?

**शशिकांत भोईर :-**

आपलेच अधिकारी बोलत होते की, ठराव मंजूर झाल्यानंतर इतिवृत्तांत मंजूर झाल्यानंतर त्याच्यावर कार्यवाही होणार ताबडतोब कुठल्याही प्रकारचे इम्लीमेंट झाले नाही. मी प्रत्येक मा. महासभेला तसे बोललो आहे की, जर फायद्याचे असेल तर त्याच्यावर ताबडतोब अंमलबजावणी होते आणि फायद्याचे नसेल तर इतिवृत्तांत मंजूर झाल्याशिवाय अंमलबजावणी लवकर होत नाही. मॅडम, त्यामुळे मला रुलिंग पाहिजे.

**आसिफ शेख :-**

सन्मा. महापौर साहेबा, याठिकाणी सकाळपासून ११.३०वा. सभा सुरू झालेली आहे. आता सायंकाळचे ५.२५ मि. होत आलेले आहे. याठिकाणी या सभागृहाचे आजच्या सकाळपासून वातावरण विपरीत झालेले दिसत आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

विपरीत नाही. हे चांगले वातावरण झालेले आहे.

**आसिफ शेख :-**

सन्मा. महापौर साहेबा, आपण याठिकाणी महापालिकेचे संपूर्ण प्रशासन चालवत असताना सन्मा. महापौर व शहराचे प्रथम नागरिक म्हणून आपण आणि सन्मा. आयुक्त या दोषांमध्ये जर व्यवस्थित सुसंवाद असेल तर शहराचे वातावरण चांगले राहिल आणि आपण अधिक चांगल्याप्रकारे काम करु शकतो. परंतु, याठिकाणी मी एक शेर सांगतो, 'हमे तो अपनोंने लुटा गैरो में क्या दम था, मेरी कश्ती वहा डुबी जहा पानी कम था।' तर या ठिकाणी सन्मा. महापौर साहेबा, आपण स्वतःच सांगितले आहे की, माझी सही नाही, मी सही केलेली नाही. कोणीतरी डयुप्लीकेट सही केलेली आहे आणि सन्मा. विरोधी पक्षनेते यांनी जो ठराव यांनी जो ठराव सभागृहात आपणाकडे दिलेला आहे. त्यावर आपली याठिकाणी सही दिसत आहे. आता सोक्षमोक्ष लावायचा असेल तर हे दोन मिनिटाचे काम आहे. रामबाण उपाय आपल्याकडे जर ओरिजनल ठराव असेल तर तो ठराव आपण सभागृहात सादर करा. संपला विषय. एवढा वेळ घालविण्याची आवश्यकता नाही. सभागृहाचा वेळ हा महत्त्वाचा वेळ आहे. जर आपण सही केली नसेल तर ओरिजनल ठराव सचिवजी आपण दाखवा. सचिवाकडे सगळी कागदपत्रे, आपल्या कस्टडीमध्ये असतात.

**मा. महापौर :-**

सचिवांना जेव्हा मी महापौर दालनामध्ये बोलावले तेव्हा ठरावावर निळ्या पेनाने सही केली होती. तेव्हा सचिवांना सांगितले की, ही सही माझी नाही एकतर आपण तज्ञाकडून तपासून घ्या किंवा व्हायटिंग लावा.

**रोहिदास पाटील :-**

ह्याच्यापेक्षा आपण असून त्यांच्याकडून काय मागता. ही तुमची चालबाजी आहे.

**मा. महापौर :-**

आपण माझे दोन शब्द ऐकून घ्या.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

मॅडम, आपके पास सही लेने के लिये कौन आया था?

**रोहिदास पाटील :-**

ही बाब गंभीर आहे. तुम्ही त्यांच्यावर दबाव आणू नका.

**मा. महापौर :-**

सभागृहाने ऐकून घ्यावे.

**रोहिदास पाटील :-**

ते नाही म्हणून सांगत असताना आपण त्यांना परत परत का विचारता?

**महेंद्रसिंग चौहाण :-**

मॅडम, आपके पास साईन लेनेके लिए कौन आया था?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मॅडम, खोटे बोललेले त्यांना सत्य....

**मा. महापौर :-**

आपण शांत बसा.

**मा. महापौर :-**

ठरावाची कॉपी तो बन्च घेउन आल्यानंतर सगळ्या ठरावावर मी सही केली. फक्त हा एकच ठराव सहीचा बाकी ठेवला होता. मग आता चार दिवसापूर्वी मला ही रेकॉर्डिंग ऐकायची होती. मा. महासभा लावायची होती. त्यामुळे सचिवांना मी ठरावाच्या प्रती आणि कॅसेट व टेप घेउन बोलावले व कॅसेट ऐकली. त्याच्यावर हिरव्या पेनाने टिकमार्क केली की, कोणकोणती पदे आपल्याला भरायची आहेत. म्हणजे सभागृहात आपण मान्य केलेले आहे. तेव्हा तिथे बघितले की, ठरावावर माझ्या जागेवर पिठासिन अधिकारी म्हणून सही केलेली आहे. तेव्हा मी सचिवांना सांगितले की, ही माझी सही नाही. या सहीवर व्हायटिंग लावा. कारण मला तेव्हा हा विषय एवढा गांर्भीयाचा वाटला नाही. त्यामुळे मी त्यांच्याकडून त्या ठरावाची जी मूळ प्रत होती त्याच्यावर व्हायटिंग लावून घेतले. पण ती सही माझी नाही. आपण नगरसेवकांनीच याचा खुलासा करायचा आहे की, तज्ञाकडे ती सही पाठवायची आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

काही गरज नाही.

**मा. महापौर :-**

तज्ञाकडून आल्यानंतर आपल्याला ती माहिती मिळेलच की ती सही माझी नाही. दुसरा विषय असा आहे की, आपल्या सभागृहाने ठरावात मंजूर केलेली जी पदे आहेत. आपला वाद येथेच आहे की, ठरावाव्दारे जी मंजूर पदे आहेत तिच पदे आपल्याला भरायची आहेत त्याच्या व्यतिरिक्त एकही पद भरायचे नाही. हा मूळ प्रश्न येथे उपस्थित झालेला आहे आणि तो प्रश्न मिटलेला आहे त्यामुळे सभागृहाला....

**ओमप्रकाश अग्रवालः-**

आपली सहीच खोटी केलेली आहे. मग विषय कसा काय मिटला?

**मा. महापौर :-**

त्याची चौकशी केली जाईल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

चौकशी कसे काय? हे आरोप झालेले आहेत.

**रतन पाटील :-**

मॅडम, सही झाली नाही तर ठराव कसा काय मंजूर?

**शिवप्रकाश भुदेका :-**

मॅडम, आपण पोलिस कंम्प्लेंट करा.

**रतन पाटील :-**

हा ठराव मंजूर नाही. आपण या पदांना स्थगिती द्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मॅडम, जेव्हा सभागृहामध्ये कुठलेही आरोप करता आणि त्याठिकाणी....

**शिवप्रकाश भुदेका :-**

मॅडम, आपण पोलिस कम्प्लेंट करा. आपण सांगता ना ही आपली सही नाही.

**संगिता म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडमचा परवानगीने बोलते, आपली सही असेल तर आपल्यावर काय कार्यवाही केली जाईल.

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर मॅडम, मला रुलिंग पाहिजे.

**मा. महापौर :-**

माझी सभागृहाला विनंती आहे की, इतर ही पुढील विषय महत्त्वाचे आहेत. तर आपण सहीची चौकशी तज्ञाकडून करणारच आहोत. परंतु, पुढील ही विषय घेण्यात यावे.

**शशिकांत भोईर :-**

मॅडम, तत्पूर्वी मला खुलासा पाहिजे. आपल्याला रुलिंग दयायला सांगितले होते तर आपण रुलिंग देता का? मी जो प्रश्न विचारला होता त्याच्यावर मला रुलिंग पाहिजे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

मा. महापौर मॅडम, ही सही आपली नाही. ही सही खोटी आहे. याबाबत आपण पोलिस तक्रार करा.

**मा. महापौर :-**

नियमामध्ये तशी तरतुद आहे का, महापौरांनी सही केल्याशिवाय ठराव तसा पाठविता येतो का?

**शरद पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलत आहे. हा जो ठराव बदली झालेला आहे.....

**जोजफ घोन्सालविस :-**

मॅडम, याबाबत आपण पोलिस कम्प्लेंट करा. काही गरज नाही ओरिजनल ठरावाची. डायसवर पेपर दिलेला आहे. ज्यांनी दिला आहे ते सिद्ध करतील. काही गरज नाही ओरिजनल दयायची.

**हॅरल बोर्जीस :-**

ओरिजनल ठरावावर व्हाईटनर लावलेला आहे. ओरिजनल ठराव डायसवर आहे.

**जोजफ घोन्सालविस :-**

ते काहीही असू दे. पण पहिले पोलिस कम्प्लेंट करा.

**शरद पाटील :-**

मॅडम, प्रोसिडिंगमध्ये हा ठराव बदली केला आहे त्याच्यावर काय कार्यवाही?

**आसिफ शेख :-**

सन्मा. महापौर साहेबा, आपण सुरूवातीला सही केली असे म्हणता ना. मग त्या तुमच्या सहीवर व्हाईटनर कोणी लावले?

**मा. महापौर :-**

मी सही केलेली नाही. सही चुकीची आहे. सही कोणी केली म्हणून सचिवांना सांगितले की, त्याच्यावर व्हाईट इंक लावा. त्यांना मी माझ्यासमोर व्हाईट इंक लावायला सांगितले. मी सही केलेली नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सन्मा. सदस्य आसिफ शेख साहेब, आपण मा. महापौरांना खोटं ठरवू नका. परत परत तोच प्रश्न विचारु नका.

**मा. महापौर :-**

आम्ही तेच सांगत आहोत. मा. महापौर आणि मा. आयुक्त साहेब यांच्यात योग्यप्रकारे सुसंवाद झालेला नाही. त्यामुळे हा प्रकार झाला. जर सुसंवाद झाला असता तर हा प्रकार सभागृहासमोर आला नसता.

**जयंत पाटील :-**

अध्यक्ष महाशय, प्रश्न सुसंवादाचा नाही. प्रश्न असा आहे की, ठराव झाल्यानंतर ही प्रक्रिया कशी चालते ते आम्हाला सांगा. ठराव झाल्यानंतर ठरावाची कॉपी कोणाकडे जाते? तर सचिवांकडे जाते व सचिवांकडून सही घेण्यासाठी मा. महापौरांकडे जाते आणि महापौरांची सही झाल्यानंतर पुन्हा सचिवांकडे येते. मग ही जबाबदारी कोणाची आहें तर तुमची आहे, मधल्या काळात तुमच्या कस्टडीमध्ये सही कोणी केली? तुम्ही ती माहिती सांगा.

**नगरसचिव :-**

सही करून ठराव माझ्याकडे आला होता.

**जयंत पाटील :-**

ठराव झाल्यानंतर ठरावाची कॉपी आपल्याकडे आली.

**नगरसचिव :-**

साईन झाल्यानंतर.

**जयंत पाटील:-**

होय, ह्यांची सही झाल्यानंतर तुमच्याकडे कॉपी आली व आपल्याकडून महापौरांची सही घ्यायला गेली.

**नगरसचिव :-**

ज्यावेळी मी गेलो त्यावेळी त्या ठरावावर झालेली होती.

**जयंत पाटील :-**

आपल्या कस्टडीमध्ये ठराव असताना त्या ठरावावर सही कशी काय झाली?

**नगरसचिव :-**

अनुमोदक आणि सुचक या दोघांची सही झाल्यानंतरच हा ठराव आपल्याकडे आला आणि मा. महापौरांची ही सही होउनच माझ्याकडे ठराव आला होता.

**जयंत पाटील :-**

परत तुमच्याकडे तो ठराव आला होता. मग मधल्या काळामध्ये त्या गॅपमध्ये डयुप्लीकेट साईन झाली.

**मा. महापौर :-**

हे साईन घ्यायला आले नव्हते.

**नगरसचिव :-**

मी सही घ्यायला कोणाकडे ही गेलेलो नाही. साईन होउनच ठराव आला होता.

**जयंत पाटील :-**

आपल्याकडे लॉक एन्ट्रीमध्ये ठराव होता.

**नगरसचिव :-**

या तिन्ही साईन होउनच माझ्याकडे ठराव आला होता.

**जयंत पाटील :-**

मग मा. महापौर साहेबा सांगतात की, माझी सही डयुप्लीकेट केलेली आहे. ही अतिशय गंभीर बाब आहे.

**नगरसचिव :-**

माझ्याकडे सही करुन ठराव आलेला होता.

**जयंत पाटील :-**

खरं म्हणजे इतर विषय नसते तर त्या ठरावावर त्यांची सही कन्फम होईपर्यंत आम्ही सभा तहकूब केली असती परंतु, अनुदानाचा विषय आहे.

**शिवप्रकाश भुदेका :-**

उसने यह भी कोई बोलनेको तयार नही है की, मैंने महापौर मॅडम से साईन लिया है।

**मा. महापौर :-**

सभागृहाला विनंती आहे की, पुढील विषय घेण्यात यावा. सदर विषयावर चौकशी होईल. तरी आपण पुढील विषय घ्यावा.

**जयंत पाटील :-**

अन्यथा आपल्या सहीचे व्हेरीफिकेशन होईपर्यंत आम्ही सभा तहकूब करु.

**संगिता म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, आपण तिथे व्हाईट इंक लावायला का सांगितले. आपण तो ठराव येथे आणायला पाहिजे होते.

**मा. महापौर :-**

त्यावेळेस एवढी गंभीर बाब आहे हे वाटले नव्हते व ती माझी सही नव्हती म्हणून व्हाईट इंक लावायला सांगितले होते.

**संगिता म्हात्रे :-**

आपण व्हायटिंग लावायलाच नको होते. ते आता सभेला कळले असते.

**शिवप्रकाश भुदेका :-**

मॅडम, ऐसे कोई अधिकारी भी बोल नही रहा है की, मैंने आपसे सही ली थी और इसमे जो इतना पद ॲड करके लिया है वह अधिकारी कौन है। जिसने इस ठराव मे बदल किया वह अधिकारी कौन है? आप रुलिंग क्यो नही देते हो? इसमे पद की संख्या लिखी है वह आदमी कौन है?

**नितीन ठाकूर :-**

मा. महापौर मॅडम, आपली दर महिन्याला मा. महासभा होते. दर मा. महासभेमध्ये दहा-पंधरा ठराव पास होतात. एखादा नगरसेवक अनुमोदन देतो तर तर एखादा नगरसेवक सुचक म्हणून सही देतो. त्यानंतर महापौर सही करतात. तर ह्या सह्या घ्यायचे काम कोणता अधिकारी करतो? आज ४ वर्षामध्ये माझ्या मते ४०५ ठराव तरी पास झाले असतील. त्यात एखादा कोणतरी कॉमन अधिकारी असेल ना. अनुमोदक आणि सुचकाकडे जाउन सह्या घेणारा तो अधिकारी कोण आहे?

**शिवप्रकाश भुदेका :-**

मा. महापौर मॅडम, यह जो ठराव मे इतना बदल किया वह अधिकारी कौन है?

**मा. महापौर :-**

वही मालूम नही है ना, की वह कौन है?

**सुरेखा गायकवाड :-**

मॅडम, माहित नाही ना, तर शोधा. तो कोण अधिकारी आहे?त्याच्यावर योग्य ती कार्यवाही करा ना.

**जोजफ घोन्सालवीस :-**

मॅडम, हा आपला विषय नाही. हा संपूर्ण सभागृहाचा विषय आहे. आज प्रथम सही झाली हे आपल्या निर्दशनात आले. पण ह्याच्या अगोदर किती सह्या झाल्या असतील. आमचे ठराव कुठे गेले असतील. आम्ही तुमच्यावर विश्वास कसा काय ठेवायचा? जर आपण परस्पर आपली खोटी सही केलेली खोडायला लावता तर आम्ही विश्वास कसा ठेवायचा आणि आपण सांगता की, पुढचे सभागृहाचे काम चालू ठेवा. आमचा ह्याला आक्षेप आहे की, पुढचे काम चालू करु नका. इथे काम स्टॉप करा. ह्याची चौकशी करा. पोलिस कम्प्लेंट करा. रितसर त्याची कार्यवाही होउ दे. नंतर पुढचे काम चालू करा.

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, या विषयाला टेक्निकल मुद्दा आता समजलेला आहे. कोणताही ठराव जेव्हा सभागृहामध्ये येतो तेव्हा ठराव करणारा सुचक आणि अनुमोदन ह्या दोघांच्या सह्या होउन तो ठराव सचिवाकडे जातो आणि सचिव पिठासिन अधिकाऱ्यांची सही घेतो आणि स्वतःच्या ताब्यात ते कागदपत्र ठेवतो. हे बरोबर आहे का?

**नगरसचिव :-**

नाही. विभागप्रमुख या तिन्ही साईन घेउन तो ठराव माझ्याकडे आणतो.

**रिटा शाह :-**

ठिक आहे. तो ठराव आपल्याकडे देतो. कोणाचा विषय असेल तो विभाग प्रमुख आपल्याकडे साईन करुन तो ठराव आणून देतो. आपल्याकडे सुचक अनुमोदन आणि पिठासिन अधिकाऱ्याची सही होउन विषय

आपल्याकडे त्या अधिकाऱ्याने सुपूर्द केले. तो ठराव सुपुर्द केल्यानंतर त्या ठरावावर व्हायटिंग लावली कोणी? तुम्ही लावली का?

**नगरसचिव :-**

मा. महापौरांच्या समोर व्हाईट इंक लावली.

**रिटा शाह :-**

आपल्या ताब्यात असलेली वस्तू आपण कोणालाही कशाला दिली?

**नगरसचिव :-**

मा. महापौर मॅडमच समोर होत्या.

**रिटा शाह :-**

तुम्हाला त्याच्यात फेरबदल करण्याचा मला तुम्हाला किंवा कुठलाही नगरसेवक, वॉर्ड ऑफिसर की चिफ मिनिस्टर. एकदा सभागृहामध्ये जो ठराव झालेला आहे त्याच्यावर सह्या झाल्या आणि त्याच्यामध्ये फेरबदल करण्याचा कोणालाही अधिकार नाही.

**नगरसचिव :-**

मी ठरावामध्ये फेरबदल केलेला नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

सन्मा. सदस्या रिटा शाह मॅडम, त्याच्यामध्ये महापौरांनी फेरबदल केलेला आहे.

**नगरसचिव :-**

ठरावात मी फेरबदल केलेला नाही

**रिटा शाह :-**

मी ठरावाचे सांगत नाही. फेरबदल करायचा म्हणजे जो ठराव तुमच्याकडे आला तो ॲज इट इज तुमच्याकडे ठेवायला पाहिजे होता. तिथे व्हाईट इंक लावणे, ॲड लावणे, फेरबदल करणे याचा कोणताही अधिकार नाही. आपल्या संविधानामध्ये.

**नगरसचिव :-**

मॅडम, जो ठराव आला ना....

**रिटा शाह :-**

आपण मला सांगा, त्याच्यामध्ये व्हाईट इंक लावण्याचा अधिकार आपल्याला आहे का?

**शिवप्रकाश भुदेका :-**

सचिवजी आपके पास ठराव का कॉपी लेकर कौन आया?

**नगरसचिव :-**

फेरबदल होउन जो ठराव आला ना तोच ठराव आहे मी दुसऱ्या ठराव...

**रिटा शाह :-**

मी असे बोलते की, आपल्याला जो ठराव सुपूर्द झाला. त्याच्यावर व्हाईट इंक लावण्याचा अधिकार तुम्हाला आहे का?

**नगरसचिव :-**

फक्त महापौरांच्या साईनवर व्हाईट इंक लावली. आतमध्ये कुठेही व्हाईट इंक लावलेली नाही.

**रिटा शाह :-**

मा. महापौरांच्या साईनचे जेव्हा तुमच्याकडे आले तेव्हा तुम्ही त्यांना ठराव दाखवायला घेउन गेलात का?

**नगरसचिव :-**

मा. महापौरांनी सगळे ठराव बघायला मागितले. म्हणून मी ठराव घेउन गेलो.

**रिटा शाह :-**

आपल्याकडे त्यांनी ठराव बघायला मागितले. आता महापौरांनी काय बोलले की, ते आजारी होते आणि आपल्याकडून कोण अधिकारी हॉस्पिटलमध्ये त्या ठरावावर साईन घ्यायला गेले होते. मागे त्यांनी असे रुलिंग दिले. आता आपण बोलता की, सही होउन तो ठराव ऑलरेडी माझ्याकडे आला होता. असे सभागृहामध्ये दोन विधान झालेले आहे.

**नगरसचिव :-**

मा. महापौरांकडे हॉस्पिटलमध्ये साईन मागायला कोण गेले असतील हे त्यांना माहित असेल ना.

**शिवप्रकाश भुदेका :-**

यह विभाग का अधिकारी कौन है? जो यह ठराव पास हुआ है।

**रतन पाटील :-**

कुठेतरी एकच प्रश्न गरगर फिरल्यापासून होत आहे. मा. महापौरांनी सचिवांना स्वतः सांगितले की व्हाईट इंक लावा. तरी एकच विषय गरगर फिरवल्यासारखे का करता?

**मा. महापौर :-**

सदस्यांनी शांत बसावे.

**रतन पाटील :-**

एकच प्रश्न परत परत विचारता. मा. महापौर मॅडम स्पष्ट सांगत आहेत ना. मा. महापौरांनीच स्वतःच सांगितले सचिवांना व्हाईट इंक लावायला.

**शिवप्रकाश भुदेका :-**

आप उसका नाम बताईए ना। वह कौन अधिकारी है?

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, आपण त्या अधिकाऱ्याचे नाव सांगा.

**रतन पाटील :-**

मा. महापौरांनी सांगितले आहे व्हाईट इंक लावायला. सही घ्यायला कोण अधिकारी हॉस्पिटलमध्ये गेले त्यांचे नाव सांगा.

**रिटा शाह :-**

आपण त्या अधिकाऱ्याचे नाव द्या.

**शिवप्रकाश भुदेका :-**

सचिवजी यह विभाग का अधिकारी कौन है? आपके पास ठराव लेकर कौन आया?

**रतन पाटील :-**

मा. महापौरांनी स्वतः जाहिर केलेले आहे. आपला त्यांच्यावर विश्वास नाही का?

**शिवप्रकाश भुदेका :-**

मा. महापौर मॅडम, आप उस अधिकारी का नाम बताओ की, आपके पास यह ठराव लेकर कौन आया?

**रतन पाटील :-**

मा. महापौरांनी स्वतःच सचिवांना सांगितलेले आहे. जे आपल्याला सांगत आहे ते आपल्याला कळत नाही का?

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील व्हाईट इंक याच्यासाठी लावली की, त्या सहीचा गैरवापर होउ नये. सही केलेली आहे हे समजून पुढे ठराव जाउ नये. त्याकरिता व्हाईट इंक लावायला सांगितले होते.

**रिटा शाह :-**

मी तसे विचारत नाही. आपण दोन विधान करता. तुमच्याकडे हॉस्पिटलमध्ये जे अधिकारी आले आहेत त्यांचे आपण नाव द्या.

**मा. महापौर :-**

सर्व सदस्यांनी जागेवर बसावे.

**शिवप्रकाश भुदेका :-**

मा. महापौर मॅडम, यह विभाग का अधिकारी कौन है और यह ठराव आपके पास कौन लेकर आया?

**मा. महापौर :-**

दि. २०/६/०६ रोजीचा इतिवृत्तांत फक्त आजच्या या ठरावापुरता पेन्डींग ठेवून इतिवृत्तांत मंजूर करण्यात येत आहे. सचिवजी पुढील विषय घेण्यात यावा. कारण सभागृहाची वेळ संपत आलेली. पुढील विषय ही महत्त्वाचे आहेत.

**जोजफ घोन्सालवीस :-**

मॅडम, इतिवृत्तांत पुढचे मागे आणि मागचे पुढे गेलेले आहे. हे तुम्हीच आता सांगितले आहे व या इतिवृत्तांतामध्ये सुद्धा फरक झालेला आहे. पुढचे मागे गेले आहे आणि मागचे पुढे आले आहे. तर हा इतिवृत्तांत सुद्धा पास करु नका.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्य शशिकांत भोईर यांनी आपल्यासमोर ज्या सुचना ठेवल्या आहेत त्याच्यावर आपण रुलिंग द्या. तसेच सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे व सन्मा. सदस्य नयना म्हात्रे यांनी सुचक व अनुमोदन म्हणून ठराव मांडला आहे तर कृपया आपण याच्यावर रुलिंग द्यावे.

**मा. महापौर :-**

मा. महासभेमध्ये असा ठराव मांडता येत नाही.

**रोहित सुवर्णा :-**

मॅडम, हा आपल्यावर झालेला अन्याय आहे. प्रथम नागरिक म्हणून आपल्यावर झालेला हा अन्याय आहे, आमच्यावर नाही.

**मिलन म्हात्रे :-**

आपण असे करा की, आमचा ठराव आपण फेटाळा. काही वांदा नाही. पुढे आम्हाला सगळं स्वायत्त आहे. मी ठेवलेला ठराव का फेटाळला त्याकरिता आपल्याला टेक्निकल कारण द्यावे लागेल की, मी हा ठराव का फेटाळले? आपण तो यशस्वीरित्या ठराव फेटाळा नंतर आम्ही बघू काय ते? आम्हाला सगळी प्रायव्हसी आहे.

**रोहित सुवर्णा :-**

तो आमचा अधिकार आहे.

**मा. महापौर :-**

असा ठराव मांडता येत नाही.

**रोहित सुवर्णा :-**

मॅडम, आपण ठराव फेटाळा ना.

**मिलन म्हात्रे :-**

आपण कारण द्या आणि आपण आमचा ठराव फेटाळा हे असे असे आहे त्यामुळे आम्हाला फेटाळता येत नाही.

**रोहित सुवर्णा :-**

सन्मा. सदस्य शशिकांत भोईर यांनी मांडलेला जो विषय, जी सुचना आहे की, आजपर्यंत इतिवृत्तांताला मंजूरी नसताना मा. आयुक्त साहेबांना तो ठराव शासनाकडे पाठविण्याचा अधिकार आहे का? आणि त्यांनी एवढी घाई का केली? त्यांच्यावर का कार्यवाही करण्यात येउ नये. ह्याच्यावर आपण रुलिंग देत नाही. आपण त्यावर रुलिंग द्या. मॅडम, आज पहिल्यांदा आम्हाला बरं वाटत आहे की, आपण शिक्षिका आहात आणि आपण बरोबर ती चूक शोधून काढली आहे आणि हा आपल्यावर झालेला अन्याय आहे. असे असताना देखिल आपण त्याच्यावर रुलिंग देत नाही.

**शिवप्रकाश भुदेका :-**

आप नाम लिजीए ना आपके पास ठराव लेकर कौन अधिकारी आया? आप उसका नाम बोलिए ना।

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य रोहित सुवर्णाजी आपण जो विषय मांडलेला आहे. प्रथम आपण हे विषय मंजूर करुन घेउ आणि नंतर शेवटी आपल्या विषयाबद्दल चर्चा करण्यात येईल.

**रोहित सुवर्णा :-**

या इतिवृत्तांताच्या नंतर.

**सुधा गोयंका :-**

मा. महापौर मॅडम, चर्चा की बात नही है। सन्मा. सदस्य शशिकांत भोईरजी ने आपसे रुलिंग मांगी है। उनके प्रश्न के बारे मे रुलिंग दिजीए ना।

**मा. महापौर :-**

या विषयावर नंतर बोलण्यात येईल. पिठासिन अधिकारी बोलत आहे म्हणून आपण ऐकणार आहात. आपण जागेवर बसून घ्या.

**रोहित सुवर्णा :-**

मॅडम, आम्ही ऐकतो.

**मा. महापौर :-**

दि. २०/०६/२००६ रोजीचे इतिवृत्तांत तहकूब ठेवण्यात येत असून दि. २०/०७/२००६ रोजीचे इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे. पुढच्या विषयावर चर्चा करण्यात यावी. सचिवजी पुढील विषय वाचण्यात यावा.

**प्रकरण क्र. ७५ :-**

दि. २०/०६/२००६ व दि. २०/०७/२००६ रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. ५९ :-**

दि. २०/०६/२००६ रोजीचे इतिवृत्तांत तहकूब ठेवण्यात येत असून दि. २०/०७/२००६ रोजीचे इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. परशुराम पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ७६ चे वाचन केले.)

**रतन पाटील :-**

सचिव साहेब, पुढील विषयावर चर्चा करण्याकरिता मला वेळ दिलेली होती.

**रोहिदास पाटील :-**

मॅडम, आपण खोट्या सहीची तक्रार का करत नाही?

**आसिफ शेख :-**

सन्मा. महापौर साहेबा, आपण घेतलेल्या भूमिकेवर आपण ठाम राहावे. पुन्हा बदलता कशाला? आपण सांगितले आमची सही नाही. नंतर ओरिजनल कॉपीवर कोणीतरी व्हाईट इंक लावले आहे. विरोधी पक्षनेता परशुराम पाटील यांच्याकडे त्याची झेरॉक्स आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आसिफ शेख पुढील विषय महत्त्वाचे आहेत ते घ्यायला सांगितले आहे आणि मागील विषय झालेला आहे. आपण सभागृहाची दिशाभूल करू नका.

**सुधा गोयंका :-**

मॅडम, यह विषय पर चर्चा होना ज्यादा गरजे का है।

**मा. महापौर :-**

आपण काय बोलता हे आपल्याला कळते का? आपण खाली बसून घ्या. सचिवजी पुढील विषय वाचला का?

**आसिफ शेख :-**

मॅडम, असे वागून चालणार नाही.

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ७६ चे पुनःश्च वाचन केले.)

**रतन पाटील :-**

सचिव साहेब, मा. महापौरांनी मला मघाशी वेळ दिली होती.

**शिवप्रकाश भुदेका :-**

मा. महापौर मॅडम, आप उस अधिकारी का नाम बताईए की, वह कौन अधिकारी है, जो आपके पास ठराव लेकर आया। आपको नाम बताने मे क्या तकलिफ है?

**रोहिदास पाटील :-**

मॅडम, आपण पोलिस तक्रार देणार की, नाही देणार?,

**शिवप्रकाश भुदेका :-**

आपको चोर का नाम बताने मे तकलिफ है?

**रोहिदास पाटील :-**

आपण सांगा ना, मी पोलिस स्टेशनमध्ये तक्रार देणार.

**रतन पाटील :-**

मा. महापौर साहेबा, आपण मला या विषयावर बोलायला वेळ दिली होती.

**आसिफ शेख :-**

दिवाळीचे अत्यंत महत्त्वाचे असे कर्मचाऱ्यांचे विषय आपल्यापुढे आहेत. याची कल्पना, हे आपल्याला आता आठवले का? सकाळी ११.३० वा. काय झाले करायला आणि आता आम्हाला म्हणता की, आपण खाली बसा. मॅडम, आपले हे वागणे बरोबर नाही.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपण खाली बसा.

**आसिफ शेख :-**

मॅडम, आयुक्त साहेबांनी जे शासनाला पत्र पाठविले होते. ते पद शासनाला मंजूर....

**मा. महापौर :-**

आपण खाली बसावे. पुढचा विषय घेतलेला आहे. सभागृह नेते आपण सदर विषयाच्या ठरावाचे वाचन करावे. ठराव वाचत आहेत आपण नंतर बोला.

**रतन पाटील :-**

माईक बंद केले आहेत.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

सकाळी ११.०० वाजेपासुन आम्ही येथे सभेकरिता आलेलो आहोत. मॅडम, आपण माईक का बंद केले?

**आसिफ शेख :-**

मा. महापौर मॅडम, कृपया आपण लहान मुलासारखे करु नका. हे चुकीचे आहे. आयुक्त साहेबांना खुलासा करु द्या. म्हणजे सोक्षमोक्ष लागेल. आयुक्तांना सांगा खुलासा करायला.

**मा. महापौर :-**

पुढचा विषय पुकारलेला आहे आणि ह्या विषयाकरिता शेवटी दहा मिनिटे ठेवलेली आहेत. आपण नंतर बोलू.

**आसिफ शेख :-**

आपल्याला हे लवकर आठवले हे दुदैव आहे.

**मा. महापौर :-**

आपण ही उठून फार लवकर बोललात.

**शिवप्रकाश भुदेका :-**

मा. महापौर मॅडम, आपके पास हॉस्पिटलमे सही लेनेके लिए कौन गया था?

**रतन पाटील :-**

मा. महापौर साहेब, आपण मला परवानगी दिलेली आहे.

**रोहीदास पाटील :-**

सानुग्रह अनुदान द्यायला कोणी ही विरोध करणार नाही. सानुग्रह अनुदान वाढवून द्या असे आम्ही सांगणार. एक सेकंदामध्ये मंजुरी देवू त्याची आपण काळजी करू नका.

**हॅरल बोर्जीस :-**

सचिवजी प्रकरण क्र. ७६ चे वाचन केले का?

**नगरसचिव :-**

होय.

**हॅरल बोर्जीस :-**

प्रकरण क्र. ७६ रस्त्यांना नावे देणेबाबत.....

**रतन पाटील :-**

सन्मा. सदस्य हॅरल बोर्जीसजी आपण थांबा. मा. महापौरांनी मला बोलायला परवानगी दिलेली आहे. आपण मला बोलायला परवानगी द्या.

**मा. महापौर :-**

विषय झाल्यानंतर आपल्याला बोलायची परवानगी देण्यात येईल.

**रतन पाटील :-**

सगळे विषय आम्ही पास करू.

**मा. महापौर :-**

हा विषय झाल्यानंतर बोला.

**रतन पाटील :-**

हा विषय झाल्यानंतर का? मला बोलायचे आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपल्याला कोणत्या विषयावर बोलायचे आहे?

**रतन पाटील :-**

इतिवृत्तांतावरील मोबाईल टॉवरच्या संदर्भात मला बोलायचे आहे.

**मा. महापौर :-**

त्याच्यावरच चर्चा झाली आणि आपण आतापर्यंत बोललात ना.

**रतन पाटील :-**

कूठे, नाही बोललो? मोबाईल टॉवरच्या बाबत कुठे बोललो? त्या विषयावर मला मा. आयुक्त साहेबांचे निवेदन पाहिजे. त्यांनी सांगितले होते की, १५ दिवसामध्ये त्यांच्यावर कार्यवाही करू. तर त्याच्यावर कार्यवाही करु तर त्याच्यावर कार्यवाही झाली का? मला हेच विचारायचे आहे हे न विचारता इतिवृत्तांत मंजूर कसे? याच्यावर काय कार्यवाही झाली? आपण कार्यवाही करणार आहात की नाही?

**रिटा शाह :-**

महत्त्वाचा मुददा असा की मा. महापौर मॅडमची सही घ्यायला हॉस्पिटलमध्ये कोणता अधिकारी गेला. त्याचे आपण नाव दया.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आपण यावर रूलिंग द्या की, सदर बाबतची पोलिस स्टेशनमध्ये रितसर तक्रार करण्यात येईल. हा विषय आम्ही येथे थांबवितो.

**संगिता म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो की, सचिव साहेब, इतिवृत्तांत कायम झाल्याशिवाय दुसरा विषय घेता येतो का?

**प्रेमनाथ पाटील :-**

सचिव साहेब, इतिवृत्तांत मंजूर झाल्याशिवाय आपण दुसरा विषय घेउ शकतो का?

**नगरसचिव :-**
तो विषय पेन्डिंग ठेवलेला आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**
मग हे पण विषय आपण पेंन्डिंग ठेवणार का?

**हॅरल बोर्जीस :-**
प्रोसिडींगच्या विषयाबाबत सभागृहामध्ये....

**रोहिदास पाटील :-**
रस्त्यांना नाव देणे हा वेगळा विषय आहे. महत्वाचा नाही. सानुग्रह अनुदानाचा विषय असेल तर त्या विषयाला आमची सहानुभुती आहे. आम्हाला कोणत्या कर्मचाऱ्याला थांबवायचे नाही पण आपण रस्त्यांना नाव देणे ते काय महत्वाचे विषय आहेत का? नाव देवून आपण शहरामध्ये वाद घातली जे नाव दिले आहेत त्याचा एक बोर्ड जागेवर नाही.

**गजानन भोईर :-**
अनुदानाचा विषय घ्या.

**रतन पाटील :-**
अनुदान विषयाच्या बाबतीत कोणाचेही दुमत नाही.

**रोहिदास पाटील :-**
विषय पेन्डिंग ठेवला आहे तर रितसर पोलिस तक्रार करण्यात येईल असे आपण रूलिंग द्या.

**गजानन भोईर :-**
सानुग्रह अनुदानाचा विषय घ्या.

**रतन पाटील :-**
सानुग्रह अनुदानाचा विषय घ्या.

**शुभांगी नाईक :-**
सानुग्रह अनुदानाचा विषय पहिल्यांदा घ्या आणि मग हा विषय घ्या.

**शिवप्रकाश भुदेका :-**
सानुग्रह अनुदानाचा एकच विषय घ्या आणि आपण पोलिस स्टेशनमध्ये जाउन एफ.आय.आर द्या.

**शुभांगी नाईक :-**
मा. महापौर मॅडम, आपण पहिल्यांदा अनुदानाचा विषय घ्या आणि नंतर मग हा विषय चालू करा.

**रोहिदास पाटील :-**
अनुदानाचा विषय महत्त्वाचा आहे त्याला आमची सहानुभूती आहे.

**मा. महापौर :-**
हा विषय पेन्डिंग ठेवा.

**रतन पाटील :-**
सगळेच विषय पेन्डिंग ठेवा आणि अनुदानाचा विषय घ्या.

**शुभांगी नाईक :-**
पेन्डिंग नाही. सानुग्रह अनुदानाचा विषय झाल्यानंतर हा विषय घ्या पण विषय पेंन्डिंग ठेवू नका. अनुदानाचा विषय पहिला होउ द्या.

**शिवप्रकाश भुदेका :-**
मॅडम, हॉस्पीटल मे कौन आया? आप उसका नाम क्यो नही बता रहे है?

**मा. महापौर :-**
सभागृहातील सदस्यांनी मागणी केल्याप्रमाणे प्रकरण क्र. ७७ महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांना दिवाळी करिता सानुग्रह अनुदान देणे हा विषय प्रथम घेण्यात यावा.

**केशव घरत :-**
मा. महापौर मॅडम, हा विषय झाल्यानंतर प्रकल्पग्रस्त कामगार संबंधित जो विषय आहे तो विषय घेण्यात यावा.

**मा. उपमहापौर :-**
शहरामध्ये अतिशय गंभिर बाब आहे ती बाब आम्ही आपल्या निदर्शनात आणली होती आणि त्या विषयावर आम्ही हरकतीचा मुद्दा सादर केलेला आहे. मा. महापौर मॅडम, आपण या सदनाला आश्वासन दिले होते की, पाण्याबाबत विशेष सभा लावण्यात येईल आणि आज पाण्याच्या लाईनवर काम करण्याचे सहा कर्मचारी कामावर आणण्याचा विषय आपण घेता. म्हणजे सहा कर्मचाऱ्यांना कामावर लावणे हा विषय महत्वाचा की, शहराला पाणी पुरवठा करून देणे हा विषय महत्वाचा आहे आणि या विषयावरून आम्ही आपल्या निदर्शनास आणले होते की, संपूर्ण सभागृहाने या विषयाचे स्वागत केले होते आणि आपण आश्वासित केले होते. आज या सदनासमोर फक्त तीन विषय होते आणि या तीन विषयामध्ये या पाण्याच्या विषयावर चर्चा

करण्यासाठी अतिशय चांगली संधी आपल्याला प्राप्त झालेली होती. विशेष सभा जरी लावली नसती तरीपण पाण्याच्या विषयावर आज चर्चा झाली असती. या विषयामध्ये आपल्याला आज चर्चा करायची आहे की, याच्यापुढे कधी करायची आहे. हे आपण सभागृहासमोर कथन केल्याशिवाय पुढच्या विषयाचे कामकाज आपण करू नये अशी विनंती आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. महापौर मॅडम, सन्मा. उपमहापौरांनी मागच्या मा. महासभेमध्ये पाण्याच्या प्रश्नावर लक्षवेधी उपस्थित केल्यानंतर जवळ जवळ दोन ते तीन तास पाण्याच्या विषयावर सांगोपांग चर्चा घडवून आपण सभागृहाला तशापद्धतीचे रूलिंग दिले होते. तर आगामी काही दिवसामध्ये तातडीची पाण्याविषयी बैठक, मा. महासभा आपण बोलावणार आहोत. परंतु, काही अपरिहार्य कारणास्तव ती बैठक लावू शकलो नाही. तरी सभागृहाच्या वतीने मी आपणांस विनंती करतो की, सदर पाण्याच्या संदर्भामध्ये आगामी दोन-तीन दिवसामध्ये आपण पाण्यासाठी एक विशेष बैठक बोलावून पाण्याच्या विषयावर खास सभा लावावी.

**मिलन पाटील :-**

ही सभा दिवाळीच्या अगोदर लावावी.

**शरद पाटील :-**

येत्या दोन दिवसामध्ये ही सभा लावण्यात यावी.

**रोहिदास पाटील :-**

नियमानुसार सभा लावावी लागणार आहे ना. खास सभा लावण्यासाठी जो पिरियड आहे त्याच पिरियडमध्ये सभा लावावी लागणार ना.

**मा. उपमहापौर :-**

तीन दिवसाचा कालावधी पाहिजे.

**हॅरल बोर्जीस :-**

अत्यावश्यक बाब म्हणून पाण्याच्या विषयावर खास सभा आपण आगामी काही दिवसामध्ये आयोजित करावी. अशी सभागृहाच्या वतीने मी आपणांस विनंती करतो आणि विषयपटलावर जे पुढील विषय आहेत तर कृपया, आपणाला विनंती करतो की, दिवाळीचा सानुग्रह अनुदानाचा जो विषय आहे त्याबाबतीमध्ये आपण सचिवांना पुढील आदेश द्यावेत.

**मा. महापौर :-**

सभागृहामध्ये मा. उपमहापौर यांनी पाण्याच्या विषयावर हरकतीचा मुद्दा सादर केलेला आहे. पाणी पुरवठा विषयाशी संबंधित आजच्या मा. महासभेपुढे आमचे सहकारी व सहयोगी पक्षातर्फे हरकतीचा मुद्दा मांडण्यात आलेला आहे. सदर मुद्याचे संक्षिप्त पुढीलप्रमाणे आहे. मागील सभेत पाणी पुरवठा विषयावर सन्मा. सहकारी पक्ष उपमहापौर यांनी एक लक्षवेधी मांडली होती या लक्षवेधीवर चर्चा घडवून आणून शहरातील पाणी टंचाई यावर लवकरच एक विशेष सभा लावून सविस्तर चर्चा करण्यात येईल असा निर्णय ही देण्यात आलेला होता. तथापि, सतत पत्रव्यवहार केल्यानंतर सदर जलसंपदा मंत्री ना. अजितदादा पवार यांच्या दालनामध्ये ३ तारखेला ही सभा झाली होती आणि यासभेमध्ये ३५ एम.एल.डी. पाण्याच्या मागणी उचलून धरण्यात आली आणि त्यांची येत्या काळात लवकरच पुर्तता करण्यात येईल. त्यासाठी येणारा जो खर्च आहे तो दिड कोटी रूपये खर्च असेल. तेथील एम.आय.डी.सी. व स्टेमचे जे अधिकारी आले होते त्यांनी सांगितले होते. तथापि, हा विषय उघड व सरळ आहे. हा विषय आमच्या सहकारी सहयोगी पक्षाच्या सदस्य बांधवांना जेवढा जिव्हाळयाचा वाटतो. तेवढाच सर्व सभागृहातील सन्मा. सदस्यांना ही या विषयामध्ये जिव्हाळ्याने, आत्मियतेने, पोटतिकडीने बोलतात. कारण पाण्याचा प्रश्न हा आवश्यक बाब असल्यामुळे प्रत्येकाला पाणी देणे हे गरजेचे आहे आणि आजची सभा लावली होती ती कर्मचाऱ्यांच्या सानुग्रह अनुदानासाठी महत्वाची, तातडीची बैठक म्हणून लावली होती. तसेच, त्याबरोबर विषयपटलावर महत्वाचे दोन विषय आले तेही घेण्यात आले. मागील पेंन्डिंग विषय होते, तहकूब विषय होते. ते विषय या सानुग्रह अनुदानाच्या विषयासोबत घेण्यात आले. त्यामुळे पाण्याची विशेष सभा त्याच्यामध्ये आयोजित केली नाही. पुढील या दोन ते तीन दिवसामध्ये लगेंच पाण्याच्या संदर्भात जे आपल्याला जलसंपदा यांच्याकडून मिनिट्स आलेले आहे, ते विषय आणि पाण्याची शहरातील टंचाई दूर करण्यासाठी लवकरच विशेष सभा लावून पाण्याची टंचाई दुर व्हावी म्हणून तोडगा काढला जाईल. धन्यवाद.

**रोहिदास पाटील :-**

या सभेमध्ये कामकाजाच्या दृष्टीने आवश्यक ते सगळ्या परवानगीचे विषय ठेवा. आर्थिक तरतूद, तांत्रिक तरतुद हे सगळे विषय घ्या. नाहीतर पाण्यासाठी खास सभा लागून जाईल आणि विषय बाकी राहिले तर पुन्हा सभा लावावी लागेल आपण दोन महिन्यात ते काम पुर्ण करायचे आहे.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौरांना विनंती आहे की, पाणी पुरवठा अत्यंत जिव्हाळ्याचा, तातडीचा विषय आहे आणि आपण मोठ्या मनाने लवकरात लवकर सभा घेण्याचे सभागृहाला आश्वासित करत आहात. परंतु, माझी सभागृहाला नम्र विनंती आहे की, या कामी आवश्यक तो अधिकारी वर्ग, खातेप्रमुख आहेत त्या सर्वांना या

सभेसाठी हजर करण्यासाठी प्रयत्न करा. कारण नंतर असे होईल की, स्टेमच्या अधिकाऱ्यांचे मत निराळे पडेल, एम.आय.डी.सी. वाल्यांचे मत निराळे पडेल आणि आपल्याला एकमुखी निर्णय घेण्यासाठी जी पार्श्वभूमी तयार करावी लागेल त्याला मदत होणार नाही म्हणून कृपया माझ्या सुचनेचा आपण विचार करावा.

**मिलन पाटील :-**

१७ तारखेला सभा लावा.

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलत आहे की, आपण जो पाणी पुरवठ्याचा प्रश्न घेणार आहोत व जी विशेष सभा लावणार आहात त्यामध्ये तांत्रिक बाबी काय आहेत हे आपण आपल्या प्रशासनाकडून विचारून घ्या. कारण कुठे पाणी चोरी होते, आपल्याला पाणी मिळत नाही, कुठे मिटर बंद आहे ते मिटर कसे सुरू होणार? एम.जी.पी. चे अधिकारी आपल्याला कुठून जॉईन्ट देणार आहेत. त्याचा सविस्तर अभ्यास करून त्याला आर्थिक व प्रशासकिय असे किती पैशांची मंजूरी लागेल त्याची ही विचार करावा आणि ज्या ज्या एरियामध्ये २४ तासाने पाणी जात असेल तर त्यांना संपुर्ण मिरा भाईंदरमध्ये एकावेळेला कसे पाणी मिळेल. याचा ही आपण गोषवाऱ्यातर्फे, सर्व नगरसेवकांना माहिती द्यावी. अशी मी सुचना मांडत आहे.

**मा. महापौर :-**

सचिवजी पुढील विषय घेण्यात यावा.

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ७७ चे वाचन केले.)

(सन्मा. सदस्य हॅरल बोर्जीस यांनी प्रकरण क्र. ७७ चा ठराव सभागृहासमोर वाचून दाखविला.)

**एस. ए. खान :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, हा इतका जिव्हाळ्याचा विषय असताना आपण सदस्यांना टिपणी देण्याचे नाकारले. यात आपला काय हेतू आहे? आम्हाला गोषवारा दिलेला नाही. आम्हाला असे वाटले होते की सभागृहामध्ये जाताना गोषवारा मिळेल. तेव्हाही नाही. आता ही नाही. सन्मा. हॅरल बोर्जीस साहेबांनी ठराव वाचले आणि त्यावर लगेच उत्तरही दिले. वाटणी करून दिली.

**संजय पांगे :-**

गोषवारा नसताना कसे काय करायचे?

**रोहिदास पाटील :-**

गेल्यावर्षी जे अनुदान दिले होते त्याच्यात किती वाढ केली असे जे चांगले असेल ते द्या. साडेपाच पावणे सहा हजार रूपये देउ शकता तर द्या. गेल्यावर्षी सानुग्रह अनुदान किती होते?

**हॅरल बोर्जीस :-**

गेल्यावर्षी कर्मचाऱ्यांना ....

**रोहिदास पाटील :-**

सभागृहात आपण आमच्या तब्येतीची, कामकाजाची सगळ्याची काळजी घेतली पाहिजे.

**गजानन भोईर :-**

आपण आपल्यासाठी निधी वाढवला. आपला पगार वाढवला तर त्यांना वाढवा आणखीन दोन हजार रूपये जास्त.

**हॅरल बोर्जीस :-**

२००५-०६ साली आपण अंदाजपत्रकामध्ये ७० लाखची तरतुद केलेली. त्यापैकी ६३-७१ लाख रूपयाचा आपण विनियोग केला होता आणि २००६-०७ साली ७० लाखाची तरतुद केलेली आहे. त्यापैकी ६९ लाख ६६ हजार ९०० रूपये, तर आपण प्रत्येक कर्मचारी, अधिकारी, लिपिक, शिक्षिका, बालवाडी, शिक्षिका, ठोक वेतन, प्रतिनियुक्ती असे सगळ्यांना सरसकट तीनशे रूपयाची वाढ मागच्या वर्षापेक्षा तीनशे रूपयाची सरसकट सगळ्यांनी वाढ करत आहोत.

**रोहिदास पाटील :-**

तुमची वाटणी कशी झाली?

**शरद पाटील :-**

आपण आम्हाला त्याचा गोषवारा का दिला नाही?

**रोहिदास पाटील :-**

५ हजार ६०० रूपयांनी वाटणी होत आहे. आपले कॅल्क्युलेशन कसे आहे?

**हॅरल बोर्जीस :-**

१ हजार ३०७ अधिकारी - कर्मचारी - लिपिक आहेत. गेल्यावर्षी आपण ४ हजार ५०० रूपये दिले होते. यंदा आपण ४ हजार ८०० रूपये देत आहोत. तर एकूण झाले ६२ लाख ७३ हजार ६०० रूपये शाळेच्या शिक्षिका १९५ आहेत.

**रोहिदास पाटील :-**

५ हजार ६०० रुपयांनी वाटणी केली तरी बरोबर होत आहे. आपण परत बघा आपले कुठेतरी चुकत आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

नाही.

**रोहिदास पाटील :-**

आपल्याला ७० लाख रूपये पुर्ण करायचे आहे ना. तर बघा आपले कुठेतरी चुकले असेल.

**हॅरल बोर्जीस :-**

आपण गेल्यावर्षी ६३ लाख ७१ हजार रूपये खर्च केला. फक्त ६ लाख २९ हजार रूपये शिल्लक राहिले. त्यापैकी आपण प्रत्येकाचे तीनशे रूपये वाढवून त्याचा विनियोग केलेला आहे.

**शिवप्रकाश भुदेका :-**

सोबत सर्वांना गोषवारा द्यायला पाहिजे होता ना.

**रतन पाटील :-**

साहेब, गोषवारा दिलेला नाही.

**शुभांगी नाईक :-**

आपण आम्हाला गोषवारा का दिला नाही? गोषवारा द्यायला पाहिजे होता आणि ४ हजार ८०० रूपये देण्यापेक्षा ६ हजार रूपये करावे. गेल्यावर्षी गोषवारा दिलेला होता. यावर्षी गोषवारा का दिला नाही?

**संजय पांगे :-**

मॅडम, आपण आम्हाला गोषवारा का दिला नाही?

**शुभांगी नाईक :-**

गोषवारा द्या म्हणजे समजेल ना आणि आपले कर्मचारी एवढे चांगले काम करतात त्यांना आपण अनुदान वाढवून द्या ना.

**रतन पाटील :-**

वर्ग - १ मध्ये इतके कर्मचारी आहेत, वर्ग - २ मध्ये इतके कर्मचारी आहेत, वर्ग - ३ मध्ये इतके कर्मचारी आहेत असे आपण गोषवाऱ्यामध्ये द्यायला पाहिजे होते. बालवाडी शिक्षिका इतक्या आहेत. शाळेतील शिक्षिका एवढ्या आहेत असे द्यायला पाहिजे होते पण काहीच दिलेले नाही.

**शुभांगी नाईक :-**

कर्मचाऱ्यांना आपण सानुग्रह अनुदान देत आहोत आपण महागाईचा तरी विचार केला पाहिजे.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर मॅडम, एक सुचना करावीशी वाटते की, सभागृहाला योग्य वाटले तर सभागृहाने निर्णय घ्यावा. परंतु, मला बोलावेसे वाटते की, या महापालिकेमध्ये जे कर्मचारी कार्यरत आहेत त्यांना आपण सानुग्रह अनुदान देवून त्यांची दिवाळी चांगल्या रितीने साजरी करीत आहोत. परंतु, या शहरामध्ये स्वच्छता ठेवण्याचे काम जे अस्थायी कर्मचारी करतात. त्यांना देणे लागत नाही. आपण त्यांना देवू शकत नाही. परंतु, ते ज्या ठेक्यामध्ये काम करतात तर किमान महापौर म्हणून, आयुक्त म्हणून आपण संबंधित ठेकेदाराला त्या संदर्भात सुचना द्याव्यात. शहर स्वच्छ आणि सुंदर राखण्याचे काम ते करतात. किमान एक महिन्याचे वेतन किंवा आपल्याला जो पर्याय योग्य वाटला तो पर्याय आपण एक माणूसकिचा दृष्टीकोन म्हणून त्यांच्यासमोर ठेवा आणि त्या कर्मचाऱ्यांची सुद्धा दिवाळी आनंदात साजरी होईल याचा निश्चितपणे विचार करावा. मला असे वाटते की, येथे सभागृहातील सर्वांची पण हीच भावना असेल. त्यांची हरकत नसेल. ते ठेक्यावर जरूर आहेत. त्यांना ठेकेदाराने द्यावे. आपण बोला, माणुसकीचा दृष्टीकोन ठेवून बोला. आपण संबंधित ठेकेदाराशी त्या संदर्भात बोलणी करा.

**शुभांगी नाईक :-**

मा. महापौर मॅडम, आपण ठेकेदारांबाबत असे सांगितले होते की, आम्ही ठेकेदारांना एक-एक हजार रूपये सानुग्रह अनुदान द्यायला सांगणार आणि सन्मा. सदस्य प्रकाश दुबोले साहेबांनी हा प्रस्ताव मांडला होता आणि गेल्यावर्षी त्या ठेकेदाराने एकाही कर्मचाऱ्याला अनुदान द्यायचे. पण ते अनुदान दिले गेले नाही. आपण एक-एक हजार रूपये कबूल केले होते. अनुदान द्यायचे पण ते अनुदान दिले गेले नाही. आपण ठकेदारावर कार्यवाही का करत नाही?

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आपण याबाबतीत काही निर्णय घेणार आहात का?

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्यांना सांगू इच्छितो की, कालच मी जेवढे सफाई कामगारांचे ठेकेदार आहेत त्यांना बोलावले होते आणि काल संध्याकाळच्या वेळेस मी त्यांना सर्व सुचना दिलेल्या आहेत की, महापालिका जशी

कर्मचाऱ्यांना बोनस देते त्याप्रमाणे आपण आपल्या कर्मचाऱ्यांना बोनसची रक्कम द्यायला पाहिजे आणि त्यांनी ते मान्य केलेले आहे.

**शुभांगी नाईक :-**

साहेब, गेल्यावर्षी मान्य करून सुद्धा अनुदान दिले गेलेले नाही त्याचे काय? मग दोन्ही वर्षाचे मिळून त्यांना एकदम रक्कम द्या. ठेकेदारांना गेल्यावर्षीचे आणि ह्या वर्षीचे असे दोन्ही वर्षाचे अनुदान द्यायला लावा.

**परशुराम पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो की, ठेका पद्धतीने जे दिलेली काम आहेत. त्यांना त्या कर्मचाऱ्यांना अनुदान देण्याचा प्रश्न उभा राहत नाही.

**शिवप्रकाश भुदेका :-**

आयुक्त साहेब, आप सब ठेकेदारो कोआपके पास पैसा लेकर बुलाओ।

**मा. महापौर :-**

महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांबरोबर शहरातील सफाई करणाऱ्या कर्मचाऱ्यांनाही सानुग्रह अनुदान मिळावे म्हणून गेल्या वर्षी सुद्धा सर्व ठेकेदारांची महापौर दालनामध्ये सभा बोलावली होती आणि त्यावेळेस सर्वांनी १-१ हजार रूपये त्यांना सानुग्रह अनुदान बोनस म्हणून द्यायचे कबुल केले होते. परंतु, नंतर अशी माहिती मिळाली की, ठेकेदारांकडून अशी कुठलीही पुर्तता केलेली नाही. त्यामुळे उद्या, या ठेकेदारांनी पुन्हा एकदा महापौर दालनामध्ये बोलावून घेउन योग्य ती समाधानकारक रक्कम हे जे सफाई कामगार आहेत व इतर जे कामगार आहेत त्यांना मिळावी अशी आम्ही त्यांच्यापुढे सुचना ठेवू.

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौर मॅडम, गेल्यावर्षी त्या ठेकेदारांनी आपल्या दालनामध्ये कमिटमेंन्ट केले होते आणि त्यांनी तुम्हाला प्रॉमिस केले की, आम्ही कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान देवू. परंतु, आपल्याला दिलेला शब्द त्यांनी पाळला नाही. कृपया, यावर्षी आपण ठेकेदारांना तशाप्रकारच्या सुचना द्याव्यात.

**शिवप्रकाश भुदेका :-**

मा. आयुक्त साहेब, सब ठेकेदारोसे पैसा मांगके आपके पास रखो और सब लेबर को आप पैसा दिजीए। नही तो वो ठेकेदार बेईमानी करेगा।

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलत आहे. गेल्या वर्षी ठेका पद्धतीचे जे कामगार आहेत जसे झाडू कामगार जे नालेसफाई करतात त्यांना ठेकेदाराने फक्त २५० रूपये दिलेले आहेत. काही लोकांना तर मिठाई देखिल दिलेली नाही आणि त्याच्या पुढच्या वर्षी ताट आणि चमचा दिला होता. तर तसे होता कामा नये. मॅडम, माझ्या ४ नंबर वॉर्डामध्ये सुहास रकवी हा ठेकेदार आहे. त्या ठेकेदाराने बायकांना साड्या वाटल्या पोरांना कपडे वाटले. शिवाय त्यांना बोनस देवून मिठाई देखिल दिली. पण बाकीच्या वॉर्डामध्ये तसे होत नाही. आपण महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांना बोनस वाढवून दिला पाहिजे हे ठिक आहे. परंतु, यांच्यापेक्षा जास्त काम हे सफाई कामगार करतात. ते शहराची साफसफाई करतात म्हणून पहिला विचार त्यांचा करा. नंतर ह्यांचा विचार करा. मी ह्यांच्या विरोधात नाही. पण पहिला विचार आपण त्यांचा करा.

**मा. महापौर :-**

सदर विषयाबाबत दालनामध्ये बैठक बोलावून निर्णय घेण्यात येईल.

**नयना म्हात्रे :-**

मॅडम, अडीचशे रूपये दिले म्हणून यावर्षी आठशे रुपये नको. त्यांना हजार रूपये सांगितले की आठशे रूपये तरी मिळतील.

**रतन पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलत आहे की, कमर्चाऱ्यांना अनुदान देण्यासंदर्भाचा प्रस्ताव येथे आहे. मागच्या वर्षी आपण सर्व कर्मचाऱ्यांना ४५००/- रूपये दिले होते. त्यावेळेला सुद्धा ७० लाखाची तरतुद होती. पण मागच्यावेळेला ही आपले कर्मचारी वाढले होते. आम्ही बजेटच्या सभेमध्ये १ कोटी रूपयाची तरतुद केली होती. पण हे ७० लाख रूपये नाही. मला वाटते की, ह्याच्यामध्ये १ कोटी रूपयाची तरतुद आहे. यावर्षी कर्मचारी वाढणार आहे म्हणून १ कोटी रूपयाची तरतुद केलेली आहे. आपण त्यांना ४५००/- रूपयामध्ये ३००/- रूपये वाढवत आहात. याच्यात वाढ व्हायला पाहिजे आपले कर्मचारी निश्चित जे काम आहे ते काम चांगल्याप्रकारे आहे. त्यांना आपण जास्तीत जास्त अनुदान द्यायला पाहिजे माझी अशी सभागृहाला विनंती आहे की, त्यांना आपण जास्तीत जास्त अनुदान द्यायला पाहिजे माझी अशी सभागृहाला विनंती आहे की, त्यांना ५५००/- रूपये अनुदान द्यावे. ५५००/- रूपये कर्मचाऱ्यांना अनुदान द्यावे त्याचबरोबर आपले परिवहन सेवेतील ते ठेकेदाराच्या ठेक्यामध्ये असतील पण ते जे परिवहन सेवेमध्ये असतील त्यांना सुद्धा ठेकेदाराकडून त्या कर्मचाऱ्यांना सुद्धा अनुदान देण्यात यावे असे मा. महापौर मॅडमना विनंती करतो आणि अशापद्धतीने सर्वांना जे ठेक्यामध्ये आहेत त्या सर्व कर्मचाऱ्यांना अनुदान देण्यात यावे.

**मा. महापौर :-**

सचिवजी, पुढील विषय घेण्यात यावा.

**प्रकरण क्र. ७७ :-**

महानगरपालिका कर्मचाऱ्यांना दिवाळी करिता सानुग्रह अनुदान देणे बाबत.

**ठराव क्र. ६१ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या कर्मचारी कामगार संघटनानी कर्मचाऱ्यांना दिवाळीपुर्वी बोनस व सानुग्रह अनुदान देणेबाबत विनंती केलेली आहे. परंतु मागील पाच वर्षपासुन शासनाने कर्मऱ्यांना बोनस देण्याचे बंद केलेले असून महानगरपालिका कर्मचारी ॲक्टनुसार बोनस मिळण्यास पात्र नाही. त्यामुळे महानगरपालिका कर्मचाऱ्यांना बोनस शासनाच्या निर्णयाशिवाय देता येत नाही. मात्र या संदर्भात नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्ीकडील पत्र क्र. जीईएन-१०९७/प्र.क्र२६७/नवि-२४, दि. २७/११/२००२ च्या अनुषंगाने दि. ३१/१०/२००२ रोजी श्री. महाबळ शेट्टी, निमंत्रक महाराष्ट्र राज्य, महानगरपालिका कामगार कर्मचारी संघटना व इतर यांच्या मागण्या बाबत मा. मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य, यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या बैठकीतील कार्यवृत्तामध्ये नमुद केल्याप्रमाणे महानगरपालिका स्तरावर आर्थिक परिस्थिती नुसार सानुग्रह अनुदान किती द्यावे याबाबत निर्णय घेण्यात यावा. मात्र राज्य शासन महानगरपालिका कर्मचाऱ्यांना वेतनासाठी कोणत्याही प्रकारचे अनुदान देत नसल्यामुळे सानुग्रह अनुदान देण्याबाबत निर्णय घेण्यासाठी महानगरपालिकेने राज्य शासनाची पुर्ण परवानगी घेण्याची आवश्यकता नाही.

सन २००५ चे वर्षासाठी महानगरपालिकेच्या महासभेत महानगरपालिका कर्मचाऱ्यांना फक्त सानुग्रह अनुदान देण्याबाबत ठराव पारित करण्यात येउन वर्ग - १ ते वर्ग - ४ च्या कर्मचाऱ्यांना रु. ४५००/- प्रदान करण्यास तसेच रोजंदारी कर्मचारी व सुवर्णजयंती रोजगार योजनेचे कर्मचारी यांना प्रत्येकी रु. २५००/-, बालवाडी शिक्षिका यांना रु. १०००/- तसेच महानगरपालिका शिक्षकांना रु. २७००/- सानुग्रह अनुदान मंजूर करण्यास मंजुरी दिली होती. दिवाळी निमित्त या वर्षी २००६ मध्ये कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान मिळणेबाबत कामगार संघटनांनी मागणी केलेली आहे.

सन २००६-०७ यावर्षाच्या अंदाजपत्रकात लेखाशिर्ष ''फ'' संकिर्ण मध्ये एकूण रु. ७० लाख इतकी सानुग्रह अनुदानासाठी तरतुद केलेली आहे. सदर तरतुदीपैकी वर्ग - १, वर्ग - २, वर्ग - ३ व वर्ग - ४ यांना रु. ४८००/- व रोजंदारी व सुवर्णजयंती रोजगार योजनेच्या कर्मचाऱ्यांना तसेच ठोक वेतन व मानधनावरील कर्मचाऱ्यांना रु. २८००/-, महानगरपालिका शिक्षकांना रु. ३०००/- व बालवाडी शिक्षकांना रु. १३००/- दिवाळी निमित्त सानुग्रह अनुदान देणेस मा. महासभेची मंजूरी देण्यात येत आहे.

## मिरा भाईंदर महानगरपालिका कर्मचारी वर्गास सानुग्रह अनुदान

### वर्ष - २००५-०६

| अ.क्र. | कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांचा तपशिल | गेल्यावर्षी वाटप केलेले अनुदान | | | अंदाजपत्रकातील तरतुद | प्रत्यक्ष खर्च |
|---|---|---|---|---|---|---|
| | | कमर्चारी संख्या | अनुदान रक्कम | एकूण | | |
| १. | अधिकारी / कामगार लिपिक | १२५५ | ४५०० | ५६,४७,५०० | ७०,००,०००/- | ६३.७१ लाख |
| २. | डेप्युटेशन अधिकारी | १२ | ४५०० | ५४०० | | |
| ३. | इतर कर्मचारी<br>बालवाडी शिक्षिका | २७ | १००० | २७,००० | | |
| | सुवर्ण जयंती | २ | २५०० | ५,००० | | |
| | आरेग्य वैद्यकिय कर्मचारी | ३४ | २५०० | ८५,००० | | |
| | ठोक वेतन (वाहनचालक व इतर) | ५ | २५०० | १२,५०० | | |
| ४. | महानगरपालिका शिक्षक | २०० | २७०० | ५,४०,००० | | |
| | एकूण कर्मचारी | १५३५ | -- | ६३,७१,००० | | |

### वर्ष २००६-०७

| अ.क्र. | कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांचा तपशिल | गेल्यावर्षी वाटप केलेले अनुदान | | | अंदाज पत्रकातील तरतुद | अपेक्षित वाढ (रू. ३०० प्रमाणे) | एकूण खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कर्मचारी संख्या | अनुदान | एकूण | | | |
| १ | अधिकारी/कर्मचारी /लिपिक | १३०७ | ४५०० | ५८,८१,५०० | ७०,००,०००/- | ४५००+३००= ४८०० | ६२,७३,६००/- |
| २ | शाळेच्या शिक्षिका | १९५ | २७०० | ५,२६,५०० | | २७००+३००= ३००० | ५,८५,०००/- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | बालवाडी शिक्षिका | २७ | १००० | २७,००० | | १०००+३००= १३०० | ३५,१००/- |
| ४ | सुजयो ठोक वेतन | २ | २५०० | ५,००० | | २५००+३००= २८०० | ५,६००/- |
| ५ | महानगरपालिका ठोक वेतन | ७ | २५०० | १७,५०० | | २५००+३००= २८०० | १९,६००/- |
| ६ | प्रतिनियुक्ती | १० | ४५०० | ४५,००० | | ४५००+३००=४८०० | ४८,०००/- |
| | **एकूण खर्च** | १५४८ | -- | ६५,०२,५००/- | | -- | ६९,६६,९००/- |

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. एस. ए. खान.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ७६ चे वाचन केले.)

**केशव घरत :-**

मा. महापौर मॅडम, माझे असे म्हणणे आहे की, वेळ संपत आलेली आहे आणि जसा जिव्हाळ्याचा प्रश्न पाणी, पाणी सगळीकडे चालले आहे. पण जे पाणी येण्यासाठी लागणारी जी पाईप लाईन टाकण्यासाठी लागणारी जागा आहे. ती जागा ज्या शेतकऱ्याने दिलेली आहे. त्या शेतकऱ्यांचा, प्रकल्पग्रस्तांचा जो प्रश्न आहे तो प्रश्न अगोदर घेण्यात यावा. अशी माझी सभागृहाला विनंती आहे.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, ज्या बी.एस.ई.एस. कंपनीने ज्यांच्या शेतामध्ये टॉवर टाकले आहेत. त्या लोकांना बी.एस.ई.एस. कंपनीने कामाला घेतले आणि आल आपल्या मिरा भाईंदरमध्ये जे पाणी येते त्यांच्या शेतामधून पाईपलाईन आलेली आहे. त्यांचा पहिला विचार करण्यात यावा. कारण त्यांना कामाला घ्यावे अशी माझी प्रामाणिक इच्छा आहे.

**मा. महापौर :-**

सभागृहातील सदस्यांनी मागणी केल्याप्रमाणे ७९ क्रमांकाचा विषय घण्यात यावा. काजुपाडा ते घोडबंदर येथे ५० एम.एल.डी. वाढीव पाणीपुरवठा पाईप लाईन टाकणे कामी जागा दिलेल्या प्रकल्पग्रस्तांना महानगरपालिकेच्या आस्थापनेवर कायमस्वरूपी नेमणूक देणेबाबत हा विषय प्रथम घेण्यात यावा.

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ७८ चे वाचन केले.)

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, या विषयाची टिपणी नाही आणि आपण विषय कसा काय मांडला? आमच्या जवळ टिपणी नाही. कोण प्रस्थावित आहेत, कोण आहे? ह्याची सभागृहाला माहिती नाही. ठिक आहे. अनुदानाचा विषय आहे. दिवाळीचा बोनस आहे. ७० लाखाची तरतुद आहे. पण माणसे कोण आहेत? उद्या हाच प्रकार पुन्हा घडणार आहे. जे प्रस्थावित नाहीत त्यांची नावे या ठरावामध्ये येतील आणि नंतर घोळ होणार आहे.

**लिओ कोलासो :-**

मा. पिठासीन अधिकाऱ्यांचा परवानगीने बोलत आहे. मॅडम, हा विषय यापूर्वी या सभागृहामध्ये आलेला होता, आणि यावर असे सभागृहामध्ये पारित केलेले होते की, ..........

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

एक महिन्यानंतर सभा होते. तरी सभागृहामध्ये विषय अणताना टिपणी देता येत नाही.

**लिओ कोलासो :-**

या विषयामध्ये सभागृहामध्ये अशी भूमिका ठरविण्यात आली होती की, ह्या कर्मचाऱ्यांना घेण्याबद्दल शासनाकडे प्रस्ताव पाठवावा. आमच्याकडे उपलब्ध माहिती आहे. शासनाकडून याप्रकरणी असा निवारा देण्यात आलेला आहे की, महापालिका असे कमर्चारी नेमण्यासाठी स्वतः स्वायत्त असल्यामुळे याचा महापालिका पातळीवर निर्णय घेण्यात यावा. मा. महापौर साहेबा, मी आपल्या माध्यमातून सभागृहाला अवगत करीन की, चेणे, घोडबंदर परिसरातील हे तारवी कुटूंबिय त्यांच्या जमिनितून पाण्याची पाईप लाईन आणण्यासाठी त्यावेळी अडचण आलेली होती. आपल्या शहरामध्ये पाण्याच्या प्रश्नामध्ये एवढा भडका भरण्याची शक्यता होती. त्यावेळी तत्कालीन अध्यक्ष प्रफुल्लजी पाटील यांनी आपले सारे कौशल्य पणाला लावले होते. प्रफुल्लजी पाटील आज सभागृहात नाहीत. त्यांच्यात आमच्यात वैचारिक मतभेद असतील. परंतु, पाणी पुरवठ्याच्या कामकाजाच्या पध्दतीबद्दल त्यांना जर धन्यवाद दिले तर ते काही कमी पडण्यासारखे नाही. म्हणून मी त्यांचा उल्लेख करतो. हे जे काम आहे. ह्याच्यामध्ये तांत्रिक बाबी आहेत. मा. महापौरजी मी मा. आयुक्त साहेबांच्या निदर्शणास आणून देत आहे की, संबंधितांचे हे प्रकरण ही मुले महानगरपालिकेच्या सेवेत होती. महापालिकेने हे प्रकल्पग्रस्त नाहीत असे कारण देवून त्यांना कमी केले. मी आयुक्त साहेबांना विनंती करत आहे की, आपण या

दोन-चार वर्षामध्ये मोठ्या प्रमाणामध्ये नोकर भरती केली. ह्यामध्ये ही जी चार पोरं, चार सात जी मुले होती त्यांना आपण सामावून घ्यावे असे आम्हाला वाटत आहे. म्हणून ह्या मुलांना, महापालिका जर सक्षम आहे तर या महापालिकेच्या सेवेमध्ये जरुर घेण्यात यावे असा मी प्रस्ताव मांडत आहे. मा. सभागृह नेत्यांना विनंती करतो की, त्यानी आवश्यक ते त्यांच्या फॉरमेटमध्ये ठराव मांडावा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, यापध्दतीने जर तुम्हाला ठराव मांडायचा अयेल तर आपण आपल्या दालनामध्येच निर्णय घ्या. मग सभागृहामध्ये विषय आणण्याची गरजच काय आहे? या विषयाची टिपणी का नाही? ७-१० मुलांना घ्या, ७ मुलांना घ्या.

**रोहिदास पाटील :-**

आता १३ सांगाल आणि उद्या ३१ कराल. हा आपला अनुभव आहे. आता १३ सांगाल आणि उद्या ३१ कराल. तुम्हाला ३ करायचे आहेत की, ७ करायचे आहे ते सांगा?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

समोर संख्याच नाही.

**रोहिदास पाटील :-**

टिपणी कुठे आहे?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

टिपणी कुठे आहे?

**शरद पाटील :-**

आम्हाला नांव कळू द्या ना.

**रोहिदास पाटील :-**

मॅडम, आपण एवढा का इझी घेता ते समजत नाही.

**तुळशीदास म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, आपण हा जो विषय आणलेला आहे त्याचा आपण गोषवारा दिलेला नाही. सन्मा. नगरसेवकांनी सांगितले की, ही ६ मुले घ्यायला पाहिजे. पण त्यांच्या नावावर उतारे आहेत का? कारण ओवळ्याच्या लोकांचेही ह्याच्यात बरीचशी नाव आहेत. मग आपण नेमके काजूपाड्याचे ६ लोक घेणार आहात का? असे चालणार नाही. आपण आमचाही मणुस घेतला पाहिजे.

**गजानन भोईर :-**

मा. महापौर मॅडम, असे ही लोक आहेत की ज्यांच्या शेतातून पाईप लाईन गेली आहे. पण त्यांची ह्याच्यामध्ये नावे नाहीत. हे खरे प्रकल्पग्रस्त असतात त्यांची नावं नाहीत.

**रोहिदास पाटील :-**

ह्या ५-६ जणांची नावे आली आहेत आणि बाकीच्यांची नावे नाहीत.

**रतन पाटील :-**

सर्व नावे एकत्रित करुन आपण नंतर विषय घ्या ना.

**तुळशीदास म्हात्रे :-**

ओवळ्याला पाईप लाईन खोदली होती. तेव्हा सांगितले होते की, तुम्हाला कामाला लावू आणि ते राहिले बाजूला.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर मॅडम, हे आपल्या महानगरपालिका हद्दीतील आहेत.

**रोहिदास पाटील :-**

महानगरपालिका हद्दीतील लोक घोडबंदर आणि लक्ष्मीबागेमध्ये आहेत. आपण सर्वांना देणार आहात ना. की, आपल्याला एक भेटला तर आपण एकालाच देता का? नियमात जे बसेल त्या सर्वांना द्या.

**तुळशीदास म्हात्रे :-**

जर समजा, उद्या उत्तनवरून पाईप लाईन टाकली तर उत्तनचे लोक घ्यायचे नाहीत आणि भाईंदरचे लोक घ्यायचे असे चालेल का? ते सांगा. आम्ही कोणाला विरोध करत नाही.

**केशव घरत :-**

मा. महापौर मॅडम, माझी सभागृहाला विनंती आहे की......

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्यांनी एकेकाने बोलावे. सन्मा. सदस्य आपण बसून घ्या.

**रोहिदास पाटील :-**

मा. उपमहापौर साहेब बोलत नाही. त्यांच्या कुटुंबातले देखिल आहे. ते बोलत नाही.

**तुळशीदास म्हात्रे :-**

मॅडम, आपण विषय घ्या. पण त्यांच्या नावाचे खास पुरावे पाहिजे का, नको?

**मा. महापौर :-**

या ठरावामध्ये सर्वांच्या सुचना समाविष्ट करून घेण्यात येईल.

**रोहिदास पाटील :-**

असे नाही.

**मा. महापौर :-**

आपण एकेकाने बोला.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मॅडम, अशापद्धतीचा ठराव होत नाही.

**रोहिदास पाटील :-**

अशापद्धतीने आपण ह्या मुलांना लावता ना. तर हा विषय पुन्हा घ्या. पुढच्या सभेमध्ये विषय घ्या आणि संमती देतो. पण ह्या पद्धतीने कामकाज चालणार नाही.

**तुळशीदास म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, मागे मी स्टॅण्डपोस्ट बाबत असाच एक विषय दिला होता. शांती स्टारचे पाईप लाईन सर्व घेतले आणि आपण कर्मचाऱ्यांना असेच ठेवले आहे. त्यांना आपण घ्यायचे नाही का? त्यांनी गुन्हा केला आहे का? तेही आपल्या हद्दीतील लोक आहेत. ती ही ५-६ लोक आहेत. मी मागे दोन - चार विषय दिले होते. मॅडमनी ते विषय घेतले नाही.

**रोहिदास पाटील :-**

आपण सर्वांना न्याय द्या.

**मा. महापौर :-**

आयुक्त साहेबांकडून विषय यायला पाहिजे ना.

**तुळशीदास म्हात्रे :-**

आपण सांगितले की, नंतर आपण विषय घेउ. तीनवेळा आपल्याला सांगितले आपण सांगितले की, विषय नंतर घेउ.

**मा. महापौर :-**

मा. आयुक्त साहेबांकडून विषय आल्यानंतर मी घेते. आपण बोलतात पण आयुक्त साहेबांकडून विषय आल्यानंतर ते घेउ असे बोलले होते.

**तुळशीदास म्हात्रे :-**

मी सभापती असताना, मी हा विषय नावासहित टाईप करून दिले होते व आयुक्त साहेब मी आपल्याला भेटलोही आपण सांगितले की, हा विषय नंतर घेतो असे आपण बोललात.

**रोहिदास पाटील :-**

आपण नियमानुसार घ्या ना.

**केशव घरत :-**

माझी सभागृहाला अशी विनंती आहे की, चेने - काजुपाडा येथील कर्मचाऱ्यांना नगरपालिका असताना आस्थापनेवर घेण्यात आले होते. परंतु, महानगरपालिका झाल्यानंतर त्यांना परत कमी करून त्यांना अशाप्रकारे सेवेत घेता येत नाही. म्हणून त्यांना कमी करण्यात आले होते. असे प्रकल्पग्रस्त म्हणून ज्या घोडबंदर गावातून ८० दशलक्ष पाण्याची जी जलवाहीनी गेलेली आहे. त्या शेतकऱ्यांच्या जागेतून जलवाहिन्या गेलेल्या आहेत. त्यांना सुद्धा या सेवेमध्ये सामावून घेण्यात यावे. अशी माझी विनंती आहे.

**रोहिदास पाटील :-**

हा विषय सविस्तर नीट आणा. त्या ४ मुलांना विरोध करण्याचे आमचे काही कारण नाही. ४ च्या ठिकाणी जी ४४ आहेत त्या सर्वांना एकसारखा न्याय मिळाला पाहिजे. एका न्यायाने न्याय मिळाला पाहिजे.

**केशव घरत :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील (काका) मी असे सांगत आहे की, जे १०० सफाई कामगार म्हणून ज्यांची भरती केली. त्यांना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार त्याच्यातुन जर घेतले असते तर काय बिघडले असते.

**रोहिदास पाटील :-**

घेत नाहीत. म्हणून तर बोलत आहे.

**केशव घरत :-**

मग काय बिघडले असते.

**रोहिदास पाटील :-**

आम्हीही तेच बोलतोय. पण आपण उशिरा बोलत आहात आणि आम्ही आधी बोलतो.

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर मॅडम, मी कधीपासून परवानगी मागत आहे. मी मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलत आहे की, पहिले प्रथम महापौरांचे अभिनंदन करतो की, उशिरा का होईना पण आपण लवकर हा निर्णय घेतला त्याबद्दल आपले अभिनंदन. परंतु, आता हे जे सात कर्मचारी आहेत त्यांना आपण सामावून घेणार

आहोत. ते पुर्वी कामालाही होते आणि त्यांना आपण अचानक काढले. काढल्यानंतर महापालिकेत अनेक भरती झाल्या. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, प्रकल्पग्रस्त त्यामध्ये सफाई कामगार गेले. माळी गेले. त्यावेळी त्यांना सामावून घेणे गरजेचे होते. तत्कालिन आयूक्तांनी ते करणे गरजेचे होते. तरीही केले नाही. परंतु, आता पण सफाई कामगार म्हणून जी भरती होत आहे. त्याच्यामध्ये ही सामावून घेणे गरजेचे होते. परंतु, काही अशी पदे भरली जातात की, कोणत्या पेपरला त्याची जाहिरात येते. ते आजपर्यंत कधी कळले नाही. मा. आयुक्त, आयुक्तांच्या मर्जीमध्ये ही पद भरायची होती. आपण बिना गोषवारा दिल्याबिगर हा विषय मा. महापौरांनी आणला त्याबद्दल आम्ही त्यांचे अभिनंदन केलेले आहे. पण चतुर्थ आणि तृतीय श्रेणीतील पद भरण्याचा जर आयुक्त साहेबांचा अधिकार असेल तर एम्पॉलयमेंट कार्ड समाजकल्याणमध्ये जाउन किंवा जाहिरात देवून पद भरण्याची त्यांना जर पॉवर असेल तर ही ७६ पदे त्यांच्या अधिकाराखाली होती. तर मा. महासभेचा निर्णय घेण्याची त्यांना गरज काय होती? आपण अगोदर जी ४ पदे मंजूर केली ती कोणत्या पेपरमध्ये आली? त्या पेपरचा उल्लेख कधी आला नाही. तोच इतिवृत्तांत आपण आज मंजूर करीत होतो. काही अडचण असल्यामुळे आपण तो विषय मंजुर करू शकलो नाही. श्री. माणिक आबा दुबोले - अन्ननिरिक्षक, सौ. सई हेमंत वडके - विधी अधिकारी, श्री. सुरेश दशरथ वाकोडे - उप अभियंता, श्री. दिलीप प्रभाकर घेवारे - सहा. संचालक नगररचना, ही पदे कधी भरली? फक्त पद भरल्यानंतर मा. आयुक्तांच्या मते एक शिष्टमंडळ असते. त्यांची इंटरव्ह्यू होते. त्यांची इंटरव्ह्यू झाल्यानंतर त्यांना मंजूर करतात. त्यानंतर मा. महासभेकडे विषय येतो ते कळावे की, ही पदे मंजूर करून त्यांची आपण नियुक्ती करत आहोत. नियुक्तीसाठी आले. पण त्या अगोदर तत्कालीन जे आयूक्त होते त्यांनी या लोकांना सामावून घेणे गरजेचे होते पण तसे ही नकरता ज्यावेळेस सफाई कामगार भरत होते त्यावेळेस तरी त्यांना सामावून घ्यायचे होते. मला वाटते की, या सभागृहाची दिशाभूल होत आहे. मा. आयुक्तांचे अधिकार असलेले त्यांच्या कार्यशक्तीचे असलेले अधिकार मुद्दामुन आपल्यावर लादत आहेत की, हे आपण करा. मी केलेले नाही आणि जर आपण १७० सफाई कामगार भरले त्याच्यात तुम्ही त्यांना सामावून घ्या. त्यांनी हा अर्ज केला असेल त्यांना ही आपण सामावून घ्यावे. आमचा अधिकार आहे, आम्ही सांगणार. आमच्या स्थानिक रहिवास्यांच्या ज्या समस्या आहेत. त्यांच्या जागेतून जी पाईप लाईन गेली आहे त्यांना ही अडचण आली होती. ते प्रकल्पग्रस्त झालेले आहेत. तर त्यांना घेणे गरजेचे आहे. पण प्रशासनाने त्याचा कधीही विचार केला नाही. जर मा. आयुक्त साहेबांना अधिकार असेल तर त्यांनी ७ नाही ७० असतील १७० असतील त्यांना सामावून घेणे गरजेचे आहे आणि आपण त्यांच्या कागदपत्राची शहानिशा करा. पडताळणी करा. नंतरच हे काम करा. आता आमची सभा मंजुरी देईल. मंजुरी दिल्यानंतर आपण १ चे १० करू नका किंवा १ चे १०० करू नका. आपण त्या कागदाची शहानिशा करा. तदनंतर खरोखरच कोणाच्या जागा गेल्या असतील त्यांनाच या कामामध्ये सामावून घ्यायचे त्यांना आपले कर्मचारी म्हणून या महापालिकेत सामावून घ्यावे अशी मी सुचना करीत आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, आपण जर हा ठराव मंजुर करत असाल तर या ठरावाला माझा विरोध आहे. आपण टिपणी देत नाही म्हणून या ठरावाला आमचा विरोध आहे. आमचा विरोध आपण नोंदवून घ्या व आम्ही मतदानाची मागणी करत आहोत.

**हॅरल बोर्जीस :-**

प्रकल्पग्रस्तांना सेवेमध्ये सामावून घेत असताना कोणावर अन्याय करावा असे दुमत असण्याचे कारण नाही. त्यावेळेला ह्या कर्मचाऱ्यांनी चार वर्षे काम केल्यानंतर त्यांना कमी करण्यात आले. त्यानंतर शासनाकडून हा प्रस्ताव आपल्याकडे आलेला आहे की, ह्यांची नेमणूक करावी व इतर जे प्रकल्पग्रस्त असतील ते सगळे अंतर्भुत करून आगामी सभेपुढे विषय घेउन कोणावर अन्याय होउ नये त्या दृष्टीने जे प्रस्ताव आहेत ते एकत्रित करावे अशी सभागृहाला विनंती आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

शासकीय पत्र अशी नोंद आहे. मग आपण हे पत्र सभागृहासमोर का आणले नाही? शासकीय पत्रासमोर निरंक ठेवले आहे. म्हणजे आपणच लोकांना न्याय देता असे होईल का? आमचा कोणाचा विरोध नाही.

**शशिकांत भोईर :-**

ह्याच्यातून असे दिसते की, सभागृहाची दिशाभुल केलेली आहे. प्रशासनातर्फे......

**परशुराम पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आपल्याला आता ही जी सहा काजुपाडा लोकांची भरती करायची आहे तर त्यांच्या जमिनीतून खरच पाईप लाईन गेलेल्या आहेत आणि ते माझ्याजवळ कित्येक वेळा तरी आले होते आणि सन २००० मध्ये सन्मा. प्रफुल्ल पाटील साहेब नगराध्यक्षांनी त्यांची नेमणूक केली होती आणि सन २००४ मध्ये त्यांना कमी करण्यात आले होते व त्यानंतर काही लोक भरले गेले. पण त्यांचा कधीही विचार केलेला नव्हता तरी आता त्यांना शासनाकडून.....

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सभागृहापुढे आपण शासकीय पत्र ठेवा ना.

**परशुराम पाटील :-**

का?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

का म्हणजे काय? आपण प्रत्येकवेळी दादागिरीने प्रस्ताव आणणार का?

**परशुराम पाटील :-**

आप सुनके तो लिजीए। त्या कारणाने शासनाकडून आलेले आहे आणि त्याला आपली मंजुरी नसेल तर शासनाने सभागृहापुढे दिलेले आहे की, आपण जे ठरवाल ते तुम्ही ठरवून त्यांची नेमणूक करण्यात यावी. तर आपल्याला जर आता मंजुरी द्यायची नसेल तर पुढच्या महिन्यात पुढच्या सभेमध्ये विषय ठेवूया. तुमच्या नियमानुसार ठेवू. तुमच्या सांगण्यावरून ठेवू. पण या सहा लोकांची केव्हापासूनची जमिन गेलेली आहे आणि ते आदिवासी गरिब लोक आहेत आणि त्यांचा आपण विरोध करून असे करता. मग तुम्ही अजून काय करणार. एखाद्या पक्षाच्या माणसाने केले म्हणून ते चुकीचे आहे. स्थानिक माणसे आहे. मग आम्ही मागे उपोषण केले. मा. आयुक्त साहेबांना १७० सीट भरायच्या होत्या. त्यांनी ती इंटरव्ह्यू मागे घेतली. आता साडेचार हजार लोकांच्या इंटरव्ह्यू बाकी आहेत आणि त्याच्यामध्ये १४ हजार आलेले आहेत. त्यात डुप्लिकेट आले, काय आले व त्यानंतर ते भरले गेलेले नाहीत. अता ही सहा लोक आहेत. त्या सहा लोकांना आपण कशाला विरोध करता? त्यांची भरती होउ द्या ना. ह्यांचे करून घ्या. त्यांचे आपण नंतर बघू. आपल्याला जर सगळ्या सदस्यांच्या माणसांना लावायचे असेल तर आपण मा. आयुक्त साहेबांना विनंती करू आणि सगळ्यांचे एक-एक, दोन-दोन भरती करू.

**तुळशीदास म्हात्रे :-**

ह्यांना घेउ नये असे कुठे सांगतो?

**हॅरल बोर्जीस :-**

आपला ही त्याला विरोध नाही. परंतू, आज.......

**शशिकांत भोईर :-**

मॅडम, विरोध असण्याचे कारण नाही.

**मा. महापौर :-**

सन्मा. सभागृह नेता आपण ठरावाचे वाचन करावे.

**शशिकांत भोईर :-**

मॅडम, ठराव मांडायला हरकत नाही. आम्ही कोणाला विरोध करत नाही.

**हॅरल बोर्जीस :-**

मी ठराव वाचतो. आपला जर विरोध असेल तर आपण सांगा.

**शशिकांत भोईर :-**

जर मा. आयुक्त साहेब त्यांच्या अधिकारामध्ये जागा भरू शकतात तर आपली गरज काय आहे? जेव्हा १७० सफाई कामगार भरणार होते. तेव्हा आपल्या नगरसेवकांचे एक-एक माणूस ते घेणार आहेत का? आपल्यावर हे कशाला लादतात त्यांचे अधिकार त्यांनी वापरायला पाहिजे.

**सुधा गोयंका :-**

सन्मा. सदस्य बरोबर बोलत आहेत. ते आपल्याला कशाला सांगत आहेत?

**शशिकांत भोईर :-**

त्यांचे अधिकार आहेत ते त्यांनी वापरायला पाहिजे. आपल्या अधिकारात नसेल तर आपण कशाला करता?

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य शशिकांत भोईरजी आपल्याला बोलायला संधी दिली जाईल. सभागृह नेते यांना ठराव वाचू द्या. आपली सुचना रास्त आहे.

**शिवप्रकाश भुदेका :-**

मॅडम, ठराव वाचला की अनुमोदन द्यायला तयार आहेत.

**शशिकांत भोईर :-**

या ठरावाला आमचा विरोध नाही.

**रोहिदास पाटील :-**

आमचा विरोध नाही.

**शशिकांत भोईर :-**

पण, ज्यावेळी हे आयुक्तांचे अधिकार आहे तर त्यांनीच ते भरले पाहिजे. ते सभागृहावर कशाला लादता? लादायची गरज नाही.

**रोहिदास पाटील :-**

आपल्याला हा ठराव मांडायची घाई आहे. तर टिपणी द्यायची घाई नव्हती. गोषवारा का दिला नाही.

**शशिकांत भोईर :-**

आमचे त्याला समर्थन आहे. परंतु, ज्यावेळेस मा. आयुक्तांना अधिकार असताना आयुक्त साहेब त्यांचा अधिकार का वापरत नाही. सभागृहाच्या डोक्यावर कशाला लादता?

**रोहिदास पाटील :-**

कशापद्धतीने हे कामकाज आपण चालवता?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आपण शासकीय पत्र बोलता. तर शासकीय पत्राचे ही नियम आहे. शासकीय पत्र सभागृहासमोर यायला पाहिजे.

**एस. ए. खान :-**

नाहीतर ६ चे ६० होईल.

**शशिकांत भोईर :-**

नियुक्ती करण्याचा अधिकार त्यांचा आहे. मग त्यांच्या अधिकाऱ्यात करु द्या ना. हे सभागृहावर कशाला लादता? १७० पद भरताना त्यांनी सभागृहाला विचारले का? सभागृहाला कधी विश्वासामध्ये घेतले नाही. अगोदर ७० पद भरण्याचे केले. त्याच्यावर ऑब्जेक्शन घेत असतानाच आणखीन १०० पद काढली. तेव्हा सभागृहाची गरज कोणाला पडली नाही.

**एस. ए. खान :-**

आता ६ आहे नंतर ६० होईल. आपण गोषवारा द्या व सदरचा विषय पुढे घेण्यात यावा.

**रोहिदास पाटील :-**

गोषवारा पाहिजे.

**शशिकांत भोईर :-**

शासनाचे पत्र आम्हाला मिळालेले नाही.

**हॅरल बोर्जीस :-**

प्रकरण क्र. ७८ चा सभागृहासमोर ठराव मांडला.

**परशुराम पाटील :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजूर.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मॅडम, ठराव सर्वानुमते मंजूर नाही. आमचा ठरावाला विरोध आहे. दुसरा ठराव मांडत आहोत.

**शशिकांत भोईर :-**

मॅडम, ठराव मंजूर झाला. पण या अगोदर नगरपालिकेने त्यांना कामावर ठेवले होते. त्यांना असे काढून शकणार का? कारण सौ. मोघे मॅडमचा असाच विषय औदयोगिक न्यायालयातर्फे आला होता. ते सन १९९६ ला कामावर लागल्या. त्यानंतर त्यांना औदयोगिक न्यायालयाने ऑर्डर दिली की, यांना कायम स्वरूपी करावे व मागचा फरक दयावा. तर या लोकांनाही आपल्याला मागचा फरक दयावा लागेल. ही माझी सुचना आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, आमचा दुसरा असा ठराव आहे की, मा. महासभेच्या विषयपत्रिकेवर शासकिय किंवा शासकिय अधिकाऱ्यांचे पत्र सभागृहासमोर न ठेवता प्रकरण क्र. ७८ ची टिपणी न देता सभागृहात विषय आणला त्याबद्दल या ठरावाला आमचा विरोध आहे. आपण मतदान घ्यावे. आमची मतदानाची मागणी आहे. आम्ही चारजण आहोत ना.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आपण अजून चूक करत आहात. सकाळपासून आपण स्वतःच्या जिवाची हाल करुन घेतले असे पुन्हा पुन्हा करु नका. आम्ही बघतो तुमचा चेहरा. आपण सन्मा. हॅरल बोर्जीस साहेबांच्या मागे लागू नका. आम्ही विरोध करतो का? मास्तर आपण ही सल्ला देत नाही. आम्ही विरोध करतो का?

**ग्रिटा फॅरो :-**

सन्मा. हॅरल बोर्जीस साहेबांच्या मागे लावू नका असे आपण का बोलता? म्हणजे काय?

**रोहिदास पाटील :-**

कामकाज सोडून आपण हे कशाकरिता चालविता? एकतर आपण टिपणी दिली नाही. टिपणी का दिली नाही?

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील (काका) मी आपल्याला विनंती केली आणि अपवादात्मक खास म्हणून मी विनंती केली की...

**रोहिदास पाटील :-**

आपण सभागृह नेते आहात. आम्ही आपल्याला मान देतो. सभागृहाच्या कामकाजात टिपणी देणे आवश्यक हे तुम्हाला मान्य आहे की, नाही. नाहीतर, तसे सांगा. प्रशासनाचा प्रश्न आहे. प्रशासनाला बोलू द्या. प्रशासन बोलतच नाही. सन्मा. हॅरल बोर्जीस साहेब, आम्ही तुम्हाला विरोध करत नाही. प्रशासनाने बाजू मांडावी. टिपणी न देणं योग्य आहे का, हे सांगावे?

**शिवप्रकाश भुदेका**

अभी आप ठराव परसिग्नेचर नही करेंगे तो भी आपने अपने सिग्नेचर का बताया है की, मेरा इसमे यह यह कमी है। वैसा सिग्नेचर यह लोग करेंगे।

**रोहिदास पाटील**

स्वतंत्र सैनिक आहेत. अपंग आहेत जे या शहरातले आहेत त्यांचाही आपण यांच्यासोबत विचार करावा अशी माझी मागणी आहे.

**जयंत पाटील :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. जेष्ठ नगरसेवक रोहिदास पाटील यांनी सांगितले की, गोषवारा दिला नाही म्हणून तो ठराव मांडू नका किंवा आमचा विरोध आहे. गोषवारा देणे हे निश्चितच मा. महापौरांचे कर्तव्य आहे. काही कारणामुळे गोषवारा दिला नसेल. परंतु, ज्यांना आपण या नोकर भरतीमध्ये घेत आहोत. ते अतिशय गरिब वर्गातील लोक आहेत आदिवासी लोक आहेत आणि आतापर्यंत मानलेले काँग्रेस पक्षाने, राष्ट्रवादी पक्षाने की, आमच्या गरिबांचा पक्ष आहे. आतापर्यंत आम्ही गरिबांची सेवा केलेली आहे आणि भारतीय जनता पक्षाने नेहमी व्यापाऱ्यांची बाजू घेतलेली आहे. मोठ्या वर्गाची बाजू घेतलेली आहे. मी त्यांना विनंती करतो की, आदिवासी समाज या परिसरामध्ये आहे. त्यांना न्याय मिळावा त्यांना नोकरी मिळावी. त्यांना उदरनिर्वाह करण्यासाठी .......

**गजानन भोईर :-**

एवढ्या उशिरा.

**जयंत पाटील :-**

उशिर लागला तरी वेळ गेलेली नाही. तुम्ही तर तीन वेळा अडकले. हा जो ठराव मांडलेला आहे. त्या ठरावाला सर्वांनी अनुमोदन दिलेले आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

काँग्रेस चे अध्यक्ष आहेत त्यांनी विरोध नोंदविला आहे. आपण त्यांना तरी सोबत घ्या.

**जयंत पाटील :-**

ज्यांना विरोध करायचा असेल त्यांच्या विरोधाची नोंद घ्या. परंतु, ठराव मांडलेला आहे. त्या गरिबांना रोजी-रोटी मिळण्यासाठी हे सभागृह मान्यता देते.

**रोहिदास पाटील :-**

आम्ही जे बोलतो ते स्पष्ट याच्यामध्ये आले पाहिजे. शासन आदेशाची प्रत आपण या सभागृहाला दिलेली नाही. नियमानुसार हा ठराव आणतेवळी त्याची जी प्रशासकीय टिपणी हवी होती ती टिपणी दिलेली नाही. सभागृह नेत्याने स्वतःच्या शक्याबळावर ठराव बेकायदेशीर आणलेला आहे. आदिवासी लोकांना नोकरी मिळाली पाहिजे.एक नाही अनेक. ६ चे ६० झाले तरी त्यांना नोकरी मिळाली पाहिजे. या मताचे आम्ही आहोत. याच्यामध्ये स्वातंत्र सैनिक आहेत, याच्यामध्ये प्रकल्पग्रस्त आहेत. यामध्ये जी लोक येतात त्यांना नोकरी देण्यासाठी आम्ही प्राधान्याने पुरस्कृत करु. पण ज्या पध्दतीने या सभागृहात हा ठराव सत्ताधारी पक्षाने आणलेला आहे. त्याला आमचा विरोध आहे आणि आमचा विरोध आपण नोंदवून घ्यायचा आहे. आपण हा ठराव मतदानाला टाका. आमची मतदानाची मागणी आहे ती घ्या.

**मा. महापौर :-**

सचिव पुढील कार्यवाहीला सुरूवात करावी.

**अनंत पाटील :-**

मा. महापौर साहेबा, शासन निर्णय म्हणून आता जो निर्णय घेतला तर त्या शासन निर्णयाबरोबर आपण नगरपालिका अस्तित्वात असताना इतर १८ लोकांची यादी मंत्रालयामध्ये पाठविलेली होती आणि या १८ यादीमध्ये फक्त सातच लोकांना मान्यता मिळालेली आहे तर इतर लोकांचे काय? आपण सगळ्यांना सामावून घ्या ना. याबाबत दोन वर्षापूर्वी बरीच चर्चा झाली होती. १८ लोक नाही.

**रोहिदास पाटील :-**

हा विषय बऱ्याच वेळेला आणलेला आहे. पाच वेळा विषय आणलेला आहे, एक वेळा असे नाही. नगरपरिषदेपासून हा विषय आलेला आहे.

**अनंत पाटील :-**

शासन निर्णयानुसार ७ जणांना घ्यायला आमची हरकत नाही. परंतु, उर्वरित जे काही कर्मचारी आहेत त्यांचे काय? त्यांना सुद्धा आपण त्याच्यामध्ये सामावून घ्या.

**मा. आयुक्त :-**

आपले म्हणणे काय आहे? गोषवारा पाहिजे की....

**रोहिदास पाटील :-**

गोषवारा ही पाहिजे आणि सगळ्यांना न्याय मिळाला पाहिजे.

**अनंत पाटील :-**

१७ ते १८ लोक आहेत. आपण त्या १८ लोकांचा एकत्रितरित्या ठराव केला होता. त्यातील ८ लोकांना शासन मंजूरी आहे. शासन निर्णय, धोरणात्मक निर्णय असे घेतलेले आहे. परंतु, ती जी उर्वरित लोक आहेत. त्यांच्याविषयी आपण काय निर्णय घ्याल? त्यांना ही आपण यामध्ये समाविष्ट करुन घ्या. म्हणजे मोकळं होऊन जाईल. कारण नगरपालिकेपासून हाच प्रस्ताव दोन ते तीन वेळा आपण सभेसमोर आणला आहे.

**केशव घरत :-**

मा. महापौर मॅडम, आता सन्मा. सदस्य अनंत पाटील साहेबांनी हा जो प्रश्न उपस्थित केलेला आहे की, हे जे सहा प्रकल्पग्रस्त काजूपाड्याचे आहेत त्यांना सभागृहाने मान्यता दिलेली आहे. पण त्याचबरोबर इतरांच्या जागेतून ज्या काही जलवाहिन्या गेलेल्या आहेत. ते जे प्रकल्पग्रस्त आहेत. त्यांनासुद्धा सामावून घेण्यात यावे. अशी माझी विनंती आहे. जे काही आहेत. आपल्याकडे पद निर्माण होतात. त्याच्यात त्यांना का घेतले जात नाही?

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्यांनी ज्या सुचना केलेल्या आहेत त्याचा खुलासा मा. आयुक्त महोदय करतील.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्यांनी जो प्रश्न विचारलेला आहे. त्या बाबतीमध्ये मी खुलासा करु इच्छितो की, तत्कालिन नगरपालिका स्थायी समिती, ठराव क्र. १८२(क) दि. ७/१/२००० या ठरावा अन्वये ज्या ज्या शेतकऱ्यांच्या जमिनीतून पाईप लाईन गेलेली होती. असे ६ कर्मचाऱ्यांना वरील स्थायी समितीच्या निर्णयाप्रमाणे् रोजंदारीवर त्यांना लावून घेतलेले होते आणि त्याच्यानंतर दि. १/२/२००४ पासून त्यांना कामावरून कमी करण्यात आले. जवळ जवळ दोन ते तीन वर्षापर्यंत ते कार्यरत होते आणि त्यांना कमी केल्यानंतर जो प्रस्ताव पाठविला तो प्रस्ताव आणि त्याच्यासोबत एकूण १८ कर्मचाऱ्यांच्या बाबतीतला प्रस्ताव शासनाकडे पाठविला होता. तर शासनाने हे जे १ ते १८ कर्मचारी आहेत. त्यांचा विचार न करता फक्त १ ते ६ कर्मचारी आहेत. त्यांचा विचार न करता फक्त १ ते ६ कर्मचारी जे ऑलरेडी काम करत होते किंवा त्यांना स्थायी समितीने ठरविलेल्या निर्णयाप्रमाणे जे पूर्वी कामावर घेतले होते त्यांच्याच बाबतीमध्ये शासनाने मंजूर करून परत पाठविले आणि त्यांनी असे सांगितले की, याबाबत मा. महासभेने निर्णय घ्यावा.

**रोहिदास पाटील :-**

आम्ही तिच विनंती करत आहोत. मा. महासभा सक्षम आहे ना.

**मा. आयुक्त :-**

होय.

**रोहिदास पाटील :-**

मग आपण पारदर्शक निर्णय घ्या ना. आपण १८ लोकांचा निर्णय घ्या ना. लोकांचाच निर्णय का घेता? आमचा स्पष्ट आग्रह आहे की, ही सभा १८ लोकांचा निर्णय घेते त्यात आपला विरोध का?

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, आपल्या परवानगीने  बोलत आहे की, पेलणीच्या आगरामध्ये त्या शिलोत्र्यांना न विचारता कचरा व मातीचा भराव केला आणि आमच्या लोकांचा धंदा तोच होता. तर माझी आपल्याला अशी विनंती आहे की, जे शिलात्री आहेत त्यांच्या मुलांना देखिल कामाला लावा. तिथे मैदान झाले आहे.

**रोहिदास पाटील :-**

मा.आयुक्त साहेब, चतुर्थ श्रेणीकरिता आपण सक्षम आहोत की नाही. शासनाचे मत आहे ना, चतुर्थ श्रेणीसाठी आपण सक्षम आहोत. मग ह्या १८ लोकांचे करा. कशासाठी आपण त्या लोकांना वेटींगला ठेवायचे. आमचा हेतू अशुद्ध आहे का? तुमच्या हेतूबद्दल ही शंका घ्यायला मोकाट देऊ नका. जरी आपण टिपणी दिली नसेल....

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील आपण मतदान घेता की, माघार घेता.

**रोहिदास पाटील :-**

काय?

**मा. महापौर :-**

मतदानाची मागणी करु नका ना.

**रोहिदास पाटील :-**

आम्ही पहिल्यांदा १८ लोकांची मागणी करतो ना. आयुक्तांना निवेदन करावे.

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर मॅडम, आयुक्त साहेबांनी शासनाचे पत्र वाचले.

**शिवप्रकाश भुदेका :-**

आपण ठरावामध्ये सुधारणा करा व तो ठराव मागे घ्या.

**शशिकांत भोईर :-**

आपण १८ च्या १८ लोकांना सेवेमध्ये सामावून घ्या.

**रोहिदास पाटील :-**

आयुक्त साहेबांनी १८ लोकांचे सांगितले. पण शासनाने काय सांगितले आहे?

**मा. महापौर :-**

शासनाने १८ पैकी सहा पदाना शासनाने सांगितले आहे....

**शशिकांत भोईर :-**

आपण सक्षम आहोत असे शासनाने निर्देशनात आणले आहेत.

**रोहिदास पाटील :-**

शासनाने सांगितले आहे की, आपण सक्षम आहात.

**मा. महापौर :-**

मा. महासभेमध्ये....

**रोहिदास पाटील :-**

मा. महासभा सक्षम आहे तर आपण १८ लोकांचे घ्या ना.

**रतन पाटील :-**

१८ लोकांचे घ्या ना.

**रोहिदास पाटील :-**

१८ लोकांना घेण्यामध्ये जर काय अडचण असेल तर...

**शशिकांत भोईर :-**

अगोदर लागताना १८ ची १८ लोक होती नंतर हे ७ जण लागली होती. पहिले १८ कामाला होती नंतर हे ७ राहिले असे आहे.

**मा. महापौर :-**

सचिवजी मतदान घेण्यात यावे. ज्यांचा विरोध आहे त्यांचा विरोध नोंदवून मतदानाला सुरूवात करावी.

**शशिकांत भोईर :-**

मॅडम, शासनाच्या पत्रात लिहिलेले आहे की, आपण सक्षम आहात मग बाकीच्या व जणांवर अन्याय का करावा?

**मा. महापौर :-**

सचिवजी, मतदान घेण्यात यावे.

**शशिकांत भोईर :-**

मॅडम, आपण ११ जणांवर कशाला अन्याय करता?

**मा. महापौर :-**

आपण बसून घ्यावे. मतदान प्रक्रियेला सुरूवात करत आहोत आता कोणीही बोलू नका.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ७८ करिता दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सन्मा. हॅरल बोर्जीस -सुचक व अनुमोदन- सन्मा. परशुराम पाटील आहेत. दुसरा ठराव सन्मा. ओमप्रकाश अग्रवाल- सुचक व अनुमोदन- रोहिदास पाटील आहेत.

**रोहिदास पाटील :-**

आम्ही आपल्याला पुर्नश्च विनंती करत आहोत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मॅडम, आमचा कोणाचा व्यक्तिशः असा विरोध नाही.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेबा, दोन ठराव आलेले आहेत. त्यामुळे आता पुन्हा चर्चेचा विषय कुठे येतो. दोन ठराव आलेले आहेत. तर त्यांना पुन्हा विचारण्याचा प्रश्न येत नाही.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, सकाळी आपण झाशीच्या राणीचा आव आणला आणि सभागृहाला काय दाखविण्याच्या प्रयत्न केला?

**लिओ कोलासो :-**

मा. महापौरांनी हे भावनाशीर आवाजाने बोलत आहेत त्याबदद्ल आम्ही...

**मा. महापौर :-**

हा विषय शासनाने दिलेल्या विषयाबद्दलचा आहे.

**लिओ कोलासो :-**

हे असे नाही. आपल्याला झाशीची राणी असे येथे कशाला बोलायला पाहिजे?

**हॅरल बोर्जीस :-**

सचिव साहेब, आपण रितसर कामकाजाला सुरूवात करावी.

**रोहिदास पाटील :-**

आपण सकाळी अन्यायाबद्दल विषय मांडला.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील (काका) आपण बसून घ्यावे.

**रोहिदास पाटील :-**

आपण टिपणी दिलेली नाही.

**मा. महापौर :-**

रितसर कामकाजाला सुरूवात होऊ दया.

**रोहिदास पाटील :-**

आपण टिपणी का दिली नाही? ह्याचे उत्तर आपल्याकडे काय उत्तर आहे का?

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील आपण टिपणी दिलेली नाही म्हणून आक्षेप घेतलेला आहे व दुसरा ठराव दिलेला आहे तर कृपया मतदानाची मागणी केली आहे तर मतदान होऊ दया.

**रोहिदास पाटील :-**

सन्मा. सभागृह नेते, टिपणी का दिली नाही त्याचा खुलासा होऊ द्या ना. आमचे ऑब्जेक्शन आहे. त्यावर खुलासा झाला पाहिजे ना.

**रतन पाटील :-**

शासनाचे पत्र आले होते तरी ते पत्र टिपणी म्हणून, गोषवारा म्हणून आम्हाला का दिले नाही. पहिला प्रश्न तिथेच येतो.

**रोहिदास पाटील :-**

आपण टिपणी का दिली नाही त्याचा खुलासा करावा.

**रतन पाटील :-**

टिपणी का दिली नाही त्याचा खुलासा करावा.

**मा. महापौर :-**

आपण मतदानाकरिता ठराव दिलेला आहे तर मतदानाला सुरूवात करण्यात येत आहे.

**रतन पाटील :-**

आपण टिपणी का लपवली? आपण ती टिपणी सभेला का दिली नाही?

**मा. महापौर :-**

आपण टिपणीबाबत निवेदन करा आणि मतदान घ्या.

**नगरसचिव :-**

मा. महापौरांच्या परवानगीने, शासकीय अधिकारी पत्र....

**रोहिदास पाटील :-**

सचिव साहेब, आपण पुन्हा चुक करु नका. आपण आपले कर्तव्य बजावले पाहिजे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सचिवजी, आपण कर्तव्य बजावत नाही आणि मग सगळ्या चुका करतात.

**नगरसचिव :-**

मा. महापौर साहेबांनी सांगितल्याप्रमाणे मी ठरावाचे वाचन करतोय.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

शासकीय पत्र असताना ही आपण निरंक का लिहिले आहे. शासकिय पत्राच्या आधारावर हा ठराव आलेला आहे ना. तर आपण निरंक का लिहिले?

**नगरसचिव :-**

आलेले शासकिय पत्र जर सचिवांकडे आले तरच तो सभागृहासमोर ते पत्र ठेवेल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

असे नाही. आपण ठराव कोणत्या पद्धतीने आणता. आपण हे शासकिय पत्र आलेले आहे म्हणून आपण ठराव आणलेला आहे असे सांगता तर आपण निरंक का लिहिलेले आहे.

(सायं ६.४५ मि. मतदानाच्या प्रक्रियेला सुरूवात करण्यात आली.)

**नगरसचिव :-**

मा. महासभेच्या विषयपत्रिकेवर शासकिय, जिल्हा शासकिय अधिकाऱ्याचे पत्र सभागृहासमोर न ठेवता. तसेच, प्रकरण क्र. ७८ चे महासभेत विशेष टिपणी न देता. तसेच, शासनाकडे आपली कोणतीही भुमिका न देता असा प्रस्ताव सभेसमोर आणला होता. तसेच, स्वातंत्र्यसैनिक अन्य स्थानिक प्रकल्पग्रस्तांना समाविष्ट करुन पुन्हा सभेत ठराव आणावा असा मी ठराव मांडत आहे. उपस्थित सदस्यांपैकी सुचक श्री. ओमप्रकाश अग्रवाल व अनुमोदन श्री. रोहिदास पाटील यांच्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी प्रथम उभे राहायचे आहे.

१) श्री. म्हात्रे मिलन वसंत
२) श्रीम. म्हात्रे नयना गजानन
३) श्री. अग्रवाल धनराज नंदलाल
४) श्री. अग्रवाल ओमप्रकाश गंगाधरजी
५) श्री. रोहिदास शंकर पाटील
६) श्री. भुदेका शिवप्रकाश प्रल्हादराय
७) श्री. भोईर गजानन लक्ष्मण
८) श्री. घोन्सालवीस जोजफ जॉन
९) श्री. कोलासो जेम्स इजिदोर
१०) श्रीम. नरावत भवरीकुंवर चेनसिंह
११) श्री. पाटील शरद केशव

या ठरावाच्या विरोधात जे आहेत त्यांनी उभे राहायचे आहे.

१) श्रीम. निर्मला बाबुराव सावळे
२) श्री. मेन्डोसा स्टिवन जॉन
३) श्री. हॅरल जॉर्ज बोर्जीस
४) श्री. पाटील परशुराम दामोदर
५) श्रीम. संगिता विजय म्हात्रे
६) श्री. चिंतामण कमलाकर पाटील
७) श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस
८) श्री. ठाकुर नितिन गोपीनाथ
९) श्रीम. गोहिल शानु
१०) श्रीम. पाटील प्रभात प्रकाश
११) श्रीम. पाटील सुनिता कैलास
१२) श्री. पाटील जयंत महादेव
१३) श्री. रविंद्र भीमदेव माळी
१४) श्री. घरत केशव रामभाऊ
१५) श्रीम. हसनाळे ज्योत्स्ना जालिंदर
ऊर्फ
शिंदे पुजा प्रताप
१६) श्रीम. वाडे जिवी हिरा
१७) श्रीम. अनिता जयवंत पाटील
१८) श्री. गावंड हरेश लक्ष्मण
१९) श्रीम. सुरेखा यशवंत गायकवाड
२०) श्री. मोदी चंद्रकांत भिकालाल
२१) श्री. खान शफीक अहमद
२२) श्री. रोहिदास आत्माराम पाटील
२३) श्री. कोलासो लिओ इजिदोर
२४) श्रीम. शाह रिटा सुभाष
२५) श्री. प्रेमनाथ गजानन पाटील
२६) श्री. तुळशिदास दत्तु म्हात्रे

या ठरावात तटस्थ असतील त्यांनी उभे राहायचे आहे.

१) श्री. अनंत रामचंद्र पाटील
२) श्रीम. करंबेळे प्रियांका प्रकाश
३) श्रीम. पाटील लिला गुरुनाथ
४) श्री. पाटील रतन कृष्णा
५) श्रीम. गोयंका सुधा लक्ष्मीकांत

६) श्री. शशिकांत जगन्नाथ भोईर
७) श्रीम. नाईक शुभांगी सिताराम

**नगरसचिव :-**

तत्कालीन नगरपालिकेत महाराष्ट्र शासनाच्या सहकार्याने ५० दशलक्ष लिटर क्षमतेची १३५० मी. मी. व्यासाची नविन पाणिपुरवठा पाईप लाईन काजुपाडा ते घोडबंदर या महानगरपालिकेच्या क्षेत्रात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत टाकण्यात आलेल्या पाईप लाईन करिता काजुपाडा येथे त्या परिसरातील शेतकऱ्यांनी जमिन उपलब्ध करून दिलेली होती. सदर शेतकऱ्याच्या मुलांना मा. स्थायी समिती सभा दि. ०७/०१/२००० ठराव क्र. १८२ (क) अन्वये रोजंदारीवर घेण्यात आले होते. प्रत्यक्षात सहा कर्मचारी कार्यरत होते. त्यांची नावे खालील प्रमाणे.

१) श्री प्रदिप बिस्तुर भरले.
२) श्री महादेव मंगळ तारवी.
३) श्री पुंडलिक वासुदेव चौधरी.
४) श्री महादेव कृष्णा तारवी.
५) श्री उमेश शनिवार तारवी.
६) श्री शशिकांत बाबु तारवी.

वरिल कर्मचाऱ्यांना दि. ०१/०२/२००४ पासून कामावरून कमी करण्यात आले होते. तद्नंतर मा. महासभा दि. १९/०६/२००३ ठराव क्र. १६ अन्वये ठराव पारित करून सदर कर्मचाऱ्यांना सेवेत घेण्याबाबत शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यास मंजुरी देण्यात आली होती.

शासनाकडे सदर प्रस्ताव पाठविला असता शासनाने क्रमांक मिभापा-२००४/४६९/प्र.क्र.१४०/०४/नवि-२८ दि. २६/०६/२००६ च्या पत्रान्वये '' मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ मधील तरतुदीनुसार वर्ग - ३ व वर्ग - ४ मधील पदावर नियुक्ती करीता महापालिका सक्षम आहे. त्यामुळे रोजंदारी कर्मचाऱ्याबाबत महानगरपालिकेने योग्य तो निर्णय घ्यावा. तसे करताना पदांची उपलब्धता, प्रचलित शासन आदेश, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील तरतुदी इ. विचारात घेउन उचित कार्यवाही करावी '' असे नमुद केले आहे. शासनाने महानगरपालिकेने प्रस्तावास कुठेही विरोध केलेला नाही. महानगरपालिकेच्या आस्थापनेवर सफाई कामगार या संवर्गातील पदे रीक्त असून सदर पदाकरीता आवश्यक शैक्षणिक पात्रता व इतर निकश वयोमानात वर नमुद सहा कर्मचारी बसत असल्याने व नेमणुकीस मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (१) नुसार महासभा सक्षम असल्याने त्यांना '' सफाई कामगार '' या पदावर रू. २५५०-३२०० या वेतनश्रेणीत कायम स्वरूपी नेमणुक देण्यास एक खास व अपवादात्मक बाब म्हणुन ही महासभा मंजुरी देत आहे. सुचक श्री. हॅरल बोर्जीस व अनुमोदन श्री. परशुराम पाटील या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी उभे राहायचे आहे.

१) श्रीम. निर्मला बाबुराव सावळे
२) श्री. मेन्डोसा स्टिवन जॉन
३) श्री. हॅरल जॉर्ज बोर्जीस
४) श्री. पाटील परशुराम दामोदर
५) श्रीम. संगिता विजय म्हात्रे
६) श्री. चिंतामण कमलाकर पाटील
७) श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस
८) श्री. ठाकुर नितिन गोपीनाथ
९) श्रीम. गोहिल शानु
१०) श्रीम. पाटील प्रभात प्रकाश
११) श्रीम. पाटील सुनिता कैलास
१२) श्री. पाटील जयंत महादेव
१३) श्री. रविंद्र भीमदेव माळी
१४) श्री. घरत केशव रामभाऊ
१५) श्रीम. हसनाळे ज्योत्स्ना जालिंदर
ऊर्फ
शिंदे पुजा प्रताप
१६) श्रीम. वाडे जिवी हिरा
१७) श्रीम. अनिता जयवंत पाटील
१८) श्री. गावंड हरेश लक्ष्मण
१९) श्रीम. सुरेखा यशवंत गायकवाड
२०) श्री. मोदी चंद्रकांत भिकालाल
२१) श्री. खान शफीक अहमद

२२) श्री. रोहिदास आत्माराम पाटील
२३) श्री. कोलासो लिओ इजिदोर
२४) श्रीम. शाह रिटा सुभाष
२५) श्री. प्रेमनाथ गजानन पाटील
२६) श्री. तुळशिदास दत्तु म्हात्रे

या ठरावाच्या जे विरोधात असतील त्यांनी उभे राहावे.

१) श्री. म्हात्रे मिलन वसंत
२) श्रीम. म्हात्रे नयना गजानन
३) श्री. अग्रवाल धनराज नंदलाल
४) श्री. अग्रवाल ओमप्रकाश गंगाधरजी
५) श्री. रोहिदास शंकर पाटील
६) श्री. भुदेका शिवप्रकाश प्रल्हादराय
७) श्री. भोईर गजानन लक्ष्मण
८) श्री. घोन्सालवीस जोजफ जॉन
९) श्री. कोलासो जेम्स इजिदोर
१०) श्रीम. नरावत भवरीकुंवर चेनसिंह
११) श्री. पाटील शरद केशव

जे तटस्थ असतील त्यांनी उभे राहावे.

१) श्री. अनंत रामचंद्र पाटील
२) श्रीम. करंबेळे प्रियांका प्रकाश
३) श्रीम. पाटील लिला गुरुनाथ
४) श्री. पाटील रतन कृष्णा
५) श्रीम. गोयंका सुधा लक्ष्मीकांत
६) श्री. शशिकांत जगन्नाथ भोईर
७) श्रीम. नाईक शुभांगी सिताराम

मा. महापौर मॅडम, ठरावाच्या मतदानाचा निकाल घोषित करित आहेत.

**मा. महापौर :-**

काजूपाडा ते घोडबंदर येथे ५० एम.एल.डी. वाढीव पाणीपुरवठा पाईप लाईन टाकणेकामी जागा दिलेल्या प्रकल्पग्रस्तांना महानगरपालिकेच्या आस्थापनेवर कायम स्वरुपी नेमणूक देणेबाबतचा हा ठराव मा. महासभेपुढे ठेवला असता यामध्ये मतदान घडून आले आणि पहिला ठराव सुचक-हॅरल बोर्जीस व अनुमोदन- परशुराम पाटील यांनी मांडला या ठरावाच्या बाजूने २६ मत विरोधात ११ मत आणि तटस्थ ७ मत दुसरा ठराव मांडणारे सुचक-ओमप्रकाश अग्रवाल व अनुमोदन- रोहिदास पाटील यांच्या बाजूने ११ मत विरोधात- २६, तटस्थ ७ मत यामुळे पहिला ठराव कायम करण्यात आला.

**प्रकरण क्र. ७८ :-**

काजूपाडा ते घोडबंदर येथे ५० एम.एल.डी. वाढीव पाणीपुरवठा पाईप लाईन टाकणे कामी जागा दिलेल्या प्रकल्पग्रस्तांना महानगरपालिकेच्या आस्थापनेवर कायमस्वरुपी नेमणूक देणेबाबत .

**ठराव क्र. ६२:-**

तत्कालीन नगरपालिकेत महाराष्ट्र शासनाच्या सहकार्याने ५० दशलक्ष लिटर क्षमतेची १३५० मी. मी. व्यासाची नविन पाणिपुरवठा पाईप लाईन काजुपाडा ते घोडबंदर या महानगरपालिकेच्या क्षेत्रात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत टाकण्यात आलेल्या पाईप लाईन करिता काजुपाडा येथे त्या परिसरातील शेतकऱ्यांनी जमिन उपलब्ध करून दिलेली होती. सदर शेतकऱ्याच्या मुलांना मा. स्थायी समिती सभा दि. ०७/०१/२००० ठराव क्र. १८२ (क) अन्वये रोजंदारीवर घेण्यात आले होते. प्रत्यक्षात सहा कर्मचारी कार्यरत होते. त्यांची नावे खालील प्रमाणे.

७) श्री प्रदिप बिस्तुर भरले.
८) श्री महादेव मंगळ तारवी.
९) श्री पुंडलिक वासुदेव चौधरी.
१०) श्री महादेव कृष्णा तारवी.
११) श्री उमेश शनिवार तारवी.
१२) श्री शशिकांत बाबु तारवी.

वरिल कर्मचाऱ्यांना दि. ०१/०२/२००४ पासून कामावरून कमी करण्यात आले होते. तद्नंतर मा. महासभा दि. १९/०६/२००३ ठराव क्र. १६ अन्वये ठराव पारित करून सदर कर्मचाऱ्यांना सेवेत घेण्याबाबत शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यास मंजुरी देण्यात आली होती.

शासनाकडे सदर प्रस्ताव पाठविला असता शासनाने क्रमांक मिभापा-२००४/४६९/प्र.क्र.१४०/०४/नवि-२८ दि. २६/०६/२००६ च्या पत्रान्वये '' मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ मधील तरतुदीनुसार वर्ग - ३ व वर्ग - ४ मधील पदावर नियुक्ती करीता महापालिका सक्षम आहे. त्यामुळे रोजंदारी कर्मचाऱ्याबाबत महानगरपालिकेने योग्य तो निर्णय घ्यावा. तसे करताना पदांची उपलब्धता, प्रचलित शासन आदेश, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील तरतुदी इ. विचारात घेउन उचित कार्यवाही करावी'' असे नमुद केले आहे. शासनाने महानगरपालिकेने प्रस्तावास कुठेही विरोध केलेला नाही. महानगरपालिकेच्या आस्थापनेवर सफाई कामगार या संवर्गातील पदे रीक्त असून सदर पदाकरीता आवश्यक शैक्षणिक पात्रता व इतर निकश वयोमानात वर नमुद सहा कर्मचारी बसत असल्याने व नेमणुकीस मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (१) नुसार महासभा सक्षम असल्याने त्यांना '' सफाई कामगार'' या पदावर रू. २५५०-३२०० या वेतनश्रेणीत कायम स्वरूपी नेमणुक देण्यास एक खास व अपवादात्मक बाब म्हणुन ही महासभा मंजुरी देत आहे.

## ठरावाच्या बाजुने असलेले सदस्य

१) श्रीम. निर्मला बाबुराव सावळे
२) श्री. मेन्डोसा स्टिवन जॉन
३) श्री. हॅरल जॉर्ज बोर्जीस
४) श्री. पाटील परशुराम दामोदर
५) श्रीम. संगिता विजय म्हात्रे
६) श्री. चिंतामण कमलाकर पाटील
७) श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस
८) श्री. ठाकुर नितिन गोपीनाथ
९) श्रीम. गोहिल शानु
१०) श्रीम. पाटील प्रभात प्रकाश
११) श्रीम. पाटील सुनिता कैलास
१२) श्री. पाटील जयंत महादेव
१३) श्री. रविंद्र भीमदेव माळी
१४) श्री. घरत केशव रामभाऊ
१५) श्रीम. हसनाळे ज्योत्स्ना जालिंदर
ऊर्फ
शिंदे पुजा प्रताप
१६) श्रीम. वाडे जिवी हिरा
१७) श्रीम. अनिता जयवंत पाटील
१८) श्री. गावंड हरेश लक्ष्मण
१९) श्रीम. सुरेखा यशवंत गायकवाड
२०) श्री. मोदी चंद्रकांत भिकालाल
२१) श्री. खान शफीक अहमद
२२) श्री. रोहिदास आत्माराम पाटील
२३) श्री. कोलासो लिओ इजिदोर
२४) श्रीम. शाह रिटा सुभाष
२५) श्री. प्रेमनाथ गजानन पाटील
२६) श्री. तुळशिदास दत्तु म्हात्रे

## ठरावाच्या विरोधात असलेले सदस्य

१) श्री. म्हात्रे मिलन वसंत
२) श्रीम. म्हात्रे नयना गजानन
३) श्री. अग्रवाल धनराज नंदलाल
४) श्री. अग्रवाल ओमप्रकाश गंगाधरजी
५) श्री. रोहिदास शंकर पाटील
६) श्री. भुदेका शिवप्रकाश प्रल्हादराय
७) श्री. भोईर गजानन लक्ष्मण
८) श्री. घोन्सालवीस जोजफ जॉन

९) श्री. कोलासो जेम्स इजिदोर
१०) श्रीम. नरावत भवरीकुंवर चेनसिंह
११) श्री. पाटील शरद केशव

## ठरावाला तटस्थ असलेले सदस्य

१) श्री. अनंत रामचंद्र पाटील
२) श्रीम. करंबेळे प्रियांका प्रकाश
३) श्रीम. पाटील लिला गुरुनाथ
४) श्री. पाटील रतन कृष्णा
५) श्रीम. गोयंका सुधा लक्ष्मीकांत
६) श्री. शशिकांत जगन्नाथ भोईर
७) श्रीम. नाईक शुभांगी सिताराम

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. परशुराम पाटील**

**ठराव बहुमताने मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ७६ चे वाचन केले.)

**रोहिदास पाटील :-**

आपण मघाशी निवेदन केले होते की, शेवटची १० मिनिटं पोलिसस्टेशनला जायचे की, नाही. त्यावर चर्चा करणार आता १० मिनिटच राहिली आहेत.

**मा. महापौर :-**

विषयपटलावर अजून विषय आहेत ना.

**रोहिदास पाटील :-**

पण तो विषय तरी पुर्ण करायला पाहिजे ना.

**शिवप्रकाश भुदेका :-**

मॅडम, आपण त्या अधिकाऱ्याचे नाव सांगणार होता.

**शरद पाटील :-**

मा. महापौर मॅडम, रस्त्यांना नाव देण्याचा विषयावर मला बोलायचे आहे.

**मा. महापौर :-**

आपले मत मांडा.

**शरद पाटील :-**

आपण या शहरामध्ये या रस्त्यांना जी नाव देत आहोत. तर एकाच महापुरूषांची नावे अनेक रस्त्याला होत आहेत आणि या शहरामध्ये जर कोणी ॲडरेस विचारायला गेले तर त्या नागरिकाची दिशाभूल होईल त्यामुळे या नावाचा विचार करण्यात यावा. आम्ही त्या नावाच्या विरोधात नाही. पण त्या महापुरूषाचे नाव एकाच रस्त्याला असावे. अनेक रस्त्याला तेच नाव असल्यामुळे या शहरामध्ये येणारे नागरिकांचे जे टुरिझम येतात त्यांची दिशाभूल होईल म्हणून आपण तसा विचार करावा. बरीचशी नाव डबल-डबल आहेत. दोन-दोन, तीन-तीन रस्त्याला एकच नाव आहे. ही माझी सुचना आहे या सुचनेवर विचार करण्यात यावा.

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, माझी एक सुचना आहे ती आपण सामावून घ्यावी. स्वातंत्र्य सेनानी भिकालाल हरगोविंदास मोदी हे मिरा रोड येथे राहत होते आणि त्यांचा मृत्यू झालेला आहे तर त्यांचे नाव कोणत्या तरी रोडवर किंवा चार रस्त्यावर दयावे व त्यांचे नाव समाविष्ट करुन घ्यावे.

**एस. ए. खान :-**

माझे अनुमोदन आहे.

**शुभांगी नाईक :-**

मा. महापौर मॅडम, गोडदेव चौकाला गोडदेव चौक म्हणून नाव देण्यात यावे.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, माझ्याजवळ ७६ नावांची लिस्ट आहे. ह्याच्यामध्ये संपूर्णपणे संलग्न करुन द्यावी अशी आपल्याला नम्र विनंती आहे. मी ती लिस्ट आपल्याकडे पाठवून देत आहे. यामध्ये देशाच्या पातळीवर किर्तीमान असलेले सर्व क्रिडा, त्यानंतर सर्व क्षेत्रातले.

**शिवप्रकाश भुदेका :-**

मा. महापौर मॅडम, स्वातंत्र्य सेनानी रतनलाल जोशी.

**शरद पाटील :-**

मा. महापौर मॅडम, मी जी सुचना केली आहे त्याबाबत आपण काहीतरी सांगा ना. या शहरामध्ये दोन-दोन, तीन-तीन रोडला एकाच महापुरूषाचे नाव आहे तर कसे चालेल? एकाच महापुरुषाचे नाव दिले तर कसे चालेल ते सांगा ना.

**प्रकाश दुबोले :-**

मा. महापौर मॅडम, काशी मिरा रोड ते सुभाष लेन, नंदू पाटील राहतात तिथे शाहू महाराजांचे नाव दयावे.

**चंद्रकांत मोदी :-**

मा. महापौर मॅडम, मिरा के रोड अंदर शरयू ब्राम्हण परिवार बहूत बडा है। तो शरयूमाता चौक, सृष्टी-पोलिस चौकी है, वहा मेरी सुचना है की और शितल नगर व शांती नगर के बिच जो रोड है उसके नाम के लिए वहाँ पटेल समाज काफी है तो सरदार पटेल रोड का नाम दिया जाए। कनकिया पोलिस स्टेशन के पास जय अमराव मार्ग किया जाए। सेक्टर नं.३ मे जो अंदर का रोड है बुध्दिसागर जैन ऐसा नाम दिया जाए। सिंधी पंचायती का झुलेलाल रोड ऐसा नाम दिया जाए इसलिए पत्रव्यवहार गया है तो झुलेलाल यह नाम दिया जाए।

**अनिता पाटील :-**

मा. महापौर मॅडम, सृष्टीमध्ये जी पोलिस चौकी जवळ जो चौक आहे त्याला शरयूमाता चौकाचे नाव दिले जावे.

(सन्मा. सभागृह नेते श्री. हॅरल बोर्जीस यांनी प्रकरण क्र. ७६ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**तुळशीदास म्हात्रे :-**

स्थायी समितीने दिलेली ही नाव आहेत. त्याची ही शिफारस आहे. आता गोडदेवला गोडदेव चौक आहे ना. तर तिथे तुम्ही नाव कशाला बदलता.

**रोहिदास पाटील :-**

एकाच चौकाला आपण तीन ठिकाणी नाव दयायचा आपण विचार कराल का? ज्या चौकाने नाव दिलेले आहे त्याला आपण परत नाव देणार.

**एस. ए. खान :-**

मा. महापौर मॅडम, मिरा रोडमध्ये सेक्टर क्र. ३ मधील रस्त्याचे नाव आपण जाफरी मशाई रोड असे नाव दया.

**मा. महापौर:-**

ठराव सर्वानुमते मंजूर.

**नगरसचिव :-**

सभागृहाला विनंती आहे की सभेची वेळ सभा संपलायला सायं. ७.०० ची आहे व ७.०० वा. ला दोन मिनिटे बाकी आहेत.

**शुभांगी नाईक :-**

गोडदेवला आनंद दिघे चौक म्हणून नाव राहू दे. मग दुसरे नाव दिले नाही तरी वांदा नाही.

**नगरसचिव :-**

सभागृहाची वेळ सायं. ७.०० पर्यंतच आहे.

**केशव घरत :-**

मा. महापौर मॅडम, प्रभाग क्र. १० मध्ये मी जी रस्त्यांची नावे देत आहेत ते समाविष्ट करावे.

**प्रकरण क्र. ७६ :-**

रस्त्यांना नावे देण्याबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. २७/०७/२००६ रोजीचे प्रकरण क्र. ६० व दि. ३१/०८/२००६ रोजीचे प्रकरण क्र. ९४)

**ठराव क्र. ६० :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील खालील रस्ते / चौक यांच्या नामकरण प्रस्तावास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसुची 'ड' मधील प्रकरण ११ (२) नुसार मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | ठिकाण | नामकरण |
|---|---|---|
| १. | प्लीझंट पार्क रस्ता | महात्मा ज्योतिबा फुले मार्ग |

| अ.क्र. | ठिकाण | नामकरण |
|---|---|---|
| २. | छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर प्लीझंट पार्क चौक | सावित्रीबाई फुले चौक |
| ३. | लोढा पार्क (रेल्वे बॉम्बस्फोट झालेला चौक) | हास्यकवी डॉ. श्यामसुंदर शर्मा चौक |
| ४. | प्लीझंट पार्क ते जांगिड (हेतलपार्क) | स्व. वसंतराव चव्हाण मार्ग |
| ५. | सृष्टी पोलिस चौकी समोरील चौक | स्वामी. आत्मनंदजी महाराज चौक |
| ६. | एस.के स्टोन ते एम.आयजी कॉम्प्लेक्स रस्ता | महात्मा गांधी मार्ग |
| ७. | भाईंदर (पू.) उड्डाणपूल लगत सर्व्हीस रोड | स्व. राजेश पायलट मार्ग |
| ८. | सुभाषचंद्र बोस मैदान समोरील चौक (उत्तन रोड) | वाल्मिकी चौक |
| ९. | आझादनगर गल्ली नं. २ | अमर शहीद भगतसिंग मार्ग |
| १०. | आझादनगर गल्ली नं. ३ | अमर मौलाना अब्दुल कलाम आझाद मार्ग |
| ११. | रामदेव पार्क रस्ता | श्री. आई माता मार्ग |
| १२. | महाराणा प्रताप येथील यशोदिप बिल्डींग कॉर्नर | जलाराम बाप्पा चौक |
| १३. | प्रकाश मार्केट नारायण नगर क्रॉस रोड | मारुती मंदिर मार्ग |
| १४. | न्यु गोल्डन नेस्ट क्रॉस रोड | जैन मंदिर मार्ग |
| १५. | मिरारोड शांतीनगर मधील चौक | रामपियारी चौक |
| १६. | मिरारोड शांतीनगर सेक्टर नं. ११ समोर मधील चौक | जुलेलाल चौक |
| १७. | शांतीनगर व शितलनगर मधील रस्ता (गणेश मंदिराजवळ) | भारतरत्न सरदार पटेल मार्ग |
| १८. | कनकिया पोलिस चौकी समोरील रोड (स्कुल) | स्वातंत्र्यसैनिक जे. एन. राव मार्ग |
| १९. | शांतीनगर सेक्टर नं. ३ मधील रस्ता | बुध्दीसागर मार्ग |
| २०. | शांतीनगर अय्यपा मंदिर समोरील चौक | जाफरी सायगी चौक |
| २१. | शांतीनगर सेक्टर क्र. ७ मधील रस्ता | जय अंबे मार्ग |
| २२. | शांतीनगर सेक्टर क्र. ८ मधील रस्ता | साईबाबा मार्ग |
| २३. | शांतीनगर सेक्टर क्र.९ मधील रस्ता | भोलेनाथ मार्ग |
| २४. | शांतीनगर सेक्टर क्र. ५ मधील रस्ता | बिल्लावर असोसिएशन मार्ग |
| २५. | शांतीनगर सेक्टर क्र. ५ समोरील रस्ता (भारत गॅस समोर) | स्वातंत्र्यसैनिक भिखालाल एच. मोदी मार्ग |
| २६. | शांतीनगर रस्ता मासळी मार्केट समोरील चौक | सरयु माता मार्ग |
| २७. | नर्मदा कुंज ते नाकोडा बिल्डींग पर्यंत गार्डन | नर्मदा - महादेव गार्डन |
| २८. | मिरा रोड गोकुळ व्हिलेज चौक | लिटल फ्लॉवर चौक |
| २९ | देवचंदनगर, आकाशगंगा, अशोक सम्राट, पार्श्वनगर ५ मधील चौक | पंजाबी केसरी आचार्य श्री. विजय वल्लभ सुरी स्वरजी महाराजा साहेब चौक |

वरील नामकरणाचे फलक बसविणेकामी येणाऱ्या खार्चास सुध्दा मान्यता देण्यांत येत आहे. सदर ठरावाची त्वरीत अंमलबजावणी करण्यात यावी.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस** **अनुमोदन :- श्री. परशुराम पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, सायं. ७.०० वाजलेले आहे. तरी सभा आपण पुढे घ्यावी. प्रत्येकाचे प्रस्ताव आहे.

**रतन पाटील :-**

सदस्यांच्या सुचना आहेत त्या सुचना घेण्यात याव्यात.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्यांनी शांत बसावे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

अजून 'ज' चे प्रस्ताव आहेत.

**मा. महापौर :-**

सभागृहापुढे 'ज'चे प्रस्ताव मांडलेले आहेत. सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल, ह्यांचा पहिला व दुसरा प्रश्न आहे. तिसरा प्रश्न सन्मा. सदस्या रिटा शाह, चौथा प्रश्न सन्मा. सदस्या नयना म्हात्रे, सन्मा. सदस्य प्रेमनाथ पाटील यांनी 'ज'चे प्रस्ताव दिलेले आहेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-.**

साहेब, वेळ संपलेली आहे. सचिव साहेब सायं. ७.०० वाजलेले आहे. ही सभा तहकूब झालेली आहे. सायं. ७.०० नंतर आपण सभा चालवू शकत नाही. ह्याची नोंद करा.

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ७९ चे वाचन केले.)

**मा. महापौर :-**

'ज' चे प्रस्ताव रितसर विषयपटलावर घेण्यात येतील. त्यामुळे हे विषय पेंडीग ठेवण्यात येत आहे. आजची ही सभा संपली आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, आपण 'ज' चे प्रस्ताव अशापद्धतीने परत परत घेणे हे बरोबर नाही.

**जयंत पाटील :-**

विषय क्र. ७७ महानगरपालिका कर्मचाऱ्यांना दिवाळीकरिता अनुदान देणेबाबत. आपला हा ठराव पारित झालेला आहे. परंतु, जर प्रोसिडिंगला मंजुरी मिळाली नाही तर त्यांना सानुग्रह अनुदान वाटता येणार नाही. आपण आत्ताच या प्रोसिडिंगला मंजुरी द्या.

**मा. महापौर :-**

मिरा - भाईंदर हद्दीतील कर्मचारी अधिकारी यांना दिवाळी निमित्त जे सानुग्रह अनुदान आपण आज मंजुर केलेले आहे त्याच्यासाठीच खास ही सभा आज लावलेली आहे. तर दिवाळीच्या अगोदर त्यांना हे सानुग्रह अनुदान देण्यात येईल. जरी प्रोसिडिंग मंजुर झाले नाही तरी याला कायमस्वरुपी मान्यता देण्यात आलेली आहे.

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, आता आपण रुलिंग दिले की, 'ज' चा प्रस्ताव पुढच्या सभेमध्ये रितसर विषय घेण्यात येईल. मी पत्रामध्ये नमुद केलेले आहे की, ह्यावेळी जर प्रस्ताव फेटाळला तर मी उद्यापासून महानगरपालिकेच्या मुख्य दरवाजाच्या समोर उपोषण वर बसणार आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्या रिटा शाह, आपण कोणत्याही प्रकारची उपोषणाला बसण्याची घाई करु नका.

**रिटा शाह :-**

उद्यापासून मी उपोषणला बसणार आहे याची नोंद घ्यावी.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्या पुर्ण सभागृह आपल्याशी सहमत आहे.

(सभागृहात गोंधळ)

**रिटा शाह :-**

सभा तहकूब करा.

**मा. महापौर :-**

सदस्या, विषय विषयपटलावर घेतला जाईल.

**रिटा शाह :-**

आपण ही  सभा तहकूब करा. आपण हा विषय विषयपटलावर घ्यायचा नाही. आमचा २१ (ज) चा हा प्रस्ताव आहे. आणि आपण पुढच्या सभेमध्ये जर तो प्रस्ताव घेतला नाही तर आम्ही उद्यापासून उपोषणाला बसणार.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मी पण उद्यापासून ह्यांच्यासोबत उपोषणाला बसणार.

**रिटा शाह :-**

आम्ही उद्यापासून आमरण उपोषणाकरिता बसणार.

**मा. महापौर :-**

संत गाडगेबाबा अभियानांतर्गत, स्वच्छता अभियानांतर्गत मिरा - भाईंदर ......

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सचिव साहेब, सायं. ७.०० वाजलेले आहे. त्यामुळे पुढचा कोणताही विषय घेता येत नाही. असे घेतले तर हे प्रोसिडिंग चुकीचे होणार आहे. म्हणून ही सभा येथेच थांबवा.

**रतन पाटील :-**

सायं. ७.०० वाजले आहेत.

**प्रकरण क्र. ७९ :-**

सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल यांचे दिनांक ०५/१०/२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. - मालमत्ता नावात फेरबदल बाबत.

(मा. महापौर सो. ह्यांच्या आदेशानुसार सदरील प्रस्ताव पुढील महासभेत प्रशासनाकरण गोषवाऱ्यासह विषयपत्रिकेवर घेण्यात येईल.)

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ८० चे वाचन केले.)

**प्रकरण क्र. ८० :-**

सन्मा. सदस्य श्री. ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल यांचे दिनांक ०५/१०/२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. - मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत सुरू असलेल्या बांधकामाच्या दर्शनी भागात विकासकर्ते यांनी सदर बांधकामाचे परवानगीचे दस्तऐवजेचे फलक लावणेबाबत.

(मा. महापौर सो. ह्यांच्या आदेशानुसार सदरील प्रस्ताव पुढील महासभेत प्रशासनाकरण गोषवाऱ्यासह विषयपत्रिकेवर घेण्यात येईल.)

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ८१ चे वाचन केले.)

**प्रकरण क्र. ८१ :-**

सन्मा. सदस्य श्रीम. रिटा सुभाष शाह यांचे दिनांक ०७/१०/२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. - मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात बिगर मंजुर नकाशा बांधकामाबाबत.

(मा. महापौर सो. ह्यांच्या आदेशानुसार सदरील प्रस्ताव पुढील महासभेत प्रशासनाकरण गोषवाऱ्यासह विषयपत्रिकेवर घेण्यात येईल.)

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ८२ चे वाचन केले.)

**प्रकरण क्र. ८२ :-**

सन्मा. सदस्या श्रीम. नयना गजानन म्हात्रे यांचे दिनांक ०७/१०/२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. - मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विकास योजनेच्या कामामुळे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर, भोला नगर येथील लोक विस्थापित झाले. योजनेत रस्ता रुंदीकरणात विस्थापित झालेल्यांना प्राधान्य देऊन घरे उपलब्ध करून देण्यात यावीत असे स्पष्ट निर्देश शासनाने मनपाकडे दिले आहेत. आरक्षण क्र. २२२ व २२२ अ (बेघरांसाठी घर) या जागेच्या मालकाने / विकासकाने १०१ सदनिका मनपाकडे दि. १६/०८/२००६ रोजी विनामुल्य हस्तांतरीत करणार आहेत असे लेखी पत्र दिले आहे. तरी मनपा ने १०१ सदनिका ताब्यात घेऊन विकास नियंत्रण नियमावलीतील विनियम क्र. ९ टेबल ३-१ ब नुसार विकास योजना अंमलबजावणी कामी विस्तापीत होणाऱ्या झोपडीधारकांना सदरील घरे देऊन पुर्नवसन करणे व घरे वाटप करण्याबाबत मनपाने धोरण निश्चीत करून योग्य निर्णय घेणेबाबत.

(मा. महापौर सो. ह्यांच्या आदेशानुसार सदरील प्रस्ताव पुढील महासभेत प्रशासनाकरण गोषवाऱ्यासह विषयपत्रिकेवर घेण्यात येईल.)

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ८३ चे वाचन केले.)

**प्रकरण क्र. ८३ :-**

सन्मा. सदस्य श्री. प्रेमनाथ गजानन पाटील यांचे दिनांक ०७/१०/२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. - महानगरपालिका कर्मचाऱ्यांना सुट्टीच्या दिवशी केलेल्या कामाचा अतिरिक्त मोबदला देणेबाबत.

(मा. महापौर सो. ह्यांच्या आदेशानुसार सदरील प्रस्ताव पुढील महासभेत प्रशासनाकरण गोषवाऱ्यासह विषयपत्रिकेवर घेण्यात येईल.)

**मा. महापौर :-**

संत गाडगेबाबा अभियानांतर्गत, मिरा - भाईंदरला दुसरे पारितोषिक मिळालेले आहे. कंपनी क्षेत्रामध्ये दुसऱ्या क्रमांकाचे बक्षिस मिरा-भाईंदर शहराला मिळालेले आहे. रक्कमेचा उल्लेख केलेला नाही. वर्तमानपत्रामध्ये हे जाहिर झालेले आहे.

**रतन पाटील :-**

शोक प्रस्ताव. शेख साहेब यांच्या मातोश्रीचे निधन झालेले आहे त्याबद्दल मी शोकप्रस्ताव मांडत आहे.

**मिलन म्हात्रे :-**

रतनलालजी जोशी हे मिरा - भाईंदर महानगरपालिकेच्या परिसरातील स्वातंत्र सैनिक यांचे निधन झाल्याप्रकरणी मी शोकप्रस्ताव मांडत आहे. तसेच, बहुजन समाजाचे अध्यक्ष काशीराम ह्यांचे निधन झालेले आहे त्यांचा ही शोक प्रस्ताव मांडत आहे.

**रतन पाटील :-**

त्याचबरोबर नवघर येथील परशुराम काशीनाथ पाटील यांच्या पत्नी यांचे सुद्धा ही निधन झालेले आहे. तसेच, राई येथील कडू गुरुजी यांचे सुद्धा निधन झालेले आहे. त्यांचा ही शोक प्रस्ताव मांडत आहे.

**रोहित सुवर्णा :-**

मुर्धा गावातील स्थानिक मनिष पाटील ह्यांचे देखिल निधन झालेले आहे. त्याचादेखील शोकप्रस्ताव मांडत आहे.

**नगरसचिव :-**

सर्व सन्मा. सदस्यांनी सभागृहात दोन उभे राहून मृतात्म्यास श्रद्धांजली वाहायची आहे.

**दुःखवटा ठराव क्र. ६३ :-**

स्वातंत्र सैनिक श्री. रतनलालजी जोशी यांचे निधन झालेले आहे. तसेच, बहुजन समाजाचे अध्यक्ष काशीराम ह्यांचे निधन झालेले आहे. तसेच नवघर येथील श्री. परशुराम का. पाटील ह्यांच्या पत्नी ह्यांचेही

दुःखद निधन झालेले आहे. त्याचप्रमाणे राई येथील कडू गुरुजी व मुर्धा गावातील स्थानिक मनिष पाटील ह्यांचे देखिल निधन झालेले आहे. त्या सर्व मृतांना ही सभा श्रध्दांजली अर्पण करत आहे.

सर्व मृतांच्या कुटूंबियांवर ओढवलेल्या दुःखात ही सभा सहभागी असून सर्व मृतात्म्यांस चिरशांती लाभो अशी ईश्वरचरणी प्रार्थना करुन त्यांना श्रद्धांजली वाहण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. रतन पाटील.** **अनुमोदन :- श्री. मिलन म्हात्रे.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(सभागृहात दोन मिनिटे शांतता राखण्यात आली.)

**मा. महापौर :-**

सर्व सन्मा. सदस्या, सन्मा, सरस्य, मनपा अधिकारी वर्ग व मनपा कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे आभार मानून आजची सभा संपल्याचे जाहिर करित आहे.

**सभा संपल्याची वेळ :- सायं. ०७.०० वा.**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**